विली जोली

फक्त एका मिनिटात जीवन बदलू शकतं!

अडथळे आणि आव्हानं हा सामर्थ्य निर्माण करण्याचा जीवनाचा मार्ग आहे



'हे पुस्तक तुमचं जीवन बदलून टाकेल!' – लेस ब्राऊन

MARATHI EDITION

संकल्पना रुजवा, त्यावर विश्वास ठेवा आणि प्राप्त करा!

विली जोली यांच्या यशाचं गमक हेच आहे. 'द मॅग्निफिसंट मोटिव्हेशनल मिनिट' या त्यांच्या प्रत्येक दिवशीच्या एक मिनिटाच्या आकाशवाणीवरच्या कार्यक्रमातून सगळ्या देशभरातले लोक प्रेरणा मिळवतात. पुष्टी देणारे पाठ, गाणी, रंजक गोष्टी, कविता आणि कथा, ज्यांच्याद्वारे आता प्रत्येकजण प्रभावित आणि प्रेरित होऊ शकतो. त्यांची तुम्हाला आयुष्यात अधिक काही मिळवायला आणि आयुष्यालाच अधिक काही द्यायला मदत होईल. तुमची स्वप्नं जगण्यासाठी तुम्हाला मदत करणाऱ्या कल्पना मिळतील. कसं ते शिका.

- प्रत्येक मिनिटाकडून उर्जा मिळवा.
- तुमच्या मनात गाडली गेलेली स्वप्नं पुन्हा नव्याने शोधून काढा.
- 'स्वप्नांचा विनाश करणाऱ्यां'पासून दूर राहा.
- स्वतःच्या आयुष्यावर पकड बसवून भविष्याची रूपरेषा ठरवा.
- एक सकारात्मक आणि उत्पादनक्षम मानसिक दृष्टिकोन विकसित करा.
- अडथळ्यांवर मात करून परिस्थिती सुधारा.
- तुमची स्वप्नं सत्यात उतरवा!
- आयुष्य समरसून जगा आणि प्रत्येक मिनिटाचा आनंद लुटा!

हल्लीच्या, एका मिनिटात भात, इन्स्टंट कॉफी, फास्ट फूड, ताबडतोब रोख रक्कम आणि फोनवरून जलद कर्ज मिळण्याच्या जमान्यात, आम्हाला 'एका मिनिटात प्रेरणा' सादर करायला आनंद होतो आहे. कार्यमग्न लोकांना वेगळा काढण्यासाठी थोडाही किंवा बिलकूलच वेळ नसतो. म्हणून आपलं आयुष्य बदलण्याची हीच वेळ आहे. लक्षात ठेवा, तुमच्याकडे असलेल्या वेळेचं व्यवस्थापन तुम्ही कसं करता हे तुमच्याकडे किती वेळ आहे यापेक्षा जास्त महत्त्वाचं आहे! तुमचं आयुष्य बदलायला फक्त एक मिनिट लागतं! ते आत्ताच करा!

लेखकाविषयी

विली जोली हे एक उत्साही, जोरकस आणि तळमळीचे प्रेरक वक्ते आहेत. कित्येक शाळा, महाविद्यालयं आणि व्यावसायिक संघटना तर त्यांना बोलावतातच, पण बेल अटलांटिक, ब्लू क्रॉस आणि ब्लू शिल्ड, आय.बी.एम., सी.बी.आय., स्प्रिंट आणि पेप्सी कोला हेही त्यांच्यासाठी रांगा लावतात. वॉशिंग्टन डी.सी. आणि साऱ्या देशात लोकप्रिय असलेल्या 'द मॅग्निफिसंट मोटिव्हेशनल मिनिट' या रेडिओ कार्यक्रमाचे निर्माते आणि सादरकर्ते आहेत. मानसशास्त्र आणि समाजशास्त्र यातील पदवी आणि धर्मशास्त्रातील पदव्युत्तर पदवी यांव्यतिरिक्त, विली जोली हे प्रतिभावान, पारितोषिक विजेते जाझ संगीतकार आहेत. तसेच प्रेरणा, स्फूर्ती, मनोरंजन आणि माहिती यांद्वारे इतरांना प्रेरणा देणाऱ्या 'इन्स्पिटेंनमेंट प्लस्' या कंपनीचे संस्थापक आहेत.

फक्त एका मिनिटात जीवन बदलू शकतं!

विलि जोली

अनुवाद : शोभना शिकनीस

MANJUL
मंजुल पब्लिशिंग हाउस

भारतामध्ये सर्वप्रथम प्रकाशित

MANJUL

मंजुल पब्लिशिंग हाउस

पुणे संपादकीय कार्यालय

फ्लॅट नं. 1, पहिला मजला, समर्थ अपार्टमेंट्स,
1031 टिळक रोड, पुणे – 411 002

व्यावसायिक आणि संपादकीय कार्यालय

दुसरा मजला, उषा प्रीत कॉम्प्लेक्स, 42 मालवीय नगर, भोपाळ – 462 003

विक्री आणि विपणन कार्यालय

7/32, अंसारी रोड, दर्यागंज, नवी दिल्ली – 110 002

www.manjulindia.com

वितरण केंद्रे

अहमदाबाद, बेंगलुरू, भोपाळ, कोलकाता, चेन्नई,
हैदराबाद, मुंबई, नवी दिल्ली, पुणे

It Only Takes A Minute to Change Your Life by Willie Jolley – Marathi Edition

विली जोली लिखित इट *ओन्ली टेक्स अ मिनिट टू चेंज युअर लाईफ़*
या मूळ इंग्लिश पुस्तकाचा मराठी अनुवाद

प्रथम मराठी आवृत्ती 2012 साली प्रकाशित
प्रस्तुत तृतीय आवृत्ती 2020 साली प्रकाशित

ISBN : 978-81-8322-254-9

मराठी अनुवाद : शोभना शिकनीस

मुद्रण व बाइंडिंग : रेप्लिका प्रेस प्रायव्हेट लिमिटेड

अर्पणपत्रिका

जिचं प्रेम, पाठिंबा आणि कष्ट यांमुळे हे पुस्तक सत्यात उतरलं, ती माझी पत्नी डी, जी माझी फक्त पत्नीच नव्हे तर माझी जिवलग मैत्रीण आणि त्याहून अधिक म्हणजे माझी राणी आहे तिला हे पुस्तक समर्पित. माझी मुलं, विल्यम आणि ला टोया यांना त्यांच्या प्रेम आणि पाठिंब्याबद्दल. माझी आई, कॅथरीन बी. जोली हिला तिच्या प्रेम, पाठिंबा आणि माझ्यावर ठेवलेला विश्वास यांबद्दल. या पुस्तकाची सुरुवात करण्यासाठी साहाय्य केल्याबद्दल डेव्हिड मेटकाफ यांनाही समर्पित. एक वाचक म्हणून त्यांच्या उच्च दर्जाबद्दल आणि मदतीसाठी ऱ्होंडा डेब्हिस स्मिथ आणि डार्लिन ब्रायन्ट यांना. शेवटी, मी हे पुस्तक लिहीत असताना ज्यांचे निधन झाले, त्या माझ्या सासूबाई लिली मे टेलर यांना हे पुस्तक समर्पित केले आहे. ज्यांनी त्यांच्या मृत्यूपर्यंत मला प्रेम, प्रोत्साहन, प्रेरणा आणि स्फूर्ती दिली आणि तसं त्या आजही करत आहेत. आय लव्ह यू ऑलवेज!

विली जोली

अनुक्रमणिका

प्रास्ताविक

– लेस ब्राऊन

वॉशिंग्टन डी. सी. येथे हार्वर्ड युनिव्हर्सिटीत माझ्या एका कार्यक्रमाच्या वेळी मी विली जोलीला प्रथमच भेटलो. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे माझ्या सादरीकरणाच्या शेवटी, श्रोतृवर्गाच्या प्रश्नांसाठी मी काही मिनिटं ठेवली. एक तरुण माणूस ध्वनिवर्धकाजवळ आला आणि फक्त काही शब्द बोलला. विली जोलीमध्ये काहीतरी विशेष आहे हे मला त्याच वेळी उमगलं आणि आम्हाला एकमेकांशी थोडंसं बोलता यावं म्हणून मी त्याला कार्यक्रमानंतर थांबायला सांगितलं. तो तसं करेल असं त्याने आश्वासन दिलं.

त्या विशिष्ट संध्याकाळी, मुलाखत घेऊ इच्छिणाऱ्या, स्वाक्षऱ्या मागणाऱ्या लोकांनी मला एवढं घेरून टाकलं होतं की विलीला भेटण्याची मी ठरवलेली योजना माझ्या मनातून पूर्णपणे पुसली गेली. माझ्या हॉटेलकडे परतायला एखादा तास मोडला असेल. तिथे पोहोचल्यावर विलीला बघून मी आश्चर्यचकित झालो आणि आनंदलोदेखील. विली जोली त्याच्या चेहऱ्यावर नेहमीच विलसत असलेल्या हास्याने सज्ज होऊन एक पुस्तक वाचत हॉटेलच्या लॉबीत बसला होता. विलीशी फक्त काही मिनिटं बोलल्यावरच माझ्या लक्षात आलं की भविष्यात तो एक महान गृहस्थ बनणार आहे.

त्या वेळेपासून, मोठं स्वप्न बघणारा आणि त्याचा पाठपुरावा करणारा, महान होण्यासाठी कसोशीने प्रयत्न करणारा आणि सतत विकसित होत असणारा असा विली जोली मी बघितला आहे. एक

चांगला प्रतिसाद मिळणारा स्थानिक वक्ता ते देशातील एक अत्याधिक गुणवान तरुण वक्ता असं त्याला विकसित होताना मी पाहिलं आहे. विलीने जेव्हा मला त्याच्या पुस्तकाबद्दल सांगितलं, तेव्हा मी उत्तेजित झालो. भाषण देणं असो, गायन असो, रेडिओवरच्या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन असो, किंवा अगदी तुमच्याशी हस्तांदोलन करणं असो, स्वीकारलेलं प्रत्येक काम विली किती उत्साहाने करतो ते मला माहीत आहे. त्याच्या या पुस्तकात विली जोली सर्वोत्कृष्ट आहे.

विली जसं जगतो त्या पद्धतीने त्याने *इट ओन्ली टेक्स ए मिनिट टू चेंज युअर लाईफ!* हे पुस्तक लिहिलंय – उत्साहाने, उत्तेजनेने आणि ऊर्जेने. प्रेरणादायी आणि त्वरित पचनी पडणाऱ्या कल्पनांनी, रंजक गोष्टींनी आणि प्रगतीकडे वाटचाल करणाऱ्या, आयुष्याकडून अधिक काही मिळवण्यासाठी उत्सुक असलेल्या व्यक्तींसाठी नेमकेपणाने रेखाटलेल्या गोष्टींनी हे पुस्तक ठासून भरलेलं आहे. हे पुस्तक वाचा आणि मग त्याचं पुन्हा वाचन करा. प्रत्येक रंजक गोष्टीत आणि उदाहरणात विलीने घेतलेली काळजी आणि प्रेम अनुभवा. गोष्टींवर चिंतन करा आणि यशाच्या अनुभवांत उडी घ्या. उद्दिष्ट निश्चित करण्याच्या तंत्रांवर पकड घ्या आणि मग त्यांना तुमच्यावर पकड घेऊ द्या. मोठं स्वप्न बघा, मोठा विचार करा आणि आयुष्य भरभरून जगण्याचं धाडस करा.

तुमचं स्वप्न जगा. कारण विली जोलीसारखेच तुम्हीही मोठे बनणार आहात! *इट ओन्ली टेक्स ए मिनिट टू चेंज युअर लाईफ!* *प्रवासाची मजा लुटा!*

परिचय

– डब्ल्यू मिशेल

सकारात्मक विचार करण्याची शक्ती ही काही नवीन कल्पना नाही. प्रेरणेची संकल्पना ही आपल्यासमोर काही अचानक अवतरलेली नाही. पण विली जोली या दोन्ही कल्पनांचं एका नवीन कोऱ्या करकरीत पद्धतीने 'पॅकेज' पेश करतो, त्याची सळसळणारी ऊर्जा आणि उत्साह तो त्या प्रेरणादायी संदेशांमध्ये प्रवाहित करतो. गेली कित्येक वर्षं, विलीने त्याच्या रेडिओच्या श्रोतृवर्गाला दिवसभरातला एक उत्साही क्षण देऊ केलाय. मनोवृत्तीसाठी थोडंसं कॅफेन. त्याच्या 'मॅग्निफिसंट मोटिव्हेशनल मिनिट्स'नी त्याच्या श्रोत्यांना उत्साहित केलंय आणि त्यांच्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्यासाठी, तसंच त्यांचं आयुष्य नियंत्रित करण्यासाठी प्रेरित केलंय.

गेली कित्येक वर्षं, आपल्यासारख्या मोठ्या श्रोतृवृंदापुढे भाषणं देण्याच्या गतीमान क्षेत्रात असलेले कार्यमग्न लोक या मिनिट प्रेरकांचा एक साधन म्हणून उपयोग करत आले आहेत. विमानप्रवास आणि भाषणं यांच्या मधल्या अतिशय थोड्या वेळात, विलीने आमच्यासाठी दिलेल्या संदेशांतून आम्हाला बरीचशी माहिती, स्फूर्ती आणि दिलासा मिळवणं शक्य होतं.

आकाशवाणीच्या लहरींवर जितकी वर्षं विली उल्हास निर्माण करतोय, तेवढीच वर्षं श्रोते, त्याने त्याची सूक्ष्मदृष्टी, लिखित स्वरूपात त्यांच्यासमोर आणावी म्हणून याचना करीत होते. त्याला उत्तर म्हणजेच, विलीची 'मोटिव्हेशनल मिनिट्स', त्याचे वैयक्तिक विचार आणि काही

उत्तम गोष्टी, कल्पना यांचं एकत्रीकरण असलेलं हे पुस्तक. तुम्ही त्यात एका मिनिटासाठी डुबकी मारा किंवा पानन्‌पान एकाच बैठकीत वाचून काढा... प्रत्येक पानाबरोबर तुम्ही अधिक प्रभावित, अधिक निश्चयी आणि जास्त विचारी झालेलं तुम्हाला जाणवेल. तुमच्याकडे अगदी एकच मिनिट जरी असलं, तरी कोणास ठाऊक, त्या मिनिटात तुम्ही तुमचं आयुष्य कदाचित बदलूनदेखील टाकाल. कोणत्याही प्रकल्पात सर्वांत महत्त्वाची गोष्ट कोणती असेल तर सुरुवात करणं. एका जुन्या चिनी म्हणीप्रमाणे सर्वांत मोठा प्रवास एका पावलाने सुरू होतो. तुम्ही या पुस्तकाचं पहिलं पान वाचताच याची खात्री होऊन, पान क्रमांक दोनवर जाल. पहिलं पान वाचा, पहिलं पाऊल टाका आणि प्रवासाला सुरुवात करा आणि या पुस्तकाची फक्त काही पानं तुम्ही जेव्हा वाचून संपवाल, तेव्हा तुम्ही धावायला सुरुवात केलेली असेल आणि तुमच्या ध्येयमार्गावर असाल, तुमच्या स्वप्नांपर्यंत पोहोचण्यासाठी, ते आत्ताच करा! ALOHA!

उपोद्घात

'महान गोष्टी लहान पाकिटांत येतात.' आपण सर्वांनी हा जुना वाक्प्रचार ऐकलेला आहे, पण जेव्हा काही वर्षांपूर्वी मी माझा उदरनिर्वाह, गायन आणि जॅझ संगीत सादर करून करत होतो, त्या वेळेस या उक्तीच्या सामर्थ्याबद्दल मी अनुभवातूनच शिकलो. ग्रॅज्युएट स्कूलमध्ये असताना देशभर वेगवेगळे कार्यक्रम सादर करून मी माझा चरितार्थ चालवत होतो. आठवडाभर मी स्कूलमध्ये जायचो आणि साप्ताहिक सुट्टीच्या वेळी कार्यक्रमांचे सादरीकरण करायचो. महान जॅझ कलाकार जीन कार्न हिच्या सोबत पार्श्वगायक म्हणून गाण्याचा अनुभव हा माझा एक सर्वोत्तम अनुभव होता. ती केवळ एक महान गायिका होती एवढेच नव्हे, तर व्यासपीठावर तिच्यासोबत गाणाऱ्या इतर गायकांच्या बाबतीत अतिशय निःस्वार्थी होती हे मला जेव्हा मी प्रथमच तिच्याबरोबर प्रवासासाठी गेलो, तेव्हा समजले. कार्यक्रमाच्या एका भागात ती नेहमीच वाद्यवृंदाच्या कलाकारांचा आणि गायकांचा परिचय करून द्यायची आणि ते काय करू शकतात हे दाखवून द्यायची त्यांना संधी द्यायची. आमची कौशल्यं व्यक्तिगत पातळीवर सादर करण्याची ही वेळ असायची. अडचण अशी होती की वाद्यवृंदात असलेल्या कलाकारांच्या संख्येमुळे संगीतकारांना त्यांचं वैयक्तिक सादरीकरण करण्यासाठी ठरावीकच वेळ मिळायचा.

आश्चर्यकारकरीत्या, पण ते तसं काम करू शकत नव्हते. त्यांचं वैयक्तिक सादरीकरण ते दिलेल्या वेळेत सादर करू शकत नव्हते. एवढ्या थोड्या वेळात एक छान सादरीकरण करता येणं शक्य आहे, ही कल्पनाच त्यांना पटत नव्हती. त्यांच्यापैकी बरेचजण दिलेल्या वेळेपर्यंत नुकतेच रंगात

येऊ लागायचे; तर इतर काही जण एवढा वेळ घ्यायचे की त्यांच्या प्रमुखाला त्यांना थोपवावं लागायचं, कारण त्यांचं ते वेळ घेणं फारच पेचात आणणारं ठरायचं. मी त्या क्षेत्रात नवखा होतो आणि लज्जास्पद ठरण्याची माझी निश्चितच इच्छा नव्हती! मी इतर लोकांचा अभ्यास केला आणि एक मनोरंजक, उत्तेजक असा ठरावीक वेळेचा कार्यक्रम निर्माण करण्याचं मनात पक्कं ठरवलं. उपलब्ध वेळेचा जास्तीत जास्त फायदा करून घेऊन एक छोटा आणि छान कार्यक्रम सादर करण्याची गरज आहे असं मला जाणवलं. म्हणून जेव्हा माझी पाळी आली, तेव्हा मी गाण्याच्या ओळी, एक तान आणि सुंदर शेवट, असा एकल गाण्याचा कार्यक्रम सादर केला. त्याच्यात श्रोतृवर्गाचाही सहभाग आणि प्रतिसाद अपेक्षित होता. नंतर एक गाणं म्हणायचं होतं, ज्याच्यात मी एक शीघ्र 'रॅप अॅन्ड ऱ्हाईम' गायलं आणि नंतर एक मोठा शेवट केला. सगळं काही दिलेल्या वेळेत बसवलं. तो एक फार यशस्वी कार्यक्रम ठरला आणि त्वरितच तो, कार्यक्रमाचा एक लोकप्रिय भाग झाला. तुमचा मुद्दा लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि सकारात्मक ठसा उमटवण्यासाठी फार वेळ लागत नाही, असं मी त्या अनुभवातून शिकलो! तुमच्याकडे किती वेळ आहे, हे महत्त्वाचं नाही, तर तुम्हाला दिलेल्या वेळेचं व्यवस्थापन तुम्ही कसं करता यातच खरी मेख आहे.

तुमच्याकडे जो मर्यादित वेळ आहे, त्याचा तुम्ही करत असलेल्या गोष्टींसाठी शक्य तितका संपूर्ण आणि अतिशय चांगला उपयोग केला पाहिजे, हेदेखील मी त्या अनुभवातून शिकलो. धैर्याचं महत्त्व आणि ताकदही मी त्यात अनुभवली. महान सादरीकरणं छोटी आणि तरीही अर्थवाही असू शकतात हे मला त्या अनुभवाने शिकवलं! वस्तुत: एक सर्वकालीन महान आविष्कार सर्वांत लहान सादरीकरणांपैकी एक होता. गेटीसबर्गचं भाषण म्हणून संबोधण्यात येणारं, गेटीसबर्ग युद्धभूमीवर अब्राहम लिंकन यांनी दिलेलं ते भाषण होतं. पाच मिनिटांहून कमी वेळात केलेलं ते एक छोटंसं भाषण होतं, पण तरीही ते एक सर्वकालीन महान भाषण म्हणून गणलं गेलं आणि खरं म्हणजे गेटीसबर्ग कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते एडवर्ड एव्हरेट असं म्हणाले की लिंकन पाच मिनिटांत जेवढे प्रभावी ठरले, तेवढे ते स्वत: दोन तासांत ठरले असते तर...

आयुष्य बदलण्यासाठी, संदेश देण्यासाठी, मुद्दा मांडण्यासाठी फार वेळ लागत नाही – फक्त एक मिनिट लागतं! जसजशी आयुष्याची वाटचाल करत गेलो, तसा हा धडा मी लक्षात ठेवला. नंतर मी जिंगल्स गायला आणि व्यावसायिक कार्यक्रम करायला सुरुवात केली. उत्पादनाची विक्री करायला मला साठ सेकंद मिळायची; पुन्हा एकदा मी तीच जुनी संकल्पना वापरली आणि माझा संदेश कमी वेळात द्यायला शिकलो. गोष्ट कमी वेळात सांगण्याच्या माझ्या क्षमतेमुळे मी एक जिंगल सिंगर म्हणून कामात गढून गेलो.

जेव्हा मी सभेत भाषणं द्यायला सुरुवात केली तेव्हाही ही संकल्पना मी विसरलो नाही आणि कमी काळात श्रोतृवृंदाला रुचतील असे कार्यक्रम विकसित करण्याचा मी निर्णय घेतला. माहितीपूर्ण, प्रेरणादायी, स्फूर्तिदायक आणि मनोरंजक तरीही छोटे आणि सुधारित असे कार्यक्रम मी डोळ्यांसमोर आणले. थोड्याशा वेळात मला खूप काही द्यायचं होतं. वेळ फार मौल्यवान आहे आणि लोक नेहमीच घाईत असतात. त्यांना प्रेरणेची गरज असते आणि ती देखील घाईघाईत. त्याचीच परिणती म्हणजे 'द मॅग्निफिसंट मोटिव्हेशनल मिनिट' ही रेडिओ मालिका – त्यातले एका मिनिटाचे प्रेरक संदेश, जे मनोरंजक, माहितीपूर्ण, स्फूर्तिदायक आणि चालना देणारे आहेत.

या संकल्पनेत तुम्हालाही सहभागी करून घेण्यासाठी हे पुस्तक लिहिलं गेलंय. कमीतकमी वेळात अधिकाधिक देण्याच्या दृष्टीने मांडण्यात आलेल्या कल्पना, दीर्घ काळ टिकणारा परिणाम करणाऱ्या पण छोट्या आणि जलद गतीने सांगितलेल्या गोष्टी आणि विचार, यांचा या पुस्तकात अंतर्भाव आहे. एका मिनिटात भात, इन्स्टंट कॉफी, फास्टफूड, रोख रक्कम आणि फोनवर मिळणाऱ्या लोनच्या जगात 'मिनिट मोटिव्हेशन' सादर करताना आम्हाला आनंद होतोय! 'द मॅग्निफिसंट मोटिव्हेशनल मिनिट बुक : *It Only Takes A Minute To Change You Life'*

दिमाखदार मिनिट

गेली कित्येक वर्षं, अनेक लोकांप्रमाणे मीही विचार करत होतो की एक मिनिट म्हणजे वेळेचा एक गौण भाग आहे. मी असा विचार करत होतो की एका मिनिटाचा वैशिष्ट्यपूर्ण उपयोग तास बनवणं एवढाच आहे आणि तास अधिक महत्त्वाचे असतात. 'मी तिथे एका मिनिटात पोहोचतो' किंवा 'एक मिनिट थांबा' असं लोक बोलताना मी ऐकायचो. तेव्हा खरं म्हणजे त्यांच्या बोलण्याचा अर्थ एक मिनिट नसायचा. खरं म्हणजे दहा, पंधरा, वीस किंवा अधिकही मिनिटांबद्दल किंवा जास्त वेळेबद्दल ते बोलत असायचे. एक मिनिट हे फक्त एक अलंकारिक बोलणं असायचं, जे आपण सगळेचजण गृहीत धरतो.

मी जेव्हा मोठा झालो, तेव्हा मला समजलं की महान गोष्टी छोट्या पाकिटात येतात. एक मिनिट हे खूप महत्त्वाचं आहे. एवढंच नव्हे तर सगळ्या यशाची सुरुवात करण्याचा तो एक बिंदू आहे, हे माझ्या लक्षात आलं. पेनीजपासून जसे डॉलर्स बनतात, तशीच मिनिटांचे तास बनतात, हे आपण मनात बिंबवलं पाहिजे. फरक असा आहे की आपण जर पेनीज वाया घालवल्या तर तुमच्याकडे अधिक कमावण्याची क्षमता असते, पण वेळेच्या बाबतीत तसं नाही. तुम्हाला जो वेळ उपलब्ध आहे त्यावर काही मर्यादा आहे. तुम्ही जेवढी मिनिटं जगणार आहात, त्याच्यावरही मर्यादा आहे. म्हणूनच जी मिनिटं तास बनवतात, जे तास दिवस बनवतात, दिवसांचे महिने होतात आणि शेवटी ज्यामुळे वर्षं बनतात, त्या वेळेबद्दल जागरूक राहून मिनिटांचा आदर केला पाहिजे. एकदा गेलेलं ते मिनिट

पुन्हा गवसणार नाही. तुम्ही तुमच्या मिनिटांचं काय करता, त्याच्यावरून तुम्ही तुमच्या आयुष्याचं काय करता हे निश्चित होईल!

वस्तुत: या पृथ्वीतलावर काही थोड्या गोष्टींपैकी वेळ ही अशी एक गोष्ट आहे, जिचं असमान वाटप होऊच शकत नाही. ती सर्वांनाच समप्रमाणात वाटली जाते. प्रत्येक दिवसाचे चोवीस तास, १४४० मिनिटं आपल्या सर्वांकडे असतात. कोणालाही एखादा तास अधिक किंवा कमी दिला जात नाही. प्रत्येकाकडे चोवीस तास असतात आणि दिवसाचा वेळ अधिक वाढवण्यासाठी कोणी करू शकेल असं बिलकूल काहीही नाही. तुमच्याकडे किती पैसा आहे किंवा तुमचा प्रभाव किती आहे त्याचं काहीही महत्त्व नाही. श्रीमंतातला श्रीमंत आणि गरिबांतला गरीब यांच्याकडे सारखाच वेळ असतो. डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडे, माझा मित्र बॉबी याच्यापेक्षा एकही मिनिट जास्त नाही. बॉबी एका पेट्रोल पंपावर गाड्यांच्या खिडक्या धुवायचं काम करतो. तो एक अतिशय सक्षम आणि नेमकेपणाने बोलणारा माणूस आहे. त्याला कठीण काळाचा, अवघड प्रसंगांचा सामना करावा लागला पण त्या परिस्थितीतून तो वर येऊ शकला नाही. त्याचे अंगभूत गुण पूर्णपणे वापरात आणणंही त्याला कधीच जमलं नाही. या दोन व्यक्तींना देण्यात आलेला वेळ सारखाच आहे, पण **त्यांना देण्यात आलेल्या वेळेचं ते काय करतात हे महत्त्वाचं आहे.**

आपण जर वेळेचा विचार पाण्याच्या संदर्भात केला, तर पाण्याच्या एका थेंबाचा विचार आपल्यापैकी बरेच जण खरंच कधी करत नाहीत हे आपल्याला दिसून येईल. पण पाण्याचा तो एक थेंब जेव्हा आणखी काही थेंबांबरोबर मिसळून जातो, तेव्हा या पृथ्वीतलावर सर्वाधिक शक्तिमान ताकद ठरेल अशी एक खवळलेली नदी होऊ शकेल. मिनिटांबद्दलदेखील हे खरं आहे. एकेकटेपणाने विचार केला तर त्यांचा कोणी फारसा विचार करत नाही. पण प्रत्येक मिनिट म्हणजे महानतेची अंतर्भूत शक्ती आहे आणि जेव्हा या मिनिटांचा शहाणपणाने उपयोग केला जाईल तेव्हा ती मिनिटंदेखील प्रचंड उर्जा निर्माण करू शकतील. **एका मिनिटात तुमचं आयुष्य खूप बदलू शकतं!**

'द मॅग्निफिसंट मोटिव्हेशनल मिनिट' या माझ्या दररोजच्या रेडिओवरच्या कार्यक्रमाच्या श्रोतृवर्गाकडून मला जो प्रतिसाद मिळाला,

तो मला हे पुस्तक लिहायला प्रवृत्त करणाऱ्या कारणांपैकी एक प्रमुख कारण होते. फोन, फॅक्स, मेल किंवा अगदी मला रस्त्यामध्ये थांबवूनदेखील ज्या संख्येने लोकांनी माझ्याशी संपर्क साधला, त्यामुळे मी विस्मित झालो. छोट्या, जलद, प्रेरक कल्पनांच्या संकल्पनेने '१ मिनिट मोटिव्हेशन्स'मुळे ते सगळेजण उत्तेजित झाले होते. त्यांनी त्यांच्या मित्रांनाही कार्यक्रम ऐकण्याचं सांगितलं आणि आकाशवाणी केंद्राला कार्यक्रमाबद्दल भरभरून दूरध्वनी आणि पत्रं आली. एखाद्या संहितेची प्रत किंवा आणखी काही पाहिजे असणाऱ्या बऱ्याच श्रोत्यांचे मला दूरध्वनी आले. ती माझी प्राधान्याने करण्याची गोष्ट नसली तरी माझी सगळी हस्तलिखितं एकत्रित स्वरूपात संकलित करून, त्याला पुस्तकाचं स्वरूप देण्याची कल्पना माझ्या मनात चमकून गेली होती.

एक दिवस मला, जिचं आयुष्य प्रेरणादायी मिनिटांमुळे बदललं होतं आणि जिच्या पत्राचा माझ्यावर प्रामुख्याने प्रभाव पडला होता, अशा एका तरुण स्त्रीकडून पत्र आलं. त्या तरुण स्त्रीने नुकतीच महाविद्यालयातून पदवी मिळवली होती आणि नोकरी शोधण्यात तिला यश येत नव्हतं. ती शोध घेत होती, पण तिला सकारात्मक प्रतिसाद मिळत नव्हता. ती अधिकाधिक निराश होत चालली होती. तिला सकाळी बिछान्यातून उठून काही करू नये असं वाटण्याइतक्या संपूर्ण नैराश्याच्या स्थितीत ती गेली. ती बिछान्यातच पडून राहायची, पूर्ण दिवसभर झोपून राहायची. आणखी प्रयत्न करण्यात काहीच उपयोग नाही असं तिला वाटल्याने तिने लवकरच नोकरी शोधण्याचा प्रयत्न करणं सोडून दिलं. परिस्थिती निराशाजनक आहे असं तिला वाटलं.

एक दिवस बिछान्यात पडून असताना योगायोगानेच तिला रेडिओवर 'द मॅग्निफिसंट मोटिव्हेशनल मिनिट' हा कार्यक्रम ऐकायला मिळाला. ती म्हणाली की आयुष्य थोडं वेगळ्या पद्धतीने जगण्याचा एक नवीन दृष्टिकोन तिला त्या कार्यक्रमातून मिळाला. तो प्रेरणादायी मिनिटाचा विशिष्ट कार्यक्रम हा माझा एक ट्रेडमार्क कार्यक्रम झालाय आणि माझ्या सर्वाधिक लोकप्रिय कार्यक्रमांपैकी तो एक आहे. कार्यक्रमाचं नाव आहे 'द लायन अँन्ड द गॅझेल' (सिंह आणि हरिण) आणि त्या तरुण स्त्रीचं आयुष्य त्याने बदलून टाकलं.

सिंह आणि हरिण

प्रत्येक दिवसाकडे, आपण आपलं सर्वस्व ओतावं, आपलं सर्वाधिक चांगलं करावं अशी संधी देणारा दिवस म्हणून पाहणं, ही आज यश मिळवण्याची पायरी आहे. यशाकडे आपण केवळ आपलं इष्टस्थळ म्हणून न पाहता सातत्याने साहसं आणि आव्हानं यांनी भरलेला एक प्रवास या दृष्टिकोनातून बघायला पाहिजे. मित्रांनो, आफ्रिकेत प्रत्येक सकाळी जेव्हा हरिण जागं होतं, तेव्हा सर्वाधिक वेगाने पळणाऱ्या सिंहापेक्षाही आपण वेगाने पळलं पाहिजे, नाहीतर आपल्याला खाऊन टाकलं जाईल, हे त्याला ठाऊक असतं. तसंच प्रत्येक सकाळी जेव्हा एक सिंह जागा होतो, तेव्हा सर्वांत हळू वेगाने पळणाऱ्या हरणापेक्षा अधिक वेगाने पळायला पाहिजे नाहीतर उपाशी मरावं लागेल, हे त्याला माहीत असतं. तुम्ही सिंह आहात की हरिण यामुळे काही फरक पडत नाही. जेव्हा सूर्य उगवतो तेव्हा तुम्ही पळलेलं बरं! लक्षात ठेवा, तुम्ही फक्त विश्वास ठेवलात तर सर्व काही शक्य आहे. मी विली जोली बोलतोय, तुमचा दिवस चांगला जावो!

तिने तो कार्यक्रम त्या दिवशी सकाळी ऐकला आणि तिने निर्णय घेतला पाहिजे हे तिला कळून चुकलं. एकतर तिने आयुष्याबद्दल काहीतरी केलं पाहिजे किंवा मग आयुष्यच तिच्याबाबतीत काहीतरी करेल. या निर्णयाचा पाठपुरावा तिला कृतीने करायचा होता. तिने काहीतरी करणं भाग होतं. तिने मला सांगितलं की, तिच्या डोक्यात प्रकाश पडला आणि तिला एक नवीन दृष्टिकोन मिळाला होता. त्या क्षणीच तिला एकाएकी विश्वास वाटला की तिला केवळ नोकरीच मिळेल असं नव्हे, तर तिला जी पाहिजे ती नोकरी मिळू शकेल. यातली मेख अशी होती की आयुष्यात काहीतरी मिळवायचं असेल तर तिने उठायला हवे आणि सुरुवात करायला हवी.

ती तरुण स्त्री उठली. तो कार्यक्रम रोज ऐकायला तिने सुरुवात केली आणि तिच्या ध्येयाच्या दिशेने वाटचाल सुरू केली. तिची स्वप्नं सत्यात आणण्यासाठी तिने कंबर कसली आणि प्रत्येक दिवसागणिक ती अधिकाधिक मजबूत होत गेली. सुरुवातीला नोकरीच्या शोधात जरी यश

आलं नाही तरी आता तिची मनोभूमिका आणि निश्चय नवीन असल्याने तिने तिचा प्रयत्न सोडला नाही. तिने कार्यक्रम ऐकणं चालू ठेवलं, शोध चालू ठेवला आणि काही आठवड्यातच तिला नुसती नोकरीच मिळाली असं नव्हे, तर अपेक्षेपेक्षा अधिक वेतनाची, तिच्या क्षेत्रातली नोकरी मिळाली!

तिने मला एक फार सुंदर पत्र लिहिलं. तिच्या मित्रमैत्रिणी आणि कुटुंबाला दाखवण्यासाठी तिला मी कार्यक्रमाच्या संहितेच्या प्रती पाठवू शकेन का अशी विचारणा केली. त्याच क्षणी मला उमगलं की लोकांना प्रेरणेची आणि प्रोत्साहनाची नितांत गरज आहे. मला वेळ काढून त्या सगळ्या संहितांचं संकलन करून, त्यांची लोकांबरोबर देवाणघेवाण करणं अनिवार्य आहे. रोजच्या धकाधकीच्या जीवनात बऱ्याच लोकांना प्रेरणा आणि स्वयंसिद्धता यांच्याकडे लक्ष द्यायला फुरसत नसते. पण सकारात्मक माहिती मिळवण्याची त्यांना मोठी भूक असते. प्रेरणा मिळवण्यासाठी त्यांना जलद, छोट्या पद्धतींची गरज असते. त्यांना ताबडतोब प्रेरणा मिळावी असं वाटतं, अगदी एका मिनिटात. म्हणून मला एका मिनिटात प्रेरणा सादर करायला आनंद होतोय, **कारण खरोखरच त्याला अगदी एक मिनिट लागतं, फक्त एक मिनिट... तुमचं आयुष्य बदलण्यासाठी!**

तुम्ही तुमचं आयुष्य बदलण्यासाठी निर्णय घेणं आणि त्यासाठीच्या कृतीची सुरुवात करणं हे या पुस्तकाचं माझं उद्दिष्ट आहे. एक नवीन मनोभूमिका, एक नवीन परिमाण हे पुस्तक वाचल्यानंतर तुम्हाला लाभावं आणि कृती करण्यासाठी तुम्हाला प्रेरणा मिळावी. तसं जर घडलं तर तुम्ही तुमचं आयुष्य बदलण्याची प्रक्रिया चालू केलेली असेल, तुम्ही जसे आहात तिथपासून तुम्ही काय होऊ शकाल त्या परिवर्तनाची प्रक्रिया! मी एकदा असं ऐकलं की नवीन कल्पनांमुळे भारलेलं मन पुन्हा त्याच्या पूर्वस्थितीत कधीच परत येऊ शकत नाही. नवीन कल्पनांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि स्वप्नांचा पाठपुरावा करताना स्वतःच्या आत खोलवर पोहोचण्यासाठी हे पुस्तक तुम्हाला मदत करेल, अशी मला आशा आहे. आत्तापर्यंत तुम्ही काय मिळवलंय किंवा तुम्ही किती यशस्वी आहात याने फरक पडत नाही, आणखी मिळवण्यासाठी आणि पुढे मुसंडी मारत राहण्यासाठी हे पुस्तक तुम्हाला प्रेरणा देईल. प्रत्येक

मिनिट मौल्यवान आहे. प्रत्येक मिनिट एक देणगी आहे, तुमचं आयुष्य बदलण्याची अंगभूत गुणवत्ता असलेलं हे मिनिट ऊर्जेने ठासून भरलंय... तुम्ही जर त्याचा शहाणपणाने उपयोग केलात तर.

कार्पे डिएम (प्रत्येक दिवस सार्थकी लावा!)

दिवसाला घट्ट पकडून ठेवा! कार्पे डिएम! गेली काही वर्षं आपण अधिकाधिक लोकांना दिवस पकडून ठेवण्याबद्दल म्हणजेच तो क्षण परिपूर्ण जगण्याविषयी बोलताना ऐकतोय! रॉबिन विल्यम्सने डेड पोएट्स सोसायटी या त्याच्या चित्रपटात ते लोकप्रिय केलं. ते शर्टांवर, पोस्टरवरदेखील प्रसिद्ध झालं.

'कार्पे डिएम, कार्पे डिएम, दिवस पकडून ठेवा!'

पण मी म्हणतो की तुम्ही 'कार्पे मोमेंट' – 'क्षण पकडून ठेवा' याबद्दलही दिवस पकडून ठेवा सारखंच जागरूक असलं पाहिजे. आपण असं बघितलंय की काही लोक आत्ता एक मिनिट इथे असतात तर पुढच्या मिनिटाला मेलेले असतात! आयुष्य अतिशय विचित्र आणि अनपेक्षित आहे. माझ्या मनात एका बाईच्या गोष्टीचा विचार येतो, जी 'टायटॅनिक' बोटीतून प्रवास करत होती आणि तिला जेवणानंतर गोड खायला फार आवडायचं म्हणून तिने तिचा तो आवडता पदार्थ दिवसभरात नंतर खायचा म्हणून काढून ठेवला होता! लाइफ इज अनसर्टन, इट डेझर्ट फर्स्ट (Life is Uncertain, Eat Dessert First) शीर्षकाच्या गॉर्डन आणि ब्रेचर यांनी लिहिलेल्या पुस्तकात ही संकल्पना विशेषत्वाने मांडली आहे. आयुष्य अतिशय अनिश्चित आणि अकल्पित आहे, म्हणून आपण फक्त दिवसच नव्हे, तर क्षणही पकडला पाहिजे... कार्पे डिएम, कार्पे मोमेंट! (दिवस पकडा आणि क्षण पकडा!)

फक्त एका मिनिटात जीवन बदलू शकतं!

प्रकरण १

तुमचं आयुष्य बदलायला एक मिनिट पुरे!

फक्त एक मिनिट लागतं (अल जॉन्सनकृत)

आयुष्याकडून तुम्हाला चांगली वागणूक मिळत नाही
म्हणून तक्रार करणं आणि रडणं याचा तुम्हाला कंटाळा आला आहे का
तुम्ही बऱ्याच इतर लोकांना पुढे जाताना बघता
ज्या वेळी तुम्ही मात्र जागच्या जागी खिळलेले, कुठेच जात नसता?

तुम्ही बहुतेक या निर्णयाप्रत येऊन पोहोचला आहात का
की असं काहीच नाही जे तुम्ही करू शकाल
ठीक तर मग, फक्त आरशात बघा आणि तुम्हाला दिसेल
तुम्हाला खरंच, खरंच कोण थोपवतंय?

ते आपल्यापैकी प्रत्येकावर अवलंबून आहे
आपल्याला जे पाहिजे ते घडवणं आणि आपल्या आयुष्याची
सूत्रं हातात घेणं
जर त्याला खूप वेळ लागतोय असं तुम्हाला वाटत असेल
तर पुन्हा विचार करा, कारण तेवढा वेळ लागत नाही,
सत्य असं आहे की...

त्याला फक्त लागतं, एक मिनिट
तुमचं मन घट्ट करायला, हीच वेळ आहे धाव घ्यायला..

त्याला फक्त एक मिनिट लागतं, फक्त एक मिनिट लागतं
सुरुवात करायला साठ सेकंद, जिंकायचंय म्हणून निर्णय घ्यायला फक्त सुरुवात करा!

तुमची वैफल्यं कोणती आहेत ते तपासण्यापासून सुरुवात करा
तुम्ही खूप सोसलंय असं ओरडून सांगा
बदलण्यासाठी एवढे पेटून उठा की
तुमचा प्रत्येक संशय आणि भीती नाहीशी होईल

मग तुम्ही खरंच ते करणार आहात असा निश्चय करा
दुसऱ्या सगळ्या निवडींपासून स्वत:ला विभक्त करा
तुम्ही जे बोलता, तुमच्या म्हणण्याचा खरा अर्थ तोच आहे
याची खात्री करा
तुम्ही फक्त नुसता गोंधळच करू शकत नाही

प्रत्येकाच्या प्रवासाची सुरुवात सारखीच होते
एकाच पावलाने, जास्त नाही की कमी नाही
तुम्ही पुढचं पाऊल जे टाकाल ते तुम्हाला दिशा दाखवू देईल
लक्षात ठेवा तो मार्ग तुम्हाला सर्वांत चांगलं मिळवून देणार आहे

फक्त एकच मिनिट लागतं, फक्त एकच मिनिट
तुमचं मन घट्ट करायला, हीच वेळ आहे क्रांती करायला!
फक्त एकच मिनिट लागतं, फक्त एकच मिनिट
सुरुवात करायला साठ सेकंद, जिंकायचंय म्हणून ठरवायला,
फक्त सुरुवात करा!

एका मिनिटाचं महत्त्व

हे पान वाचण्यासाठी तुम्ही जे मिनिट खर्च करत आहात, त्याच फक्त एका मिनिटाच्या महत्त्वाविषयी मला आज आपल्याशी बोलायचंय. ती

कदाचित काही फार मोठी गोष्ट आहे असं तुम्हाला वाटणार नाही, पण तुमची स्वप्नं साकारण्यासाठी एक मिनिट ही एक सुरुवात आहे आणि महत्त्वाची गोष्ट आहे, हे मला तुम्हाला सांगू द्या. एका महान मिनिटापासून एक महान तास होतो, एका महान तासापासून एक महान आठवडा होतो, नंतर मग एक मोठा महिना, मग एक मोठं वर्ष आणि त्या बिंदूपासून तुम्ही एका महान आयुष्याच्या कालावधीचे रचनाकार होऊ शकता; आणि हे सगळं सुरू होतं ते फक्त एका मिनिटापासून! म्हणूनच आपण प्रत्येक मिनिट जपलंच पाहिजे आणि आपल्या मिनिटांचा सुबुद्धपणे उपयोग केला पाहिजे. डॉ. बेंजामिन पेज यांनी ते फार छान सांगितलं आहे. 'माझ्याकडे फक्त एक मिनिट आहे, त्याच्यात फक्त साठ सेकंद आहेत. मी ते नाकारू शकत नाही. कारण ते माझ्यावर लादलं गेलंय. मी त्याच्या मागे गेलो नाही, मी ते निवडलं नाही, पण ते कसं वापरायचं हे माझ्यावर अवलंबून आहे. ते जर मी घालवलं तर मी त्रास भोगलाच पाहिजे. त्याचा जर दुरुपयोग केला तर मी त्याचा जाब दिला पाहिजे. एक छोटंसं, लहानसं मिनिट पण त्याच्यात अनंत काळ सामावला आहे.' म्हणून सभ्य स्त्री-पुरुषहो, तुमचं मिनिट शहाणपणाने वापरा!

किपलिंगने लिहिलंय, 'साठ सेकंदांच्या मूल्याने निष्ठुर मिनिट संपूर्ण भरून टाका.'

साठ सेकंदांच्या धावण्याइतक्या अंतरात. म्हणजे मिनिट फार धारेवर धरणारं असल्याने तुम्ही वेळ शहाणपणाने वापरला पाहिजे. तुमचा हुद्दा काय आहे, तुम्ही कोण आहात याची ते पर्वा करत नाही; तुमच्यासाठी, माझ्यासाठी, अध्यक्षांसाठी, काँग्रेसच्या सदस्यांसाठी, वैद्यकीय तज्ज्ञांसाठी, वकिलांसाठी आणि बाकीच्या इतर प्रत्येकासाठी ते क्षमा न करणारं असं आहे. काळ कोणासाठी थांबत नाही. म्हणून आपण हे समजून घेतलं पाहिजे की आपल्याकडे असलेली सर्वांत मौल्यवान वस्तू म्हणजे मिनिटं आणि आपण त्यांच्याबद्दल जागरूक राहिलं पाहिजे. एकदा का आपण ती घालवली की त्यांची पुन्हा भरपाई होऊ शकत नाही!

या पृथ्वीतलावरच्या प्रत्येक व्यक्तीला जगण्यासाठी एक ठरावीक मुदतीचा वेळ दिलेला असतो. शिवाय, आपल्यापैकी प्रत्येकाला एक

दैनंदिन मोजमापाचाही वेळ दिलेला असतो. प्रत्येक दिवसाचे तास, जे सगळ्यांसाठी निर्विवादपणे अगदी सारखेच असतात. गरीब लोकांपेक्षा श्रीमंत लोकांना प्रत्येक दिवशी अधिक वेळ मिळत नाही, बुटक्या लोकांना उंच लोकांपेक्षा अधिक वेळ मिळत नाही. राजा आणि राणीला त्यांच्या प्रजेपेक्षा अधिक वेळ नसतो.

प्रत्येक दिवसाचे चोवीस तास प्रत्येकाला दिले जातात, त्यांच्या खात्यावर १४४० मिनिटं जमा होत असतात. ती मिनिटं खर्च झाल्यावर तुम्ही त्या दिवसासाठी अधिक मिनिटं खरेदी करू शकत नाही. जेव्हा तुमचा दिवस संपतो तेव्हा ती १४४० मिनिटं वापरली जातात, तुम्ही अधिक वेळ विकत घेऊ शकत नाही, मग तुमच्याकडे कितीही पैसा किंवा शक्ती का असेना?

काळ पुढे सरकतोय, तुम्ही?

मित्रांनो, काळ कोणासाठीही थांबत नाही. तो पुढे सरकतो आणि सरकत राहतो. तो कशाहीसाठी किंवा कोणाहीसाठी थांबत नाही. तुमच्याकडे किती पैसा आहे, किती ताकद आहे किंवा तुमचा किती मान आहे याला महत्त्व नाही. काळ पुढे सरकत राहतो. म्हणून वेळेचा आदर करून त्याचा शहाणपणाने उपयोग केला पाहिजे. कारण तुम्ही कोण आहात याला काळ महत्त्व देत नाही. सर्वांना समान पातळीवर आणणारा असा हा महान काळ आहे. त्याच्या दृष्टिकोनातून प्रत्येक जण समान आहे. श्रीमंत असो वा गरीब, शक्तिमान असो किंवा दुर्बल, मोठा असो किंवा छोटा, काळ प्रत्येकाला सारखाच फायदा देतो. प्रत्येकाकडे दिवसाचे चोवीस तास एवढा सारखाच वेळ असतो, एकही मिनिट अधिक नाही. तुमच्याकडे किती वेळ आहे ही यशाची गुरुकिल्ली नव्हे, कारण तुमच्याकडे फक्त चोवीस तास असतात. प्रत्येक दिवसाची १४४० मिनिटं – महत्त्वाचं आहे ते तुम्ही तुमच्या वेळेचं काय करता? तुमचा वेळ कसा वापरता? तुम्ही तो शहाणपणाने वापरता का तुमची मौल्यवान मिनिटं वाया घालवता. वेळ फुकट घालवून तुम्ही तुमचं आयुष्य भरून टाकता, की आयुष्य घडवण्यासाठी तुम्ही तुमचा वेळ सत्कारणी लावता? तुम्ही तुमचा वेळ

कसा वापरता यावर तुमचं यश किंवा अपयश अवलंबून आहे. काळ पुढे सरकतो... तुम्ही सरकताय का?

प्रत्येक मिनिट मौल्यवान आहे, कारण ते परत आणता येत नाही. एकदा का दिवस मावळला, की निघून गेलेली वेळ आपण पुन्हा अनुभवू शकत नाही. प्रत्येक दिवसाचं त्याचं वेगळं असं स्वतः:चं वेळेचं माप असतं आणि ते पुन्हा जगता येत नाही. एकदा का ती वेळ टळून गेली, की तिचं काम संपतं म्हणून आपण ती शहाणपणाने वापरली पाहिजे, कारण या पृथ्वीतलावर आपल्याला किती वेळ आहे, याची आपल्याला काहीच खात्री नाही. स्टीव्ह हार्डिमन या माझ्या मित्राने मला एक फार सुंदर अवतरण पाठवलं, ज्यामध्ये म्हटलंय, 'मी आज काय करतोय हे महत्त्वाचं आहे, कारण माझ्या आयुष्याचा एक दिवस मी त्यासाठी खर्ची घालतोय. मी जे मिळवेन, ते नक्कीच योग्य असणार कारण त्याची किंमत खूप आहे!' मित्रांनो, आपण आपली मिनिटं शहाणपणाने वापरणं हे अतिशय आवश्यक आहे कारण त्यांची किंमत खूपच आहे!

वाया घालवण्यासाठी वेळच नाही

आकडेवारीनुसार अमेरिकेतलं सरासरी आयुष्यमान ७९.५ वर्षं आहे. तुम्ही जर आत्ता वीस वर्षांचे असाल तर सध्याच्या आयुष्यमानाच्या आकडेवारीनुसार तुमच्याकडे जगण्यासाठी जेमतेम सातशे महिने आहेत. तुम्ही जर तीस वर्षांचे असाल तर तुमच्याकडे जगण्यासाठी सहाशे महिने आहेत. तुम्ही जर चाळीस वर्षांचे असाल तर तुमच्याकडे जगण्यासाठी अंदाजे चारशे ऐंशी महिने आहेत. तुम्ही जर पन्नास वर्षांचे असाल तर तुमच्याकडे जेमतेम तीनशे वीस महिने आहेत आणि साठ वर्षांचे असाल तर अंदाजे दोनशे चाळीस महिने आहेत आणि जर तुमचं वय ऐंशी किंवा अधिक असेल तर... तर मग तुमच्यावर देवाचा आशीर्वाद आहे! हे जरी फक्त आकडेच असले तरी आपण मनाशी खूणगाठ बांधली पाहिजे की त्याला काहीतरी अर्थ आहे, कारण आपण किती काळ जगणार आहोत, हे आपल्यापैकी कोणालाच ठाऊक नसतं. आपण आपलं आयुष्य गृहीत

धरून चालणार नाही. आयुष्यमान जरी वाढत असलं तरी वेळ मोलाचा आहे आणि आपल्याकडे वाया घालवण्यासाठी खरोखरच बिलकूल वेळ नाही याची आपल्याला जाणीव झाली पाहिजे. तुमचं आयुष्य जोमाने जगा, कारण वाया घालवण्यासाठी आपल्याकडे वेळ नाही.

तुमची मिनिटं तुमच्या उपयोगी पडू द्या!

आपल्या सगळ्यांकडे दिवसाचे चोवीस तास असतात. एक मिनिट जास्त नाही की कमी नाही. तुम्हाला दिल्या गेलेल्या मिनिटांचं तुम्ही काय करता हीच यशाची गुरुकिल्ली आहे. माईक मर्डोक म्हणतात, की आपणा सर्वांना प्रत्येक दिवशी चोवीस खोकी दिली जातात. तुम्ही ती कचऱ्याने भरता की हिऱ्यांनी? बिल गेट्स यांच्याकडे प्रत्येक दिवसाचे चोवीस तास आहेत, तसंच गाडीच्या काचा धुण्याचं काम करणारा माझा मित्र बॉबी याच्याकडेही तेवढेच आहेत. त्यांच्याकडे असलेला वेळ ते कसा उपयोगात आणतात यात फरक आहे. स्थानिक पेट्रोलपंपांवर गाड्यांच्या काचा धुवून बॉबी थोडे पैसे कमावतो. तो खूप नेमकं बोलणारा आणि चांगल्या व्यक्तिमत्त्वाचा माणूस आहे. पण त्याने काचा धुण्यापेक्षा इतर काही काम करण्याचा विचार सोडून दिला, कारण त्याला असं वाटतं की तो त्यापेक्षा चांगलं काही करू शकणार नाही. प्रत्येक वेळी जेव्हा आमचं बोलणं होतं तेव्हा तो नेहमीच म्हणतो, ''मी ते करणार आहे, मी ते करणार आहे. माझ्या आयुष्याचं मी अधिक काहीतरी करणार आहे.'' पण, तो कधीच काही करत नाही. त्याच्यात डॉलर्स कमावण्याची गुणवत्ता असूनदेखील तो दुसऱ्या दिवशी पेनी कमावण्यासाठी काचा धुवायला पुन्हा हजर असतो. त्याची जी मिनिटं तो हिऱ्यांनी भरू शकला असता, ती तो घाणीने भरतो. दुसऱ्या बाजूला बिल गेट्स यांच्याकडे पण चोवीस तासच आहेत, पण ते त्यांचा वेळ वेगळ्याच पद्धतीने वापरतात. पेनीजऐवजी ते त्यांची मिनिटं डॉलर्सनी भरतात. आयुष्य आपल्या सर्वांसाठी कठीण आहे आणि ते प्रत्येकाला आव्हान देतं. काही लोक इतरांच्या खूप मागून सुरुवात करतात; पण आपल्यापैकी प्रत्येक जण आपला वेळ कसा घालवायचा याची निवड करू शकतो. आपण आपले

तास घाणीने भरतो की ऱ्हिंयांनी? आपण आपली मिनिटं चिल्लर पैशांनी भरतो की डॉलर्सनी? आयुष्यात आपण कुठेही असलो, तरी निवड करणं आपल्या हातात असतं. तुमचा वेळ शहाणपणाने वापरा. वेळ ऱ्हिंयांनी भरा, घाणीने नव्हे!

निर्णयाचं सामर्थ्य

तुमचं आयुष्य बदलायला किती वेळ लागतो? बरेच लोक असं मानतात की त्याच्यासाठी खूप वेळ लागतो, पण तो एक भ्रम आहे. वास्तवात त्याला फक्त एक मिनिट लागतं! बरोबर आहे, एक मिनिट! तुम्ही जेव्हा खरोखरच बदलायचा निर्णय घेता आणि दुसऱ्या दिशेने जाण्याचं ठरवता, तेच ते मिनिट, जेव्हा तुम्ही तुमचं आयुष्य वास्तवात बदलता. एवढा वेळ कशाला लागत असेल तर निर्णय घेण्यासाठी तयार व्हायला! कराय़चं की नाही या कल्पनांभोवती, करण्याच्या मुद्यांवर वाद घालत, उड्या मारत राहता. काही लोक तर कल्पनेचा एवढा दीर्घ काळ विचार करतात, की ते 'विश्लेषणाच्या निष्क्रियते'त अडकून पडतात. ते एवढा वेळ त्याच्यावर वादविवाद करतात की वास्तवात काहीच घडून येत नाही. पण ज्या मिनिटाला तुम्ही निर्णय घेऊन कृती करता, ते मिनिटच तुमचं आयुष्य खरोखरच बदलतं. डॉ. हॉवर्ड थरमन, एक महान धर्मशास्त्रवेत्ते त्यांच्या एका भाषणात म्हणाले, "जेव्हा ही पिढी भीतीवर मात करेल त्या क्षणी, त्या मिनिटाला लढाई जिंकली जाईल... अडचणी येतील, पण लढाई जिंकली जाईल!"

माझे मित्र जिम आणि नाओमी ऱ्होड त्यांच्या परिसंवादाची सुरुवात "आयुष्यात तुम्ही महान गोष्टी कशा मिळवता?" या प्रश्नाने करतात. लोक जेव्हा उत्तर देण्यासाठी चुळबुळत राहतात, जिम आणि नाओमी ऱ्होड त्यांना उत्तर देतात, "तुम्हीच ते करण्याचा निर्णय घेता!". तुमचं आयुष्य बदलण्यासाठीची गुरुकिल्ली म्हणजे प्रथम एक निर्णय घेणं. ओजी मॅनडिनो त्याला "निवडीचं गुपित" म्हणतो, लेस ब्राऊन त्याला "निर्णयाचं गतिशास्त्र" म्हणतो, ॲन्थनी रॉबिन्स म्हणतो "तुमच्या

निर्णयांमुळे तुमचं भवितव्य ठरतं''. ते कसंही मांडलं असेल, तुमच्या निवडीमुळेच किंवा मग निवड न केल्यामुळे तुम्ही कोण आहात आणि कुठे आहात हे ठरतं. आयुष्यावर कृती करा नाहीतर आयुष्य तुमच्यावर कृती करेल! एकतर तुम्ही ठरवा नाहीतर आयुष्यच तुमच्यासाठी काहीतरी ठरवेल! आपल्यापैकी किती जणांनी निर्णय घ्यायचा नाही असं ठरवलं आणि आयुष्य कसंही भरकटत जाऊन शेवटी आपल्यासाठी निर्णय घेण्यात आला? आपल्या सर्वांनीच असं केलंय! आयुष्य आपल्यासाठी निर्णय घेईल याची वाट पाहत न राहता, आपणच निर्णय घेऊन आपल्या आयुष्याचा ताबा घेतला पाहिजे. ज्या मिनिटाला तुम्ही निर्णय घेता आणि त्या निर्णयावर कृती करता, तेच ते मिनिट असतं जे तुमचं आयुष्य बदलून टाकतं! निर्णय ही तुमचं आयुष्य बदलवणारी गुरुकिल्ली आहे!

पण निर्णय घेण्यासाठी तुम्हाला कुठे जायचंय ते आधी तुम्हाला माहीत असलं पाहिजे. तुमच्याकडे प्रथम एक स्वप्न असलं पाहिजे. **तुमच्याकडे एक स्वप्न असलंच पाहिजे!**

प्रकरण २

अविश्वसनीय साध्य करण्यासाठी अशक्य गोष्टींची स्वप्नं बघाच!

इतिहासाचा मागोवा घेतल्यास आपल्याला असं आढळून येतं की, प्रत्येक मोठी गोष्ट, अशक्य वाटणारी कामगिरी तेव्हाच घडली जेव्हा कोणीतरी त्याचा ध्यास घेतला, पाठपुरावा केला. मग ते थॉमस एडिसन, हेन्री फोर्ड, अलेक्झांडर ग्रॅहम बेल किंवा राईट ब्रदर्स यांच्यासारखे संशोधक असो; किंवा मग मार्टिन ल्यूथर किंग ज्युनिअर किंवा जिने महिलांच्या मतदानाच्या हक्कासाठी लढा दिला ती सुझान बी. ॲन्थनी असो किंवा नेल्सन मंडेला असोत, ज्यांनी दक्षिण आफ्रिकेतील कैदी ते दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष ही इतरांनी अशक्य मानलेली वाटचाल करून दाखवली. अविश्वसनीय काम करायचं असेल तर तुम्ही प्रथम अशक्य असं स्वप्न पाहिलं पाहिजे! अशक्य स्वप्न बघून तुम्ही प्रेरित झालं पाहिजे आणि ते घडवून आणलं पाहिजे!

मोटिव्हेशन म्हणजे काय? लॅटिन शब्द 'मोटर' या शब्दावरून मोटिव्हेशन हा शब्द आला आहे, ज्याचा अर्थ आहे कृती करणं. मला स्वत:ला मोटिव्हेशनच्या तीन विशिष्ट भागांमध्ये विचार करायला आवडतो, ज्याचा निर्देश मी या पुस्तकात एका साध्या पद्धतीने केला आहे.

कल्पना करा, विश्वास ठेवा आणि साध्य करा!

मॅग्निफिसंट मोटिव्हेशनल मिनिटमध्ये तुमचं स्वागत. एक असं मिनिट, जे माहिती देईल, स्फूर्ती देईल, शिकवेल आणि प्रेरणा देईल; असं मिनिट जे तुमचं आयुष्य बदलेल. प्रेरणादायी मिनिट पूर्णपणे समजावून घेण्यासाठी प्रथम आपण 'मोटिव्हेशन'ची व्याख्या करू. वेबस्टरने केलेल्या

व्याख्येप्रमाणे मोटिव्हेशन (प्रेरणा) म्हणजे, 'अशी गरज किंवा इच्छा जी एखाद्या व्यक्तीला कृती करण्यासाठी प्रवृत्त करते किंवा कारण देते.' प्रेरणेकडे बघताना मी तिचे तीन भाग करतो. पहिला भाग आहे तुम्हाला स्वप्न बघायला लावणं, एका कल्पनेचं बीज पेरणं, एक संकल्पना मनात आणणं, दुसरा भाग म्हणजे तुमच्या स्वतःवर तुम्हाला विश्वास ठेवायला लावणं (बायबलमध्ये म्हटलं आहे की तुम्ही फक्त विश्वास ठेवलात तर सगळं शक्य आहे). तिसरा भाग आहे काहीतरी करण्यासाठी तुम्हाला निर्णय घ्यायला लावणं, तुमच्या स्वप्नांच्या मागे जायला लावणं आणि नंतर ती स्वप्नं साकार करायला लावणं. थोडक्यात तुम्ही कल्पना करू शकता, विश्वास ठेवू शकता आणि नंतर ते साध्य करू शकता, हे तुम्ही समजून घेण्यासाठी तुम्हाला मदत करणं आणि तशी प्रेरणा देणं. तुम्ही ज्याचं स्वप्न बघितलंत ते जर तुम्ही करू शकलात, तर तुम्ही महान होऊ शकता. लक्षात ठेवा, तुम्ही जर फक्त विश्वास ठेवू शकलात तर सगळ्या गोष्टी शक्य आहेत. तुमचा दिवस विलक्षण जाओ!

तुम्ही जर मोठी स्वप्नं बघू शकलात तर सगळ्या गोष्टी खरोखरच शक्य आहेत. त्या स्वप्नांवर विश्वास ठेवा आणि मग तुमच्या सगळ्या अंतर्गत शक्तिनिशी त्या स्वप्नांचा पाठपुरावा करा. माझ्या स्वप्नांचा पाठपुरावा करायचा, लोकांशी बोलून त्यांना प्रेरित करण्याचा निर्णय मी घेतला ते मला आठवतं. मी त्या शंभर मोठ्या पायऱ्या उतरून माझ्या जुन्या, बंद पडलेल्या गाडीकडे जाताना माझ्या सहकाऱ्यांनी मला सांगितलं की मी वेडा आहे. ते हसले, कारण त्यांना माहीत होतं की माझी गाडी शेवटच्या घटका मोजत होती आणि माझ्याकडे होते सगळे मिळून फक्त दोनशे डॉलर्स. ते म्हणाले, "तू नक्कीच वेडा असणार! तुझी चांगली सरकारी नोकरी एका स्वप्नाखातर तू सोडणार! तुला काय करायचंय? तुला एक वक्ता व्हायचंय? तुला तुझी स्वतःची कंपनी चालू करायचीय? तुला पुस्तकं लिहायची आहेत? तुला रेडिओ आणि टेलिव्हिजनवर जायचंय? तुला खूप मोठं व्हायचंय? स्वप्नरंजन बंद कर! भानावर ये! तुझी गाडी दुरुस्त करण्याइतकेदेखील पैसे तुझ्याकडे नाहीत!" माझ्या प्रत्येक पावलाबरोबर ते अधिकाधिक मोठमोठ्याने हसत होते. मी जितका लांब

गेलो ते तितक्याच मोठ्याने हसले! ते म्हणत असलेली शेवटची गोष्टी मी जी ऐकली ती होती, ''तो परत येईल, तो परत येईल.. हा! हा! हा! ही विल बी बँक!''

ते बरोबर होते. मी परत गेलो! पण या वेळेला मी एक सल्लागार म्हणून परतलो, मर्सिडिझ बेन्झ चालवत... मी तिथे असताना जेवढे कमवत होतो त्यापेक्षा सुमारे आठपट अधिक कमाई करत! काही थोड्याच वर्षांत मी माझ्या स्वत:च्या कंपनीचा अध्यक्ष बनलो होतो, मी पुस्तकं लिहिली होती आणि ध्वनिफितींवर संगीताचे अल्बम आणि प्रेरणादायी पुस्तकं मुद्रित केली होती. नुकताच मी नॅशनल कॅपिटल स्पीकर्स असोसिएशनचा अध्यक्ष निवडला गेलो होतो, एक रेडिओ कार्यक्रमही करत होतो आणि मी मजेत होतो!

मर्सिडिझ गाडी, कर्मचारीवर्ग किंवा पैसा यांनी मला यशस्वी बनवलं होतं का? **नाही!** यशाची पाककृती शिकताना मिळालेली ती बाय-प्रॉडक्टस होती. ती काय होती? त्याची गुरुकिल्ली कोणती होती? मुख्य पदार्थ कोणता होता? माझ्या सहकाऱ्यांचा सल्ला ऐकूनही परत न फिरण्यासाठी कोणती गोष्ट कारणीभूत ठरली? आणि सहकाऱ्यांवर विश्वास न ठेवता स्वत:च्या हिमतीवर पावलं टाकणं मला कसं जमलं? माझ्या यशासाठी कोणती गोष्ट अत्यावश्यक होती? काय होतं ते? **ती होती... स्वप्नांची शक्ती आणि त्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्याचा निर्णय!**

तुमच्याकडे एक स्वप्न असलंच पाहिजे!

प्रत्येक दिवस हा एक नवा कोरा दिवस असतो. तुमची स्वप्नं सत्यात उतरवण्यासाठी एक नवी कोरी संधी, इतर दिवसांपेक्षा वेगळा दिवस. पण स्वप्नं खरी करायची असतील तर तुमच्याकडे एक स्वप्न असणं आवश्यक आहे. तुम्ही ज्याच्यासाठी बांधिलकी निर्माण केलेली आहे, असं एक मुक्कामाचं ठिकाण, एक उद्दिष्ट, एक लक्ष्य, फक्त एक संकल्प नव्हे जो एक जानेवारीला करतात आणि पंधरा तारखेपर्यंत विसरतात. तुमच्याकडे एक स्वप्न असलंच पाहिजे. तुमच्याकडे एक स्वप्न असणं निकडीचं आहे. डॉ. बेंजामिन मेज यांनी ते खूप छान शब्दांत मांडलं आहे,

"तुमच्या उद्दिष्टापर्यंत न पोहोचण्यात आयुष्याची शोकांतिका दडलेली नसते, हे प्रथम आपण मनावर बिंबवलं पाहिजे. गाठण्यासाठी उद्दिष्ट नसणं ही शोकांतिका आहे. स्वप्नं पूर्ण न होताच मृत्यू पावणं हे काही संकट नाही, तर मुळात स्वप्नच नसणं हे एक मोठं संकट आहे. तुमच्या आदर्शावर पकड मिळवता न येणं हे संकट नव्हे, पण पकड मिळवण्यासाठी आदर्शच नसणं हा एक दुर्धर प्रसंग आहे. ताऱ्यापर्यंत पोहोचू न शकणं हे लज्जास्पद नाही, पण पोहोचण्यासाठी तारेच नसणं हे लाजिरवाणं आहे. अपयश नव्हे, तर अल्पसंतुष्टता हे एक पाप आहे." सभ्य स्त्री-पुरुषहो, बऱ्याच लोकांकडे अगदी साधंसं ध्येय असतं किंवा ध्येयच नसतं. आणि ज्यांना ते स्वतःच फारसं महत्त्व देत नाहीत असे छोटे संकल्प ते करतात. तुम्ही जर कोणतंच ध्येय ठेवलं नाही तर तुम्हाला काहीच मिळणार नाही! मोठं ध्येय ठेवा, मोठी स्वप्नं बघा, मोठे संकल्प करा आणि लक्षात ठेवा; फक्त तुम्ही विश्वास ठेवलात तर सगळं काही शक्य आहे.

तुम्ही कधी या गोष्टीवर विचार केलाय का की काही लोक लाख डॉलर्स मिळवतात, गमावतात, मग पुन्हा आणखी एक लाख डॉलर्स मिळवतात आणि घालवतात, मग तिसऱ्या वेळेला परत लाख डॉलर्स कमावतात, याच वेळेला इतरांना मात्र जेमतेम उदरनिर्वाहापुरतेच पैसे मिळवता येतात! काही लोक ज्या कशालाही हात लावतात त्याचं सोनं होतं, जेव्हा बाकीच्या लोकांना स्पर्धा जिंकताच येत नाही! उत्तर असं आहे की काही लोकांना यशाची पाककृती ठाऊक असते. केक किंवा पाय बनवण्याची जशी पाककृती आहे. तशीच यशाचीही एक पाककृती आहे. फार छान केक आणि पाय बनवणारे असे कोणीतरी प्रत्येकाला ठाऊक असतात, जशी माझ्या पत्नीची आत्या - बुबा आँटी. बुबा, मी कधीही चाखले नसतील असे उत्तम केक्स आणि पाईज बनवते आणि ती ते दररोज बनवते.

लोक ते पटकन संपवतात म्हणून कधीकधी तिला ते दुप्पट प्रमाणात बनवावे लागतात. पण कितीही पटपट जरी पाईज आणि रोल्स खाल्ले गेले तरी ती ते आणखी बनवू शकते. का? कारण तिला त्याची पाककृती माहीत आहे! आता, असं म्हणू या की कोणीतरी बुबा आँटीच्या घरी

येतं आणि ते पदार्थ खातं. केक्स आणि पाईजची चव त्यांना अतिशय आवडते. म्हणून मग ती व्यक्ती असं ठरवते की घरी जाऊन थोडे केक्स आणि पाईज बनवायचे, पण त्यांच्याकडे तर पाककृतीच नसते. मग ते घरी जाऊन प्रयत्न करतात, प्रयत्न फसतात. मग ते पुन्हा प्रयत्न करतात, पुन्हा अयशस्वी होतात, प्रयत्न करतात, हरतात. मग ते प्रयत्न करतात आणि प्रयत्न फसतो, प्रयत्न करतात, अयशस्वी होतात आणि शेवटी, बऱ्याच इतर लोकांप्रमाणे ते प्रयत्न सोडून देतात. आयुष्यात हे असं घडतं. बहुतेक लोकांना यशस्वी व्हायचं असतं, पण त्यांच्याकडे त्यासाठीची पाककृती नसते. बरेच लोक प्रयत्न करा, चुका करा अशा स्थितीतून सातत्याने आयुष्यभर जात राहतात, ते प्रयत्न करतात, अयशस्वी होतात, नंतर पुन्हा प्रयत्न करतात, अयशस्वी होतात. असं पुन्हा-पुन्हा करत ते शेवटी प्रयत्न सोडून देतात. समजा शंभर लोकांनी एकोणिसाव्या वर्षी एकाच टप्प्यावरून सुरुवात केली असं धरलं; तर आकडेवारी असं दर्शवते की वयाची पासष्टी गाठेपर्यंत त्यांच्यापैकी फक्त एक जण श्रीमंत होईल, चार लोकांची आर्थिक परिस्थिती सुरक्षित असेल, एकोणीस लोक फक्त उदरनिर्वाहापुरतं कमवत असतील, बावीस लोक मृत्यू पावलेले असतील आणि चोपन्न लोक पूर्वीपेक्षा निर्धन होऊन जगण्यासाठी सरकारवर किंवा त्यांच्या कुटुंबावर अवलंबून असतील. हे असं असायला नको!

सगळ्या यशस्वी लोकांमध्ये समान काय असतं? नव्याण्णव टक्के वेळा मला सारखंच उत्तर मिळतं... पैसा! मी शाळेत जात असेन, कॉलेजात, व्यापारी संघटनांत किंवा कॉर्पोरेशनमध्ये, पहिल्या क्रमांकाचं उत्तर हेच असतं, पण ते बरोबर उत्तर नाही. तुम्ही जर यशस्वी असाल तर तुम्हाला हवे तेवढे पैसे तुमच्याकडे असू शकतात; पण तुमचं यश पैशामुळे निश्चित होत नाही. यशाचं एक आनुषंगिक उत्पन्न म्हणजे पैसा, एक परिणाम उत्तर नव्हे. प्रकरणातला मुद्दा : मदर तेरेसा फार यशस्वी झाल्या, पण ती एक श्रीमंत स्त्री नव्हती; आणि तरीही मदर तेरेसा जर कोणत्याही आठवड्याच्या कोणत्याही दिवशी दुपारी टीव्हीवर गेल्या आणि पन्नास मिलियन डॉलर्ससाठी जगभरात एक आवाहन केलं, तर त्यांना ते त्याच दिवशी, दिवस मावळायच्या आत मिळतील! यश पैशामुळे निश्चित होत नाही, पण तुम्ही जर यशस्वी असाल तर तुम्हाला

हवे तेवढे पैसे तुमच्याकडे असू शकतील. मार्टिन ल्यूथर किंग फार यशस्वी होते, पण ते श्रीमंत नव्हते.

मी ज्युनिअर हायस्कूलमध्ये असताना माझ्या एक शिक्षिका होत्या, ज्या नेहमीच मला प्रोत्साहित आणि प्रभावित करायच्या, मी कितीही वाईट वागलो तरी. प्रत्येक दिवशी त्या आमच्या वर्गाला उद्देशून म्हणायच्या, "तुम्ही खूप मोठे होणार आहात, खूप मोठे होणार आहात तुम्ही." त्या बाई काही श्रीमंत स्त्री नाहीत, पण त्या फार यशस्वी आहे. पैसा फक्त त्याच्याच गुणवत्तेवर यश निश्चित करत नाही, पण तुम्ही जर यशस्वी असाल तर तुम्हाला हवे तेवढे पैसे तुमच्याकडे असू शकतील.

सगळ्या यशाचा मुख्य समान घटक कोणता? तो आहे स्वप्न बघण्याची क्षमता! गोष्टी शक्य आहेत अशा प्रकारे त्यांच्याकडे बघणं आणि ज्या अजून सत्यात उतरलेल्या नाहीत, अशा गोष्टी बघणं. स्वप्नं बघायला समर्थ असणं, भविष्यावद्दलची दूरदृष्टी विकसित करण्याची क्षमता असणं. बायबलचं २९:१५ नीतिसूत्र म्हणतं, 'जिथे दूरदृष्टी नसेल तिथे लोक विनाश पावतात.' तुमच्याकडे काही असो किंवा नसो, एक गोष्ट तुमच्याकडे असली पाहिजे – ती म्हणजे स्वप्नं. यशासाठी स्वप्नं अत्यंत आवश्यक आहेत. तुमच्याकडे स्वप्नंच नसेल तर तुम्ही तुमचं स्वप्न खरं तरी कसं करणार? मित्रांनो, तुमच्याकडे स्वप्न असलंच पाहिजे!

काठावर उभं राहणं; तुम्हाला स्वप्न बघितलंच पाहिजे!

जेव्हा मी देशभर प्रवास करत लोकांशी बोलत असतो, तेव्हा ज्याच्यावर मी पुरेसा जोर देऊ शकत नाही असा एक मुद्दा आहे – तो आहे स्वप्नं बघण्याचं महत्त्व, स्वप्नं बघण्याची गरज. आपल्या समाजात ज्यांनी मौल्यवान योगदान दिलेलं आहे, अशा लोकांच्या आयुष्याचं पुनरावलोकन केलं तर एक समान तत्त्व सातत्याने पुढे येतं. त्या सर्वांनी स्वप्नांचं सामर्थ्य ओळखलं होतं. मार्टिन ल्यूथर किंग ज्युनिअर ते वॉल्ट डिस्ने, थॉमस एडिसन ते अल्बर्ट आईनस्टाईन ही यादी अशीच पुढे-पुढे आणि पुढेच जात राहील. यशाचं बीज म्हणजे स्वप्नं. आपलं आयुष्य बदलणारी स्वप्नं कशी बघायची हे आपण शिकणार आहोत. स्वप्नं कशी बघायची, त्यांचा

पाठपुरावा कसा करायचा आणि ती सत्यात कशी आणायची, हेही आपण शिकणार आहोत. तुम्ही जर स्वप्न बघायचं धाडस दाखवलंत, तर तुम्ही जिंकण्याचं धाडसही कराल. आयुष्य परिपूर्ण जगण्याच्या एका महान साहसाच्या काठावर आपण उभे आहोत आणि म्हणून मी उत्तेजित झालो आहे. व्हिक्टर ह्युगोने म्हटलं आहे, ''ज्या कल्पनेची वेळ झाली आहे ती नाकारता येत नाही!'' गेट रेडी, सेट, गो! चला, स्वप्नं बघायला सुरुवात करू या! आयुष्य परिपूर्णतेने जगायला सुरुवात करू या!

कल्पनाशक्तीचं महत्त्व

मी तरुण असताना मला जेव्हा महंमद अलीला भेटायची संधी मिळाली होती, तेव्हा कल्पनाशक्तीचं महत्त्व माझ्या मनावर चांगलंच ठसलं. महंमद अलीच्या एका स्थानिक टेलिव्हिजन कार्यक्रमाच्या चित्रणाची तिकिटं माझी आई मिळवू शकली होती आणि अनायसे मी माझ्या आजीला भेटण्यासाठी तिथे गेलो होतो. काय करावं ते सुचेना एवढा मी उत्तेजित झालो होतो. टेलिव्हिजन स्टुडियोत जाण्याची वेळ होईपर्यंतदेखील मला धीर धरवेना. आम्ही तिथे पोहोचलो आणि आम्हाला पुढच्या रांगेतली आसनंदेखील मिळाली! बिजेता आला आणि त्याने पुढच्या रांगेतल्या सगळ्यांशी हस्तांदोलन केलं. मी खरोखरच महंमद अलीशी हस्तांदोलन केलं हे आता घरी गेल्यावर सगळ्यांना सांगू शकेन म्हणून मी खूपच उत्तेजित झालो!

आता मी जेव्हा मागे वळून पाहतो तेव्हा मला समजतं की त्याच्याशी हस्तांदोलन करणं छान होतं, पण ते धुऊन गेलं. मात्र मुलाखतीच्या वेळी तो जे काही म्हणाला ते मात्र धुऊन किंवा विटून गेलं नाही. त्याने एक असं बीज पेरलं, जे माझ्याबरोबरच वाढलं आणि माझ्या विचारांना आकार देण्यासाठी त्याची मदत झाली. मुलाखतीच्या वेळी त्याला विचारण्यात आलं, की त्याचं मुष्टियुद्ध बघायला लोकांनी एवढी गर्दी करावी, अशी मुष्टियुद्धाच्या प्रांतातली क्रांती त्याने कशी काय घडवून आणली? त्याचं उत्तर होतं की त्याच्या यशाची गुरुकिल्ली होती त्याची कल्पनाशक्ती! तो म्हणाला, ''फक्त चांगलं असणं एवढंच पुरेसं नसतं,

तुमच्याकडे कल्पनाशक्ती असलीच पाहिजे आणि तुम्ही स्वप्नदेखील बघितलीच पाहिजेत. हे मी खूप पूर्वीपासून शिकलो.''

महंमद अलीने स्वत:चं व्यक्तिमत्त्व विकसित केलं. एक असं व्यक्तिमत्त्व, ज्याच्यावर लोकांनी एकतर प्रेम तरी केलं, नाहीतर तिरस्कार तरी. ज्यांनी त्याच्यावर प्रेम केलं ते तो जिंकल्याचं बघायला आले, ज्यांनी त्याचा तिरस्कार केला ते त्याला हरलेलं बघायला आले. काही असो, प्रत्येक आसन भरलेलं होतं! मला आयुष्यभर पुरेल असं काहीतरी मी त्या दिवशी शिकलो. मी स्वप्नांच्या शक्तीविषयी शिकलो. मी असं शिकलो की तुमच्याकडे कल्पनाशक्ती असलीच पाहिजे, तुम्ही निर्मितीक्षम असलंच पाहिजे आणि तुमच्याकडे एक स्वप्न असलंच पाहिजे!

स्वप्नांचं बीज

आयुष्यात जे काही वाढतं ते जसं एका बीजाची निष्पत्ती असतं, तसंच तुमच्या स्वप्नांचंही आहे. स्वप्न म्हणजे यशाचं बीज, यशाची पहिली पायरी. तुम्ही जर मक्याचं बीज रुजवलं आणि त्याला दररोज पाणी घातलं, तर त्याचं मक्याच्या कणसात रूपांतर होतं. तुम्ही जर अकॉर्न घेतलंत, त्याचं रोप लावलंत आणि दररोज पाणी घातलंत तर एक ओकचा वृक्ष म्हणून वाढेल. तुम्ही जर तुमच्या मनात एक स्वप्न पाहिलंत, तुमच्या हृदयात त्याचं रोप रुजवलंत आणि त्याला दररोज पाणी घातलंत, तर तेदेखील वाढेल. तुम्ही त्याला पाणी कसं घालाल? तुम्ही दररोज त्याला म्हणा, ''आय बिलिव्ह आय कॅन, माझा विश्वास आहे की मी करू शकतो, खरं म्हणजे मला माहीत आहे, मी करू शकतो.'' तुमचं स्वप्न खोलवर रुजवा, दररोज त्याला पाणी घाला. संशयाच्या तणामुळे ते गुदमरून जाऊ देऊ नका. मग तुमचं स्वप्न सत्यात उतरेल!

स्वप्न बघणारा, मायकेल जॉर्डन

स्वप्न बघणाऱ्या माणसाचं माझं एक आवडतं उदाहरण म्हणजे मायकेल जॉर्डन. मी मायकेल जॉर्डनबद्दल एक गोष्ट ऐकली. त्याची सुरुवातच ह्या प्रश्नानी होत होती की, ''तो एक महान बास्केटबॉल खेळाडू कशामुळे

झाला?" त्याचं उत्तर असं होतं की जेव्हा तो नवव्या इयत्तेत होता तेव्हा त्याला फारसा चांगला खेळाडू नसल्याचं कारण देऊन बास्केटबॉल टीममधून बाहेर काढण्यात आलं. तो घरी गेला आणि त्याने स्वप्न बघायला सुरुवात केली. त्याच्या प्रशिक्षकाने चूक केलीय हे त्याला पटवून द्यायचं होतं. एकदा मायकेलने ते स्वप्न बघितलं आणि मनात ते चित्र उमटल्यावर त्याला समजलं की तो ते करू शकतो. एकदा त्याला ते तो करू शकेल हे समजल्यावर तो खेळाच्या मैदानात गेला आणि त्याने ते केलं. त्याने ते स्वप्न बघितलं आणि तो एक सर्वकालीन महान बास्केटबॉलपटू म्हणून नावारूपाला आला. त्याला समजलं की आयुष्यात जर महान बनायचं असेल, तर स्वप्न बघायची तुमची इच्छा असली पाहिजे, नंतर तुम्ही त्या स्वप्नांचा पाठपुरावा केला पाहिजे आणि तुमच्या अंगभूत सामर्थ्यापर्यंत पोहोचण्यापासून कधीही कोणाला रोखू देऊ नका. तुम्हीदेखील उंच उडू शकाल आणि आकाशाला गवसणी घालू शकाल!

हँक ॲरॉन, स्लो मोशनमध्ये स्वप्नं बघणं!

एक सर्वकालीन उच्च प्रतीचा होम-रन हिटर होण्यासाठी अद्वितीय ॲथलिट असण्याबरोबरच हँक ॲरॉनने कोणती आयुधं वापरली, याचा निर्देश रॉबर्ट ग्रिसमनने घेतलेल्या हँक ॲरॉनच्या एका मुलाखतीत केला आहे. लक्ष केंद्रित करण्याच्या आणि चित्त एकाग्र करण्याच्या क्षमतेबरोबरच हँक ॲरॉनने स्वतःच्या स्वप्न बघण्याच्या क्षमतेचा उपयोग केला. हँक ॲरॉन पूर्ण लीगमध्ये पिचर्सचा अभ्यास करायचा. त्यांच्या सामर्थ्यावर आणि कमजोरीवर लक्ष केंद्रित करायचा. त्यांच्याकडून होम रन्स कशा मिळवता येतील त्याच्यावर चित्त एकाग्र करायचा. शेवटचं, आणि सर्वांत महत्त्वाचं, तो खेळाबद्दल स्वप्न बघायचा. समोर चेंडू बघत असल्याची कल्पना करायचा आणि त्याच्यावर लक्ष केंद्रित करून, विचारातच चेंडूचा वेग नियंत्रित करता येईपर्यंत चित्त एकाग्र करायचा. मग चेंडू खाली येऊन प्लेटपर्यंत येतानाची स्थिती सावकाश करायचा. नंतर पूर्ण शक्तिनिशी चेंडूला फटका मारायचा आणि त्याचा परिणाम

असायचा... एक होम रन! तो सत्य आणि स्वप्न यांना पराकोटीच्या एकाग्रतेने एकत्र आणायचा, होम रन्सचा एक शक्यता म्हणून विचार करायचा आणि मग ती शक्यता सत्यात रूपांतरित करायचा.

एका महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या गटाशी बोलत असताना एका तरुण मुलीने मला सांगितलं की तिने तिच्या आयुष्यात काही मोठे फरक न पाहिल्याने आणि प्रत्येक रात्री तिला स्वप्नं पडत असल्याने ती गोंधळून गेली होती. ती अजूनपर्यंत यशस्वी झालेली नव्हती. मी तिला सांगितलं की स्वप्नं वेगवेगळ्या प्रकाराची असतात. रात्री पडणाऱ्या स्वप्नांत तुम्हाला फक्त चित्रं आणि तुमच्या मनातल्या गोष्टी दिसतात. सगळं काही छान असलेली अशी काही स्वप्नं असतात आणि काही स्वप्नं वाईट असतात, ज्यांना सर्वसाधारणपणे दुःस्वप्न असं म्हटलं जातं. काही विद्यार्थी हसले आणि म्हणाले की त्यांना घरबसल्या, बिछान्यावरून न उठता किंवा अगदी उठून टेलिव्हिजनदेखील चालू न करता, भीतिदायक चित्रपट फुकट बघायला मिळतो म्हणून त्यांना दुःस्वप्न आवडतात.

दुसऱ्या प्रकारची स्वप्नं दिवास्वप्नं असतात. ज्याच्यामध्ये तुम्ही जागे असलात तरीही दूरवरच्या विचारात वाहवत जाता. तुमचं लक्ष दुसऱ्या योग्य ठिकाणी जेव्हा असायला पाहिजे असतं, तेव्हा, बहुतेक वेळेला शाळेत किंवा कामाच्या ठिकाणी घडतं. तुमचं शरीर एका ठिकाणी आणि मन दुसरीकडे असतं तेव्हा काही शिकणं किंवा मिळवणं कठीण असतं, ही दिवास्वप्नं बघण्यातली एक अडचण आहे. यशात आणि अपयशात फरक घडवणारं स्वप्न हे शेवटच्या प्रकाराचं स्वप्न आहे : कल्पना करण्याचं स्वप्न!

कल्पना करण्याचं स्वप्न!

डॉ. मार्टिन ल्यूथर किंग, ज्युनिअर यांनी दाखवलेलं स्वप्न जसं होतं, त्या प्रकारच्या स्वप्नांवर आज आपण लक्ष केंद्रित करणार आहोत. कल्पना करण्याचं स्वप्न, ज्या गोष्टी अद्याप सत्यात आलेल्या नाहीत अशा गोष्टी शक्यता म्हणून पाहणं. आपण आपल्या मनाला जर उंच उडू दिलं, आपल्यावर मर्यादा घालणाऱ्या बंधनांपासून मुक्तता करून घेतली तर

अविश्वसनीय गोष्टी करायला आपण समर्थ आहोत. तुम्ही जर थांबलात आणि आजूबाजूला नजर टाकलीत, तर तुम्हाला दिसणारी प्रत्येक गोष्ट कोणाच्या तरी आधी सुरू झाली होती असं दिसेल. तुम्ही ऐकता तो रेडिओ, घालता ते कपडे, ज्याच्यात बोलता तो टेलिफोन, तुमचं घर, तुमची गाडी, तुमचं ऑफिस. हजारो वर्षांपूर्वी त्या गोष्टी अस्तित्वात नव्हत्या. पण त्या आज अस्तित्वात आहेत. याचं श्रेय कोणाच्यातरी कल्पनाशक्तीला जातं. तुम्हीदेखील महान गोष्टी करण्यासाठी तुमच्या कल्पनाशक्तीचा उपयोग करू शकता. प्रयत्न करून बघा. तुम्हाला ते खूप आवडेल!

मला नेहमी विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांपैकी एक प्रश्न म्हणजे, "स्वप्नं का बघायची?" चांगला प्रश्न, स्वप्नं का बघायची? कॉलेजचे विद्यार्थी कधी स्वप्नं बघतात, याचा अभ्यास करण्यासाठी आणि त्यांच्या झोपेच्या पद्धती, मेंदूच्या लहरींवर नियंत्रण ठेवण्यासाठी त्या विद्यार्थ्यांना यंत्रांशी जोडण्यात आलं. जेव्हा REM (रॅपिड आय मूव्हमेंट) म्हणजेच डोळ्यांची अतिशय जलदगतीने हालचाल होत असते, तेव्हा तेव्हा स्वप्नं पडतात. प्रत्येक वेळी जेव्हा विद्यार्थ्यांची आरईएम झोपेची पद्धत सुरू झाली आणि विद्यार्थी स्वप्नं बघायला सुरुवात करतायत अशी नोंद मॉनिटर्सनी केली की त्यांना उठवण्यात येत होतं. त्यांना योग्य तेवढा वेळ झोप घेऊ देण्यात आली, तरी त्यांना स्वप्नं बघू देण्यात येत नव्हतं. पहिल्या रात्रीनंतर विद्यार्थी चिडलेल्या मनःस्थितीत जागे झाले. दुसऱ्या रात्रीनंतर, ते चिडखोर अवस्थेत उठले. तिसऱ्या रात्रीनंतर ते विवेकशून्य अवस्थेत उठले आणि चौथ्या रात्रीनंतर ते वेडसर अवस्थेत उठले आणि प्रयोग थांबवण्यात आला! तुम्ही जेव्हा गाढ झोपलेले असता तेव्हा स्वप्नं बघणं अत्यावश्यक आहे, कारण तुमची मनःस्थिती स्थिर ठेवण्यासाठी त्याची मदत होते, हे त्या प्रयोगातून सिद्ध झालं. पण स्वप्नं ही यशाची बीजं असल्याने तुम्ही जागे असतानादेखील स्वप्नं बघणं अत्यावश्यक आहे!

स्वप्नं येतात तरी कुठून?

स्वप्नं, ती कुठून येतात? एक मान्यवर मंत्री आणि लेखक रॉबर्ट शूलर म्हणतात की, स्वप्नं अशी 'आकाशातून टपकत' नाहीत, तर देवाच्या

मनातून येतात. स्वप्नं बघणाऱ्यांशी देव स्वप्नांची जुळणी करतो. त्या स्वप्नाचं स्वागत करेल, त्याचा आदर करेल, त्याला आलिंगन देईल, त्याच्यावर हक्क सांगेल, त्याच्यासाठी जगेल आणि त्याच्यासाठी जीव द्यायलादेखील तयार होईल असा स्वप्न बघणारा त्या स्वप्नासाठी शोधला जातो. देव मानवाला देतो त्या सर्वांत महान देणग्यांपैकी एक म्हणजे स्वप्नं. तरीही, ते आपण स्वीकारतो आणि वाढू देतो, की नाकारतो आणि मारून टाकतो, हे आपल्यावर अवलंबून असतं. नीतिसूत्र २९:१८मध्ये म्हटलंय, 'जिथे दूरदृष्टी नसते, तिथे लोक नाश पावतात.' 'जिथे दूरदृष्टी असते, तिथे लोक प्रगती करतात.' या वचनावर माझा विश्वास आहे. आपण स्वप्नं बघण्याचं धाडस दाखवलं पाहिजे आणि जिंकण्याचंही धैर्य दाखवलं पाहिजे!

मी जेव्हा हॅम्प्टन विद्यापीठात भाषण करत होतो, तेव्हा एका नवीन विद्यार्थ्याने फार गहन प्रश्न विचारला, "जेव्हा तुम्हाला मार्ग दिसत नसतो आणि विशेष आशाही दिसत नसते, तेव्हा तुम्ही स्वप्न कसं बघता?" मी असं बघितलंय की बऱ्याच लोकांनी त्यांच्या स्वप्नांच्या मागे जाणंच सोडून दिलंय. स्वप्नं कशी बघायची हेदेखील त्यांना आठवत नाही आणि म्हणून त्यांच्याकडे स्वप्नं आहे असं त्यांना वाटत नाही.

लॉस एंजेलिसमध्ये भाषण देण्यासाठी गेलेलो असताना मला जॉन ॲलस्टन नावाच्या मित्राबरोबर रात्रीचं जेवण करायला जायची संधी मिळाली. जॉन हा एक फारच उत्कृष्ट वक्ता आहे आणि अमेरिकेतल्या आघाडीच्या शिक्षणतज्ज्ञांपैकी एक मानला जातो. माझी संगीत व्यवसायातली पार्श्वभूमी ठाऊक असल्याने त्याने मला, ज्या ठिकाणी संगीताचा प्रत्यक्ष कार्यक्रम चालू असतो अशा रेस्टॉरंटमध्ये जेवायला नेलं. टेबल मिळण्याची वाट बघत आम्ही थांबलेलो असताना आम्हाला संगीत ऐकू आलं आणि ते फारच छान होतं. जेव्हा वाद्यवृंदासाठी मधे विश्रांतीची वेळ झाली तेव्हा आम्ही पियानोवादकाकडे गेलो आणि तो पियानो किती छान वाजवतो आणि आम्ही संगीताचा किती आनंद लुटला, ते त्याला सांगितलं. मग जॉनने त्याला विचारलं, "मित्रा, तुझं स्वप्न काय आहे?" पियानोवादकाने वर पाहिलं आणि म्हणाला,

"आता माझ्याकडे कोणतंही स्वप्न उरलेलं नाही. मी खूप पूर्वी त्याचा प्रयत्न सोडून दिला." जॉनने आणि मी एकमेकांकडे पाहिलं आणि मग त्या संगीतकाराकडे पाहिलं आणि म्हणालो, "अरेरे! तुम्ही तुमचं स्वप्न सोडून देऊ शकत नाही, कारण स्वप्नाशिवाय जगत राहणं हे खरं जगणंच नव्हे, ते फक्त अस्तित्वात असणं आहे." आमचं टेबल मांडलं जाईपर्यंत आम्ही त्याच्याशी बोलणं पुढे चालू ठेवलं आणि नंतर जेवण संपल्यावरही बोलणं पुढे सुरू ठेवलं. त्या रात्री तिथून निघेपर्यंत तो जणू एक नवीनच माणूस झाला होता, कारण आता तो स्वप्न बघायला तयार झाला होता.

आपली स्वप्नं घट्ट पकडून ठेवा

मी हायस्कूलमध्ये असताना आमच्या एका शिक्षिकेनं लॅंगस्टन ह्यूजेस याच्या एका कवितेबद्दल चर्चा केली होती ती आज, इतक्या वर्षानंतरही माझ्या लक्षात आहे. जर स्वप्नं मृत पावली, तर आपलं आयुष्य हे एका पंख तुटलेल्या पक्ष्यासारखं होईल, म्हणून स्वप्नांना धरून राहा असं तो कवी आपल्याला सांगतो. मित्रांनो, एक पंख तुटलेला पक्षी उडू शकत नाही! बरेच लोक स्वप्नं सोडून देतात आणि स्वप्नं सोडून दिल्यामुळे त्यांनी खरं म्हणजे स्वतःबद्दलच्या शक्यताच सोडून दिलेल्या असतात. आयुष्याची जी आव्हानं आपण या ना त्या स्वरूपात पेलली पाहिजेत, त्या आव्हानांमुळे खूप लोक वैफल्यग्रस्त आणि नाउमेद झालेले आहेत. स्वप्नं ही यशाची बीजं आहेत, हे न ओळखता, बरेचदा न लढताच हार मानताना या लोकांना आपण बघतो. तुमच्या स्वप्नांसाठी लढा द्या, कारण त्यांचं फळ अतिशय मधुर असू शकेल!

जर तुम्ही ते स्वप्न बघू शकलात...

वॉल्ट डिस्ने यांनी म्हटलंय, "तुम्ही जर स्वप्न बघू शकलात तर तुम्ही ती गोष्ट साध्य करू शकाल." ऐकायला छान वाटतं म्हणून केवळ त्यांनी हे म्हटलेलं नाही, त्यांच्या वैयक्तिक अनुभवावरून हे खरं आहे हे त्यांना माहीत होतं म्हणून त्यांनी तसं म्हटलं. वॉल्ट डिस्ने यांनी एक साधा व्यंगचित्रकार म्हणून सुरुवात केली आणि ते एक सर्वकालीन यशस्वी

उद्योजक झाले. त्यांची कथा सुरू होते – त्यांनी सैन्यात जाण्यासाठी शाळा सोडली, मग घरी परतून व्यंगचित्र काढायला सुरुवात केली, नंतर भागीदार घेऊन कार्टून व्यवसायात उतरले आणि मग त्यांचा व्यवसाय चालला नाही. त्या वेळेला डिस्ने निर्धन झाले आणि जगण्यासाठी त्यांना मदत मागावी लागली. त्यांनी कॅलिफोर्नियाला जाऊन पुन्हा सगळं सुरू करायचं ठरवलं, पण त्यांच्याकडे काहीच पैसे नव्हते म्हणून मग त्यांनी कॅलिफोर्नियाचं वन-वे तिकीट काढण्यासाठी होतं नव्हतं ते सगळं विकून टाकलं. चाळीस डॉलर्स. एक चामड्यासारखी दिसणारी सूटकेस, एक संगती न साधणारा सूट आणि काही चित्रकलेचं साहित्य अशा वस्तू घेऊन ते गेले. पण त्यांच्याकडे एक स्वप्नदेखील होतं, कॅलिफोर्नियाला जाऊन त्यांनी एक नवीन कंपनी सुरू केली. त्यांची पीछेहाट झाली आणि दोन अतीव मानसिक नैराश्याच्या झटक्यांतून ते सावरले आणि तरीही त्यांच्याकडे एक स्वप्न होतं. शेवटी त्यांना डिस्नीलँड सुरू करण्यासाठी त्यांची गाडी विकावी लागली, घर गहाण ठेवावं लागलं, पण तरीही त्यांच्याकडे एक स्वप्न होतं. त्यांनी वारेमाप कर्ज काढलं. खूप लोकांनी त्यांना नाकारलं, पण तरीही त्यांच्याकडे एक स्वप्न होतं. बरेच जण त्यांना हसले, त्यांना 'वेडा' म्हणाले पण त्यांनी त्यांचं स्वप्न सोडलं नाही. डिस्नीलँड सुरू झालं आणि अमेरिकेतलं सर्वांत मोठं आकर्षण ठरलं आणि ते एक अब्जाधीश झाले. तुम्ही जर स्वप्न बघू शकलात, तर तुम्ही ते करू शकाल!

स्वप्नं बघितलीच पाहिजेत...

आत्मविश्वास, निश्चय, चिकाटी आणि ठाम विश्वास यांच्या साथीने बघितलेलं स्वप्न सत्यामध्ये रूपांतरित होऊ शकतं. स्वप्न जेवढं मोठं, तेवढी त्याची बक्षिसं मोठी. मार्टिन ल्यूथर किंग, ज्युनिअर यांच्याकडे एक स्वप्न होतं. ते ठाम, निश्चयी आणि चिकाटीचे होते आणि ते महान झाले. मेरी मॅकलिऑड बेथून हिच्याकडे एक स्वप्न होतं. सर्वसाधारणपणे ज्यांना महाविद्यालयात जाता येत नसे अशा काळ्या विद्यार्थ्यांसाठी तिला एक महाविद्यालय सुरू करायचं होतं. तिच्या नावावर फक्त सहा डॉलर्स

असताना तिने डेटोना बीच, फ्लोरिडा इथे शाळा सुरू केली. पण तिच्याकडे अधिक शक्तिशाली असं काही तरी होतं, एक स्वप्न. मेरी मॅकलिऑड बेथून हिचा तिच्या स्वप्नावर विश्वास होता. तिच्याकडे आत्मविश्वास, निश्चय आणि चिकाटी होती. म्हणूनच आज बेथून कुकमन कॉलेज ही या देशातील उच्च शिक्षणासाठीची एक उत्तम संस्था आहे आणि मेरी मॅकलिऑड बेथून ही अमेरिकेतल्या महान स्त्रियांपैकी एक म्हणून लोकांच्या स्मृतीत आहे. स्पड वेब हा पाच फूट सहा इंच उंच आहे. प्रत्येकाने त्याला सांगितलं की तो बास्केटबॉल खेळायच्या दृष्टीने बराच बुटका आहे. त्यामुळे त्याला ते कधीच जमणार नाही. पण स्पड वेबकडे एक स्वप्न होतं, एक मोठं स्वप्न. स्पड वेबने काही वर्षांपूर्वी नॅशनल बास्केटबॉल असोसिएशनची 'डंक स्पर्धा' जिंकली. जोस फेलिसिआनो प्युअर्टो रिकोमध्ये जन्मला. तो जन्मतःच अंध होता आणि अशा काळात तो जन्मला, जेव्हा पैशांसाठी हातात एक कटोरा घेऊन भीक मागण्याखेरीज तो दुसरं काही करू शकणार नाही असं त्याला सांगितलं जात होतं. पण त्याच्याकडे एक स्वप्न होतं, एक फार मोठं स्वप्न, त्यामुळे जोसने ती कल्पना स्वीकारायला नकार दिला. त्याने एक जुनी गिटार शोधून काढली आणि ती कशी वाजवायची हे तो शिकला. कधी कधी त्याच्या बोटांतून रक्त येईपर्यंत त्याने रात्रंदिवस सराव केला. आज जोस फेलिसिआनो हा आपल्या काळाचा एक महान संगीतकार आहे. 'फेलिझ नाविदाद' (मेरी ख्रिसमस) त्याने लिहिलेलं गाणं आपण प्रत्येकजण नाताळच्या सणाला गातो. प्रत्येकाकडे एक स्वप्न असलंच पाहिजे. तुमचं स्वप्न काय आहे? ते जे काही असेल, तुम्ही ते सत्यात आणू शकाल... तुम्ही जर स्वप्नांवर विश्वास ठेवला आणि तुमच्याकडे आत्मविश्वास, निश्चय आणि चिकाटी असेल तर! करोडो डॉलर्सचा व्यवसाय उभारणारे डेक्स्टर युगेर आधी एक ट्रक ड्रायव्हर होते. ते लिहितात, स्वप्न जर पुरेसं मोठं असेल तर सत्यामुळे काही फरक पडत नाही!

मन म्हणजे एक चमत्कार आहे, ते वापरा!

आपण आपल्या मानसिक शक्तीचा फार कमी प्रमाणात वापर करतो, असं मानसशास्त्रज्ञ आणि वैद्यकीय तज्ज्ञ फार वर्षांपासून म्हणत आले

आहेत. आपलं मन जेवढं करायला समर्थ आहे त्यातल्या फक्त पंधरा टक्क्यांचा आपण उपयोग करतो. आपली स्मरणशक्ती, म्हणजेच पूर्वी घडून गेलेल्या घटनांची उजळणी करणारं मन म्हणजे एखाद्या चित्रपटाच्या कॅमेऱ्यासारखं आहे. पण पुढे भविष्यात होणाऱ्या गोष्टींचा 'ट्रेलर'देखील मन दाखवू शकतं, जी आपली स्वप्नं असतात. आपल्या भूतकाळाची उजळणी कशी करायची, हे आपणा सर्वांनाच माहीत असतं, पण स्वप्नं सत्यात कशी उतरवायची आणि भविष्यकाळाचा 'ट्रेलर' आधी कसा बघायचा, हे फार थोड्या लोकांना माहीत असतं. आपण जर स्वप्नं बघायला शिकलो आणि नंतर त्या स्वप्नांच्या मागे जाण्याचं साहस केलं, तर महान गोष्टी करू शकू. तुमच्या मनाचा वापर करा.

तुमच्याकडे एकदा एक स्वप्न असलं, तर ते तेवढंच पुरेसं आहे का? नाही! नुसतं स्वप्न असणं पुरेसं नाही, तुम्ही त्या स्वप्नाचा पाठपुरावा करून ते सत्यात आणलं पाहिजे. स्वप्न म्हणजे केवळ एक सुरुवात आहे. ते जर सत्यात उतरवायचं असेल, तर तुम्ही ते स्वीकारलं पाहिजे. त्यांच्यावर विश्वास ठेवला पाहिजे आणि नंतर त्याचा पाठपुरावा करून ते मिळवलं पाहिजे.

जेव्हा तुम्ही त्या स्वप्नाची संकल्पना मनात रुजवाल, त्याच्यावर विश्वास ठेवाल आणि त्याला खतपाणी घालाल, तेव्हा ते स्वप्न वाढायला लागेल. नंतर तुम्हाला त्या स्वप्नाला मारून टाकणारं, गुदमरवणारं, गळा पकडणारं असं काही त्या स्वप्नाच्या आजूबाजूला वाढणार नाही याबद्दल सावध राहावंच लागेल! अशा गोष्टींना 'स्वप्न उद्ध्वस्त करणारे' असं म्हणायला मला आवडतं. हे 'ड्रीमबस्टर्स', 'घोस्टबस्टर्स'शी बरंच साधर्म्य असलेले आहेत. भुतं उतरवणाऱ्यांचं काम असतं भुतांना मारणं, त्यांचा नाश करणं, त्यांना पूर्णपणे नाहीसं करणं आणि त्यांच्यापासून सुटका करून घेणं. 'स्वप्नं उद्ध्वस्त' करणाऱ्यांचं काम असतं तुमच्या स्वप्नांना ठार करणं, त्यांचा नाश करणं, समूळ नाहीसं करणं आणि त्यांना घालवून देणं.

फरक असा आहे की भुतं नाहीशी करणारे फार ठळकपणे नजरेत भरतात. गर्दीतदेखील ते उठून दिसतात. त्यांचे कपडे मजेशीर असतात, गाड्या विनोदी असतात आणि त्यांच्याकडे प्रोटॉन पॅक्स आणि झिपर्स

असतात. तुम्ही घोस्टबस्टर्सला एक मैल अंतरावरूनदेखील ओळखू शकाल. स्वप्नं उद्ध्वस्त करणारे मात्र गर्दीत उठून दिसत नाहीत. त्यांचे कपडे गमतीशीर नसतात आणि त्यांना ओळखता येईल अशा काही खाणाखुणादेखील नसतात. वस्तुतः ते अगदी तुमच्या जिवलग मित्रासारखे, वर्गमित्रासारखे, चुलत भावासारखे किंवा तुमच्या स्वतःच्या परिवारातल्या कोणासारखेही असू शकतात.

एकदा का तुम्ही स्वप्नं उद्ध्वस्त करणाऱ्याला शोधून काढलंत, की तुमच्याकडे दोन पर्याय असतात. एक म्हणजे त्यांना स्वप्नं घडवणाऱ्यांमध्ये बदलवा, स्फूर्ती द्या, प्रोत्साहित करा आणि ज्या शक्यता अस्तित्वात आहेत, त्याबद्दल त्यांचं प्रबोधन करा. याचा उपयोग जर झाला नाही, तर तुमच्याकडे फक्त एकच पर्याय आहे. त्यांचा त्याग करा! त्यांच्याकडे दुर्लक्ष करा. उत्तर-दक्षिण आणि पूर्व-पश्चिम यांच्यात जेवढं अंतर असेल तेवढंच त्यांच्यात आणि तुमच्यात ठेवा. कारण जर तुम्ही तसं केलं नाहीत तर ते तुमच्या स्वप्नांचा फुगा फोडून टाकतील.

स्वप्नं उद्ध्वस्त करणारे पुष्कळ प्रकारचे असतात पण सर्वसाधारणपणे आढळणारे पाच मोठे प्रकार आहेत जे आजच्या घडीला स्वप्नं उद्ध्वस्त करण्यास कृतिशील आहेत. पहिल्या क्रमांकाचे ड्रीमबस्टर म्हणजे... आपण स्वतः! बरोबर. आपणच. आपणच आपले स्वतःचे सर्वांत वाईट शत्रू असतो. बरेचदा आपण आपल्या उत्तम कल्पना बारगळवतो!

रब्बाईचा मुलगा

शेजारच्या गावात राहायला गेलेल्या धर्मगुरूंच्या मुलासंबंधी एक बोधकथा आहे. तो घरी परतल्यावर, ते गाव काही वेगळं होतं का असं त्याला वडील विचारतात. मुलगा म्हणतो, "होय बाबा, ते तुम्हाला शत्रूवर प्रेम करायला शिकवतात." वडलांनी विरोध केला, "आम्ही इथेही तेच शिकवतो." मुलाने उत्तर दिलं, "होय, पण ते तुम्हाला तुमच्या आतल्या शत्रूवर प्रेम करायला शिकवतात!"

बरेच लोक आयुष्यभर शत्रूचा शोध घेत राहतात. वर-खाली सगळीकडे शोधतात. इथे-तिथे बघतात. सगळीकडे ते शत्रूला शोधतात.

टी.डी. जेक्स म्हणतो तसं, त्यांना कधीही कळत नाही की, 'शत्रू... माझ्या आतच आहे!' पोगोने ते एवढं मार्मिकपणे म्हटलंय, ''आम्ही शत्रूला शोधून काढलंय आणि तो आम्हीच आहोत!''

आतला शत्रू

मी स्वप्नांबद्दल बोलण्यात एवढा वेळ का घालवतो असं कदाचित तुम्ही विचाराल. यशासाठी स्वप्नं अत्यावश्यक आहेत हे त्याचं कारण. तरीही, खूप लोक वास्तवात त्यांचे स्वतःचेच अत्यंत वाईट शत्रू असतात, कारण ते त्यांच्या स्वप्नांना नाकारतात. आपल्यापैकी किती जणांना एक विचार, एक स्वप्न किंवा दूरदृष्टी दिली गेली होती आणि आपण म्हटलं, 'मी ते करू शकत नाही, मी ते करूच शकत नाही!' आणि त्या विचाराला बगल दिली. तुम्हाला जे काही करायचंय ते काहीही तुम्ही करू शकता. एका जुन्या आफ्रिकन वाक्प्रचाराप्रमाणे, 'तुम्ही जर तुमच्या आतल्या शत्रूवर मात केलीत, तर बाहेरचा शत्रू तुमचा केसही वाकडा करू शकणार नाही.' तुम्हाला जे साकार करता येणार नाही असं स्वप्नच देव तुम्हाला देणार नाही. तुम्ही जर त्याची संकल्पना रुजवायला, ते स्वीकारायला, विश्वास ठेवायला तयार असाल... तर तुम्ही ते साध्य करू शकाल!

पर्वत तो नाही... आपणच आहोत!

आपल्या आयुष्यभरात किती जणांना निदान एक तरी चांगली कल्पना सुचली होती? सगळ्यांनाच! आता, किती जणांनी निदान एक चांगली कल्पना वाऱ्यावर सोडून दिली? आपण सर्वांनी! एक चांगली कल्पना तुमचं आयुष्य बदलू शकते आणि तेवढी पुरेशी असते, हे आपण समजावूनच घेतलं नाही आणि तरीही आपली आयुष्यं बदलू शकणाऱ्या चांगल्या कल्पना आपण निष्फळ घालवल्या. एडमंड हिलरीला एका मुलाखतीत विचारण्यात आलं होतं, की माऊंट एव्हरेस्टच्या शिखरावर पोहोचणारा पहिला माणूस होण्यासाठी त्याला सर्वांत मोठ्या कोणत्या आव्हानाला सामोरं जावं लागलं? त्याने सांगितलं की सर्वांत मोठा अडथळा होता तो मानसिक अडथळ्यांवर मात करणं आणि प्रयत्नांपासून स्वतःच परावृत्त

न होणं. प्रयत्न न करताच सोडून देणं हा एक मोठा अडथळा असतो. आपण निव्वळ प्रयत्नच करत नाही म्हणून कित्येक वेळेला आपण आपलं उद्दिष्टच गाठू शकत नाही! 'ते अशक्य आहे.' ते करताच येणार नाही, असं म्हणत आपण प्रयत्न करण्यापासून परावृत्त होतो. बऱ्याच वेळा आपण करत नाही... कारण आपण प्रयत्न करत नाही. सर एडमंड हिलरी माऊंट एव्हरेस्टच्या शिखरावर पोहोचले आणि ते करणं शक्य आहे हे त्यांनी दाखवून दिलं. ते लगेचच इतरांनाही सोपं झालं. ते शक्य आहे हे लोकांनी बघितलं आणि म्हणाले, 'कदाचित मीदेखील ते करू शकेन' आता माऊंट एव्हरेस्टवर सहलीदेखील आयोजित केल्या जातात. सर एडमंड हिलरी यांनी अत्यंत चातुर्याने नमूद केल्याप्रमाणे, "आम्ही एका पर्वतावर विजय मिळवला नाही, तर स्वत:वरच मिळवला!" ते आत्ताच करा! तुमच्या पर्वतावर आजच विजय मिळवा!

प्रत्येक वेळी जेव्हा तुम्ही एखादी गोष्ट मिळवता, तेव्हा तुम्ही तुमच्या स्वाभिमानात, स्वत:बद्दलच्या प्रतिमेत, तुमच्या स्वत:बद्दलच्या संकल्पनेत भर घालत असता. तुमच्या आत्मविश्वासाच्या खात्यात तुम्ही छोटी साठवण करत असता. नकळत तुम्ही म्हणत असता, "मी ठीक आहे, मी व्यवस्थित आहे. मी काय केलं बघा! मी जर हे करू शकलो तर मी आणखीही काही मिळवू शकेन." मोठ्या गोष्टी मिळवण्याची सुरुवात लहान गोष्टी मिळवण्यापासून होते. पण ते तुमच्यापासून सुरू होतं – आतल्या शत्रूवर विजय मिळवून आणि स्वत:वर विश्वास ठेवून!

स्वप्नं उद्ध्वस्त करणारी दुसऱ्या क्रमांकाची गोष्ट म्हणजे नकारात्मक विचार करणाऱ्या, संकुचित मनाच्या लोकांमध्ये मिसळणं! विशेषत: ज्या लोकांना 'करू शकणार नाही' हे शब्द वापरायची सवय असते, अशा लोकांमध्ये. तुम्हाला माहीत आहे, असे लोक 'तुम्ही खूप वयस्कर आहात, तुम्ही हे करू शकणार नाही.', 'तुम्ही खूप लहान आहात, तुम्ही हे करू शकणार नाही.', 'तुम्ही हे करू शकणार नाही, तुमच्याकडे योग्य ती पात्रता नाही.', 'तुम्ही हे करू शकणार नाही, तुमच्याकडे पुरेसं शिक्षण नाही.', 'तुम्ही हे करू शकणार नाही, तुम्ही कधीच यशस्वी होणार नाही.', 'तुम्ही खरं तर हा प्रयत्न सोडून देऊन तुमचा वेळ आणि

मन:स्ताप वाचवावा हे चांगलं...', 'तुम्ही हे करू शकणार नाही, तुम्ही ते करू शकणार नाही, तुम्ही करू शकणार नाही, तुम्ही करू शकणार नाही.' हा वेडेपणा थांबवा! तुम्हाला जे करायचंय ते काहीही तुम्ही करू शकता. तुम्ही जर त्याचं स्वप्न बघू शकलात, तर तुम्ही ते करू शकता... त्याच्यासाठी लढा देण्याची तुमची तयारी असेल तर!

ॲलन टॉर्गेसनने मला ही कविता पाठवली ज्यात हे खूप छान सांगितलंय.

सर्वाधिक धोकादायक लोक ते नव्हेत
जे तुम्हाला दंडुक्यांनी मारतात किंवा बंदुका घेऊन तुम्हाला लुटतात
तुमच्या चारित्र्याच्या विशिष्ट्यांवर हल्ला चढवणारे असे ते शत्रू नसतील
किंवा तुमच्या तोंडावर तुमच्या क्षमतांना तुच्छ लेखण्याचा प्रयत्न करतील
नाही, सर्वाधिक धोकादायक लोक आहेत क्षुद्र मनोवृत्तीचे मित्र
ज्यांचं नकारात्मक बोलणं तुमची स्वप्रतिमा आणि इच्छा चिरडून टाकेल
ते बंदुकीच्या नळीच्या टोकावर तुमचा जीव घेण्याची धमकी देत नाहीत
उलट ते 'हे होऊच शकणार नाही' असं बोलून तुमची स्वप्नं चोरतात
जे तुम्ही कराल असं तुम्हाला वाटतं, ते करणाऱ्या इतरांकडे बोट दाखवत तुम्हाला सांगतात
'तुम्ही हे करू शकणार नाही, हे तुमच्याबाबतीत घडणार नाही.'
त्यांचे शब्द खोटे आहेत त्यामुळे काही फरक पडत नाही.
तरीही तुम्ही ऐकताच, त्यांना तुमच्यापेक्षा चांगलं कळतं असा विचार करत
म्हणून मग तुमच्यापासून तुमची स्वप्नं हिरावून घेतली जातात आणि तुमच्या जिंकण्याच्या आशाही
जे आशीर्वाद तुम्हाला मिळालेले असतात त्यांच्यावरही दरोडा घातला जातो
'तुम्ही करू शकता' हा विश्वास चोरून घेण्यात येतो
एका अज्ञानी, क्षुद्र मनोवृत्तीच्या मित्राकडून लुबाडले जाता
म्हणून मग सर्वांत धोकादायक लोक हे दंडुके किंवा बंदुका घेतलेले नाहीत
'हे करता येणार नाही' असं तुम्हाला जे सारखं सांगत राहतात ते लोक आहेत

कारण एका घरफोड्याने चोरलेलं असतं ते पुन्हा परत मिळू शकतं पण तुमचं स्वप्न आणि तुमची जिंकण्याची इच्छा कशी परत मिळेल!

सूर्य नेहमीच प्रकाशतो, पण....

सूर्य नेहमीच प्रकाशतो, पण कधीकधी ढग सूर्याला झाकोळून टाकतात! तुम्ही कितीही सकारात्मक असलात तरीही, जे लोक सकारात्मक आहेत आणि तुम्हाला प्रोत्साहन देतात, त्यांच्याबरोबरच तुम्ही असलं पाहिजे. जे नकारात्मक आहेत आणि तुम्हाला नाउमेद करतात, त्यांच्याबरोबर नाही. आयुष्यात दोन प्रकारचे लोक असतात, जे तुम्हाला काहीतरी देतात आणि जे तुमच्याकडून काहीतरी काढून घेतात, जे काहीतरी ठेव ठेवतात आणि दुसरे जे काहीतरी वजा करतात. तुमच्या भोवताली कोणाला ठेवायचं त्याचा निर्णय तुम्ही घ्या. हे एखाद्या बँकेच्या खात्यासारखं आहे. लोक एकतर काहीतरी जमा करतील आणि तुमच्या स्वप्नांमध्ये भर घालतील किंवा काढून घेतील आणि तुमच्या स्वप्नांतून काहीतरी कमी करतील. तुमच्या स्वप्नांतून जर हे असे नकारघंटा वाजवणारे लोक काहीतरी घेत आणि वजा करत राहिले तर शेवटी तुमची स्वप्नं 'पुरेशी बचत' या सदरात मोडतील आणि याच्या पुढची पायरी आहे दिवाळखोरी. तुमच्या स्वप्नांचा त्याग करणं. मग स्वत:चं नशीब स्वत:च निश्चित करण्याऐवजी तुम्हाला आयुष्य जे देतं, त्यावर तडजोड करायला लागते. मित्रांनो, ही काही एक रंगीत तालीम नव्हे. तुमच्या स्वप्नांचा पाठपुरावा करा आणि जे तुमच्या खात्यात भर घालतील अशांच्या संपर्कात राहा.

चांगलं शोधा!

जे नेहमीच नकारात्मक असतात असे लोक तुम्हाला माहीत आहेत का? आयुष्यात वाईट काय आहे, फक्त त्याचाच शोध घेणारे आणि तेच शोधून काढणारे? नेहमीच रडतराऊत असलेले आणि गोष्टी किती वाईट आहेत, त्याबद्दल कुरकुरत असलेले? कधीच काही बरोबर नसतं. एकतर खूप गरम नाहीतर खूप गार असतं, खूप गोड नाहीतर खूप आंबट असतं, खूप कडक नाहीतर खूप मऊ असतं. खूप हे आणि खूप ते. काहीही कधीच

बरोब्बर नसतं! अशा लोकांना आयुष्यात काहीतरी चांगलं शोधायला आपण मदत केली पाहिजे. अगदी मोडलेलं घड्याळदेखील दिवसातून दोनदा बरोबर असतंच!

आपल्याला जर अशा नकारात्मक लोकांबद्दल खरोखरच आस्था असेल, तर आपण त्यांना हे समजावून घ्यायला मदत केली पाहिजे की प्रत्येक ढगाला एक रुपेरी किनार असते, जर ती किनार बघायची तुमची इच्छा असेल तर. सकारात्मक लोक आयुष्य अधिक 'एन्जॉय' करतात. एवढंच नव्हे, तर आकडेवारी दर्शवते त्याप्रमाणे ते अधिक काळ जगतात! तुमच्या मित्रांना अधिक सकारात्मक दृष्टीने बघायला मदत करा, नाहीतर ते तुम्हाला अधिक नकारात्मकतेने बघायला मदत करतील. आयुष्यात काय चांगलं आहे ते बघत राहा आणि बहुतेक वेळा तुम्हाला ते सापडेल!

बरेल ते हॅमर... अशक्य काय?

मला एकदा 'रॅप' कलाकार हॅमर यांना भेटण्याची संधी मिळाली. मी रीडर्स डायजेस्टमध्ये त्यांच्याबद्दल जे वाचलं ते खरं आहे का, असं मी आमच्या संभाषणाच्या वेळी त्यांना विचारलं. ते म्हणाले की ते खरं आहे, अगदी खरं आहे. दहा वर्षांपूर्वी मि. हॅमर ओकलॅन्ड बास्केटबॉल स्टेडियमच्या बाहेर रॅप नृत्य करत होते. ओकलॅन्ड 'ए'चा खेळ पाहण्यासाठी आत जाणाऱ्या लोकांना त्यांनी त्यांच्या घरी बनवलेल्या ध्वनिफिती विकल्या. स्टेडियमच्या बाहेर ते त्यांचं नृत्यकौशल्य दाखवत असताना बरेच लोक त्यांची बक्षिसी पुठ्ठ्याच्या खोक्यामध्ये टाकत होते. त्यांचे मित्र त्यांच्याकडे येऊन हसायचे आणि म्हणायचे, ''मित्रा, तुला नृत्य करता येत नाही, तुला 'रॅप' येत नाही! हा सगळा मूर्खपणाचा कारभार तू थांबवत का नाहीस? हे लाजिरवाणं आहे.'' हॅमरनी त्यांना सांगितलं की त्यांना विश्वास आहे की ते रॅप आणि डान्स करू शकतात आणि त्यांच्याकडे एक स्वप्न आहे. ''एक स्वप्न?'' मित्र त्यांच्या तोंडावर हसायचे. तेच मिस्टर स्टॅन्ली कर्क बरेल, ज्यांना 'हॅमर' म्हणून ओळखतात, फोर्ब्ज मासिकात जगातले एक श्रीमंत 'एंटरटेनर' (करमणूक करणारा कलाकार) म्हणून नोंदले गेले. त्यांच्याकडे बघून चेष्टेने हसणारे त्यांचे बरेच मित्र

शेवटी त्यांचे कर्मचारी झाले. जे लोक 'करू शकत नाहीत' असा शब्द वापरतात त्यांचे ऐकू नका, त्यांच्याबरोबर राहू नका आणि त्यांच्याशी संबंध ठेवू नका. ते तुमच्या स्वप्नांना ठार करतील.

आरशातला माणूस

स्वप्नं उद्ध्वस्त करणाऱ्यांची सर्वसाधारण मल्लिनाथी म्हणजे 'तू ते करू शकणार नाहीस', 'ते करायला जे पाहिजे ते तुझ्यात नाही', 'तू पुरेसा चांगला नाहीस'. आपल्या उत्तम कल्पना आणि मोठी स्वप्नं यांपासून आपल्याला परावृत्त करणाऱ्या लोकांशी त्यांचा संबंध असतो. पण अडचण अशी आहे की ही मुक्ताफळं उधळणारी मुख्य व्यक्ती आपण रोज आरशात बघतो. ते आपणच असतो. आपल्यापैकी बरेचजण स्वतःच स्वतःचे सर्वांत वाईट शत्रू असतात. 'आपण हे करू शकणार नाही', 'जे आवश्यक ते आपल्यात नाहीच', 'आपण एवढे चांगले नाही आहोत' असं स्वतःला सांगून आपण आपली उत्तम स्वप्नं आणि कल्पना यांना सोडचिठ्ठी देतो. आपण असे प्रसंग अनुभवले आहेत, जेव्हा आपण स्वतःचा संशय घेतो, आपल्या क्षमतेबद्दल संशय घेतो आणि त्यामुळे जी कामं उत्पादनक्षम आणि फायदेशीर ठरतील, अशा गोष्टींपासून पाय ओढत दूर जातो. फक्त आपण ते करू शकणार नाही असं वाटल्याने! असो, हे मी पूर्वी म्हटलंय आणि पुढेही म्हणत राहीन. तुम्ही जर आतला शत्रू ताब्यात ठेवू शकलात, तर बाहेरचा शत्रू तुमचा केसही वाकडा करू शकणार नाही. आपल्यामधल्या सुप्त गुणांचा शोध घेताना आपण आधी स्वतःपासून सुरुवात केली पाहिजे. आपल्या स्वप्रतिमेवर आपण आधी मेहनत घ्यायची गरज आहे. 'मी करू शकतो आणि मी करेन.' असा दृष्टिकोन आपण विकसित केला पाहिजे आणि आपल्या मनात कोणत्याही प्रकारचा नकारात्मक संवाद सुरू होताच तो नष्ट करून टाकला पाहिजे. स्वतःशी बोला आणि स्वतःला सांगा, 'मी करू शकतो, हो, मी करू शकतो.' प्रत्येक दिवशी आरशात स्वतःचं स्वागत करा आणि म्हणा 'जगाला ठाऊक असलेल्या महान लोकांपैकी मी एक आहे आणि आज मी अविश्वसनीय गोष्टी करणार आहे.'' आरशातल्या

माणसापासून सुरुवात करा आणि मग आरशाच्या बाहेर जे आहेत त्यांना बदलायची तुम्ही सुरुवात करू शकाल!

तुमचे शब्द खूप काही बोलतात

बऱ्याच लोकांना इतर कोणीतरी त्यांच्या स्वप्नांपासून परावृत्त करण्याची वाट बघावी लागत नाही. ते स्वत:च तसं करतात! त्यांची दूरदृष्टी मर्यादित करणारे आणि स्वप्नांनी लढा देण्याची संधीदेखील न देणारे शब्द ते वापरतात. तुम्ही नकारात्मक शब्द वापरणं बंद केलं पाहिजे आणि सकारात्मक, पाठिंबा देणारे शब्द वापरायला सुरुवात केली पाहिजे. खाली उद्धृत केलेली कविता माझ्या मुलीने मला सांगितली. कवितेचा लेखक अनामिक आहे, पण त्यातला संदेश फार सुस्पष्ट आहे.

केलं हा शब्द ध्येय साध्य करण्याचा आहे
करणार नाही हा शब्द माघार घेण्याचा आहे
कदाचित करेन हा वियोगाचा शब्द आहे
करू शकत नाही हा शब्द पराभवाचा आहे
केलंच पाहिजे हा शब्द कर्तव्यासंबंधी आहे
प्रयत्न हा शब्द तासाचा आहे
करेन हा शब्द सौंदर्याचा आहे
करू शकेन हा शब्द शक्तीचा आहे

तुमचे शब्द पुष्कळ काही बोलतात. शब्द असे वापरा, जे तुम्हाला स्फूर्ती देतात, तुम्हाला भुईसपाट करणारे शब्द नकोत!

'करू शकत नाही' या शब्दाकडे दुर्लक्ष केलं पाहिजे

'करू शकत नाही' हे असे शब्द आहेत ज्याच्याकडे दुर्लक्ष केलं पाहिजे
तुमच्या स्वप्नांवर विजय मिळवण्याच्या दीर्घ प्रवासासाठी
हे एक गुपित आहे जे इतरांनी शिकून घेतलंय

ज्यांनी अविश्वसनीय गोष्टी केल्या आहेत
आधी त्याची संकल्पना रुजवून मग त्याच्यावर विश्वास ठेवायला ते शिकले
आणि त्यांची स्वप्नं सत्यात येऊ शकतील
जर ते त्या स्वप्नांसाठी लढायला तयार असतील तर
त्यांच्या सर्व शक्तिनिशी, त्यांच्यासाठी!
इमानदारीने त्याच्यासाठी जात राहतील
झगडत आणि शर्थीने प्रयत्न करत त्याच्यासाठी
जर ते सर्वस्व द्यायला तयार असतील त्या शोधासाठी
विश्वास ठेवायला शिका आणि होय म्हणायला शिका
त्यांच्या आशांना आणि स्वप्नांना जर ते होय म्हणायला शिकले
जर सगळ्या अविश्वसनीय गोष्टींना ते होय म्हणायला शिकले
तर मग अमर्याद आनंदाने आयुष्य तुम्हाला प्रतिसाद देईल
आणि ते आयुष्याच्या अशक्य परीक्षांत
उत्कृष्ट कामगिरी करायला शिकलेले असतील!

विली जोली

तुमचा आत्मविश्वास हिरावून घेणाऱ्या आणि स्वप्नांची वासलात लावणाऱ्या, क्षुद्र मनोवृत्तीच्या, नकारात्मक लोकांशी तुम्ही संबंध ठेवणार नाही असा एक निश्चित निर्णय तुम्ही घेतला पाहिजे. दुर्दैवाने, कधीकधी ते लोक आपल्या आतल्या गोटातले असतात आणि आपल्यावर खरोखरच प्रेम करतात. ते वाईट मनोवृत्तीचे नसतात किंवा नाउमेद करण्याचा त्यांचा प्रयत्न नसतो, पण त्यांना 'शक्यतांबद्दलचं अंधत्व' असतं. त्यांना असं वाटतं की आपण आपल्या मोठ्या स्वप्नांपर्यंत वर पोहोचू शकलो नाही तर ते आपल्यासाठी खूप कठीण आणि खूप त्रासदायक ठरेल. एक गुपित मला तुम्हाला सांगू द्या. 'ते दोन्ही दृष्टीने त्रासदायक असतं!' तुम्ही जर काही केलं नाहीत तर ते त्रासदायक आहे! आणि तुम्ही जर जग जिंकायला निघालात, तरीदेखील ते त्रासदायकच आहे. म्हणून मग माझं सांगणं असं आहे की तुम्हाला एवीतेवी त्रास सहन करावा लागणारच आहे, मग तुम्ही ती गोष्ट स्वत:ला झोकून देऊन करा!

तुमच्या मानसिकतेवर आणि स्वप्रतिमेवर एका नकारात्मक व्यक्तीचा काय परिणाम होऊ शकतो ते मला माहीत आहे. नववया इयत्तेत असताना मी वाद्यवृंदात ट्रम्पेट वाजवत होतो आणि साप्ताहिक सुट्टीच्या वेळेला आम्ही छोट्या नृत्यांच्या वेळी संगीत वाजवायचो. एक दिवस माझे आई-वडील मला म्हणाले, "तू वाद्यवृंदात गात का नाहीस? तू घरात गातोस, चर्चमध्ये गातोस आणि शाळेतही गातोस. तू एक चांगला गायक आहेस. तू त्या वाद्यवृंदात गायला हवंस."

त्या दिवशी संध्याकाळी मी बँडच्या सरावाला गेलो आणि "मी आज रात्री गायलो तर चालेल का" असं त्या लोकांना विचारलं. प्रत्येकाने होकार दिला, म्हणून मी गायला सुरुवात केली. सगळ्या लोकांनी सांगितलं की तसं ठीक वाटतंय. फक्त एका व्यक्तीखेरीज, जो वाद्यवृंदाचा प्रमुख गायक होता. मला वाटत होतं की तो माझा चांगला मित्र होता, पण तो म्हणाला, "विली, तू गाऊ शकत नाहीस! तू फार वाईट गातोस!" मग तो हसायला लागला. मग बाकीचे सगळे जण हसायला लागले, समूहाच्या मानसशास्त्रानुसार. मी एवढा अपमानित आणि लज्जित झालो की मला रडावंसं वाटलं. पण मी रडताना माझ्या मित्रांनी मला पाहावं अशी माझी इच्छा नव्हती. म्हणून मी सहमत झाल्यासारखा अभिनय केला. मी माझं ट्रम्पेट उचलून एका कोपऱ्यात गेलो आणि जिवंत आहे तोपर्यंत पुनश्च गाणं म्हणणार नाही अशी शपथ घेतली! तीन वर्षं मी ती शपथ पाळली. मी घरी गायलो नाही की शाळेत गायलो नाही, लोकांच्या वाढदिवसांच्या पार्टीच्या वेळेलादेखील गायचं बंद केलं. जेव्हा प्रत्येक जण 'हॅपी बर्थडे' गायचा तेव्हा मला लाज वाटत होती. मी गाऊ शकत नाही असं बीज त्यांनी माझ्यामधे पेरलं होतं, पण एका छोट्याशा रोपट्यापासून त्याचा मोठा वृक्ष होईपर्यंत मीच ते वाढू दिलं. मी गाऊ शकत नाही याच्यावर मी खरोखरच विश्वास ठेवला!

एकदा एका रात्री, एका नाइट क्लबमध्ये जेव्हा मी ट्रम्पेट वाजवत होतो, तेव्हा वाद्यवृंदाच्या प्रमुखाला एक चिठ्ठी आली. ज्याच्यात म्हटलं होतं की 'गायक आजारी असल्यामुळे येऊ शकत नाही.' प्रमुखाने आजूबाजूला पाहिल्यावर त्याची नजर माझ्यावर स्थिरावली आणि तो म्हणाला, "विली, तुझा बोलतानाचा आवाज खूप छान आहे, चल इकडे

ये आणि आमच्यासाठी गा!'' मी त्याला सांगितलं, ''नाही, मी गाऊ शकत नाही!'' त्याने प्रतिक्रिया दिली, ''ये इकडे आणि गा!'' मी उत्तर दिलं, ''नाही! मी तुमच्यासाठी किंवा आणखी कोणासाठी गाणार नाही.'' मग तो रागावला आणि म्हणाला, ''मला तू गायला हवं आहेस!'' आणि आम्ही आडवं-तिडवं बोलत वाद घालायला लागलो. शेवटी तो म्हणाला, ''एकतर तू गाशील किंवा मग तुला काढून टाकण्यात येत आहे!'' त्या मुद्द्यावर ती निवड सोपी झाली! मला त्या नोकरीची गरज होती!

पण गायला सुरुवात करण्यापूर्वी मी माझे डोळे मिटले आणि ते गाणं कशा पद्धतीने व्हायला पाहिजे याचं चित्र डोळ्यांपुढे आणलं. मग मी माझ्या सगळ्या आंतरिक शक्तीनिशी गायला सुरुवात केली. जेवढं मोठ्याने आणि जितकं भरदार गाता येईल, तेवढं मी गायलो! मी जेव्हा माझे डोळे उघडले तेव्हा प्रेक्षकांतल्या लोकांनी नृत्य थांबवलं होतं आणि ते फक्त बघत होते आणि टाळ्या वाजवत होते! मग मी आणखी गायलो आणि त्यांनी आणखी टाळ्या वाजवल्या! मी गायलो आणि त्यांनी टाळ्या वाजवल्या, मी गायलो आणि त्यांनी टाळ्या वाजवल्या. शेवटी रात्र सरताना मी त्यांच्या लग्नात, ग्रॅज्युएशनला, चर्चमध्ये, या प्रसंगी, त्या प्रसंगी गाऊ शकेन का हे विचारण्यासाठी लोक माझ्या डावीकडे-उजवीकडे आणि भोवताली जमले होते. शेवटी माझ्या डोक्यात प्रकाश पडला, माझा मित्र माझ्याशी खोटं बोलला होता!

त्या वेळेपासून मी कार्नेजी हॉल, न्यू यॉर्कच्या लिंकन सेंटर, केनेडी सेंटर आणि वॉशिंग्टन डी.सी. इथल्या कॉन्स्टिट्यूशन हॉल इथे गायलो. ध्वनिमुद्रिका, रेडिओवरच्या जिंगल्स आणि टेलिव्हिजनवर गायलो. देशभर मी गाण्यासाठी फिरलो, कारण स्वप्नं उद्ध्वस्त करणाऱ्यांचं ऐकणं मी बंद केलं. 'करू शकत नाही' हा शब्द वापरणाऱ्या नकारात्मक लोकांचं ऐकणं बंद करा. ते लोक तुमच्या स्वप्नांना मूठमाती देतील!

जगातलं सर्वांत श्रीमंत ठिकाण!

मी जर तुम्हाला विचारलं, 'जगातलं सर्वांत श्रीमंत ठिकाण कुठे आहे?' तर मला खात्री आहे की काही लोक म्हणतील वॉशिंग्टन डी.सी.ची

टांकसाळ, इतर काही म्हणतील फोर्ट नॉक्स आणि इतर म्हणतील आफ्रिका खंडातल्या सोन्याच्या आणि हिऱ्यांच्या खाणी. पण सगळे जण चुकतील. जगातलं सर्वांत श्रीमंत ठिकाण आहे दफनभूमी! अगदी बरोबर, दफनभूमी. महान कल्पनांमुळे जे लोक श्रीमंत झाले असते असे लोक तिथे चिरनिद्रा घेत आहेत. त्यांनी 'करू शकत नाही' हा शब्दप्रयोग वापरणाऱ्या नकारात्मक लोकांचं ऐकलं आणि त्यांच्यावर विश्वास ठेवला. नंतर ते त्यांच्या महान कल्पना त्यांच्याबरोबर थडग्यात घेऊन गेले! त्यांचं सर्वांत चांगलं गाणं... न गायलेलं! त्यांचा सर्वांत चांगला शोध... न लागलेला! त्यांचं सर्वांत चांगलं पुस्तक... न लिहिलेलं! त्यांचं सर्वांत चांगलं भाषण... न दिलेलं! का? कारण 'करू शकत नाही' शब्द वापरणाऱ्या लोकांचं त्यांनी ऐकलं. ऐकू नका, मी पुन्हा म्हणतो, ऐकू नका. तुमची संपत्ती तुमच्याबरोबर तुमच्या थडग्याकडे नेऊ नका!

लक्षात ठेवा की स्वप्नं उद्ध्वस्त करणाऱ्यांना बदलता येतं! तुम्ही त्यांना प्रोत्साहित करा, त्यांचं प्रबोधन करा आणि वाढण्यासाठी मदत करा. ते शक्य आहे एवढंच नव्हे तर करता येण्याजोगं आहे, हे तुम्ही त्यांना सिद्ध करून दाखवलं पाहिजे.

पण काही वेळा अशा असतात जेव्हा तुम्हाला त्यांच्याकडे दुर्लक्ष करावं लागतं आणि जोपर्यंत ते सुबुद्ध होत नाहीत तोपर्यंत त्यांच्याशी घसट वाढणार नाही अशी खूणगाठ बांधावी लागते. तसं जर केलं नाही, तर ते त्यांच्याबरोबर तुम्हालाही खाली ओढतील. त्यांना तुमची स्वप्नं उद्ध्वस्त करू देऊ नका. मी पुनरुक्ती करतो, स्वप्नं उद्ध्वस्त करून तुमचा ऱ्हास करू देऊ नका. तुम्हाला जर त्यांना तुमच्या पातळीवर आणायला जमत नसेल, तर त्यांना वेगळं ठेवा! त्यांच्या पातळीवर तुम्हाला आणायला त्यांना सूट देऊ नका!

पुष्कळ वेळा ते शक्य आहे असं त्यांना तुमच्या उदाहरणावरून कळून येईल आणि जर ते तुम्हाला शक्य असेल, तर कदाचित ते त्यांच्यासाठी शक्य आहे असा विश्वास ठेवायला ते सुरुवात करतील. आयुष्यात कधीकधी तुम्हाला कसली गरज असेल तर ती कदाचितची! फक्त कदाचित!

कदाचित, फक्त कदाचित!

तुम्ही गाडी उचलू शकाल का? तुम्ही प्रयत्न कराल का? नाही? का? कारण तुमचं मन तुम्हाला सांगतं की गाडी उचलणं अशक्य आहे, म्हणून मग तुम्ही तसा प्रयत्नदेखील करणार नाही. तरीही अत्यंत कठीण परिस्थितीत ज्यांनी गाड्यादेखील उचलल्या आहेत अशी कितीतरी लोकांची उदाहरणं आहेत. अशा काही असंख्य पालकांच्या कथा आहेत, ज्यांची मुलं किंवा प्रियजन अपघातामुळे गाड्यांत अडकले होते आणि त्यांनी गाड्या उचलण्यासाठी सगळ्या तर्कशास्त्राला फाटा दिला. त्यांनी अशक्य ते शक्य केलं! का? त्या प्रसंगात ते अशक्य या शब्दाच्या पुढे निघून जातात. तुम्हीही जर कदाचित शब्दाचा विचार करायला शिकलात, तर अशक्य शब्दाच्या विचाराच्या पलीकडे जाऊ शकाल. काहीतरी मिळवण्याची आपली क्षमता निश्चित करण्याच्या विचारांच्या चार पातळ्या असतात. पहिली पातळी, संपूर्ण जबाबदारी, जिथे आपण प्रयत्न करण्याचा विचारदेखील करणार नाही. पुढची पातळी आहे संशय, जेव्हा आपल्या व्यक्तिमत्त्वापैकी एकावन्न टक्के भाग तरी असं म्हणतो की आपण ते करू शकू असं आपल्याला वाटत नाही आणि त्यामुळे प्रयत्नच न करण्याकडे आपला कल होतो. मग आशेची पातळी, जेव्हा आपल्या व्यक्तित्त्वाचा निदान एकावन्न टक्के भाग म्हणतो, 'मला वाटतं मी करू शकेन! कदाचित!' एकदा का तुम्हाला 'मे बी' किंवा 'कदाचित' पातळी मिळाली की तुम्ही प्रयत्न करायला अधिक योग्य झालात. शेवटी निश्चिततेची एक पातळी आहे, जेव्हा तुमचं मन म्हणतं, 'आपण आपलं उद्दिष्ट नक्कीच साध्य करू शकू!' एकदा का तुम्ही प्रयत्नाला लागलात, उद्दिष्ट साध्य करण्याच्या तुमच्या शक्यता अमाप वाढतात. आयुष्यात कधीकधी, तुम्हाला जे काही आवश्यक असतं ते म्हणजे 'कदाचित, फक्त कदाचित'. कारण तुमच्याकडे ते असेल तर तुम्ही निदान प्रयत्न तरी कराल. तुम्ही जर प्रयत्न केलात, तर तुम्हाला यशस्वी होण्याची संधी असते. पण तुम्ही जर प्रयत्नच केला नाही, तर तुम्हाला ते मिळणार नाही याची खात्री असते. तुम्ही प्रयत्नच करत नाही, असे तुमचे शंभर टक्के नेम नेहमीच चुकतात! तुमचा सर्वोत्कृष्ट प्रयत्न करा, कदाचित असा विचार करा!

तिसरा स्वप्न उद्ध्वस्त करणारा घटक आहे भीती – प्रयत्न करण्यासाठी तुम्ही घेत असलेल्या पुढाकाराची गळचेपी करणारी आणि मागे खेचणारी भीती, ती तुम्हाला प्रयत्नदेखील करू देत नाही. अभ्यासपूर्ण अहवालातून असं दिसलंय की जन्मजात फक्त दोन प्रकारची भीती असते. मुलं या पृथ्वीतलावर फक्त दोन प्रकारच्या भीतीसह जन्माला येतात, पडण्याची भीती आणि मोठ्या आवाजाची भीती. बाकीची सगळी भीती ही नव्याने शिकलेली गोष्ट असते. फ्रँकलिन रुझवेल्टने म्हटलंय, 'भीतीखेरीज भीती वाटण्यासारखं काहीच नसतं.' आणि एलेनॉर रुझवेल्टने म्हटलंय, ''तुम्ही जर भीतीला नेमकं ओळखलंत, तर तिच्याकडे बघा आणि तिच्याकडे जा... मग ती नाहीशी होईल!'' कृती हा भीतीवरचा उतारा आहे!

भिऊ नका

सक्सेस इज नेव्हर एन्डिंग अँन्ड फेल्युअर इज नेव्हर फायनल या रॉबर्ट शूलरच्या पुस्तकातला एक उतारा मी आज तुम्हाला सांगणार आहे.

'तुमच्या स्वप्नावर विश्वास ठेवून तुम्ही कदाचित चूक करत असाल अशी भीती बाळगू नका. याउलट अशी भीती बाळगा की तुम्ही त्या स्वप्नाचा पाठपुरावा केला नाही तर देव तुम्हाला सांगेल की अजून थोडा विश्वास दाखवला असता तर तुम्ही नक्कीच यशस्वी झाला असता.'

तुम्ही अयशस्वी व्हाल अशी भीती बाळगू नका. उलट तुम्ही धोके पत्करायला इच्छुक नसल्याने प्रयत्नच केला नाही, तर तुम्ही कधीच यशस्वी होऊ शकणार नाही याची भीती बाळगा. तुम्हाला इजा होईल याची भीती बाळगू नका. तुम्ही जर त्रास न घेता मिळणाऱ्या यशाची वाट बघत बसलात, तर तुमचा विकास कधीच होणार नाही.

मित्रांनो, भिऊ नका, उलट स्वप्न बघण्याचं धाडस दाखवा. एक वृद्ध घाबरणाऱ्या तरुणाला म्हणाला, ''फळ तोडण्यासाठी उंचावर का पोहोचायचं नाही? तिथेच तर फळं असतात ना?'' तुमची पहिली पायरी सोडायला जर तुम्हाला भीती वाटत असेल, तर दुसऱ्या टप्प्यापर्यंत पोहोचणं अशक्य आहे. तुम्ही महान गोष्टी साध्य करू शकाल, पण तुमच्याकडे एक

स्वप्न असलंच पाहिजे आणि मग त्या स्वप्नावर कृती करण्याचं धाडस दाखवायला पाहिजे, भिऊ नका, माझ्या मित्रांनो, भिऊ नका!

आपल्या सर्वांनाच भीती असते. एक संरक्षण यंत्रणा म्हणून आपण भीती घेऊनच जन्माला येतो. निर्णय घेताना काळजी घेणं आणि धोका टाळणं यासाठी त्या यंत्रणेचा उपयोग होतो; पण महानता गाठण्यापासून आपल्याला प्रतिबंध करणं आणि बेड्या घालणं असा काही भीतीचा अर्थ नाही. आपल्या भीतीवर विश्वास ठेवायचा की स्वत:वर आणि आपल्या शक्यतांवर, ही निवड आपल्यासमोर असते. एका मित्राने मला सांगितल्याप्रमाणे :

भीतीला अडथळे दिसतात, विश्वासाला संधी दिसतात
भीतीला प्रश्न दिसतात, विश्वासाला शक्यता दिसतात
भीतीला काटेकुटे दिसतात, विश्वासाला पायवाटा दिसतात

निवड तुमची आहे, एकतर तुम्ही तुमच्या भीतीवर विश्वास ठेवा किंवा स्वत:वर. द मॅजिक ऑफ थिंकिंग बिग पुस्तकात डेव्हिड श्वार्झने लिहिलंय की भीती दूर करण्याचा उतारा म्हणजे कृती. तुमची भीती कोणती आहे ते निश्चित करा आणि तिच्या दिशेने सरका. कृती करा आणि भीती अदृश्य होईल. विश्वास ठेवा, कृती करा आणि भीती अदृश्य होईल!

डोंट वरी, बी हॅपी! – काळजी करू नका, खुश राहा!

डोंट वरी, बी हॅपी! आनंदी असणं निवडा, कारण शेवटी निवड तुम्हीच करता. एकतर तुम्ही भविष्यात काय घडेल याची आणि आयुष्याबद्दल चिंता करण्याची निवड करू शकता किंवा आनंदी राहण्याची, जीवनाचा आनंद लुटण्याची आणि आयुष्य समरसून जगण्याची. ती एक निवड आहे. गुदमरून टाकणे, गळा आवळणे या शब्दावरून " worry (वरी)' हा शब्द आला आहे आणि ते भीतीचं एक विस्तारीकरण आहे. भीती अपंग करून टाकते. जे लोक महान गोष्टी करू शकतील अशांना ती

बेड्या घालते आणि ते कदाचित मिळवू शकले असते अशा गोष्टींना प्रयत्नदेखील करण्यापासून त्यांना रोखते. स्वप्नं आणि निर्मितीक्षमता यांना भीती गुदमरवून आणि मारून टाकते आणि भीतीबद्दल सर्वांत गमतीची गोष्ट म्हणजे ते एक अवगत केलेलं वर्तन आहे. मानसशास्त्रज्ञ म्हणतात की, आपण फक्त दोन प्रकारची भीती घेऊन जन्मतो : पडण्याची भीती आणि मोठ्या आवाजाची भीती. बाकी सगळ्या प्रकारची भीती शिकून घेतलेली असते. सर्वसाधारणपणे भीती म्हणजे कल्पनाशक्तीचा गैरवापर असतो. स्वप्नं बघता यावीत म्हणून कल्पनाशक्ती निर्माण करण्यात आली; ज्या अद्याप वास्तवात उतरलेल्या नाहीत अशा सकारात्मक गोष्टी बघणं आणि मग त्यांना शक्य झालेलं बघणं यासाठी.

उद्भवू शकेल अशा प्रत्येक प्रश्नाचा आपण आयुष्यात बरेच वेळा आपल्या मनामध्ये विचार करतो. आपली मनं ही प्रश्नांची उत्तरं शोधण्यासाठी निर्माण झाली आहेत, प्रश्न शोधण्यासाठी नव्हे. उत्तरं शोधून काढल्यावर स्वप्नांना सत्यात कसं उतरवायचं याचा विचार करण्यासाठी आपल्या मनाचा उपयोग झाला पाहिजे. तुम्हाला गुदमरवून टाकण्याची संधी भीतीला देऊ नका. तिला नकार करा, तिला उद्ध्वस्त करा, मोडून टाका, तिचा त्याग करा, सोडून द्या आणि तिला एकदाचं जाऊ द्या. भीतीच्या नजरेत नजर देऊन बघा, तिला आव्हान द्या म्हणजे ती निघून जाईल. कृतीपुढे भीती टिकू शकत नाही. तुमच्या स्वप्नांच्या मागे जा.

डोंट वरी, बी हॅपी! किंवा मग मी असं म्हणू का, खुश रहो!

⏱ विश्वास आणि धैर्य, विरुद्ध भीती आणि संशय

मायकेल केली हे व्हर्जिनिया बीच, व्हीए इथले एक फार मोठ्या ताकदीचे वक्ते आणि प्रशिक्षक आहेत. त्यांच्या उल्लेखनीय कल्पना आणि माहिती ते आपणहून इतरांबरोबर वाटतात, त्याबद्दल मला त्यांना 'प्रोफेसर' म्हणायला आवडतं. त्यांच्या कार्यक्रमात ते विश्वास आणि धैर्य विरुद्ध भीती आणि संशय याबद्दलची एक जबरदस्त कथा सांगतात; त्यांनी ती तुम्हाला सांगायला परवानगी दिली आहे.

कोणे एके काळी भीती आणि संशय हे दोन वाईट भाऊ लोकांची दारं ठोठावत घरोघरी भटकत होते. लोक त्यांच्या घर वाजवण्याला प्रतिसाद द्यायचे, तेव्हा ते आत घुसायचे, त्यांच्या घरातलं सामान अस्ताव्यस्त फेकून द्यायचे आणि त्यांच्या आयुष्याची पुरती वाट लावून टाकायचे. त्यांना त्यांची स्वप्नं जगता येऊ नयेत एवढं घाबरवून टाकायचे. लोकांच्या स्वप्नांचा आणि आशांचा विनाश करत, भीती आणि संशय या घरापासून त्या घराकडे, एका शहरातून दुसऱ्या शहराकडे, एका राज्यातून दुसऱ्या राज्यात जातच राहिले. एक दिवस ते एका नवीन ठिकाणी आले आणि त्यांना एक सुंदर मोठं घर दिसलं. ते म्हणाले, ''चला तिथे जाऊ! आपण खरोखरच काहीतरी नुकसान करू शकू.'' भीती आणि संशय त्या घराकडे धावत गेले आणि त्यांनी दार वाजवलं. पण त्यांचे कट्टर शत्रू विश्वास आणि धैर्य यांचं ते घर असल्याचं त्यांना ठाऊक नव्हतं. भीती आणि संशय यांनी आणखी जोरजोरात दार ठोठावलं आणि अधिकाधिक क्रोधित झाले. शेवटी विश्वास आणि धैर्य यांनी दरवाजा उघडला... पण दारात कोणीच नव्हतं! त्यांनी रस्त्यावर सगळीकडे पाहिलं, पण त्यांना कोणीही दिसलं नाही, कारण विश्वास आणि धैर्य यांच्यासमोर... भीती आणि संशय नेहमीच गायब होतात!!!

जेव्हा अत्युत्कृष्टता काही पावलांवर असते, तेव्हा स्वप्न उद्ध्वस्त करणारा शेवटचा महत्त्वाचा घटक म्हणजे 'मध्यम प्रतीवर तडजोड करणं'. हुशार असणं म्हणजे अभ्यासू, घासू असणं वा थापेवर विश्वास ठेवणाऱ्या तरुण लोकांत या प्रकारचा स्वप्न उद्ध्वस्त करणारा घटक दिसत असतो! 'ते ध्येयाच्या पुरेसं जवळ आहे' असं सांगत त्यांच्या नोकरीचं समर्थन करतात. ज्या वेळी फक्त थोड्या अधिक प्रयत्नाने सर्वोत्कृष्ट गोष्ट मिळवता येऊ शकते, त्या वेळी ते त्याच्या जवळपास असणाऱ्या गोष्टींवर समाधान मानतात.

अत्युत्कृष्टतेमुळे फरक पडतो

अमेरिकेत आपण एका पिरॅमिडसारख्या समाजात राहतो, ज्याच्यात पिरॅमिडच्या तळाशी खूप लोक असतात आणि फार थोडे लोक शिखरावर

असतात. तळाशी असलेले लोक दर दिवशी जेमतेम जगण्यापुरते, हाता-तोंडाची गाठ पडण्यापुरते पैसे मिळवतात. वरच्या गटातले लोक मात्र जोमाने प्रगती करतात आणि श्रीमंत होत असतात. प्रत्येक समाजात आणि भौगोलिक विभागात, खूप लोक तळाच्या भागात असतात आणि मूठभर लोक वरच्या भागात असतात. वरच्यापैकी बरेच लोक तळापासून सुरुवात करून वरपर्यंत पोहोचतात. का? कारण ते मध्यम प्रतीच्या दर्जाशी जमवून घ्यायला नकार देतात. ते अत्युत्कृष्टतेचा ध्यास घेतात आणि उन्नती करायला सुरुवात करतात. दुधावरची साय असावी तसं हे तत्त्व आहे. लोणी वरपर्यंत तरंगतं. मी ऑप्रा विनफ्रेला तिच्या टेलिव्हिजनवरच्या एका मुलाखतीच्या कार्यक्रमात पाहिलं. तिला विचारण्यात आलं होतं, मानसिकदृष्ट्या अस्वस्थ आणि दुभंगलेल्या कुटुंबातून येऊन आणि आता जगातली अत्यंत सामर्थ्यवान स्त्री अशी मजल तिने कशी मारली. तिचं उत्तर होतं – तिने स्वतःशी अशी बांधिलकी जपली होती की ती जे काही करेल त्याच्यामध्ये ती अत्युत्कृष्टतेचा ध्यास घेईल. सुरुवातीला ती काही एखाद्या टेलिव्हिजन किंवा चित्रपट तारकेसारखी दिसत नव्हती. ती सडपातळ, कमनीय किंवा नजरेत भरण्याइतकी दिमाखदारदेखील नव्हती, पण तिने जिद्दीने अत्युत्कृष्टतेचा पाठपुरावा केला आणि अत्युत्कृष्टता ही सत्यासारखी आहे. तुम्ही ती खाली ढकला, त्याच्यावर आवरण घालण्याचा प्रयत्न करा किंवा दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न करा, तुम्ही काहीही जरी केलंत तरी ती नेहमीच उच्च स्थानावर पोहोचते. आपण जे काही करतो त्यात आपण नेहमीच अत्युत्कृष्टतेचा पाठपुरावा केला पाहिजे. अत्युत्कृष्टतेसाठी शर्थीचे प्रयत्न करा आणि तुमची स्वप्नं ध्येयापर्यंत पोहोचतील.

माझी मदतनीस बार्बरा, ती जी प्रत्येक गोष्ट करते त्याच्यात अत्युत्कृष्टतेचा पाठपुरावा करते. अत्युत्कृष्टतेशी वचनबद्ध होण्याचं तिचं गुपित मी तिला विचारलं आणि तिने तिच्या टेबलावर ती जे एक वचन समोर ठेवते ते मला सांगितलं, 'जे लोक आपल्या घराची वीटन् वीट एखाद्या उद्देशाने रचतात, पहिल्यापासून शेवटच्या विटेपर्यंत तशीच काळजी घेतात आणि प्रत्येक वीट रचताना तीच वीट सर्वांत महत्त्वाची आहे असं समजून काम

करतात, अशा लोकांकडे यश धावत येतं.' अत्युत्कृष्टतेमुळे नेहमीच उत्तम फायदे मिळतात!

अत्युत्कृष्टता ही नोकरीची हमी आहे

तुम्हाला आणि मला ठाऊक आहे की, आजच्या जगात नोकरीची सुरक्षितता ही गोष्टच उरलेली नाही. लोकांचं नोकऱ्या जाण्याचं प्रमाण नवनवीन उच्चांक गाठत आहे. कंपन्यांमध्ये वेगवेगळ्या नावांखाली केली जाणारी नोकरकपात – डाऊन साइझिंग, राइट साइझिंग इ. – या सगळ्याला लोकांना तोंड द्यावं लागत आहे. तुम्ही त्याला काहीही नाव दिलं, तरी इतिहासाच्या तुलनेत लोक त्यांच्या नोकऱ्या जलदगतीने गमावत आहेत. कंपनी काय निर्णय घेईल यावर तुमचा काहीही ताबा नाही. पण तुम्ही तुमची नोकरीची स्थिती नियंत्रणात ठेवू शकता. कशी? एक विशिष्ट अशी मनोभूमिका विकसित करून आणि अत्युत्कृष्टता हा तुमचा परवलीचा शब्द बनवून तुम्ही तुमचे स्वतःचेच मुख्य कार्यकारी अधिकारी होऊ शकता. माझ्या एका मैत्रिणीची कथा मला तुम्हाला सांगायचीय, जिची कंपनी रसातळाला गेली, पण तिने उत्कृष्ट कामाबद्दल नाव मिळवलं होतं. नोकरी गेल्यानंतर एका आठवड्याच्या आतच, तिच्या एका माजी सहकाऱ्याने तिचा शोध घेतला आणि तिला आधीच्या पेक्षाही चांगल्या पगाराची नोकरी दिली. का? कारण तिची अत्युत्कृष्टतेचा ध्यास तिच्या त्या माजी सहकाऱ्याने लक्षात ठेवला. शिकागो बुल्स हा अमेरिकेतला प्रख्यात बास्केटबॉल संघ आहे. मायकेल जॉर्डन आणि स्कॉटी हे त्यातले आघाडीचे खेळाडू आहेत. अत्युत्कृष्ट दर्जा राखणं ही नेहमीच नोकरीची एक सर्वांत चांगली हमी आहे. तुमच्या सध्याच्या नोकरीच्या बाबतीत काय घडतं याच्यावर कदाचित तुम्ही नियंत्रण ठेवू शकणार नाही, पण तुमची नोकरी करण्याची क्षमता मात्र तुम्ही ताब्यात ठेवू शकता. एक लक्षात ठेवा, तुम्ही कुठेही असा किंवा काहीही करत असा, कोणीतरी तुमच्यावर नजर ठेवून असतं आणि तुम्ही काय करता हे लक्षात ठेवतं! उत्कृष्टता राखा आणि तुमच्या भविष्याची सूत्रं हातात घ्या!

स्वप्नाला 'कृती'ची जोड देणं हे यशाकडे जाण्याचं पुढचं पाऊल आहे. तुमच्या स्वप्नांवर कृती करा! स्वप्नं सत्यात आणण्यासाठी कृती करण्याचा निर्णय घेणं हा त्या प्रक्रियेचा एक अतिशय महत्त्वाचा भाग आहे.

एक स्वप्न, एक कृती

स्वप्नं आणि उद्दिष्टं ही यशाची बीजं कशी आहेत याबद्दल आपण चर्चा करत होतो. यशाचा तो सुरुवातीचा बिंदू आहे. पण एकदा का तुम्हांकडे तुमची स्वप्नं असली, की त्यांना सत्यात कसं आणायचं, त्यांचं वास्तवात कसं रूपांतर करायचं हे तुम्हाला आत्मसात करावं लागेल. तुमच्या स्वप्नांनंतर, तुम्ही 'कृती'चा निर्णय घेतला पाहिजे. तुम्ही तुमच्या स्वप्नांबद्दल काहीतरी करण्याची गरज आहे. तुम्हाला तुमच्या स्वप्नांचा पाठपुरावा करावा लागेल. कृतीशिवाय विश्‍वास म्हणजे खरं तर विश्‍वासच नव्हे. प्रथम तुम्हाला एका स्वप्नाची आवश्यकता आहे, नंतर तुम्हाला 'कृतीची' आवश्यकता आहे. कृती करा! चिनी लोकांकडे एक फार प्रभावी नीतिवचन आहे. त्यात म्हटलंय, 'मी ऐकतो आणि मी विसरतो. मी बघतो आणि मी लक्षात ठेवतो. पण मी करतो आणि मग मला ते खरोखरच कळतं!' लक्षात ठेवा, तुम्हाला ते केलंच पाहिजे!

पुढचं पाऊल आहे, सुरुवात करणं. ही आहे 'सुरू करण्याची कला'. तुम्ही सुरुवात केलीच पाहिजे. निर्णय घ्या, नंतर त्या निर्णयावर कृती करा. मार्लन स्मिथ हा माझा मित्र त्याच्या भाषणांचा समारोप नेहमीच पुढच्या कडव्याने करतो. 'कृतीशिवाय स्वप्न म्हणजे निव्वळ एक इच्छा आहे. स्वप्नाशिवाय कृती म्हणजे फक्त वेळ दवडणं आहे. पण कृतीबरोबर एक स्वप्न जग बदलू शकेल!'

मित्रांनो, तुमचं आयुष्य बदलायला फक्त एक मिनिट पुरेसं आहे. मोठं स्वप्न बघा, त्या स्वप्नाचा पाठपुरावा करण्याचा निर्णय घ्या आणि नंतर त्या स्वप्नावर कृती करा. ते तुमचं आयुष्य बदलेल, याची मला खात्री आहे!

"माझं एक स्वप्न आहे"

'आय हॅव ए ड्रीम' हे मार्टिन ल्यूथर किंग, ज्युनिअरने दिलेलं प्रसिद्ध भाषण आहे. कोणत्याही काळात स्फूर्तिदायक ठरणारे सामर्थ्यशाली आणि उत्कट, मनाचा ठाव घेणारे ते शब्द आपण सर्वांनी ऐकले आहेत. मी जरी कितीही वेळा ते भाषण ऐकलं, तरीही त्यातून उद्‌भवणाऱ्या शक्तीमुळे माझ्या अंगावर नेहमीच रोमांच उभे राहतात. मी जेव्हा ते ऐकलं तेव्हा 'माझं एक स्वप्न आहे' या चार शब्दांचं महत्त्व बळावलं. 'माझ्याकडे-एक-स्वप्न-होतं' असं त्यांनी म्हटलं नाही, त्याऐवजी 'माझ्याकडे एक स्वप्न आहे' असं म्हटलं. का? महान व्हायचं असेल, तर तुमचं स्वप्नदेखील पुढे जात राहणारं असलं पाहिजे. 'माझ्याकडे एक स्वप्न होतं' असं म्हणण्याचा अर्थ होतो 'स्वप्न आलं आणि गेलंसुद्धा' पण 'स्वप्न आहे' म्हटलं तर ते अजून आहे, असा त्याचा अर्थ होतो. त्याच्यात सातत्य आहे. तुमच्याकडे स्वप्न आहे का? तुम्हाला पाठपुरावा करायला भाग पाडेल, भारून टाकेल आणि शेवटी साध्य करता येईल असं एखादं स्वप्न तुमच्या मनात आणि आत्म्यात धगधगत आहे का? माझ्या असंही लक्षात आलंय की डॉ. किंगनी 'माझ्याकडे एक इच्छा आहे' असं म्हटलं नाही. का? कारण इच्छांमध्ये काही विशेष अर्थ नसतो आणि सहसा त्या साध्य होण्यासारख्या नसतात. जसं काही लोक म्हणतात, 'माझी इच्छा आहे की माझं आयुष्य मी पुन्हा एकदा जगावं.' किंवा 'माझी इच्छा आहे की मी पुन्हा एकदा लहान मूल व्हावं.' आपल्यापैकी पुष्कळांनी 'इच्छापूर्ती' विहिरीत नाणी टाकली असतील किंवा आकाशातून निखळता तारा बघून इच्छा व्यक्त केली असेल, पण खरं म्हणजे त्या इच्छा खऱ्या होतील अशी अपेक्षाही केली नसेल. ते सगळं आपल्या कल्पनेतलं मनोरंजन होतं. पण एका स्वप्नाला पाया असतो. वजन कमी करण्याचं किंवा घर विकत घेण्याचं नाही तर एक दिवस युनायटेड स्टेट्सचे अध्यक्ष होण्याचं स्वप्न बघतो. स्वप्न खरी होऊ शकतात आणि खरी होतातही! इच्छा आणि स्वप्न यांच्यात गोंधळ करू नका. लक्षात ठेवा, काही लोकांना ते प्रत्यक्षात यायला हवं असतं, काही लोकांची इच्छा असते की घडावं आणि इतर ते घडवतात! मोठी स्वप्नं बघा. मोठे विचार करा आणि ते घडवा!

यशाचं बीज म्हणजे स्वप्न. तुमची स्वप्नं सत्यात यावीत असं जर वाटत असेल, तर तुम्ही त्यांच्यापाठोपाठ गेलं पाहिजे, त्यांच्यावर कृती केली पाहिजे, त्यांचा पाठपुरावा केला पाहिजे, त्यांच्यामागे गेलं पाहिजे, नाहीतर ती फक्त अशक्य स्वप्नं किंवा इच्छा असतील, ज्यांना काही पाया नसेल. आत्मविश्वास, निश्चय, चिकाटी, तीव्र इच्छा आणि कृती यांचं मिश्रण असलेलं स्वप्न कोणीही नाकारू शकणार नाही!

जेसी ओवेन्स, एक स्वप्न पाहणारा! स्वप्नाळू?

आत्मविश्वास, निश्चय, चिकाटी आणि गाढ विश्वास यांचं मिश्रण असलेलं स्वप्न सत्यात उतरणं अटळ असतं. जेसी ओवेन्स हा एक जागतिक पातळीवरचा खेळाडू होता. त्याला असं सांगण्यात आलं होतं की तो आफ्रिकन-अमेरिकन असल्याने जर्मन, आर्यन खेळाडूंच्या पातळीवर स्पर्धा करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. हिटलर खेळ बघण्यासाठी आला, पण त्याने युनायटेड स्टेट्सच्या काळ्या खेळाडूला अभिवादन करायला नकार दिला. जेसी ओवेन्स हा एक कसलेला, तयारी केलेला खेळाडू होता, हे हिटलरला माहीत नव्हतं. पण अधिक महत्त्वाचं म्हणजे, जेसी एक स्वप्न आणि प्रबळ विश्वास यांनी सुसज्ज होता. १९३६चं ऑलिम्पिक्स बर्लिनला भरवण्यात आलं होतं. नाझी खेळाडूंना प्रोत्साहित करण्यात आलं, पण इतर अमेरिकन खेळाडूंचा मात्र धिक्कार करण्यात आला. हिटलरने केलेली उपेक्षा किंवा झालेला धिक्कार याची जेसीने पर्वा केली नाही. त्याने फक्त त्याच्या स्वप्नावर लक्ष केंद्रित केलं. तीन वेळा त्याच्या पायात खोड काढण्यात आल्यावरदेखील त्याने स्वतःच्या स्वप्नाला विश्वासाची जोड दिली आणि शेवटच्या प्रयत्नात उडी मारून तो जिंकला! भाग घेतलेल्या प्रत्येक स्पर्धेसाठी एक, अशी चार सुवर्णपदकं घेऊन तो त्या ऑलिम्पिकमधून परतला! प्रचंड विश्वास, आत्मविश्वास आणि निश्चय नेहमीच तुमची भाग्यरेखा बदलतील.

आत्मविश्वास, निश्चय आणि चिकाटी यांनी भरलेलं स्वप्न कधीही नाकारता येत नाही. जर तुम्हाला ते सत्यात उतरावं असं वाटत असेल,

तर त्याची गुरुकिल्ली आहे स्वप्नाशी बांधिलकी जपणं आणि स्वप्नासाठी लढा द्यायला सज्ज असणं. प्रत्येक चांगला प्रयत्न करताना नेहमीच आव्हानं आणि अडथळे असतील. तुम्हाला 'ते' खरोखरच किती निकडीने पाहिजे आहे हे जोखण्यासाठी आयुष्य तुमच्यापुढे अडथळे उभे करतं, असं म्हणतात आणि तरीही जेव्हा आव्हानं येतात, तेव्हा तुमच्यापुढे निवडीची संधी असते, हे तुम्ही लक्षात ठेवलं पाहिजे. तुम्ही आव्हानांना छातीठोकपणे सामोरं जाऊ शकता किंवा माघार घेऊन प्रयत्न सोडून देऊ शकता. निवड केवळ तुमच्यावरच अवलंबून आहे. तुमच्या ध्येयाशी असणाऱ्या बांधिलकीमुळे फरक पडेल.

बांधिलकी जादू घडवते!

जेव्हा तुम्हाला तुमचं स्वप्न सापडतं आणि तुम्ही त्या स्वप्नाच्या मागे जाता, तेव्हा तुमच्यासमोर आव्हानं उभी ठाकतील याची मी तुम्हाला खात्री देतो. अडथळे येतील याचीही मी तुम्हाला हमी देतो. पण तुम्ही जर तुमच्या स्वप्नांशी बांधिलकी घ्यायला तयार असाल आणि एका निश्चयी मनोवृत्तीने आव्हानांचा सामना करायला तयार असाल, तर तुमच्याबाबतीत अविश्वसनीय गोष्टी घडू लागल्याचं तुम्हाला दिसेल, तुम्ही जर प्रयत्नच केला नसता तर अशा गोष्टी घडल्या नसत्या! जोहान वुल्फगँग वॉन गॉएथ यांनी हे फार छान मांडलंय, ''जोपर्यंत बांधिलकी नसते, त्या ठिकाणी संभ्रम असतो. मागे फिरण्याची संधी. नेहमीच निष्फळ. सगळ्या प्रकारच्या पुढाकाराच्या (आणि निर्मितीच्या) कृतीत एक प्राथमिक सत्य आहे आणि त्याबाबतीत दुर्लक्ष केलं तर असंख्य कल्पनांना आणि उत्तम योजनांना मूठमाती मिळेल. ज्या क्षणी एखादा बांधिलकी घेतो, तेव्हा दैवी योजनादेखील पुढे सरकते. एरवी घडल्या नसत्या अशा सगळ्या प्रकारच्या महत्त्वपूर्ण घटना घडू लागतात. एखादा माणूस स्वप्नातदेखील कल्पना करणार नाही, तशी आर्थिक मदत त्याला मिळू लागते. सगळ्या प्रकारच्या अकल्पित घटना आणि भेटीगाठी, त्या व्यक्तीच्या भल्यासाठी सुरू होतात. केवळ एका निर्णयामुळे एखादा घटनाप्रवाह निर्माण होतो. तुम्ही जे करता किंवा ज्याचं स्वप्न बघता

त्याची तुम्ही सुरुवात करू शकता. धिटाईमध्ये प्रतिभा, सामर्थ्य आणि जादू असते. आत्ताच त्याची सुरुवात करा."

हे खरं आहे, गेल्या काही वर्षांत मी याचा अनुभव घेतलाय. तुम्ही जेव्हा तुमच्या स्वप्नांशी निश्चित बांधिलकी निर्माण करता, तेव्हा सामान्यपणे ज्या गोष्टी एरवी घडल्या नसत्या त्या गोष्टी घडायला लागतात. मला तो दिवस आठवतो जेव्हा मी माझी नोकरी सोडून स्वतःच्या हिमतीवर पुढे जाण्याचा निर्णय घेतला होता. माझे नोकरीच्या ठिकाणचे सहकारी माझ्याकडे बघून हसले होते. तोच तो दिवस होता, त्या दिवशी मी गाडी चालवत घरी जाताना माझ्या गाडीतून धूर यायला लागला आणि ती चमत्कारिक आवाज करायला लागली. मी एका सर्व्हिस स्टेशनवर थांबलो आणि मेकॅनिकला गाडीची तपासणी करायला सांगितली. त्याने आणखी मेकॅनिक बोलावून आणले आणि म्हटलं, "करा सुरू." मी गाडी सुरू केली. त्यांनी मग मला एक बातमी दिली. "तुम्हाला नवीन इंजिनाची गरज आहे." मी माझ्या पासबुककडे नजर टाकली, त्याच्यात फक्त दोनशे डॉलर्स उरले होते. मग मी त्यांना विचारलं, "काय खर्च येईल त्याला?" अंदाजे तीन हजार डॉलर्स खर्च येईल. असं त्यांनी सांगितलं आणि त्यापेक्षा मी नवीन गाडी घ्यावी अशी शिफारस केली. सेल चालू होता अशा एका गाड्यांच्या डीलरकडे त्यांनी मला पाठवलं. मी त्या दिशेने मार्ग आक्रमू लागलो.

तो प्रवास माझा आत्तापर्यंतचा सर्वांत मोठा प्रवास वाटला. गाडीतून धूर निघत होता आणि लोक त्यांच्या गाड्यांचे हॉर्न जोरजोरात वाजवत होते. गाडी एवढी हळू चालली होती की मी रस्त्यावर एक धोका ठरत होतो. मी खूप व्यथित झालो होतो. तरीही जात असताना मी एका कागदाच्या तुकड्यावर लिहिलं होतं, 'माझं उद्दिष्ट आहे एक नवी कोरी गाडी आणि एकही पैसा न खर्चता.' मी शेवटी गाड्यांच्या डीलरकडे पोहोचलो आणि ते लोक त्या धुरामुळे त्रासून जाऊ नयेत म्हणून एक वळसा घालून बाजूच्या प्रवेशद्वाराकडे गेलो. गाडी उभी करून मी आत गेलो. एका अनाकलनीय आत्मविश्वासाने मी दुकानात प्रवेश केला. कारण मला खरोखरच विश्वास वाटत होता की नवीन

गाडी घेण्याचं, आणि तेही एक पैसाही न खर्चता घेण्याचं, माझं उद्दिष्ट मी साध्य करणार आहे. ते कसं ते मला माहीत नव्हतं, पण मला विश्वास होता.

एक विक्री प्रतिनिधी जवळ आला आणि मला नवीन मॉडेल्स दाखवायला लागला. मी बघितलं, बघितलं आणि बघितलं, जोपर्यंत मला जे पाहिजे होतं ते दिसेपर्यंत... लक्झरी मॉडेल. त्याने माझा निश्चय डळमळीत करणारं वाक्य म्हटलं, ''तुमच्याकडे तारण ठेवायला काय आहे?'' मी पुटपुटलो, ''एक १८९ झेड स्पोर्ट्स कार.'' तो म्हणाला, ''छान! चला आपण ती चाचणीसाठी चालवून बघू या'' त्या क्षणी मी एक दीर्घ श्वास घेतला, त्याला गाडीच्या चाव्या दिल्या आणि प्रार्थना करायला सुरुवात केली. तो गाडीकडे चालत गेला, दरवाजा उघडला आणि इग्निशनमध्ये चावी घातली.

त्या क्षणी काहीतरी चमत्कारिक घडलं. इग्निशन फिरेचना. त्याने इग्निशन स्विच अडकवूनच टाकला होता! त्याने खूप प्रयत्न केला आणि मीदेखील प्रयत्न केला. मग त्याने मुख्य मेकॅनिकला बोलावलं, त्यानेही खूप प्रयत्न केला. शेवटी ते म्हणाले की, चावी लागत नाही, पण गाडी बरी दिसत होती म्हणून ते मला प्रस्ताव द्यायला तयार होते. त्यादिवशी मी पार्किंग लॉटमधून एक नवी कोरी गाडी घेऊन निघालो, एकही पेनी न देता आणि शिवाय भेट म्हणून मिळालेल्या गाडीच्या सीट कव्हर्ससकट!

त्या क्षणाला ते घडण्याच्या शक्यता किती होत्या? ते कितपत संभवनीय होतं ते माहीत नाही, पण त्या माणसाने नवीन इंजीनची गरज आहे, हे सांगितल्यावर जर मी प्रयत्न सोडून दिला असता, तर शक्यता शून्यच होती. मी जर प्रयत्न केला नसता आणि मागे फिरून माझ्या पूर्वीच्याच नोकरीसाठी याचना केली असती, तर यशाची शक्यताही शून्यच होती. बांधिलकीमध्ये खरोखरच एक जादू असते!

पण त्या गोष्टीत अजून काही सांगण्यासारखं आहे. दुसऱ्या दिवशी जेव्हा मी उठलो, तेव्हा माझ्या लक्षात आलं की क्षणिक उत्तेजनेच्या भरात वाहवत जाऊन मी त्या डीलरकडे एक बिघडलेल्या इंजिनची गाडी सोडून आलो होतो. अशा प्रकारच्या प्रसंगांमुळे मी, चरित्र आणि

प्रामाणिकपणाविषयी लोकांना भाषणं देण्याचं माझं नवीन करिअर सुरू करू शकणार नाही हे मला माहीत होतं. मी उठलो आणि गाडीने परत दुकानात गेलो. विक्री व्यवस्थापकाकडे जाऊन त्याच्या हातात चावी दिली. मी त्याला म्हटलं, "सर, काल भावनेच्या भरात, मी नादुरुस्त इंजिनाची गाडी तुमच्याकडे सोडून गेलो हे माझ्या ध्यानात आलं नाही. ही घ्या तुमची गाडी परत. काही गैरसोय झाली असेल तर मी क्षमा मागतो. मी जितकी गाडी चालवली असेल त्याचं एक बिल मला कृपा करून पाठवून द्या."

सेल्स मॅनेजर चकित झाला आणि जणू काही एखादं भूत दिसावं, तसं त्याने माझ्याकडे बघितलं. तो म्हणाला, "तुम्ही परत आलात यावर माझा विश्वासच बसत नाही! मी विश्वासच ठेवू शकत नाही!" मग तो पुढे म्हणाला, "माझ्या मित्रा, तू परत आल्याबद्दल आणि गाडी परत देण्याचा प्रस्ताव देत असल्याबद्दल मला तुझे आभार मानायचेत, पण ते आवश्यक नाही. कारण असं बघा, तुमच्या गाडीचं इंजीन बिघडलेलं नाही... त्याला फक्त थोड्या ऑईलची गरज होती!" त्याने माझा संदर्भ इतरांना दिला आणि 'बोलण्याप्रमाणे चालणारा वक्ता' अशी माझी शिफारस केली!

बांधिलकी! बांधिलकी हीच किल्ली आहे. तुम्हाला ते खरोखरच किती गरजेचं आहे, हे जोखण्यासाठी आयुष्य तुमच्या स्वप्नांशी असलेली तुमची बांधिलकी तपासून बघेल! ही कविता गोएथ्यच्या बांधिलकीवरच्या एका कडव्याचं सार सांगते!

जे काही तुम्ही करता, किंवा जे कराल असं स्वप्न बघता,
ते सुरू करा!
धिटाईमध्ये शक्ती आहे आणि जादू आहे आणि त्याच्यात
प्रतिभा आहे
निर्णय घ्या आणि सुरुवात करा आणि मन सांगेल
तेव्हा विश्वास ठेवा आणि पुढे जा आणि काम पूर्ण होईल!

पर्याय नसलेला माणूस

तुमचं उद्दिष्ट गाठण्यासाठी सर्वस्व कसं ओतावं लागतं, याबद्दल आपण बोललो. तुमच्या उद्दिष्टावर तुम्हाला पूर्णपणे लक्ष केंद्रित केलं पाहिजे, तुम्ही एक 'पर्याय नसलेला माणूस' झालं पाहिजे. एका 'पर्याय नसलेल्या माणसा'कडे दुसरे काहीही पर्याय नसतात, त्याला किंवा तिला ते करावंच लागतं. करा नाहीतर मरा, सगळं काही किंवा काहीच नाही! तुम्ही जेव्हा तेवढे बांधील होता तेव्हा तुम्हाला दुसरा काही पर्याय नसल्यामुळे तुम्ही ते घडवून आणालच! एक सेनापती होता. त्याच्या सैन्याच्या तुकड्यांना एका दूरच्या किनाऱ्यावर एक मोठी लढाई लढण्यासाठी नेलं होतं. शत्रूच्या जवळ पोहोचल्यावर त्यांना दिसून आलं की शत्रूचं संख्याबळ अधिक होतं आणि तो जास्त शक्तिमान होता. त्याचं सैन्य भयभीत झालं. पण सेनापतीला ठाऊक होतं की त्याच्या सैन्यात जिंकण्याचं अंगभूत सामर्थ्य आहे. जमिनीवर पोहोचताच त्याने आज्ञा दिली, "बोटी जाळून टाका." त्याच्या सैन्याला वाटत असलेली भीती आणि त्यामुळे पुढे कूच करण्यातली त्यांची चालढकल त्याने बघितली होती. आता त्यांच्यापुढे दुसरे कोणतेच पर्याय नव्हते. कोणताही दुसरा पर्याय नव्हता. त्यांनी जिंकलं पाहिजे नाहीतर मृत्यू स्वीकारला पाहिजे. त्याच क्षणी सैन्याला उत्साह आला, ते निर्भय झाले. कारण त्यांच्यापुढे दुसरे पर्यायच नव्हते. ते पूर्ण ताकदीनिशी लढले आणि जिंकले. आपण आपली मनोभूमिका 'तरा किंवा बुडा' किंवा 'पर्याय नाहीत' अशा प्रकारे विकसित केली पाहिजे. 'करा किंवा मरा' दृष्टिकोन. आपण ते घडवलंच पाहिजे. जर तुम्ही तसं कराल आणि तशा प्रकारची बांधिलकी जपाल, तर तुमची स्वप्नं खरी होतील, वस्तुतः ती खरी व्हायलाच पाहिजेत! का? कारण तुमच्याकडे दुसरा काही पर्याय नाही!

मित्रांनो, तुमच्या स्वप्नांत सामर्थ्य आहे. पण तुमच्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्याचा निर्णय घेऊन तुम्ही ते सामर्थ्य कार्यान्वित केलं पाहिजे.

तुम्ही जर ते सोडून दिलंत तर शक्ती तुमचीच आहे.
जर तुम्ही ते दाखवून दिलंत,
जर तुम्ही ते प्रवाहित होऊ दिलंत तर शक्ती तुमचीच आहे

त्याची फक्त एक सुरुवात करा
तुमच्या अगदी हृदयापासून
सर्वांधिक चांगला प्रयत्न करा
आणि ते कधीच दुरावणार नाही
तुमच्याकडे ताकद आहे!

मित्रांनो, लक्षात ठेवा, तुमच्या उद्दिष्टापासून तुम्हाला दूर ठेवणारी आव्हानं आणि अडचणी असतील, पण निवड तुमची आहे. तुमच्या उद्दिष्टापर्यंत पोहोचण्यासाठी, तुम्हाला त्या दिशेने ढकलण्यासाठी तुम्ही त्या आव्हानांना आणि अडचणींना मुभाही देऊ शकता! एका जुन्या वाक्प्रचाराप्रमाणे, 'अडथळे हे खरं म्हणजे कोणत्यातरी वेगळ्या कामातल्या संधी असतात!' अडथळ्यांमुळे नाउमेद होऊ नका. फक्त एक लक्षात ठेवा, बांधिलकीमध्ये जादू आणि असामान्य प्रतिभा असते. त्याची आत्ताच सुरुवात करा!

हे प्राथमिक आहे असं भासतं, साधंही वाटतं, पण ते सोपं आहे असा त्याचा अर्थ नाही. ते सोपं नाही! आपल्या आयुष्यभराच्या कालावधीत जी नकारात्मक बीजं आपल्या मनात पेरली गेलेली असतात, त्यांच्यावर आपल्याला मात करावी लागते. लेस ब्राऊनने मला सांगितलं की त्याच्या यशाचा कठीण भाग म्हणजे मिलियन डॉलर्स मिळवणं हा नव्हता; ते मिलियन डॉलर्स मिळवणं शक्य आहे, यावर केवळ विश्वास ठेवणं, हा सर्वांत कठीण भाग होता!

मी जिथे काम करत होतो आणि जिथे माझे सहकारी हसले होते, त्या इमारती समोरून मी आणि माझा मुलगा गाडीतून चाललो होतो. माझा मुलगा, साधारण तो त्या वेळेला तो आठ वर्षांचा होता, त्याने मला विचारलं, ''डॅडी, तुम्ही काम करत होता, हेच ना ते ठिकाण?''

मी म्हटलं, ''होय.''

तो म्हणाला, ''डॅडी, तुम्हाला कामावरून काढून टाकलं होतं का?''

मी उत्तरलो, ''नाही, मी सोडून दिलं!''

मी जेव्हा हे उत्तर दिलं, तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर वेदना उमटलेली मला दिसली, कारण 'कधीही हार मानू नका, काहीही झालं तरी हार मानू नका!' असं मी सांगताना त्याने ते एक लाख वेळा तरी ऐकलं असेल!

मी गाडी थांबवली आणि त्याच्या डोळ्यात बघून सांगितलं, **''विल्यम, मी सोडून दिलं... मी हार मानत होतो म्हणून नव्हे, तर मी प्रगती करत होतो म्हणून!''**

ज्या गोष्टी तुम्हाला खाली खेचतात, तुम्हाला बांधून ठेवतात आणि तुमच्या कपाळावर आठ्या आणतात, त्या गोष्टी तुम्हाला कधी कधी सोडून द्याव्या लागतात. तुम्हाला जर अविश्वसनीय गोष्टी करायच्या असतील तर प्रथम तुम्ही अशक्य गोष्टींची स्वप्नं बघितली पाहिजेत, हे तुम्ही जाणलंच पाहिजे. स्वप्न बघा! नंतर एका सकारात्मक वृत्तीने त्या स्वप्नांवर कृती करण्याचा निर्णय घ्या. तुम्ही जे काही करता त्यात उत्कृष्टतेचा पाठपुरावा करा. त्या स्वप्नापर्यंत पोहोचण्यासाठी मोठी इच्छा आणि बांधिलकी विकसित करा. नंतर तुमच्या यशाची पूर्ण जबाबदारी घ्या. गंभीर व्हा आणि लवकरच तुम्हाला तुमची स्वप्नं धुमारे फुटलेली, वाढत असलेली आणि फुलांनी डवरलेली दिसतील! अशक्य गोष्टींचं स्वप्न बघा! धीट व्हा आणि पुढे जा!

⏱ दोन पर्याय?

जेम्स अँथनी कार्टरच्या 'द अनस्टॉपेबल व्हिजनरी' या ध्वनिफितीच्या मालिकेवर आजचं प्रेरणादायी मिनिट बेतलेलं आहे. मिस्टर कार्टर म्हणतात, ''निर्मितीक्षमता आणि जगणं अडचणींशिवाय शक्य नाही. स्वप्नांबद्दलची दुर्दैवी गोष्ट म्हणजे सुरुवातीला त्याच्यावर तुमच्याशिवाय कोणीच विश्वास ठेवत नाही. पण जेव्हा स्वप्न खरं होतं तेव्हा सगळे जण म्हणतील की ते होणार हे उघडच होतं. अशी परिस्थिती असते तेव्हा तुमच्यापुढे दोन पर्याय असतात. नकारघंटा वाजवणाऱ्यांचं ऐकून घ्या किंवा तुमच्या स्वप्नांच्या मागे जा.''

जेव्हा तुम्ही हे प्रेरणादायी मिनिट वाचत आहात, तेव्हा तुम्ही तुमच्या स्वप्नांच्या दिशेने एक पाऊल टाकलेलं आहे. तुम्ही वेगळं

असण्याची निवड केली, तुम्ही स्वतः आयुष्याची निवड केली आहे! आणि या विचाराच्या निर्मात्याला तुम्ही जसं असणं अपेक्षित होतं, तसं असण्याची तुम्ही निवड केली आहे. मित्रांनो, मोठी स्वप्नं बघा, महान विचार करा, कारण स्वप्नं खरी होऊ शकतात आणि होतातदेखील. रॉबर्ट केनेडींनी ते इतकं छान सांगितलंय, ''काही लोक गोष्टी आहेत तशाच बघतात आणि विचारतात, का? मी, ज्या गोष्टी कधी नव्हत्याच त्यांचं स्वप्न बघतो आणि विचारतो, का नाही?'' मी तुम्हाला मोठी स्वप्नं बघायला सांगतो, वस्तुतः अशक्य स्वप्नं आणि 'का नाही?' विचारणं चालूच ठेवतो. लक्षात ठेवा, तुम्ही जर फक्त विश्वास ठेवलात, तर सगळ्या गोष्टी शक्य आहेत!

प्रकरण ३

उद्दिष्टं : कालबद्ध स्वप्नं!

'स्वप्नं आणि उद्दिष्टं यांच्यात काय फरक आहे?' असा एक प्रश्न मला नेहमी विचारण्यात येतो. तुमच्या स्वप्नांची वाढ म्हणजे उद्दिष्टं. तुमच्या स्वप्नांसाठी चढायच्या त्या पायऱ्या आहेत. उद्दिष्ट म्हणजे विशिष्ट कालावधीत पूर्ण करायचं स्वप्न. असं म्हणू या की कायद्याचा अभ्यास करण्याचं तुमचं स्वप्न आहे. हे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी तुम्ही विशिष्ट कालावधीची मर्यादा स्वत:वर घालून घेता तेव्हा ते उद्दिष्ट होतं. तुम्ही आता तुमच्या स्वप्नांवर लक्ष केंद्रित केलं आहे आणि ते तुमचं उद्दिष्ट बनवलंय.

सुप्रसिद्ध झिग झिगलर यांनी या दोन गोष्टींचा उच्चभाव स्पष्ट करणारा एक महान सिद्धांत सांगितलाय, जर तुम्ही सूर्याचे किरण सूक्ष्मदर्शक भिंगातून एका विशिष्ट बिंदूवर एकवटून वाळक्या पानांच्या ढिगावर टाकले आणि भिंग स्थिर ठेवलं तर तुम्ही आग निर्माण करू शकता. उद्दिष्टांमुळे तुमचं लक्ष स्वप्नांवर केंद्रित व्हायला मदत होते आणि तुम्ही ती केव्हा सत्यात आणू शकता हे निश्चितपणे सांगायला मदत होते. तुमची स्वप्नं खरी करण्यासाठीच्या त्या पायऱ्या आहेत. मोठी स्वप्नं बघायची, मोठे विचार करायचे आणि नंतर ती स्वप्नं गाठता येतील, अशा उद्दिष्टांत परिवर्तित करायची, ही गुरुकिल्ली आहे. म्हणून कृती करा!

उद्दिष्ट – लक्ष्य

तुमची स्वप्नं प्रत्यक्षात कशी आणायची? प्रथम, तुमची स्वप्नं काय आहेत, हे तुम्हाला जाणून घेतलं पाहिजे. मी जर तुम्हाला एक चेंडू

देऊन तुमच्यापासून पाच फुटांवर असलेल्या दहा फुटी भिंतीवर मारायला सांगितला, तर तुम्ही ते कराल? अर्थात! काहीच अडचण नाही! पण मी जर तुमच्या डोळ्यांना पट्टी बांधली, तुम्हाला पाच पावलं मागे नेऊन दहा वेळा गरागरा फिरवलं, तरीही तुम्ही भिंतीवर सहजपणे चेंडू मारू शकाल का? नाही. तुम्हाला जेव्हा दिसत नसेल तेव्हा मारणं कठीण आहे आणि जेव्हा दिशा ठाऊकच नसेल तेव्हा तर अशक्यच आहे! म्हणूनच तुम्ही उद्दिष्टं निश्चित केली पाहिजेत. तुमच्या काही उद्दिष्टांचा सुरुवातीचा बिंदू आहे तुमची स्वप्नं. एक उद्दिष्ट म्हणजे ठरावीक वेळेत पूर्ण झालंच पाहिजे असं स्वप्न. तुमचं स्वप्न काय आहे आणि तुमचं उद्दिष्ट काय आहे?

तुमचं उद्दिष्ट काय आहे? या वर्षीची तुमची स्वप्नं काय आहेत? पुढच्या बारा महिन्यांत तुम्ही काय मिळवू इच्छिता? तुमच्या उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करायला मदत व्हावी म्हणून एक पाठ घेऊ या. कागदाचा एक तुकडा घ्या आणि त्याच्यावर एकाखाली एक असे दहा आकडे लिहा. आता मला तुम्हाला विचार करायला लावायचा आहे. तुम्ही अपयशी होणार नाही अशी खात्री दिली तर तुम्ही कशाच्या मागे जाल? तुम्हाला जर असं सांगण्यात आलं की तुम्ही हरणं अशक्य आहे, तर तुम्ही कशासाठी प्रयत्न कराल? काय मिळविण्यासाठी झटाल? नाताळच्या सकाळी एखादा लहान मुलगा जसा विचार करेल तसा विचार करा. तुम्हाला जे पाहिजे ते तुम्ही मिळवू शकाल, काहीही. निदान दहा गोष्टी लिहून काढा. जर तुमच्याकडे अधिक गोष्टी असतील तर त्या पण लिहून काढा. सध्याच्या परिस्थितीमुळे तुमच्यावर मर्यादा घालू नका. तुम्हाला जे पाहिजे ते तुम्ही मिळवू शकता; आता तुम्ही अपयशी होणं अशक्य आहे.

एकदा का तुम्ही तुमची यादी बनवलीत, की तुम्ही तुमचं यशाकडे जाण्याचं पहिलं पाऊल टाकता. त्या यादीच्या प्रती बनवा आणि ती प्रत्येक दिवशी वाचा. त्याच्यावर विश्वास बसेपर्यंत ती वाचा आणि पुन्हा पुन्हा वाचा. ती वाचत राहा, त्याच्यावर कृती करा आणि तुम्ही किती गोष्टी मिळवू शकता आहात हे बघून तुम्हाला आश्चर्य वाटेल.

टेन कमांडमेंट्स या चित्रपटातलं एक वाक्य मला नेहमी आठवतं. 'ते जसं लिहिलं गेलंय, तसं ते केलं जाईल!' तुमची स्वप्नं लिहून काढा, उद्दिष्टं निश्चित करा आणि लक्षात ठेवा, ''ते जसं लिहिलं आहे, तसं ते केलं जाईल!'' तुमची स्वप्नं लिहा आणि उद्दिष्टं ठरवा, आणि लक्षात ठेवा, 'ते जसं लिहिलं आहे, तसं ते केलं जाईल!''

स्वप्नांचा कागद

वरचा पाठ पूर्ण करण्याचं कारण म्हणजे आपली स्वप्नं आणि उद्दिष्टं निश्चित करण्यासाठी आपल्याला त्याची मदत होईल (कारण, न दिसणारं आणि माहीत नसलेलं उद्दिष्टं गाठणं अशक्य आहे हे आपल्याला समजून चुकलंय). तुम्ही अपयशी होणं अशक्य आहे अशा किमान दहा गोष्टींची या वर्षासाठी तुम्ही यादी बनवलीत. आता जेव्हा तुमचं मन शक्यतेच्या भूमिकेत आहे, आपण आणखी एक पाऊल पुढे जाऊ या. कागदाची चार पानं घ्या. पहिल्या पानावर लिहा 'माझ्या आयुष्याची स्वप्नं आणि उद्दिष्टं', दुसऱ्या कागदावर लिहा 'माझी बारा महिन्यांची स्वप्नं आणि उद्दिष्टं', तिसऱ्या कागदावर लिहा 'माझी तीस दिवसांची उद्दिष्टं' आणि चौथ्या कागदावर लिहा 'माझा आदर्श यशस्वी दिनक्रम'.

एका यशस्वी दिवसाचा दिनक्रम जेव्हा तुम्ही विकसित कराल, तेव्हा त्या दिवसाप्रमाणे फक्त सात वेळा तसंच पुन्हा करणं म्हणजे एका यशस्वी आठवड्याची गुरुकिल्ली. नंतर मग त्या यशस्वी आठवड्याप्रमाणे चार वेळा करा आणि तुम्हाला एक यशस्वी महिना मिळेल आणि त्या महिन्याप्रमाणे बारा वेळा पुनरावृत्ती केलीत तर तुम्हाला एक यशस्वी वर्ष मिळेल आणि मग तुम्ही तुमच्या यशस्वी जीवनाची निर्मिती करायला सज्ज व्हाल! पण हे सगळं सुरू होतं ते एक स्वप्न आणि एक उद्दिष्ट यांबरोबर. हा पाठ आत्ताच गिरवा आणि तुमच्या स्वप्नांना तुमच्या सद्य परिस्थितीच्या मर्यादा घालू नका. लक्षात ठेवा – तुम्हाला यशाची खात्री आहे, तुम्ही अयशस्वी होणं अशक्य आहे, फक्त विश्वास ठेवा!

स्वप्नं उभारण्याचं सूत्र

१. तुम्हाला काय पाहिजे ते निश्चित करा.
२. ते लिहून काढा (नेमकेपणा ठेवा)
३. प्रत्येक दिवशी ते तीन वेळा वाचा.
४. स्वप्नपूर्तीची तारीख ठरवा.
५. त्याचा वरचेवर विचार करा.
६. स्वप्नं बघून कल्पना करा. (त्याची मजा लुटताना स्वत:ला बघा)
७. कृती करण्याची योजना तयार करा.
८. उद्दिष्टाच्या दिशेने रोज तीन गोष्टी करा.
९. सकारात्मक राहा. (प्रत्येक दिवशी सकारात्मक गोष्टी ऐका आणि वाचा)
१०. तुम्ही जणू काही ते मिळवलंय अशा प्रकारे वागा.
(कल्पना करा – विश्वास ठेवा – मिळवा)

काही दिवसांपूर्वीची गोष्ट आहे. वाईट हवामानामुळे मी एका छोट्या गावात अडकून पडलो होतो. मी चॅनल्स बदलून बघत होतो, तेव्हा मला मार्शल आर्ट्सचा महान खेळाडू ब्रूस ली याच्यावरचा एक माहितीपट पाहायला मिळाला. लहानपणापासूनच मी त्याचा चाहता होतो. द ग्रीन *हॉर्नेट* या टीव्हीवरील कार्यक्रमात त्यानी साकार केलेलं काटो हे पात्र माझ्या आवडीचं होतं. मी नीट बसून तो माहितीपट पाहिला. त्यात जी माहिती मला मिळाली त्याने मी अतिशय प्रभावित झालो. ब्रूस लीचा जन्म सॅनफ्रॅन्सिस्कोमध्ये झाला, पण तो लहान असताना त्यांचं कुटुंब पुन्हा चीनमध्ये स्थलांतरित झालं. मार्शल आर्ट्स आणि अभिनय शिकत तो मोठा झाला. या दोन्ही आवडीच्या कलांच्या मिलाफातून त्याने एकमेवाद्वितीय अभिव्यक्ती करण्याचा मार्ग शोधला. तो अमेरिकेत परत आला आणि त्याच्या या नवीन कलापूर्ण कराटेचं शिक्षण द्यायला त्याने सुरुवात केली. त्याच्या धडपडीच्या काळात त्याने त्याच्या आयुष्यभराच्या

उद्दिष्टांचे आणि स्वप्नांचे तपशील देणारा एक कागद तयार केला, ज्याला त्याने 'प्रमुख ध्येय' असं म्हटलं. त्यात सर्वांत महत्त्वाचं उद्दिष्ट होतं सर्वाधिक मानधन घेणारा, अतिप्रसिद्ध आणि सर्वकालीन आशियाई मार्शल आर्ट्सचा कलाकार आणि अभिनेता होणं.

द ग्रीन हॉर्नेट कार्यक्रम बंद झाल्यावर काही काळ प्रयत्न केल्यानंतर तो चीनला परत गेला आणि त्याने मार्शल आर्ट्सवर चित्रपट निर्मिती सुरू केली. ते चित्रपट यशस्वी झाले आणि तो चीनमध्ये एक मोठा यशस्वी कलाकार बनला. ज्यांनी त्याला धुडकावून लावलं होतं, तेच अमेरिकेचे चित्रपट निर्माते आता त्याला चांगले प्रस्ताव देऊन बोलावत होते. तो इतका मोठा कलावंत झाला होता की त्याच्या प्रसिद्धीच्या माध्यमातून एक असा करार घडवून आणणं त्याला शक्य झालं, ज्यामुळे तो एक सर्वाधिक मानधन घेणारा सर्वकालीन आशियाई कलावंत झाला. *एंटर द ड्रॅगन* पूर्ण केल्यानंतर थोड्याच काळात एका वेदनाशामक गोळीला असलेल्या त्याच्या अतिसंवेदनक्षमतेमुळे तो मृत्यू पावला, पण तरीही त्याने त्याचं 'प्रमुख ध्येय' आणि उद्दिष्ट गाठलं होतं. त्याच्या मृत्यूनंतरही त्याचा 'स्टारडम' जिवंत राहिला आणि 'हॉलिवूड वॉक ऑफ फेम'मध्ये एका यशस्वी चित्रपटाचा निर्माता आणि अभिनेता म्हणून त्याचं नाव कोरलं गेलं!

या कथेचा मुख्य मुद्दा असा आहे की आयुष्य अतिशय अनिश्चित आहे आणि तुमची स्वप्नं आणि श्रद्धा यांशिवाय अवलंबून राहण्यासारखं फारसं काही नाही. जर तुम्ही स्वप्नं पाहू शकत असाल तर त्या स्वप्नांवर विश्वास ठेवा, त्यांच्या मागे जा, उद्दिष्टं निर्माण करा (किंवा या प्रकरणाप्रमाणे मुख्य ध्येय) आणि मग तुम्ही अविश्वसनीय गोष्टी करू शकाल! ब्रूस लीने सिद्ध करून दाखवल्याप्रमाणे, स्वप्नं खरी होऊ शकतात!

ब्रूस लीच्या चित्रपटातल्या एका वचनाने माझ्यावर एक पुसता न येणारा ठसा उमटवला! तो म्हणाला, "जेव्हा मी बोटीवर चढलो, मला कळलं की ही कल्पनांची भूमी आहे. एक माणूस, कल्पना आणि इच्छा यांच्या जोरावर काहीही करू शकतो!" मित्रांनो, खरोखरच हे एक 'कल्पनांचं ठिकाण' आहे. मी तुम्हाला मोठी स्वप्नं बघायला, मोठे

विचार करायला, तुमचं मन उंच उंच न्यायला आणि नवीन कल्पनांची निर्मिती करायला कळकळीने सांगतो. तुम्हीच बघाल की स्वप्नं खरी होऊ शकतात आणि होतात!

स्कॉट मॅककेन आणि त्याचा मित्र अरनॉल्ड

स्कॉट मॅककेन हे एक वक्तृत्वाची दैवी देणगी असलेले वक्ते आणि टेलिव्हिजनवरच्या कार्यक्रमांचे सूत्रसंचालक आहेत, ज्यांच्याबरोबर व्यासपीठावर बसण्याचा मला मान मिळाला. स्वप्नं आणि उद्दिष्टांची शक्ती विशद करणारे अरनॉल्ड श्वार्झेनेगर यांची एक कथा स्कॉट सांगतात. ऑस्ट्रियामध्ये मोठं होत असताना तरुण श्वार्झेनेगर यांनी ठरवलं की ते आयुष्यात काही अविश्वसनीय गोष्टी करतील. त्यांनी त्यांच्या मनाशी पक्कं ठरवलं आणि एक सर्वकालीन महान बॉडीबिल्डर व्हायचं उद्दिष्ट समोर ठेवलं. बऱ्याच लोकांना वाटलं की हा वेडेपणा आहे पण त्यांनी अंदाज बांधला की यासाठी बराच वेळ लागेल आणि बांधिलकीही. त्यामुळे शेवटी ते हा प्रयत्न सोडून देतील. त्यांनी असा अंदाज केला की हा मूर्खपणाचा विचार ते सोडून देतील, प्रयत्नही सोडतील आणि एक 'खरीखुरी' नोकरी पत्करतील. नंतर *अरनॉल्ड* यांनी त्यांच्या स्वप्नाला आणखी एक पैलू जोडला. त्यांना जगातला सर्वांत महान बॉडीबिल्डरच व्हायचं नव्हतं, तर एक चित्रपट अभिनेता आणि शारीरिक क्षमतेचा आंतरराष्ट्रीय गुरुदेखील व्हायचं होतं! त्यांचे मित्र म्हणाले, ''काय पण वेडगळपणाचं स्वप्न!'' अरनॉल्डनी त्यांची स्वप्नं एका कागदावर लिहून काढली आणि ती उद्दिष्टं प्रत्यक्षात आणणारच असा स्वत:शीच एक करार केला. ते म्हणतात की त्यांनी स्वत:बरोबर केलेला हाच तो करार, ज्याच्यामुळे त्यांना अमेरिकेला जाऊन मि. ऑलिम्पिया होण्यासाठी चढ चढायला सुरुवात करण्यासाठी प्रवृत्त केलं, भरीला घातलं. हॉलिवूडचा सर्वाधिक मानधन घेणारा अभिनेता आणि शारीरिक सक्षमतेच्या अध्यक्षीय समितीचा चेअरमन होण्यापर्यंत मजल मारली. स्वप्नं आणि ध्येयं यामुळे फरक पडतो का? तुम्ही त्यावर विश्वास ठेवायलाच पाहिजे, अर्नोल्डला विचारा फक्त!

संकल्प की वेळेचा अपव्यय?

बरेच लोक नवीन वर्षाचे खूप संकल्प करतात. अडचण अशी आहे की ते संकल्प सर्वसाधारणपणे फक्त काही आठवडेच टिकतात. आकडेवारीप्रमाणे, वर्षाच्या पहिल्या दोन आठवड्यांत हेल्थ क्लबची हजेरी आणि डाइट उत्पादनांची विक्री सर्वाधिक असते. जानेवारीच्या पहिल्या काही दिवसांत लोक प्रेरित झालेले असतात आणि त्यांच्या संकल्पांशी बांधील असतात. पण महिन्याच्या पंधरा तारखेच्या सुमारास तो उत्साह डळमळायला लागतो आणि सर्वसाधारणपणे महिना अखेरपर्यंत विरून जातो. का? कारण सततचा आणि अखंड प्रेरणेचा अभाव. वर्षाच्या पहिल्या तारखेला लोक प्रेरित असतात, पण ती प्रेरणा ते टिकवत नाहीत. काही लोक म्हणतात, की प्रेरणाच अशी असते की ती विरून जाते. खाणं आणि अंघोळीचंही तसंच आहे. तरीही आपल्या दैनंदिन जीवनक्रमाचा, खाणं आणि अंघोळ हा एक भाग आहे. आपल्या संकल्पांचं जर सत्यात रूपांतर करायचं असेल तर महत्त्वाचं म्हणजे प्रेरणा हा तुमच्या दैनंदिन जीवनाचा एक भाग मानला पाहिजे, काहीतरी प्रेरणादायी असं वाचणं किंवा ऐकणं, सकारात्मक आणि उत्साहवर्धक गोष्टींनी मन भरून टाकणं, स्वप्न बघणं आणि नंतर त्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्यासाठी प्रेरित होणं, यासाठी प्रेरणा आणि उत्साह देणार (एखादं पुस्तक, कॅनफिनेत किंवा संगीत) काहीतरी शोधून काढा. मी असं सुचवतो की मॅग्निफिसंट मोटिव्हेशनल मिनिट (दिमाखदार प्रेरणादायी मिनिट) हे तुमच्या दैनंदिन कार्यक्रमाचा एक भाग बनवा. प्रेरित राहणं, संकल्पना केंद्रित राहणं आणि विकास पावणं, यासाठी याची मदत होईल.

सभ्य स्त्री-पुरुषहो, लक्षात ठेवा की तुमचं आयुष्य बदलायला फक्त एक मिनिट पुरे असतं. तुम्ही जर स्वत:मध्ये गुंतवणूक केलीत, तर आश्चर्यकारक काळात तुम्हाला परिणाम दिसून येतील. या वर्षी प्रेरित राहण्याचा संकल्प करा. तुमचा दिवस आणि वर्ष छान जावो!

कॅलिफोर्निया की तीन तेरा!

एखाद्या व्यक्तीला यशाकडे जाण्यासाठी चालना देणारा अत्यावश्यक असा घटक कोणता असेल? अगणित समस्यांची कुलुपं उघडणारी विशेष किल्ली कोणती आहे? तुमचं भविष्य घडवायला मदत करेल असं साधन कोणतं? ते साधंच आहे. पण त्याचा फार गैरवापर झाला आहे आणि त्याच्याबद्दल गैरसमजुतीही आहेत. ते आहे उद्दिष्ट. उद्दिष्ट म्हणजे कालमर्यादा असलेलं स्वप्न. स्वप्नांकडे पोहोचण्याच्या पायऱ्या म्हणजे उद्दिष्ट. आपण जर उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित केलं, ती कशी ठरवायची आणि त्यांच्यापर्यंत कसं पोहोचायचं हे आत्मसात केलं, तर आपण अद्वितीय उंची गाठू शकू. 'गोल्डरश'च्या वेळी ज्यांनी मोहिमेची सुरुवात केली त्यांच्यापुढे कॅलिफोर्नियाला पोहोचण्याचं उद्दिष्ट होतं. त्यांची एक म्हण होती 'कॅलिफोर्निया ऑर बस्ट!' (कॅलिफोर्निया किंवा तीन तेरा!) त्यांच्याकडे एक स्वप्न होतं, त्यांनी ते साध्य करण्यासाठी कालावधी ठरवला आणि उद्दिष्टापर्यंत पोहोचण्याची आणि ते मिळवण्याची निष्ठा जपली. आपणही आपल्या उद्दिष्टापर्यंत पोहोचण्याची बांधिलकी ठेवली पाहिजे आणि तिथपर्यंत पोहोचलं पाहिजे. माझं एक आवडतं वचन असं. 'घोड्याच्या तोंडापुढे बांधलेलं जे गाजर असतं त्यामुळे त्याला शर्यतीत पळावंसं वाटतं!' जोरात पळा, चांगलं पळा आणि तुमच्या पुढे जी बक्षिसं ठेवलेली आहेत त्यांची मजा लुटा!

जाण्याचा निर्णय बदलू नका, फक्त दिशा बदला!

तुमच्याकडे तुमचं स्वप्न आहे. तुम्ही तुमचं उद्दिष्ट नक्की केलंय. सुरुवात करायला तुम्ही सज्ज आहात आणि मग तुम्हाला अडचणी येतात. तुमचा जाण्याचा निर्णय बदलू नका, फक्त तुमचा तिथे जाण्याचा मार्ग बदला! प्रत्येक उद्दिष्टाकडे जाण्यासाठी विविध रस्ते असू शकतील. उदाहरणार्थ, तुम्ही जर तुमच्या कामावर निघाला असाल आणि तुम्ही एका बंद रस्त्यावर पोहोचलात. तुम्ही माघार घेऊन घरी परत जाता का? नाही!

तुम्ही कामावर जाण्यासाठी खुला असलेला दुसरा रस्ता शोधून काढता. तुमच्या उद्दिष्टाकडे पोहोचताना जर तुम्हाला अडचण आली, तर तुमचा जाण्याचा निर्णय बदलू नका, तिथे जाण्याची तुमची दिशा बदला.

उद्दिष्ट आणि दूरदृष्टी यांतला फरक

स्वप्नं म्हणजे यशाची बीजं आहेत हे मी तुम्हाला यापूर्वी सांगितलं आहे. तुम्ही तुमचं स्वप्न निश्चित केल्यावर त्याचे 'उद्दिष्टां'मध्ये, म्हणजेच गाठता येतील अशा छोट्या तुकड्यांत भाग केले पाहिजेत. गाठण्याची अंतिम वेळ असलेली स्वप्नं म्हणजे उद्दिष्ट. तरीही स्वप्नांच्या प्रक्रियेत आणखी एक पातळी असते, जी तुम्हाला गाठावीच लागते. तुम्हाला तुमचं स्वप्न सापडलं आणि तुम्ही ते प्रत्यक्षात उतरवण्यासाठी उद्दिष्ट निश्चित करण्याची प्रक्रिया पण अमलात आणली आहे. त्यानंतर तुम्ही दूरदृष्टी निर्माण करण्याच्या पुढच्या पातळीवर गेलंच पाहिजे. स्वप्न हे वास्तवच असावं अशा प्रकारे जेव्हा तुम्ही स्वतःला खरोखरच त्या स्वप्नात बघता, असं स्वप्न म्हणजे दूरदृष्टी. पुढचं पाहू शकण्यासाठी आणि दूरदृष्टीच्या पात्रतेची स्वप्नं बघण्यासाठी तुम्हाला ती प्रक्रिया सुरू करावी लागेल. दूरदृष्टी असलेला माणूस म्हणजे अशी व्यक्ती, जी सर्वांनीच मोठी स्वप्नं पाहते. जी पुढचं भविष्य होतात. ती व्यक्ती स्वप्नं सत्यात आणते आणि मग त्या व्यक्तीला भविष्यवेत्ता म्हणतात. उद्दिष्ट आणि दूरदृष्टी यांच्यात फरक कोणता? उद्दिष्ट म्हणजे तुम्ही ज्याच्यासाठी काहीतरी करता एवढंच फक्त नव्हे, तर ते असं काहीतरी बनतं जे तुमच्यावर काम करतं. त्या प्रक्रियेत तुम्हाला काय मिळतं तेवढं नव्हे, तर तुम्ही तुम्ही जसे घडता, ते. थोरो म्हणाले, "दूरवरच्या टप्प्यात लोक जिथे त्यांनी निशाणा लावलाय तिथेच प्रहार करतात. म्हणूनच त्यांनी उच्च ध्येय ठेवलं पाहिजे." मित्रांनो मोठी स्वप्नं बघा, उच्च ध्येय ठेवा आणि **एक भविष्यवेत्ता होण्यासाठी प्रयत्न करा!**

लक्षात ठेवा :

जे काही तुम्हाला करता येईल किंवा ते करण्याचं स्वप्न बघता येईल,

त्याची सुरुवात करा,

धिटाईमध्ये शक्ती, जादू आणि असामान्य प्रतिभा असते;

फक्त सुरुवात करा आणि मन तप्त होऊ लागतं,

नंतर विश्वास ठेवा आणि पुढे जा आणि तुमचा कार्यभाग पूर्ण होईल!

प्रकरण ४

माणूस जसा विचार करतो...

'माणूस हृदयातून जसा विचार करतो, तसा तो असतो.' (नीतिसूत्र २३:७). गेली कित्येक वर्षं मी बायबल मधलं हे वचन ऐकत आलोय पण त्याचा खरा अर्थ मला कळला नव्हता. मला असं वाटत होतं की आयुष्यात तुम्ही फक्त प्रवाहाबरोबर जायचं असतं. जे घडलं किंवा घडलं नाही, ते जसं असायला हवं होतं तसंच आहे. जे यशस्वी झाले, ते नशीबवान होते. मी प्रवाहाप्रमाणे गेलो, आणि बरेच वेळा माझं एखाद्या वादळात सापडलेल्या भरकटणाऱ्या, इकडून तिकडे तिकडून इकडे कलंडणाऱ्या, निश्चित दिशा नसणाऱ्या बोटीप्रमाणे झालं. नंतर मला समजायला लागलं की माझ्या विचारांचा माझ्या कृती निश्चित करण्यावर परिणाम होतो आणि माझ्या यशासाठी माझी काही वैयक्तिक जबाबदारी आहे. ते वचन मी पुन्हा पुन्हा वाचलं आणि माझ्या असं लक्षात आलं की, ते फक्त माझ्या डोक्यातले विचार नव्हते तर माझ्या हृदयातलेदेखील होते. का? कारण माझ्या हृदयात माझा अगदी खरा विश्वास असतो – मी खरोखर काय विचार करतो हे निश्चित करणारा विश्वास. ज्यामुळे मी काय प्रयत्न करेन आणि काय प्राप्त करू शकेन हे निश्चित करणारे विचार माझ्या हृदयात होते!

ते वचन 'जसा तो त्याच्या हृदयात विचार करतो.' असं का म्हणतं? आपण आपल्या डोक्याने जो विचार करतो त्यापेक्षा आपण आपल्या हृदयातून जो विचार करतो तो खूपच वेगळा असू शकतो. प्रेरणेचा संबंध आपल्या डोक्याशी आहे. आपल्याला कृती करायला लावणं, उठून काहीतरी करणं हे त्याचं काम आहे. स्फूर्तीचा संबंध आपल्या हृदयाशी आहे, आपल्या आतल्या व्यक्तित्त्वाशी आहे. आपल्या डोक्याला काय म्हणायचंय याची स्फूर्ती पर्वा करत नाही! आपण योजलेले काम तर्कदुष्ट, अशक्य आणि न करता येण्यासारखं आहे, असं आपलं डोकं म्हणेल;

पण आपलं हृदय मात्र त्याची पर्वा करत नाही, डोक्याकडे आणि त्या प्रश्नाच्या तर्कशास्त्राकडे दुर्लक्ष करतं आणि त्याने जे काम केलंच पाहिजे, असं त्याला 'वाटतं' त्याच्यामागे जातं. अशक्य कसरती करू शकणाऱ्या लोकांना त्या करण्याची स्फूर्ती कशी मिळाली हे आपण नेहमीच ऐकतो. काही कसरतपटू त्यांच्या एखाद्या कुटुंब सदस्याला किंवा दिवंगत मित्राला त्यांचा खेळ समर्पित करतात आणि त्यांनाही कधी शक्य वाटलं नव्हतं अशा अशक्यप्राय गोष्टी करतात. अपघातग्रस्त किंवा दुर्घटनाग्रस्त लोक इतरांना सोडवण्यासाठी अफाट मानवी शक्तीचं प्रदर्शन घडवतात. लोक त्यांच्या हृदयातून जसा विचार करतात, तसे ते असतात!

खरे तुम्ही

तुम्ही जेव्हा आरशात बघता तेव्हा आयुष्यभर तुम्हाला माहीत असलेला एक चेहरा तुम्हाला दिसतो. तुम्ही ज्याच्याबरोबर जवळिकीचं नातं जोडता, ती व्यक्ती तुम्हाला दिसते. तुम्ही तुम्हाला बघता! पण ते तुम्ही, खरेखुरे तुम्ही नसता. खरे तुम्ही आतमध्ये आहात, आतली व्यक्ती. ज्या गोष्टी तुम्ही करता किंवा करत नाही अशा तुमच्या बाह्य रूपाला ती आतली व्यक्ती प्रत्यक्षपणे जबाबदार आहे. एक माणूस त्याच्या हृदयात, मनाच्या आतल्या गाभ्यात, त्याच्या खऱ्याखुऱ्या व्यक्तित्वात जसा विचार करतो, तसा तो असतो! आतले तुम्ही म्हणजे गाभ्यातले तुम्ही. आर्टिचोकचं हृदय म्हणजे जसा त्याचा मुख्य भाग असतो, तसा तुमचा गाभा म्हणजे तुमचा सर्वांत उत्तम भाग असतो. सफरचंदाचा गाभा हा त्याचा सर्वांत महत्त्वाचा भाग असतो. कारण (किंवा या प्रकरणात, सगळं काही बोलल्या-खाल्ल्यावर) त्या सफरचंदाचं भवितव्य ठरवणाऱ्या बिया त्या गाभ्यात असतात. तुम्ही जर एक सफरचंद निम्मं-निम्मं कापलं, तर त्या सफरचंदाच्या बिया तुम्ही मोजू शकता. पण त्या सफरचंदाच्या बियांतून भविष्यात किती सफरचंदं निर्माण होणार आहेत ते तुम्ही मोजू शकत नाही!

अननसाचा गाभा म्हणजे सर्वांत गोड भाग. आपल्याबद्दलदेखील हेच खरं आहे. आपले सर्वाधिक तीव्रतेचे विचार, भावना आणि विश्वास हृदयात सापडतात. तुमच्या 'खऱ्या विचारांचा, स्वप्नांचा, विश्वासांचा

आणि मूल्यांचा' उपयोग करायला सुरुवात केल्यानंतर तुम्हाला त्या आतल्या माणसाचा शोध घेता येईल. तुमच्या आयुष्याला मार्गदर्शन करणाऱ्या, दिशा देणाऱ्या, पक्कं करणाऱ्या आणि तुमचं आयुष्य तुम्ही कसं जगता ते निश्चित करणाऱ्या याच गोष्टी आहेत. तुमच्या इच्छांवर कृती करायला लावणाऱ्या याच गोष्टी आहेत. तुम्ही कसला प्रयत्न करणार आणि कशापासून दूर राहणार, कशाच्या मागे जाणार आणि कशाकडे दुर्लक्ष करणार, काय करणार आणि काय नाही, हे तुम्ही इथेच निश्चित करता. आतल्या व्यक्तिमत्त्वात, गाभ्यात, हृदयात माणूस जसा विचार करतो, तसा तो असतो. केंद्र, गाभा, तुमचं हृदय म्हणजे खरे तुम्ही.

तुमचे विचार बदला

तुमचे विचार बदलायच्या आधी, तुमच्या मनात काय चाललंय ते तुम्हाला बदलावं लागेल. तुमचं जाण्याचं ठिकाण बदलण्याच्या आधी तुम्हाला तुमचे विचार बदलावे लागतील. तुमचं वजन आणि प्रकृती बदलण्यासाठी तुम्ही काय खाता याच्यात जसा फरक करावा लागतो, तसंच तुम्ही कसे वागता आणि काय कृती करता याच्यावर तुमच्या विचारांचा परिणाम होतो. तुमच्या मनाच्या बाबतीतदेखील हेच खरं आहे. संशय, भीती आणि नकारात्मक विचार या गोष्टी तुमच्या स्वप्नांसाठी मारक असतात. म्हणून त्यांचा त्याग करून तुम्ही सकारात्मक, निरोगी, स्फूर्तिदायक आणि प्रोत्साहित करणाऱ्या गोष्टींनी तुमचं मन भरून टाकलं पाहिजे. तुम्ही काय आहात हे जसं तुम्ही काय खाता यावर ठरतं, तसंच तुम्ही काय विचार करता त्याप्रमाणे अगदी तसेच तुम्ही असता. लक्षात ठेवा, तुमचं आतलं रूपच कायम तुमचं बाह्य रूप दर्शवतं. तुमचे विचार बदला आणि तुमचं आयुष्य बदला!

महान विचारवंत

यश हे सरळसरळ तुमच्या विचारांची निष्पत्ती आहे, या सत्यावर इतिहासातले सगळे महान विचारवंत सहमत होतात, त्यांची आयुष्याबद्दलची तत्त्वज्ञानं जरी कितीही वेगवेगळी असली तरी. डॉ. नॉर्मन व्हिन्सेंट पील यांनी

म्हटलंय, ''तुम्ही जर नकारात्मक बैठक घेऊन विचार केला, तर तुम्हाला नकारात्मकच परिणाम मिळतील. पण तुम्ही जर सकारात्मक गोष्टींचा विचार केलात तर तुम्हाला सकारात्मक परिणाम मिळवता येतील.'' राल्फ वॉल्डो इमर्सन यांनी म्हटलंय, ''सगळा दिवस तो माणूस काय विचार करतो, त्याच्यावर तो कसा आहे ते ठरतं.'' एक महान तत्त्वज्ञ आणि मानसशास्त्रज्ञ विल्यम जेम्स यांनी म्हटलंय, ''मनाचे दृष्टिकोन बदलून माणसं त्यांची आयुष्यं बदलू शकतात, हा माझ्या माणसांबद्दलचा सर्वांत महान शोध आहे.'' डॉ. बेन कार्सन गिफ्टेड हॅन्डस्चे लेखक आणि एक नामवंत न्युरोसर्जन, यांनी म्हटलंय, ''मोठा विचार करा, धिटाईचा विचार करा, जगाचा विचार करा, मोठी उडी मारण्याचा विचार करा!'' शेवटी, सर्वकालीन सकारात्मक विचारवंत नॅलिलीच्या सुतारानी म्हटलंय, ''जे लोक विश्वास ठेवतात, त्यांना सगळ्या गोष्टी शक्य आहेत.'' मित्रांनो, जर तुम्ही करू शकता असा विचार केलात, तर करू शकाल. एक माणूस जसा विचार करतो – तसा तो असतो! महान विचार करा, महान गोष्टी करा आणि तुमचा दिवस छान जावो!

मनावरचं गोंदण

डॉ. नॉर्मन व्हिन्सेंट पील यांनी नमूद केलंय, ''तुम्ही जर नकारात्मक पद्धतीने विचार केलात, तर तुम्हाला नकारात्मक परिणाम मिळतील. आपण तुम्ही जर सकारात्मक पद्धतीने विचार केलात, तर तुम्हाला सकारात्मक परिणाम मिळतील.'' त्यांचंच ***द पॉवर ऑफ पॉझिटिव्ह थिंकिंग*** हे पुस्तक सकारात्मक विचार करणाऱ्या नवीन पिढीसाठी एक आदर्श पुस्तक ठरलं. वस्तुत:, मी स्वत: जेव्हा एका नकारात्मक प्रतिक्रिया देणाऱ्यापासून सकारात्मक निर्मितीक्षम व्यक्तीत रूपांतरित झालो, तेव्हा मी वाचलेल्या पहिल्या पुस्तकांपैकी ते एक होतं. एका सकारात्मक मानसिक दृष्टिकोनामुळे मी माझी काही पत निर्माण करू शकतो, हे सत्य उमगलं. एका दूरदर्शनच्या कार्यक्रमात डॉ. पील यांनी सांगितलेली एक जबरदस्त कहाणी मी एकदा ऐकली. त्यांनी सांगितलं की एकदा एका टॅटू काढणाऱ्या दुकानावरून जात असताना, 'हरण्यासाठी जन्मलेला'

असा नवीन टॅटू काढलेला एक गोंधळलेला दिसणारा तरुण माणूस दुकानातून बाहेर आला. या माणसाला रस्त्यावरून अडखळत जाताना डॉ. पील यांनी बघितलं. नंतर तो टॅटू रेखाटणारा कलाकारही दुकानाच्या बाहेर आला आणि जाणाऱ्या तरुणाकडे बघत बसला. 'हरण्यासाठी जन्मलेला' असा टॅटू काढलेल्या तरुण माणसाबद्दल डॉ. पील यांनी विचारलं. त्या वृद्ध टॅटू कलाकाराने दुःखाने त्याचं डोकं हलवलं आणि म्हणाला, "तो हरण्यासाठी जन्मला आहे असं जाहीर करणारा टॅटू त्याला खरंच काढून घ्यायचाय का असं मी त्याला विचारलं. त्याला खरोखरच तो काढून घ्यायचाय याबाबतीत तो ठाम होता." डॉ. पील म्हणाले, "हे चमत्कारिक नाही का?" त्यावर तो टॅटू कलाकार म्हणाला, "खरं, म्हणजे नाही! असं बघा, त्याच्या दंडावर त्याने ते गोंदवून घेण्यापूर्वी त्यानं ते त्याच्या मेंदूत गोंदवून घेतलं होतं!" तो एखाद्या हरण्यासाठी जन्मलेल्या व्यक्तीसारखा वागेल, कारण तो हरण्यासाठी जन्मलेला आहे, असा त्याला विश्वास आहे. आपल्यापैकी कोणीच हरण्यासाठी जन्माला आलेला नाही. आपण जिंकण्यासाठी जन्माला आलेले आहोत! पण निवड आपल्यावर अवलंबून आहे.

तुम्ही घोड्याला पाण्यापर्यंत नेऊ शकाल, पण...

तुम्ही घोड्याला पाण्यापर्यंत नेऊ शकाल, पण त्याला पाणी प्यायला भाग पाडू शकणार नाही. एखाद्या मूर्खाला तुम्ही शहाणपणाकडे नेऊ शकाल, पण त्याला विचार करायला लावू शकणार नाही. यशाचं गुपित शोधणाऱ्या एका माणसाची एक गोष्ट आहे. तो एका शहाण्या माणसाकडे आला आणि त्याने विचारलं, "मी यशस्वी होण्यासाठी काय करायला पाहिजे?" शहाण्या माणसाने उत्तर दिलं, "तू जसा विचार करतोस ते तुला बदलावं लागेल, तू काय करतोस ते बदलावं लागेल, काय कृती करतोस ते बदलावं लागेल आणि शेवटी काही स्वार्थत्याग करण्याची तुझी तयारी असावी लागेल." शहाण्या माणसाच्या या बोलण्यावर विचार करण्यासाठी तो माणूस थबकला आणि नंतर चालता झाला. तो काय करत होता ते त्याला थांबवायचं नव्हतं आणि त्याचे विचार

त्याला बदलायचे नव्हते. त्याला अडचणीचं होईल म्हणून आवश्यक ते त्याग करण्याचीही त्याची तयारी नव्हती. बरेच लोक यशस्वी होण्यासाठी काय करावं लागतं ते ऐकतात, पण बदलायचं नाकारतात आणि अपयश पत्करतात. सभ्य स्त्री-पुरुषहो, हे काळाइतकंच जुनं आहे. तुम्ही ज्याबद्दल विचार करता तसे तुम्ही असता, तुमचे विचार बदला आणि तुमचं आयुष्य बदला!

आपण ज्याबद्दल विचार करतो, तसेच आपण बनतो. तुम्ही कोणत्या ध्येयांचा पाठपुरावा करता आणि काय कृती करता, हे तुम्ही कसा विचार करता त्यामुळे निश्चित होतं. जे लोक कशाबद्दलही विचार करत नाहीत, त्यांचा कल काहीही न करण्याकडे असतो आणि जे लोक एका निश्चित उद्दिष्टाचा विचार करतात, ते लोक त्या उद्दिष्टापर्यंत पोहोचण्याची शक्यता अधिक असते. ज्या लोकांना ते कुठे चालले आहेत याची कल्पना नसते, त्यांचे विचार गोंधळ, संशय आणि भीतीचे असतात, त्यांची आयुष्यं गोंधळ, अस्वस्थता आणि संशयाने भरलेली असतात, कारण ते त्याचाच विचार करत असतात. तुम्ही जर कसलाही विचार केला नाही, तर तुम्ही काहीही न करण्याकडे तुमचा कल असेल, तुम्ही जर मोठ्या गोष्टींचा विचार कराल, तर तुम्ही मोठ्या गोष्टी करण्यासाठी अधिक लायक आहात.

विषारी अळंबी (मशरूम)

तुमचं मन हे एखाद्या बगिच्यासारखं आहे. म्हणून यशस्वी होण्यासाठी तुमच्या मनात काय प्रवेश करतंय, याबद्दल तुम्ही सावध असलं पाहिजे. जे काही पेराल ते तिथे उगवेल. तुम्ही जर काही सकारात्मक पेराल तर तिथे सकारात्मक उगवेल. पण जर तुम्ही नकारात्मक पेराल तर नकारात्मक उगवेल. तुम्ही जर मका लावाल तर मका उगवेल. पण जर तुम्ही विषारी अळंबी लावलीत तर ती पण तिथे वाढेल. वस्तुतः तण आणि इतर उपद्रवकारक रोपटी यांचा जलद्‌ गतीने वाढण्याकडे कल असतो आणि त्या इतर वनस्पतींना झाकोळून आणि गुदमरून

टाकतात. म्हणूनच तुमच्या मनात कशाला प्रवेश करायला तुम्ही संमती देता याबद्दल तुम्ही सावध असलं पाहिजे, कारण ते वाढू लागेल. जसं तुम्ही पेराल तसं उगवेल. कशाबद्दलही विचार केला नाही तर तुमच्या हातून काहीच घडणार नाही. मोठ्या गोष्टींचा विचार करा आणि तुम्ही सकारात्मकरित्या वाढाल, नकारात्मक विचार करा आणि तुम्ही नकारात्मकरित्या वाढाल!

यशस्वी जीवन घडवा

प्रत्येक दिवस हा एक महान दिवस असतो आणि तुम्हाला जरी तो महान दिवस असल्यासारखं वाटलं नाही, तरी तुम्ही तो एक महान दिवस घडवू शकता. मेक इट ए विनिंग लाईफ, सक्सेस स्ट्रॅटजीज फॉर लाईफ, लव्ह ॲन्ड बिझिनेस पुस्तकाचा लेखक आणि माझा मित्र वुल्फ रिके म्हणतो की, खरं म्हणजे आयुष्य तुम्ही कसं घडवता यावर आहे. तुम्ही तुमच्यासाठी गोष्टी घडवल्या पाहिजेत. तुमच्या मनाला प्रत्येक दिवस हा महान दिवस आहे असं प्रोग्रॅम करून तुम्ही प्रत्येक दिवस महान दिवस बनवला पाहिजे. बहुतेक आजार मनातून उद्‌भवलेले असतात असं मनोविकारतज्ज्ञ म्हणतात. त्याचा अर्थ असा होतो की तुमचं मन त्या विकृतींची निर्मिती करतं. कोणत्याही आजाराचा तुम्ही उल्लेख करा, एकतर ते त्या स्थितीतून गेलेले असतात किंवा त्या वेळेला त्या स्थितीत असतात, असेही लोक आपल्याला माहीत असतात. तुमचा आत्मा किंवा मन आणि शरीर यांच्यात एक निश्चित नातं आहे. तुमचं मन तुमच्या शरीरात आजार निर्माण करतं. अभ्यासपूर्ण अहवालातून स्पष्ट झालेलं आहे की तुम्ही जर नकारात्मक ऐवजी सकारात्मक माहितीने तुमचं मन प्रोग्रॅम केलं, तर प्रत्येक दिवशी तुमचं मन एक उल्हासित आणि असाधारण दिवस निर्माण करू शकतं. जर तुम्ही त्या पद्धतीने करायला तयार असाल तर प्रत्येक दिवस एक महान दिवस असेल आणि तुमचं आयुष्य एक विजयी आयुष्य होईल! मोठे विचार करा, मोठ्या गोष्टी करा आणि तो एक विजयी दिवस बनवा!

वेडेपणा?

तुम्ही आत्ता जिथे आहात ते बदलण्यासाठी तुम्ही तुमचे विचार बदलले पाहिजेत. तुम्ही आज कुठे आहात एवढंच नव्हे तर, अधिक महत्त्वाचं म्हणजे तुम्ही उद्या कुठे असणार आहात हे तुमचे विचार ठरवतात. 'वेडेपणा'ची व्याख्या आहे अगदी त्याच पद्धतीने, जे करत होतात तेच करत राहायचं आणि निष्पत्ती मात्र काहीतरी वेगळी असेल अशी अपेक्षा करायची. तुम्हाला जर यश पाहिजे असेल तर तुम्ही तुमचे विचार बदलणं अनिवार्य आहे. तुम्हाला तुमचे विचार बदललेच पाहिजेत! तुम्ही कसा विचार करता हे बदलू शकलात तर तुम्ही कशी कृती करता हे बदलू शकाल; तुम्ही कसे वागता ते बदलू शकलात तर तुम्ही काय करता हे बदलू शकता; तुम्ही काय करता हे बदलू शकाल तर तुम्हाला काय मिळतं ते बदलू शकाल; तुम्हाला काय मिळतं हे बदललंत तर तुम्ही कुठे चालला आहात हे तुम्ही बदलाल; तुम्ही कुठे चालला आहात हे जर तुम्ही बदललंत तर तुम्ही तुमचं आयुष्य बदलाल!

प्रवाहाबरोबर जायचं?

''ते जर घडायचं असेल तर ते माझ्यावर अवलंबून आहे!'' आपण सर्वांनी ही म्हण ऐकली आहे. पण त्याचा खरा अर्थ काय आहे? असं बघा, त्याचा अर्थ आहे आपलं यश किंवा अपयश यांची जबाबदारी आपण घेतलीच पाहिजे. एकतर आपण आयुष्यावर काहीतरी कृती केली पाहिजे, नाहीतर आयुष्य आपल्यावर कृती करेल. आपण एकतर प्रवाहाबरोबर जाऊ शकतो, जो आपल्याला एखाद्या जुन्या ठिकाणी घेऊन जाईल. किंवा मग आपणच प्रवाहाला दिशा दाखवू शकतो. म्हणजेच आपलं मुक्कामाचं ठिकाण आपण निश्चित करू शकतो. तुम्ही जर नदीत नौकानयन करणाऱ्या बोटींकडे पाहिलंत तर तुम्हाला असं आढळेल की वारा जर दक्षिणेकडून वाहत असेल तर काही बोटी प्रवाहाबरोबर जाऊन दक्षिणेकडे जातील आणि अशाही काही बोटी असतील ज्या उत्तर, पूर्व आणि पश्चिमेकडे जात असतील. प्रवाहाबरोबर न जाता त्यांना जिथे जायचंय तिथे जाण्यासाठी प्रवाहाचा उपयोग करून

घेताना दिसतील. आयुष्यात कुठे जायचं ते तुम्ही ठरवता. जिथे रस्ता नसेल तिथे जाणं कदाचित सोपं नसेल, पण तुम्ही जर ते केलंत तर तुम्ही तुमचा ठसा उमटवाल.

तुम्ही कसे वागता आणि काय कृती करता हे तुमचे विचार ठरवतात. तुम्हाला काय मिळतं हे त्यावरून निश्चित होतं आणि तुम्हाला काय मिळतं यावरूनच तुम्ही पुढे कुठे जाता हे निश्चित होतं. ते इतकं सोपं होतं आणि तरीही मी माझे विचार आधी का बदलले नाहीत याचं मला बरेच वेळा आश्चर्य वाटतं. मी जर माझे विचार बदलू शकलो असेन, तर इतरही लोक त्यांचे विचार का बदलत नाहीत? कारण असं आहे की ते जरी एवढं सोपं वाटत असलं तरी ते सोपं नाही. कोणीतरी म्हटलं आहे, ''तुमच्या मनात काय चाललंय यामुळे तुमचे विचार निर्माण होतात आणि त्यावरून तुम्ही कुठे आहात आणि काय आहात हे ठरतं.''

मी जेव्हा एक पूर्ण वेळ संगीतकार होतो, तेव्हा माझ्या एका दोस्ताने मला सांगितल्याचं आठवतं, ''प्रवाहाबरोबर जा, जे चांगलं वाटेल तिथे जा.'' ते इतकं मस्त आणि आधुनिक वाटलं, की माझं तत्त्वज्ञान म्हणून मी त्याचा स्वीकार केला. 'जे चाललंय ते छान चाललंय' असं जरी असलं तरी मला जे करायचंय होतं किंवा मला जिथे खरोखरच जायचं होतं ते ते नव्हतं. वस्तुतः चांगलं राहण्याचा मी जो विचार केला होता ते खरं म्हणजे एक मृगजळ होतं. मी इतका मागे होतो की मला असं वाटत होतं की मी पुढेच आहे!

उदाहरणार्थ, एकदा मला एक नको असलेली नोकरी देऊ करण्यात आली. पण मी विचार केला, 'प्रवाहाबरोबर जावं, काय चाललंय त्या बरोबर जावं.' (आणि मला खरं तर जायचं नव्हतं) मी त्या नोकरीचा तिरस्कार करत होतो आणि त्यामुळे मी अक्षरशः आजारी पडलो. पण तरीही मी टिकून राहिलो कारण ते मला पैसे देत राहिले. ते विचार किती मागासलेले होते हे मला आत्ता कळतंय आणि खरं म्हणजे बरेच लोक याच पद्धतीने विचार करतात. आकडेवारीप्रमाणे ऐंशी टक्क्यांहून अधिक अमेरिकन लोक, ते सहनदेखील करू शकत नाहीत अशा नोकऱ्या करतात. मी त्यांच्यापैकीच एक होतो (मागासलेला विचार करणारा) त्यामुळे ते खरं आहे हे मला ठाऊक आहे! मी एवढा मागासलेला विचार

करणारा होतो असं तुम्ही म्हणू शकाल. तुम्ही जर माझा मेंदू काढून एका पक्ष्याला लावला असता तर तो पक्षी उडायला लागला असता पण मागच्या दिशेने!

एकदा मी माझे विचार बदलल्यावर मात्र, ज्या लोकांनी त्यांना काय करायचंय तेच करायचा निश्चय केला होता आणि जिथे जायचंय तिथे जाण्यासाठी प्रवाहाचा उपयोग करून घेण्याचं ठरवलं होतं, अशा लोकांचा अभ्यास करायला मी सुरुवात केली. तुमचं आयुष्य बदलण्यासाठी तुम्हाला तुमचे विचार बदलण्याची गरज आहे, हे उमगलेल्या लोकांबद्दलही मी वाचलं. नाहीतर त्याच ठिकाणी, तेच करत आणि तेच परिणाम मिळवत तुम्ही जसे होता, तसेच राहता. झिग झिगलर म्हणतात तसं "ते सडलेले विचार तुम्ही बदललेच पाहिजेत!"

संकुचित मनाचा कोळी

काहीतरी महान साध्य करायचं असेल तर तुमच्याकडे मोठी स्वप्नं आणि मोठी उद्दिष्टं असली पाहिजेत. तुमच्या सद्यस्थितीशी कधीही जमवून घेऊ नका. उलट, तुम्ही नेहमीच उंचावर पोहोचलं पाहिजे. एका कोळ्याची एक गोष्ट आहे. तो आश्चर्यकारकरीत्या सहज मासे पकडायचा. पण मासे पकडल्यानंतर तो काहीतरी विचित्र करायचा. लहान मासे ठेवून तो मोठे मासे पुन्हा परत फेकायचा. 'तो असं का करतोय?' हे कोणीतरी त्याला विचारलं आणि त्याने उत्तर दिलं, "कारण माझ्याकडे एक छोटंसंच भांडं आहे!" सभ्य स्त्री-पुरुषहो आपल्या पकडीत जे आहे त्यापेक्षा आपला आवाका नेहमीच अधिक असला पाहिजे.

सर्जनशील विचार करणारा कोळी

आपण अशा काही लोकांबद्दल बोललो, जे त्यांच्या परिस्थितीला आणि प्रसंगांना, ते जे मिळवू शकतील त्याच्यावर मर्यादा घालू देतात. एक दूसरा विचार न करणारा कोळी, त्याच्याकडे लहान भांडे असल्याने लहान मासे ठेवून मोठे मासे परत पाण्यात फेकून देत होता, त्याची गोष्ट

मी तुम्हाला सांगितली. एक पाऊल पुढे जाऊन बोलायचं झालं तर, तो नुसताच दूरचा विचार न करणारा नव्हता, तर त्याच्या मर्यादित दृष्टीमुळे आणि कल्पनाशक्तीच्या अभावामुळे दिसत असलेल्या संधीचा फायदा करून घ्यायला असमर्थ होता. त्याच्या उद्दिष्टांकडे पोहोचण्यासाठी दुसरे पर्याय काय असू शकतील, याचा त्याच्या मर्यादित दृष्टीमुळे तो विचारदेखील करू शकत नव्हता. अडचण त्या भांड्याच्या आकाराची नव्हे, तर त्याच्या विचारांच्या मापाची होती. छोट्या विचारांना नेहमी छोटेच परिणाम मिळतात, कारण ज्या शक्यता अस्तित्वात असतात, त्यांच्यावर छोट्या विचारांमुळे मर्यादा पडतात. मासे परत पाण्यात फेकण्याऐवजी त्या कोळ्याने माशांचे सरळ लहान तुकडे करायला पाहिजे होते! आपल्यापैकी खूप जण आपल्या निर्मितीक्षमतेला बेड्या घालतात आणि आपल्या सध्याच्या परिस्थितीला आपल्याला थांबवू देतात. तुमच्या मनाला उंच उंच विहार करायला तुम्ही परवानगी दिली पाहिजे, म्हणजे तुमची स्वप्नं प्रत्यक्षात उतरू शकतील. लक्षात ठेवा, तुम्ही जर 'मी करू शकतो' असा विचार केलात, तर तुम्ही करू शकाल!

म्हातारा गावंढळ कुत्रा

बहुसंख्य लोक त्यांची स्वप्नं जगत नाहीत कारण त्यांना कोणत्याही प्रकारचा धोका पत्करायचा नसतो आणि ते भयभीत असतात. स्वप्नं जगण्यापेक्षा नुसतंच बसून राहणं, तक्रार करणं आणि परिस्थितीबद्दल हळहळत राहणं ते पत्करतात. आयुष्यालाच ते त्यांची वाटचाल ठरवू देतात. एका जुन्या म्हणीप्रमाणे, 'तुम्ही कुठे चालला आहात हे जर तुम्हाला ठाऊक नसेल, तर कोणताही रस्ता चालेल.' तुम्ही कोण आहात हे तुम्हाला ठाऊक नसेल तर तुम्ही कोणत्याही हाकेला उत्तर द्याल. तुम्हाला हे ठाऊक होतं का, सोमवारी सकाळी सात ते नऊच्या दरम्यानची वेळ हृदयविकाराचा झटका येण्यासाठी सर्वोत्तम वेळ आहे? याच वेळेला, ज्या नोकऱ्यांचा त्यांना तिरस्कार वाटतो, ज्या नोकऱ्या त्यांना सहन होत नाहीत, अशा नोकऱ्यांसाठी त्यांना उठून जावं लागतं. मग ते दिवसभर त्या नोकरीबद्दल तक्रारी करण्यात, नुसतंच बसून राहण्यात वेळ घालवतात.

सभ्य स्त्री-पुरुषहो, तुम्ही ज्या गोष्टीला परवानगी देता, त्याबद्दल कधीच तक्रार करू नका. तुम्हाला निवडीची संधी आहे!

हा मुद्दा अधिक स्पष्ट करणारी एक गोष्ट मी तुम्हाला सांगतो. एक माणूस एका गावाबाहेरच्या रस्त्याने चालला होता. एका घरासमोरच्या अंगणात एक म्हातारा शेतकरी त्याच्या झुलत्या खुर्चीत बसलेला होता. त्या शेतकऱ्याच्या शेजारी एक कुत्रा बसला होता. तो कुत्रा आकांत करत होता आणि सगळ्या प्रकारच्या आवाजात ओरडत होता. तो माणूस त्या शेतकऱ्याकडे गेला आणि म्हणाला, "हा कुत्रा का आकांत करतो आहे आणि एवढा ओरडतो आहे?" तो शेतकरी म्हणाला, "कारण तो एका खिळ्यावर बसला आहे." मग तो माणूस म्हणाला, "तो उठत का नाही?" शेतकरी म्हणाला, "कारण ते फार जास्त टोचत नाहीये!"

तुम्ही जर एखाद्या न आवडणाऱ्या नोकरीला जात असाल आणि बसून राहणं, तक्रारी करणं एवढंच जर करत असाल, तर त्या खिळ्यावर बसलेल्या कुत्र्यापेक्षा तुम्ही बरे नाही.

सभ्य स्त्री-पुरुषहो, तुम्ही ज्याला परवानगी देता, त्याबद्दल तक्रार करू नका. तुम्हाला पर्याय आहे. आयुष्यात कुठे जायचंय ते तुम्ही निवडलं पाहिजे. तुम्हाला जर करायचं असेल, तर तुम्ही करू शकता! महान होणं निवडा!

आनंदी असण्याचा निर्णय घ्या!

प्रत्येक सकाळी तिच्यापुढे दोन पर्याय असतात, असं एका टीव्हीवरच्या जाहिरातीमधल्या एका ज्येष्ठ नागरिक स्त्रीने सांगितलंय! मी एकतर आनंदी असण्याची निवड करू शकते किंवा दुःखी असण्याची. आनंदी असणं ही एक निवड असल्याने मी आनंदी राहण्याची निवड करते, असं तिने सांगितलं. तुम्ही एक वाईट किंवा एक चांगला दृष्टिकोन घेऊन जागे होऊ शकता. प्रत्येक दिवस म्हणजे एक नवी कोरी संधी आहे आणि तिचं तुम्ही कसं स्वागत करता हे तुमच्यावर अवलंबून आहे. काही लोक एका सकारात्मक दृष्टिकोनासह आणि सकारात्मक मनःस्थितीत उठतात आणि म्हणतात, 'शुभ प्रभात, देवा!' पण काही

लोक नकारात्मक दृष्टिकोनासह आणि नकारात्मक मानसिक स्थितीत जागे होतात आणि म्हणतात, ''सकाळ झालीये, देवा!'' तुम्ही कोणता दृष्टिकोन स्वीकारता हे तुमच्यावर अवलंबून आहे. मी असं सुचवीन की उठून तुम्ही 'शुभ प्रभात, देवा!' म्हणण्याची आवश्यकता आहे. कारण तुम्ही जागे होता तो प्रत्येक दिवस ही खरोखरच एक छान सकाळ आहे. (झिग झिगलर म्हणतो तसं, ''तुमचा विश्वास नसेल... तर फक्त एखादी चुकवून बघा!'') तुम्ही जेव्हा उठता तेव्हा फक्त तुमच्या आशीर्वादांची गणती करा आणि आनंदी असण्याची निवड करा. ती खरोखरच तुमची एक निवड असेल!

वाढतानाच्या वेदना

भीती वाटते म्हणून बरेच लोक आयुष्य समरसून जगत नाहीत. जगण्याचा आनंद आणि आयुष्य त्यांच्यापासून हिरावून घेण्याची सूट ते भीतीला देतात. तुम्ही बेफिकीर आणि मूर्ख असावं असं मला वाटत नाही, पण तुम्ही धोका पत्करावा आणि स्वत:ला आव्हान द्यावं असं मला वाटतं. कारण जर तुम्ही काही धोके पत्करायला घाबरत असाल, तर तुम्ही कधीही तुमचं स्तुत्य सामर्थ्य वाढवू शकणार नाही, ताणू शकणार नाही किंवा त्यापर्यंत पोहोचू शकणार नाही. ताणायला, वाढायला, स्वत:ला पुढे ढकलायला तुम्ही इच्छुक असलंच पाहिजे. काही वेळा ते त्रासदायक असेल, पण वेदनेशिवाय वाढ नसते. म्हणूनच त्याला वाढतानाच्या वेदना म्हणतात.

तुम्हाला जर असं एखादं मूल झालं, जे अर्भक असल्यापासून वाढलंच नाही आणि आता ते तीन वर्षांचं आहे, तर तुम्ही काय विचार कराल? तुम्ही त्याला तातडीने डॉक्टरांकडे न्याल. मूल एकदा पडलं आणि घाबरून त्याने चालण्याचा प्रयत्न सोडून दिला तर? काहीतरी चुकतंय असं तुम्ही म्हणाल, कारण पडल्याशिवाय आणि उठल्याशिवाय ते मूल चालायला कधीच शिकणार नाही. आपण पडतो म्हणून किंवा फक्त जरा वेदनादायक आहे म्हणून आपण प्रयत्न करायचं थांबवू शकत नाही. वाढणं हे वेदनादायक असलं तरी ते आवश्यक आहे. चॅलेंजर यानाच्या दु:खद दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या अंतराळवीरांच्या कुटुंबीयांचं

एक वचन इथे उद्धृत करता येईल, 'धोका पत्करायला घाबरू नका. सगळे शोध, सगळी वाढ आखीव असते. आयुष्य आव्हानांनी भरलेलं आहे. फक्त तेच लोक विकसित होऊ शकतील, जे त्या आव्हानांच्या मागे जायला तयार असतात. आपण जर कड्यावरून चालायला तयार असलो, तरच आपण विजयी होऊ शकतो.' लक्षात ठेवा, जर तुम्ही विश्वास ठेवू शकलात तर सगळं काही शक्य आहे.

होय, मी करू शकतो!

जर तुमची स्वप्नं सत्यात आणायची असतील, यशस्वी व्हायचं असेल, तर तुम्हाला तुमचे विचार बदलायला लागतील. तुम्हाला अपयश येणं अशक्य आहे, प्रामाणिकपणे विश्वास ठेवत या बिंदूपर्यंत पोहोचण्याएवढे तुम्ही तुमचे विचार विकसित केले पाहिजेत. ह्युस्टन ऑईलर्स आणि बफेलो बिल्स यांच्यामध्ये काही वर्षांपूर्वी एक फुटबॉलचा फार छान सामना झाला. ह्युस्टन ऑईलर्स हाफ-टाईम, ३५-३ ने पुढे होते आणि बफेलोंचे सेकंड स्ट्रिंग क्वार्टरबॅक आत होते. बिल्सना त्यांच्या वाईट परिस्थितीतून लवकर मुक्त करण्यासाठी खेळ लवकरच संपावा अशी प्रत्येकाला आशा होती. पण बिल्सना त्यांच्या कर्तृत्वाबद्दल किंवा ते खेळ जिंकू शकतील याबद्दल संशय नव्हता. ते सेकंड हाफमधून बाहेर आले, त्यांनी ३८ गुण मिळवले आणि ४१-३८ असा खेळ जिंकला! या उदाहरणावरून स्पष्टपणे अधोरेखित होतं की जर जिंकायचं असेल तर तुम्ही एखाद्या विजेत्यासारखा विचार केला पाहिजे.

ही कविता काळाच्या परीक्षेत उतरलेली एक सुप्रसिद्ध परिमाण आहे. कवितेचा लेखक अनामिक आहे, पण तिचा प्रभाव अविचल आहे.

तुम्ही जर हरलात असा विचार केलात, तर तुम्ही हरला आहात
तुम्ही जर विचार केलात की तुम्ही तसं करण्याचं धाडस करू नये,
तर तुम्ही हरत नाही
तुम्हाला जिंकायला आवडेल पण तुम्ही जिंकू शकणार नाही
असा तुम्ही विचार करता

तर तुम्ही जवळजवळ जिंकू शकतच नाही
तुम्ही जर हराल असं तुम्हाला वाटतं, तर तुम्ही हरला आहात
कारण या जगात तुम्हाला नक्कीच असं आढळेल
व्यक्तीच्या इच्छेवर यश अवलंबून असतं.
ते सगळं मानसिक स्थितीवर असतं.
मोठा विचार करा आणि तुमची कृती पण मोठी होईल
छोटा विचार करा आणि पिछेहाट होईल
ते सगळं मानसिक स्थितीवर असतं
तुम्हाला जर असं वाटलं की तुम्ही समाजातून बाहेर फेकलेले आहात
तर तुम्ही तसे आहात
वर यायचं असेल तर मोठा विचार करा
तुम्हाला स्वत:बद्दल खात्री असली पाहिजे
तुम्ही बक्षीस जिंकण्याआधी
आयुष्याच्या लढाईत नेहमी
बलवान स्त्री किंवा पुरुषच जिंकतात असं नाही
पण तो माणूस जिंकतो जो
जिंकता येईल असा विचार करतो!

काही फरक पडत नाही!

वॉली अमोस या प्रसिद्ध 'कुकी मॅन'ने मला सांगितलं होतं की खूप लोक **मायनॉरमध्ये मेजर करतात आणि मेजरमध्ये मायनॉर करतात.** ज्या गोष्टींना खरं म्हणजे महत्त्व नाही अशा गोष्टींवर ते लक्ष केंद्रित करतात. ते म्हणाले की वर्तमानपत्रात तुम्ही जेव्हा एक श्रद्धांजली पाहता, तेव्हा ती व्यक्ती कोणत्या वर्षी जन्मली आणि कोणत्या वर्षी मृत्यू पावली ते वर्ष बघता. ती वर्षं एका डॅशने वेगळी केलेली असतात, उदाहरणार्थ, १९००–१९९६. बहुतेक लोक ती व्यक्ती कोणत्या वर्षी जन्मली आणि केव्हा मरण पावली याच्यावर लक्ष केंद्रित करतील. पण त्यांनी त्या डॅशमध्ये, मध्यंतरीच्या काळात काय केलं, हेही तेवढंच महत्त्वाचं आहे!

मित्रांनो, तुमच्याकडे किती पैसे आहेत हे महत्त्वाचं नाही, तुमचं लिंग, तुमच्या त्वचेचा रंग यानेही फरक पडत नाही. कारण शेवटी तुमचा दृष्टिकोन तुम्हाला जिंकून देतो! तुम्ही जर विचार केलात की तुम्ही करू शकाल, तर तुम्ही करू शकाल! तुमच्या डॅशमध्ये काय असेल?

सीडीआय (कॅन डू इट – करता येईल क्लब)

काही काळापूर्वी मी एक सीडीआय नावाचा क्लब सुरू केला, ज्याचा अर्थ होता 'करता येईल' क्लब. लोकांना काहीही मिळवायचं असो, त्यांना आम्ही 'ते करू शकतील' असा मानसिक दृष्टिकोन विकसित करायला मदत करतो. ते करू शकतील असा त्यांनी विचार केलाच पाहिजे. सीडीआय क्लबच्या सभासदांना दाट विश्वास असतो की त्यांना जरी पहिल्या वेळेला यश नाही मिळालं, तरीही ते प्रयत्न करत राहतील, कारण... ते करू शकतील!

तुम्ही पण ते करू शकाल!
तुम्ही ते शिकू शकाल, तुम्ही ते मिळवू शकाल
तुम्ही त्याची आकांक्षा करू शकाल
तुम्ही त्याची इच्छा करू शकाल
तुम्ही त्याचा मुकाबला करू शकाल, तुम्ही त्याला हरवू शकाल
तुम्ही त्याचं आरेखन करू शकाल, तुम्ही ते बांधू शकाल
तुम्ही ते बनवू शकाल, तुम्ही त्याला आकार देऊ शकाल
तुम्ही त्याचं आकलन करू शकाल, तुम्ही ते पकडू शकाल
तुम्ही त्याची धारणा करू शकाल, तुम्ही ते मिळवू शकाल
तुम्ही त्याच्यावर विश्वास ठेवू शकाल, तुम्ही ते प्राप्त करू शकाल
तुम्ही ते करू शकाल... तुम्ही ते करू शकाल!

एका पेनीसाठी आयुष्याशी सौदा

आणखी एक महान दिवस, बरोबर, आणखी एक महान दिवस! आजचा दिवस महान असेल की दुःखद, हे तुम्ही निश्चित करता म्हणून आणखी एक महान दिवस. तुम्ही यशस्वी होणार की अयशस्वी, हे तुम्ही ठरवता. आयुष्यात तुम्ही काय गुंतवता यावरून तुम्हाला आयुष्यातून काय मिळणार, तेही तुम्ही निश्चित करता. बहुसंख्य लोकांना काही मिळतही नाही आणि काही मिळवताही येत नाही, कारण ते विचारतही नाहीत आणि विश्वासदेखील ठेवत नाहीत. आयुष्यात यशाच्या सुंदर मेजवानीने सजवलेल्या टेबलापर्यंत जाऊन जेवणाचा आस्वाद घेण्याऐवजी बहुतेक लोक आयुष्याने दिलेलं उरलंसुरलं खरकटं खाण्यावरच समाधान मानतात. ही कविता हा मुद्दा अधोरेखित करते.

आयुष्याबरोबर मी केला सौदा एका पेनीसाठी,
आणि आयुष्य मला अधिक काही देत नाही,
तरीही मी संध्याकाळी याचना केली,
जेव्हा मी माझा किरकोळ पुंजी मोजली.
कारण आयुष्य म्हणजे एक न्याय्य मालक आहे,
आणि तुम्ही काय मागता ते तुम्हाला देतं,
पण एकदा का तुम्ही पगार ठरवलात,
मग मात्र तुम्हाला ते काम करावंच लागेल.
मी काम केलं हलकं भाडोत्री,
निरुत्साहाने फक्त शिकलो
की कोणताही पगार मी मागितला असता आयुष्याकडून
आयुष्याने मला तो आनंदाने दिला असता

अनामिक लेखक

मित्रांनो, तुम्हाला जेव्हा डॉलर्स मिळू शकतात तेव्हा पेनींवर तडजोड करायचं थांबवा. मोठी स्वप्नं बघा, मोठे विचार करा आणि तुमच्या मनोकामना पूर्ण होतील.

उरल्यासुरल्यावर समाधान

बहुतेक लोक आयुष्यात त्यांच्यासाठी एक मेजवानीचं टेबल तयार करण्याऐवजी आयुष्य देतं त्या उरल्यासुरल्यावर कसं समाधान मानतात याबद्दल आपण बोललो. ते सामान्य स्वप्नं बघतात, विचारही सामान्य करतात आणि छोटे परिणाम मिळवतात. का? कारण बहुतेक लोक ते अधिक काही चांगलं करू शकतील असा विचार करत नाहीत. अत्युत्कृष्टतेसाठी थोडी अधिक पावलं टाकण्याऐवजी ते मध्यम दर्जावरच तडजोड करतात. ते करू शकतील असं त्यांना वाटत नाही आणि जर तुम्ही विचार करत असाल की तुम्ही करू शकता किंवा तुम्ही करू शकत नाही, या किंवा त्या प्रकारे तुम्ही कदाचित बरोबर आहात. तुम्ही जे मिळवू शकता असं तुम्हाला वाटतं, ते तुम्ही मिळवता. तुम्ही करू शकता, जर तुम्ही करू शकाल असा विचार केलात तर आणि जर तुम्ही करू शकणार नाही असा विचार केलात तरी बव्हंशी तुम्ही करू शकणार नाही. बरेचसे लोक तर निव्वळ प्रयत्नदेखील करत नाहीत! त्यांची स्वप्नं उरात दडलेली घेऊनच ते त्यांच्या थडग्याकडे जातात. अमेरिकेत अपयशासाठी काहीही सबब नाही. तुम्ही जगातल्या काही महान देशांपैकी एका देशात राहता. हा एक असा देश आहे जिथे विश्वास बसणार नाही एवढ्या संधी उपलब्ध आहेत. बँकेत जाऊन हवं ते घ्या असं सांगितलेल्या एखाद्या माणसासारखं आपल्यापैकी बरेच जण वागतात. त्याने एक पेनी घेतली आणि निघून गेला. कारण आणखी काही हाताळणं जमू शकेल असं त्याला वाटलं नाही! संपत्ती सांभाळणं खूप कठीण असेल असं त्याला वाटलं. सभ्य स्त्री-पुरुषहो, आपण ज्याबद्दल विचार करतो तसे आपण असतो. मोठा विचार करा!

तुम्ही कुठून आलात याने काही फरक पडत नाही

तुला जे पाहिजे ते घे असं सांगितल्यावर बँकेत जाऊन अधिक काही हाताळायला जमणार नाही, म्हणून एकच पेनी घेऊन परत आला त्या माणसाच्या गोष्टीबद्दल आपण बोललो. अमेरिकेत राहून तिथल्या संधींचा फायदा न घेणं हे त्या माणसासारखंच आहे. तुम्हाला हे ठाऊक आहे

का, की एखादी स्थलांतरित व्यक्ती, अमेरिकेतच जन्म झाला आहे अशा व्यक्तीपेक्षा पाचपट जलदगतीने करोडपती होते? का? कारण त्यांना अधिक पाहिजे आहे! बरेच लोक अशा देशांतून येतात जिथे मर्यादित संधी असतात. असे देश जिथे ते आठवड्याला जेमतेम पाच डॉलर्स कमावू शकतील. तिथून एका तासात पाच डॉलर्स कमावू शकतील अशा अमेरिकेत ते येतात आणि बरेचदा ते दोन, तीन किंवा चार नोकऱ्या करतात. सभ्य स्त्री-पुरुषहो, त्यांची स्वप्नं खरी होण्यासाठी जे काही आवश्यक असेल ते सर्व काही ते लोक करतात. स्थलांतरित लोक त्या देशात येतात, सगळ्या संधी बघतात आणि नंतर ते सगळं घडवून आणतात. त्याच वेळेला आपल्यापैकी बरेच जण नुसतेच रडत, विव्हळत आणि तक्रार करत बसलेले असतो. पैशाची टंचाई अजिबात नाही. फक्त कल्पना आणि इच्छा यांची वानवा आहे. अधिक मोठी स्वप्नं बघा, अधिक मोठे विचार करा आणि तो दिवस एक महान दिवस बनवा आणि एक छान आयुष्य घडवा.

एक दृष्टिकोन स्थलांतरिताचा!

स्थलांतरित दृष्टिकोन म्हणजे काय? मी एक अवघड पद्धतीने शिकलो असा तो दृष्टिकोन आहे. लेस ब्राऊन आणि ग्लॅडिस नाइटबरोबर काही दिवसांपूर्वी मी साप्ताहिक सुट्टी घालवली. तिथे असताना टेनिसचा एक गेम त्यांच्याबरोबर खेळण्यासाठी मला पाचारण करण्यात आलं. त्यांच्याकडे चार गडी आधी होतेच, पण एक पाचवा गडीही त्या गटात होता, ज्याच्याबरोबर खेळायला त्यांनी मला सांगितलं. हा गृहस्थ पासष्ट वर्षांचा होता. केस पांढरे झाले होते आणि लक्षात येईल एवढं लंगडणंही होतं (जे त्याला पूर्वी येऊन गेलेल्या एका झटक्याच्या परिणामामुळे होतं). आम्ही खेळायला सुरुवात केली आणि मला खेळायचं का असं त्याने विचारलं. ते छान होईल असं मी त्याला म्हटलं, पण माझा थकायचा विचार नव्हता, कारण त्या वृद्ध माणसाचा एक पाय दुखरा होता.

आम्ही खेळायला लागलो आणि लवकरच आम्ही प्रत्येकी चार खेळ जिंकलो, जेव्हा सेट संपवण्यासाठी फक्त दोन खेळ उरले होते. मी असा

विचार केला की बहुतेक दीर्घ कालावधीत त्या माणसाने एखादा खेळही जिंकलेला नसावा म्हणून मी त्याला जिंकू दिलं. मला वाटलं की एवढ्यात आटपेल आणि तो जायला तयार होईल. पण तो म्हणाला की, त्याला दुसरा सेटदेखील जिंकायचाय. म्हणजे तो एक पूर्ण सामना जिंकल्यासारखं होईल. का? त्याला दुसरा सेटदेखील जिंकायचा होता? मी त्याला जिंकू दिलं आणि आता त्याला मॅच पाहिजे होती? अजिबात चालणार नाही! आता टिवल्याबावल्या करणं थांबवून खरोखरच नीट खेळण्याची वेळ होती. जलद गतीने मी सरळ खेळ जिंकलो आणि आम्ही जेव्हा जागा बदलत होतो तेव्हा तो वृद्ध गृहस्थ म्हणाला, "तरुण माणसा, तुला फक्त एकच खेळ खेळायचाय, पण जिंकणार मी आहे. असं बघ, मी एक स्थलांतरित आहे आणि या स्थानावर मी असणं मला आवडेल!" मी हसलो आणि त्याला नक्कीच भास होत असावेत असं म्हटलं. तासाभरानंतर आम्ही कोर्ट सोडलं... आणि तो म्हातारा सद्गृहस्थ जिंकला होता!

ही गोष्ट मी लेसला सांगितल्यावर तो हसला. मी नोंद केली की आपण सर्वसाधारणपणे यशापेक्षा अपयशातून अधिक शिकतो. त्या टेनिस कोर्टावर त्या दिवशी मी एक मौल्यवान धडा शिकलो. मी एका स्थलांतरिताच्या दृष्टिकोनाबद्दल शिकलो. या देशात स्थलांतरित लोक एक वेगळ्या प्रकारचा दृष्टिकोन घेऊन येतात. त्यांना लोकांना आश्चर्याचा धक्का द्यायला आवडतं आणि ते जिंकणार आहेत असा त्यांना खरोखरच विश्वास असतो. अमेरिकेकडे ते एक संधी असलेला प्रदेश म्हणून पाहतात आणि सहसा संधीचा फायदा करून न घेणारे अशा दृष्टिकोनातून अमेरिकन लोकांकडे बघतात.

त्या अनुभवातून मी स्थलांतरितांसारखा दृष्टिकोन विकसित करायचा अशी माझ्या मनाची तयारी केली! परिस्थिती विरोधात असली तरीही जिंकायचं आणि हा देश देऊ करत असलेल्या संधींचा फायदा उचलायचा, असं मी ठरवलं. मी तर म्हणतो की तुम्ही अमेरिकेत जन्मलेले असा किंवा नसा, तुम्हीदेखील अशाच प्रकारचा दृष्टिकोन विकसित करा. स्थलांतरिताचा दृष्टिकोन विकसित करा आणि जिंकण्याचा निर्णय घ्या!

करोडपतींची कमतरता नाही

'करोडपती' हा शब्द आपण वरचेवर ऐकतो, पण करोडपतींबद्दल आपल्या चुकीच्या धारणा असतात. अमेरिकेत पैशांची कमतरता नाही हे मी तुम्हाला सांगितलं. उलटपक्षी कल्पनांची, स्वप्नांची आणि इच्छांची इथे उणीव आहे; जोपर्यंत इथे पैशांची उणीव नाही हे तुम्हाला कळणार नाही, तोपर्यंत ते सत्य पचनी पडणं कठीण आहे. आकडेवारीप्रमाणे अंदाजे प्रत्येक अठ्ठावन्न मिनिटांनंतर अमेरिकेत एक नवीन धनवान माणूस आकाराला येतो! उणीव पैशांची नाही, फक्त कल्पनांची कमतरता आहे आणि इच्छेची, खऱ्या इच्छेची उणीव आहे.

मित्रांनो, जोपर्यंत आपण आपल्या उद्दिष्टांपर्यंत पोहोचत नाही तोपर्यंत आपण थांबणार नाही, असं आपण आपल्या मनात आणि हृदयात पक्कं ठरवलं पाहिजे आणि आपल्या स्वप्नांच्या मागे गेलं पाहिजे. आपली स्वप्नं आणि उद्दिष्टं नेहमीच आपल्या आवाक्याबाहेरची असली पाहिजेत. आपली स्वत:बद्दलची दृष्टी आपण विस्तारली पाहिजे. आपण स्वत:कडे पाहण्याची दृष्टी विशाल केली पाहिजे आणि स्वत:ला ताणलं पाहिजे. आपले 'सुखाचे कोष' (कम्फर्ट झोन्स) सोडून दिले पाहिजेत आणि स्वप्नं सत्यात उतरवली पाहिजेत.

तुम्ही जर तसा विचार केलात, तरच करू शकाल

तुम्हाला जर वाटत असेल की तुम्ही करू शकाल किंवा असा विचार कराल की करू शकणार नाही... तर तुम्ही कदाचित बरोबर आहात. ही एक जुनी पण अर्थगर्भ म्हण आहे. मी माझ्या वैयक्तिक अनुभवावरून सांगतो. मी असं शोधून काढलंय की, मी जेव्हा करू शकणार नाही असा विचार करण्याकडे माझा कल असतो, त्यापेक्षा जेव्हा मला वाटतं की मी करू शकेन, त्या वेळी माझ्या यशाची पातळी खूपच चढती असते. का? कारण जेव्हा मी करू शकेन असं मला वाटतं तेव्हा मी निदान प्रयत्न तरी करेन. मी जेव्हा माझं आयुष्य बदलण्याचं माझ्या मनाशी पक्कं ठरवलं, तेव्हा मी करेन असा विचार करण्याचं, बदलणं

शक्य असल्याचा विचार करण्याचं मी मनाशी पक्कं ठरवलं. सर्वप्रथम, मी बदल घडवून आणू शकेन असं मी स्वत:ला समजावलं. नंतर मी माझ्या नवीन आयुष्यासाठी स्वत:ला तयार करू लागलो. कसं? मी वाचनाची आवड जोपासली, अधिकाधिक पुस्तकं वाचण्याची स्वत:ला सवय लावली आणि विशेषत: स्वयंविकास/स्व-मदत करणारी पुस्तकं आणि आत्मचरित्रं वाचली. मी इतर लोकांबद्दल वाचलं आणि ते करताना मी माझ्या मनाची पुनर्रचना केली. 'जर ते करू शकतात, तर मीही करू शकेन' अशी माझी मनोभूमिका मी तयार केली. मला ते किती नितांत गरजेचं होतं, त्याच्यावरच फक्त ते अवलंबून होतं. मर्यादित परिस्थितीवर मात करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केलेल्या आणि अडथळ्यांवर मात केलेल्या इतर लोकांशी मी संपर्क साधायला सुरुवात केली. मी करूच शकणार नाही असा मी विचार करत असल्याने, माझ्याकडे असलेल्या कौशल्यांचा मी उपयोगदेखील करत नव्हतो हे मला कळलं. मी लहान गोष्ट प्राप्त करण्यापासून ते मोठं काहीतरी मिळवण्यापर्यंत मजल मारली आणि मी अधिकाधिक मोठं, अधिक मोठं मिळवत गेलो; कारण मी करू शकेन असा विचार करायला सुरुवात केली होती. एवढंच नव्हे तर, अधिक महत्त्वाचं म्हणजे मी त्यावर खरोखरच विश्वासदेखील ठेवायला लागलो. तुम्ही जर फक्त विश्वास ठेवू शकलात तर सगळ्या गोष्टी शक्य आहेत, हे सत्य असल्याचं मी शोधून काढलं.

जर ते करू शकतात, तर मीदेखील करू शकेन!

आपण जसा विचार करतो तसे असतो. स्वत:ची विचारसरणी बदलून ज्यांनी त्यांची आयुष्यं आणि परिस्थिती बदलली, अशा असंख्य लोकांची उदाहरणं आपण पूर्ण इतिहासात बघितली आहेत. भोवतालच्या सगळ्या लोकांनी, ते करू शकणार नाहीत असं त्यांना सांगितलेलं असतानाही, त्यांनी त्यांच्या मनाची धारणा, ते करू शकतील यावर विश्वास ठेवायला तयार केली, अशा लोकांबद्दल आपण ऐकलं आहे. अपयशी होणं अशक्य आहे, हे त्यांनी त्यांच्या मनात पक्कं बिंबवल्याने कठीण प्रसंगावरसुद्धा मात करण्याचा विश्वास त्यांनी विकसित केला.

जिने स्वतःच्या नावावर सहा डॉलर्स असताना एक महाविद्यालय सुरू केलं अशी मेरी मॅकलिऑड, हे अशक्य आहे असं हिटलरने म्हटल्यावर ज्याने चार सुवर्णपदकं जिंकली असा जेसी ओवेन्स, जन्मतःच अंध आणि कर्णबधीर असलेली हेलन केलर, हायस्कूलमधून बाहेर काढलेला एक अनाथ मुलगा असूनदेखील ज्याने वेंडीज रेस्टॉरंट्स सुरू केली तो डेव्ह थॉमस... ही यादी अशीच पुढे जात राहील. आपण जसा विचार करतो तसे असतो. महान विचार करा आणि महान गोष्टी करा.

मोठ्या मधमाशीसारखं उडा

काही भीती नाही, काही शंका नाही. हेच ते आहे, नीट बघा! यश म्हणजे एक आश्चर्यजनक साहस आहे, एक स्वप्न बघणं आणि तुमच्या हृदयाच्या गाभ्यापासून त्या स्वप्नाचा पाठपुरावा करणं याची ती एक प्रक्रिया आहे. अपयशी होणं अशक्य आहे असा तुमचा जेव्हा विश्वास बसेल, त्या बिंदूपर्यंत ते पोहोचणं आहे. मेरी के कॉस्मेटिक्सच्या संस्थापक आणि अध्यक्ष मेरी के ॲश यांना भेटण्याची संधी मला मिळाली होती. इतरांनी अशक्य म्हणून म्हटलेलं स्वप्नं पाहिलेली मेरी के ॲश ही एक वाखाणण्याजोगी स्त्री होती. नकारघंटा वाजवणाऱ्या लोकांचं ऐकायला तिने नकार दिला आणि जगातील सर्वांत मोठी सौंदर्यप्रसाधनांची कंपनी तिने निर्माण केली. अशक्य ते शक्य करून दाखवणाऱ्या क्षमतेचं निदर्शक अशी मधमाशी, तिच्या कंपनीचं चिन्ह आहे, का? कारण तिचे पंख लहान आणि मोठं शरीर असल्यामुळे ती उडू शकणं अशक्य आहे, असं शास्त्रज्ञांनी आणि प्राणितज्ज्ञांनी ठासून सांगितलं. पण मधमाशीला ती उडू शकणं अशक्य आहे हे माहीत नसतं, म्हणून ती तशीही उडतेच! मित्रांनो, महान होण्यापासून जर तुम्हाला कोणी रोखू शकत असेल तर ते तुम्हीच आणि मर्यादा घालणारा तुमचा विश्वास. तुम्ही करू शकत नाही असं बोलणं थांबवा आणि 'मी अपयशी होणं अशक्य आहे' असं म्हणायला सुरुवात करा. मग तुम्हीदेखील अविश्वसनीय गोष्टी करू शकाल.

हनिबाल, अडथळ्यांवर मात

हनिबाल हा एक महान आफ्रिकन सेनापती आणि मुत्सद्दी होता. मोठ्या अडथळ्यांवर मात करून त्याने अशक्य ते मिळवून दाखवलं. कारण तो ते करू शकेल असा त्याने विचार केला. आपण स्वत:वर ज्या लादून घेतो त्याच खऱ्या आपल्यावरच्या मर्यादा असतात, हे त्याला समजून चुकलं. हनिबाल कार्थेज शहरातला होता. रोमन लोक त्यांचे कट्टर शत्रू आहेत. रोम आणि कार्थेजमध्ये इसवीसन पूर्व २२०मध्ये युद्ध सुरू झालं. महान रोमन सैन्याच्या तुलनेत हनिबालच्या सैनिकी तुकड्यांकडे मनुष्यबळ कमी होतं आणि शस्त्रास्त्रं आणि इतर पुरवठाही अपुरा होता. पण तरीही तो जिंकू शकेल याच्याबद्दलचा विश्वास आणि त्या विश्वासाप्रमाणे कृती करण्यापासून हनिबाल विचलित झाला नाही. रोमन लोकांना पराभूत करण्यासाठी त्याने एक धाडसी योजना आखली. पुढून हल्ला केला तर तो जिंकू शकणार नाही हे त्याला माहीत असल्यानं त्यानं एक अशक्यप्राय योजना आखली, त्या योजनेप्रमाणे आल्प्स पर्वतांवरून पाठीमागच्या बाजूने हल्ला करण्याचा त्याने निर्णय घेतला. पण आल्प्स पर्वत दुर्गम असल्याने ते अशक्य आहे असं म्हटलं जात होतं. मोठ्या आफ्रिकन हत्तींचा उपयोग करून आल्प्स पर्वतांवर जाण्याची त्याने व्यूहरचना आखली. दुर्गम आल्प्स पर्वतांवरून त्याने त्याचं सैन्य एकत्रित करून चढाई केली आणि यशस्वी रीतीने रोमन लोकांवर विजय मिळवला. तो एक सर्वकालीन महान युद्धनीतिज्ज्ञ आणि नेत्यांपैकी एक म्हणून प्रसिद्ध झाला. त्याच्या काही उल्लेखनीय वचनांपैकी एक वचन आपण अजूनही उद्धृत करतो, 'एकतर रस्ता शोधा.. किंवा तयार करा!' लोकांनी अशक्य म्हटलं तरी तुम्ही तुमच्या स्वप्नांच्या मागे जा, अशी मी तुम्हाला विनवणी करतो. जर रस्ता नसेल, तर रस्ता करा! जर वाट नसेल तर एखादी वाट तयार करा आणि पथनिदर्शक व्हा. जे काही तुम्ही करू शकाल असं तुम्हाला वाटतं, ते सगळं खरंच होतं हे तुम्हाला कळेल.

माझे विचार बदलण्याची प्रक्रिया सोपी नव्हती; पण माझ्या अंगातल्या सुप्त गुणांचा मी पुरेपूर उपयोग करून घेत नाही हे माझ्या लक्षात आलं.

मी करू शकेन असं अजून काही होतं आणि ते करणं माझ्या हातात होतं. माझ्या ओंजळीत आयुष्याने यशाचं माप टाकावं म्हणून मी दीर्घकाळ वाट पाहिली होती आणि ते झालं नव्हतं. मला जणू काही हजार वर्षांचं आयुष्य असावं असा मी जगत होतो. इथे मला जो काही वेळ होता त्याचा सर्वांत चांगला उपयोग करणं हे माझ्यावर अवलंबून होतं आणि प्रत्येक मिनिट मौल्यवान होतं. कोणीतरी विचारलं, "तुम्ही करू शकला असतात पण करू शकला नाहीत किंवा करण्याचा प्रयत्न केला नाही, अशा कोणत्या गोष्टीबद्दल तुम्हाला मरताना पश्चात्ताप होईल?" मी प्रवाहाबरोबर गेलो आणि प्रवाह जिथे नेत होता ते मला आवडलं नाही. फाटका खिसा असलेला, हरलेला आणि वैफल्यग्रस्त असण्याचा मला वीट आला होता. परिस्थितीचा कैदी म्हणून जगण्याचा कंटाळा आला होता. मी बदल करायचं ठरवलं. मला आयुष्याबद्दल काहीतरी कृती करणं भाग आहे नाहीतर आयुष्यच माझ्यावर कृती करत राहील, हे मला समजलं.

स्वयंविकास

तुम्ही स्वत:ला एक चांगली, अधिक उत्पादनक्षम, अधिक प्रभावी व्यक्ती कसं बनवाल? त्याची गुरुकिल्ली आहे स्वयंविकास! एखादा बॉडीबिल्डर जसा त्याच्या शरीराचा विकास करण्यासाठी, शक्ती आणि सामर्थ्य मिळवण्यासाठी जिममध्ये जातो, तसंच आपल्या मनाचा विकास करण्यासाठी आणि आंतरिक सामर्थ्य वाढवण्यासाठीही करणं गरजेचं आहे. स्वत:वर मेहनत घेऊन तुम्ही स्वत:चा विकास घडवून आणला पाहिजे. व्यायाम करून केवळ बाह्य रूपावर – असा माझ्या बोलण्याचा अर्थ नाही – तेदेखील महत्त्वाचं आहेच, पण तुम्ही तुमचं मन आणि अंतर्गत सामर्थ्य यांचाही विकास केला पाहिजे. तुम्ही जसं शरीर विकसित करताना करता तसं. पुस्तकं, टेप्स आणि विश्वकोश उथळून तुमचं मन विकसित करता येत का? नाही. त्यासाठी मार्ग आहे ती पुस्तकं वाचणं, त्या ध्वनिफिती ऐकणं आणि तुमचं मन माहितीने भरणं. यश मिळविण्यासाठी तुमचं मन शुद्ध, शक्तिशाली, सकारात्मक गोष्टींनी

भरा आणि यशासाठी मनाची धारणा तयार करा. तुम्ही तुमचं मन यशासाठी तयार करू शकता किंवा अपयशासाठी इतरांकडून तुमचं मन वळवलं जाऊ देऊ शकता. सकारात्मक माहितीने, वाचनाने तुमचं मन भरून टाकून तुमची तयारी करण्याचा निर्णय घेणं ही त्याची गुरुकिल्ली आहे. एक नवीन 'स्वत:' निर्माण करा, स्वत:ला एक 'मेक ओव्हर' द्या, फक्त तुमचा चेहरा किंवा केस यांच्यासाठी नव्हे, तर तुमचं मन आणि आत्म्यासाठीदेखील. अन्नाने जसं तुम्ही तुमचं शरीर नवीन बनवता आणि दररोज पाण्याने शरीर स्वच्छ करता, तसंच तुमचं मन आणि आत्मादेखील रोजच्या रोज स्वच्छ झाला पाहिजे. चांगल्या गोष्टींचं ध्यान करणं, प्रार्थनेसाठी वेळ काढणं, सकारात्मक संगीत ऐकणं, अधिक सकारात्मक विचार करणं, अधिक सकारात्मक पुस्तकं वाचणं हे करा. सकारात्मक प्रतिमांचा एक 'डेली डोस' स्वत:ला द्या आणि 'नवीन स्व' विकसित करा. तुम्हाला तुमची संपत्ती वाढवायची असेल तर प्रथम स्वत:ला घडवा!

अपयशाची किल्ली

'यशाची किल्ली मला माहीत नाही, पण अपयशाची किल्ली मला माहीत आहे! प्रत्येकाला खूश ठेवण्याचा प्रयत्न करणं म्हणजेच ती किल्ली.' बिल कॉस्बीचं हे वचन एका खऱ्या सत्याची अभिव्यक्ती करतं. यशाचा पाठपुरावा करताना तुम्ही एक स्वतंत्र विचारशैलीची व्यक्ती असलं पाहिजे. काही लोक तुमच्या कल्पनांवर विरजण घालतील आणि तुम्हाला नाउमेद करतील. याचं उदाहरण म्हणजे एका वक्त्याबद्दलची एक कथा. त्याने त्याच्या श्रोतृवर्गात त्याला प्रतिसाद न देणारा असा माणूस बघितला आणि त्या वक्त्याने त्याची सगळी ऊर्जा त्या व्यक्तीवर केंद्रित केली आणि इतर श्रोत्यांकडे दुर्लक्ष केलं. त्याचं भाषण संपलं तरी तो त्या व्यक्तीला बदलू शकला नाही. उलट, त्याने इतर प्रेक्षकांकडे दुर्लक्ष केल्याने तो त्यांच्यापासून दुरावला होता. तुम्ही जेव्हा एक स्वतंत्र विचारवंत होण्याच्या दृष्टीने वाटचाल करता, तेव्हा तुम्हाला एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की प्रत्येकाला तुमच्या कल्पना आवडतीलच

असं नाही, पण तुम्ही तुमच्या स्वप्नांवर विश्वास ठेवला पाहिजे आणि एकतर तुम्ही तुमची स्वप्नं जगाल किंवा इतरांची स्वप्नं जगाल. तुम्ही जेव्हा स्वत:ला खूष करता तेव्हा तुम्हाला छान वाटावं एवढं तुम्ही तुमच्या विचारांचा सकारात्मक विचार करायला आणि स्वत:ला पुरेसं आवडून घ्यायला शिकलं पाहिजे. प्रत्येकाला खूष करण्याचा प्रयत्न करू नका आणि इतरांना तुम्हाला नाउमेद करू देऊ नका. तुम्ही जर तुमच्या कल्पनांवर प्रेम केलं आणि उत्साहाने, उमेदीने तुमच्या कल्पनांच्या मागे जात राहिलात, तर तुम्हाला आणखी बरेच लोक आढळतील, जे तुमच्या कल्पनांवर प्रेम करतील. प्रत्येकाला खूष करायचा प्रयत्न करू नका, एक स्वतंत्र विचारवंत व्हा!

तुमच्या मनात गुंतवणूक करा

तुम्हाला हे माहीत आहे का की एक सर्वसाधारण अमेरिकन माणूस वर्षाकाठी एक पुस्तक वाचतो, तर एक सर्वसाधारण, स्व-कर्तृत्वावर करोडपती झालेला माणूस महिन्याला एक पुस्तक वाचतो. एक सर्वसाधारण अमेरिकन प्रत्येक दिवशी सहा तास टी.व्ही. बघतो आणि एक सर्वसाधारण करोडपती दोन तासांपेक्षा कमी वेळ टी.व्ही. बघतो. तुमचे विचार बदलायचे असतील तर तुमच्या मनात काय चाललंय ते बदलावं लागेल. इतिहासातून हे सिद्ध होतं की जे वाचक असतात ते नेते बनतात. बहुतेक नेते सर्वसाधारणपणे असे लोक असतात जे अधिक पुस्तकं वाचतात, **वाचेल तो चालवेल!** बेंजामिन फ्रँकलिन एकदा म्हणाले, 'एका माणसाने जर त्याची पर्स त्याच्या डोक्यात उपडी केली तर ती त्याच्यापासून कोणीही हिरावून घेऊ शकणार नाही. कारण ज्ञानामध्ये केलेली गुंतवणूक नेहमीच चांगला परतावा देते.' मी तुमची विनवणी करतो की स्वयंविकासाच्या एका वर्गाला जा. अधिक पुस्तकं वाचा. अधिक सकारात्मक आणि प्रेरणादायी टेप्स ऐका. तुम्ही तुमच्या मनाला यश मिळवणं शक्य आहे या माहितीसह तयार करू शकता आणि तुमचं मन त्याला उचित प्रकारे प्रतिसाद देईल.

मानसिक बंधनं तोडा!

गोष्टी शक्य आहेत असं बघण्यासाठी तुमच्या मनाला जर तुम्ही नव्याने तयार केलंत, तर ते नवीन माहितीला प्रतिसाद देईल आणि ती स्वप्नं खरी करण्याच्या प्रयत्नांना सुरुवात करेल. प्रथम तुम्ही शक्य आहे असा विचार केला पाहिजे, नंतर ते शक्य आहे यावर तुम्ही विश्वास ठेवला पाहिजे आणि शेवटी तुम्ही कृती केली पाहिजे! चर्चेमधलं प्रकरण : कित्येक वर्षं असं म्हटलं जात होतं की एक मैल अंतर चार मिनिटांपेक्षा कमी वेळात पळणं मानवाला अशक्य आहे. ते करता येणार नाही. मग १९५४मध्ये रॉजर बॅनिस्टर नावाच्या एका तरुण माणसाने या सर्वसाधारण समजुतीकडे दुर्लक्ष केलं आणि ते शक्य आहे असा विश्वास ठेवला. त्याने स्वतःला तयार केलं आणि शेवटी तीन मिनिट एकोणसाठ सेकंदात तो एक मैल अंतर धावला. त्याने वेळेचं आणि तसंच मनाचंही बंधन तोडलं. १९६४मध्ये जिम र्‍यान नावाचा एक तरुण हायस्कूल धावपटू ते अंतर चार मिनिटांपेक्षा कमी वेळात धावला आणि आता खूप लोकांना चार मिनिटात मैल पळणं शक्य आहे. हा उच्चांक मोडला जाणं चालूच आहे. का? कारण ते शक्य आहे हे लोकांना समजलंय. ते करता येतं. त्यांची आता एक नवीन मनोभूमिका आहे आणि जे अशक्य आहे हे असा विचार केला जात होता त्याच्या मागे जाणं आता त्यांच्या मनाला शक्य आहे... जर तुम्हाला वाटलं की तुम्ही करू शकाल किंवा तुम्ही विचार करता की तुम्ही करू शकत नाही... तुम्ही बहुतेक बरोबर आहे! तुमच्या मनाची पुन्हा नव्याने तयारी करा, तुमच्या स्वप्नांच्या मागे जा आणि तुमच्या आयुष्यातले काही अडथळे दूर करायला तुम्ही सुरुवात कराल याची मला खात्री आहे. एका आनंदी दिवसासाठी शुभेच्छा!

हिऱ्यांचे एकर

असं म्हणतात की कुंपणाच्या पलीकडच्या बाजूचं गवत नेहमीच जास्त हिरवं असतं किंवा ते लोक त्या गवतासाठी तुमच्यापेक्षा अधिक वेळ आणि मेहनत घेतात! मी माझ्या एका मित्राशी बोलत होतो, ज्याला सध्याच्या नोकरीपेक्षा अधिक वाव असलेली नोकरी मिळाली नाही म्हणून

तो निराश झाला होता. हिऱ्यांच्या व्यापारात बरकत आलेल्या आफ्रिकेच्या एका शेतकऱ्याची सत्यकथा मी त्याला सांगत होतो. श्रीमंत होण्यासाठी तो एवढा घायकुतीला आला होता की त्याने त्याचं शेत विकायचा निर्णय घेतला आणि खऱ्या श्रीमंतीच्या शोधार्थ जायचं ठरवलं. हिऱ्यांचा शोध न लागताच कित्येक निराशाजनक वर्षं गेल्यानंतर त्याने शेवटी प्रयत्न सोडून दिला आणि एका कड्यावरून उडी मारली! मध्यंतरीच्या काळात, ज्या माणसाने ते शेत खरेदी केलं होतं, तो एक दिवस झरा ओलांडून जात असताना त्याला एक मोठा चमचमता दगड दिसला. त्याने तो परत जाताना स्वत:बरोबर नेला आणि त्याच्या घरातल्या शेकोटीजवळ ठेवला. एक दिवस त्याचा मित्र शहरातून आला आणि तो दगड पाहून आश्चर्यचकित झाला. तो म्हणाला, "अरे वा! हा तर एक हिरा आहे. कदाचित मी बघितलेल्या हिऱ्यांपैकी सर्वांत मोठा हिरा! कुठे मिळाला तुला हा?" तो माणूस म्हणाला, "मला तो झऱ्यामध्ये मिळाला. पण अरे, इथे आसपास तसे दगड खूप आहेत. या ठिकाणी सगळीकडे आहेत." त्या शेताला 'हिऱ्यांचे एकर' म्हणून ओळखण्यात येऊ लागलं.

मित्रांनो, तुमच्या स्वत:च्याच अंगणात, तुमच्या आजूबाजूला हिरे आहेत. वस्तुत: तुमच्या आतदेखील एक हिरा आहे! त्याचा शोध घेण्याचं काम फक्त तुम्हाला करायचंय! कुंपणाच्या तुमच्या बाजूला गवत तेवढंच किंबहुना अधिक हिरवं असू शकतं, त्या गवताला खत घाला, पाणी द्या आणि तेही सुंदर होईल!

आपण जग बदलू शकतो का? उत्तर आहे होय!

जगाच्या स्थितीबद्दल चिंता वाटत असलेले बरेच लोक, एक माणूसदेखील मोठा फरक घडवून आणू शकतो हे माहीत नसल्याने, नाउमेद होतात. एक माणूस जग बदलू शकतो. एका अनामिक लेखकाचा हा विचार आपल्यापैकी प्रत्येक जण फरक घडवू शकतो हे दर्शवतो. 'मी जेव्हा तरुण होतो तेव्हा माझ्या कल्पनाशक्तीला कोणत्याही मर्यादा नव्हत्या. मी जग बदलण्याचं स्वप्न पाहिलं. मी जसा वयाने मोठा आणि शहाणा होत गेलो तेव्हा जग बदलणार नाही हे मला समजलं. म्हणून मी माझी

दृष्टी मर्यादित केली आणि फक्त माझा देश बदलायचं ठरवलं. पण तो तर जागचा हलत नव्हता. जेव्हा मी माझ्या आयुष्याच्या संधिकालात प्रवेश केला तेव्हा मी एक शेवटचा निकराचा प्रयत्न माझ्या निकटवर्ती कुटुंबाला बदलण्यासाठी केला. पण अरेरे, त्यांनी बिलकूल दाद दिली नाही. जेव्हा मी माझ्या मृत्युशय्येवर पडलो, तेव्हा मला वाटलं की मी जर स्वत:लाच आधी बदललं असतं, तर त्या उदाहरणाने मी माझ्या कुटुंबाला बदलू शकलो असतो! त्यांच्या स्फूर्तीने आणि उत्साहाने त्यांनी मग समाज बदलला असता, ज्यांनी मग इतर समाजांना बदललं असतं, त्यामुळे मग देश बदलला असता, जर देश बदलू शकतो तर मग जगही बदलले जाऊ शकतं.'' जग बदलण्याची गुरुकिल्ली होती प्रथम स्वत:ला बदलण्याचा निर्णय घेणं!

तुम्हाला ते किती निकडीने पाहिजे आहे? वाढ होण्यासाठी जर काही त्रासदायक असं करावं लागणार असेल तर तुम्ही ते करायला तयार आहात का? विस्तार पावण्यासाठी जर तुम्हाला काही अडचणी सोसाव्या लागणार असतील तर तुमची तयारी आहे का? स्वयंविकासाचा एखादा अभ्यासक्रम करण्याची तुमची तयारी आहे का? एक नवीन माणूस म्हणून रूपांतरित व्हायचं असेल, तर तो अधिक एक मैल जायला तुम्ही तयार आहात का? पारंपरिक विचारसरणीच्या विरोधात जाऊन अशी नवीन मनोभूमिका विकसित करायची तुमची तयारी आहे का? ज्यामुळे तुम्ही करू शकाल एवढाच विचार कराल असं नव्हे, तर तुमच्या हृदयाच्या गाभ्यापासून तुम्हाला असा विश्वास वाटेल, की तुम्ही करू शकता, आणि तुम्ही ते कराल? भूतकाळाचा विचार करा आणि त्या छोट्याशा झुकझुक गाडीची गोष्ट आठवा जी सगळ्या अडचणींच्या विरोधात टेकडीवर चढत होती आणि म्हणत होती, ''आय थिंक आय कॅन, आय थिंक आय कॅन, खरं म्हणजे मला माहीत आहे, मी करेन.'' तुम्हाला लवकरच कळून येईल की ही गोष्ट फक्त लहान मुलांसाठीच नव्हे तर आपल्या सर्वांसाठी आहे. आपल्या हृदयातून आपण जसा विचार करतो, आपण तसेच असतो!

प्रकरण ५

माझ्याकडे एक नवीन दृष्टिकोन आहे!

पॅटी लाबेलने तिच्या 'आय हॅव गॉट अ न्यू ॲटिट्यूड' या गाण्यात तिची दृष्टी आणि दिशा कशी बदलली, याबद्दल सांगितलं आहे. जगाकडे बघण्याच्या पद्धतीत तिने केलेल्या अंतर्गत बदलाचं ते गाणं म्हणजे बाह्य खूण आहे. तिचा दृष्टिकोन बदलला. विचार आणि कृती करण्याची पद्धत बदलली. तिला एक नवीन दृष्टिकोन मिळाला. काही वेळेला त्याच्यासाठी एक नवीन हॅट, कोट, सूट किंवा पोशाख लागतो, पण आपण हे लक्षात घेतलं पाहिजे की खरा बदल आतून बाहेर असा होतो. तुम्हाला आतून काय वाटतंय हेच शेवटी तुम्ही बाहेर कसं वागता ते ठरवतं. तुमचं बाह्य रूप बदललंत तर तुम्हाला छान वाटू शकेल. पण दूरगामी टिकणारा बदल घडवून आणायचा असेल तर तुम्ही तुमच्या आतल्या रूपातदेखील बदल घडवायला पाहिजे.

आपण जेव्हा आपलं आयुष्य सुधारतो तेव्हा आपण मोठी स्वप्नं बघितली पाहिजेत आणि मोठे विचार केले पाहिजेत हे आपल्याला माहीत असतं. आपण जाणीवपूर्वक विजेत्यासारखे विचार आत्मसात केले पाहिजेत. नंतर मग आपला शोध आपण पुढे चालू ठेवून जाणून घेतलं पाहिजे की आपल्याला एका नवीन दृष्टिकोनाचीदेखील आवश्यकता आहे. एक नवीन सम्यक दृष्टी, जगाकडे बघण्याचा एक नवीन दृष्टिकोन, एक नवीन मानसिक घडण. तुमचे विचार, तुमच्या भावना, घटनांकडे आणि आजूबाजूच्या परिस्थितीकडे बघण्याची तुमची नजर आणि तुमचा सारासार विचार या सगळ्याचं एकत्रीकरण म्हणजे तुमचा दृष्टिकोन. तुमच्या आयुष्यात घडणाऱ्या घटनांना तुम्ही कसा प्रतिसाद देता आणि तुम्ही काय करता म्हणजे तुमचा दृष्टिकोन.

निर्विवादपणे, आपल्या यशात किंवा अपयशात दृष्टिकोन हा एक निर्णायक घटक असतो. तुम्ही आयुष्यात जे निर्माण करणार आहात, त्याचा एक अतिशय महत्त्वाचा घटक म्हणजे दृष्टिकोन. तुमची विशाल यंत्रणा सुरू करून ती कार्यान्वित करण्याची गुरुकिल्ली म्हणजे दृष्टिकोन. डॉ. कार्ल मेनिंजर म्हणतात तसं, ''वस्तुस्थितीपेक्षाही दृष्टिकोन कितीतरी अधिक महत्त्वाचे आहेत.'' आणि त्यांचं बरोबर आहे. यशात किंवा अपयशात दृष्टिकोनांमुळे फरक पडतो.

सगळं काही दृष्टिकोनाबद्दलच

सत्यापेक्षा तुमचा दृष्टिकोन अधिक महत्त्वाचा आहे. बरेच वेळा आपल्यासमोर असे प्रश्न येतात जे अतिशय अवघड असतात किंवा आपल्या आयुष्यात अशी काही परिस्थिती निर्माण होते, जी आपण बदलू शकत नाही. आपले दृष्टिकोन वस्तुस्थितीपेक्षा खूपच अधिक महत्त्वाचे आहेत. स्टीव्ह वंडर हा अंध म्हणून जन्माला आला हे सत्य आहे, पण त्याचा दृष्टिकोन होता, 'मग काय झालं? महान होण्यापासून ही गोष्ट मला दूर ठेवू शकणार नाही.' स्पड वेब जन्मतःच बुटका होता. पण त्याचा दृष्टिकोन असा होता की त्याला जिथे जायचंय तिथे जाण्यावर त्याची उंची मर्यादा घालू शकणार नाही. त्याने नॅशनल बास्केटबॉलची डंक स्पर्धा जिंकली. हेलन केलर जन्मतःच अंध आणि कर्णबधीर होती. त्या काळात अशा अपंग लोकांना वेगळ्या संस्थेत भरती केलं जायचं. पण ती एक सर्वकालीन महान स्त्रियांपैकी एक बनली. मित्रांनो, तुमच्या आयुष्यात काही निश्चित सत्यं असतात जी बदलता येत नाहीत, पण तुमचा दृष्टिकोन त्या वस्तुस्थितीवर मात करू शकेल. तुम्ही मोठ्या गोष्टी करण्यासाठी तयार होऊ शकता.

दृष्टिकोन म्हणजे सगळं काही!

नॅशनल स्पीकर्स असोसिएशनच्या माध्यमातून, तसंच माझ्या *Only the Best on Success* या पुस्तकाची सहलेखिका म्हणून काम केलेली कीथ हॅरेल ही माझी एक चांगली मैत्रीण आहे. कीथ ही एक उत्कृष्ट वक्ती

आहे आणि तिचा मुख्य विषय असतो 'दृष्टिकोन म्हणजे सगळं काही'. या जगात करोडो लोक आहेत आणि प्रत्येकाकडे असलेली एक गोष्ट म्हणजे दृष्टिकोन. काही जणांना हात, पाय, डोळे, कान असतील, तर काही जणांना नसतील. पण दृष्टिकोन प्रत्येकाकडेच असतो. ही एक चांगली बातमी आहे की दृष्टिकोन तुम्हाला विकत घ्यावा लागत नाही, तो फुकट मिळतो! पण तुमच्या उपयोगी पडेल, तुमच्या आयुष्याची गुणवत्ता वाढवेल आणि तुमची स्वप्नं प्रत्यक्षात उतरणं शक्य होण्यासाठी तुम्हाला मदत करेल असा दृष्टिकोन जर तुम्हाला पाहिजे असेल, तर तुम्हाला त्याच्यासाठी प्रयत्न करावे लागतील. त्याच्यावर काम करावं लागेल. तुम्ही फक्त बसून त्याची वाट बघत राहाल, अशी ती वस्तू नाही. सकारात्मक दृष्टिकोन पाहिजे असेल तर तुम्हाला एक निर्णय घ्यावा लागेल. तुमच्या भोवताली घडणाऱ्या, तुमच्या सोबत घडणाऱ्या अशा गोष्टी तुम्ही नियोजित करू शकत नाही. पण 'तुमच्या आत' घडणाऱ्या गोष्टींवर तुम्ही नियंत्रण ठेवू शकता, हे तुम्ही जाणून घेतलं पाहिजे. दृष्टिकोन म्हणजे सगळं काही! प्रत्येक दिवशी एक चांगला, सकारात्मक आणि उत्पादनक्षम दृष्टिकोन ठेवण्याचा निर्णय घ्या. लक्षात ठेवा, ते तुमच्यावरच अवलंबून आहे!

आणखी एक महान दिवस

आणखी एक महान दिवस. प्रत्येक दिवशी असतो तेवढाच मी आजच्या दिवसाबद्दलदेखील उत्तेजित आहे. का? कारण तो आणखी एक महान दिवस आहे! हा जरी एक शब्दांचा खेळ केल्यासारखा वाटला, तरी वास्तवात मात्र बऱ्याच गोष्टी अशा आहेत ज्याच्यावर आपला ताबा नसतो, हवामानासारखा. पण आपल्या जीवनाबद्दलचा दृष्टिकोन मात्र आपण नियंत्रणात ठेवू शकतो आणि प्रत्येक दिवशी आपला दिवस महान असू शकतो. काही आठवड्यांपूर्वी आम्हाला जोरदार वारे आणि धुवाधार पावसाच्या दिवसाला सामोरं जावं लागलं. मला एक भाषण द्यायचं होतं आणि मी जेव्हा सभागृहात प्रवेश केला तेव्हा कोणीतरी म्हणालं, ''या पावसासारखा पाऊस तुम्ही कधी पाहिलाय का? काय वाटतं तुम्हाला या

गोष्टीबद्दल?" मी म्हटलं, "हा एक जोरदार पाऊस आहे आणि वाईट वादळही आहे, पण दिवस चांगला आहे." तो म्हणाला, "काय, तुम्ही काय वेडे आहात काय?" मी म्हटलं, "नाही, मी काही वेडा नाही. आज सकाळी जेव्हा मी उठलो, मी खिडकीतून बाहेर पाहिलं, मला पाऊस आणि वादळ दिसलं आणि मी म्हटलं, "वा! आणखी एक महान दिवस!" तो म्हणाला, "काय?" मी म्हटलं, "येस, अगदी बरोबर! हा आणखी एक महान दिवस! का? कारण जेव्हा मी उठलो आणि पाऊस बघितला, वादळ बघितलं तेव्हा मी खूप झालो कारण मी पाऊस 'बघू' शकत होतो. कोणीतरी आज करावयाच्या गोष्टींची यादी बनवली. कार्हीना कुठे जायचं होतं, कोणी बैठकीला उपस्थित राहायचं निश्चित केलं होतं आणि कोणी मित्रांना भेटायला जाणार होते... पण ते उठलेच नाहीत! ते पाऊस बघू शकले नाहीत. प्रत्येक सकाळी उठू शकतो म्हणून मी कृतज्ञ आहे, कारण मला आणखी एक संधी मिळालीय, स्वत:ला योग्य दिशा देण्याची आणि फरक घडवण्याची. हा एक महान दिवस आहे कारण ती संधी मला मिळालीय."

मित्रांनो, तुम्हाला जर आयुष्य आणखी एकदा जगायला मिळत असेल तर प्रत्येक दिवस हा नवीन दिवस आहे. लेस ब्राऊन म्हणतो, 'जेव्हा रोज सकाळी आपण उठतो तो प्रत्येक दिवस महान असतो.' जीवनाचा आनंद लुटा! आयुष्य परिपूर्णतेने जगा कारण 'तो आणखी एक महान दिवस आहे!'

आशीर्वाद मिळालेले आणि खास मर्जीतले!

तुम्ही जेव्हा प्रत्येक दिवशी उठता, तेव्हा इतरांना अभिवादन कसं करता आणि त्यांच्या अभिवादनाला कसा प्रतिसाद देता? लोक जेव्हा तुम्हाला विचारतात, "कसं काय चाललंय तुमचं?" तेव्हा तुम्ही "छान..", "फारच छान..", "ठीक..", "वाईट नाही..", "जेमतेम चाललंय.." किंवा "वैतागलेलं आयुष्य.." असं म्हणता? जोमदारपणे आणि उत्साहाने प्रतिसाद देता की फक्त बाकीचे म्हणतात तसं कोणत्याही विचार किंवा भावनेशिवाय उत्तर देता? कसा प्रतिसाद देता? अभ्यासातून

असं निर्देशनाला आलंय की तुम्ही आयुष्याला जसा प्रतिसाद देता तसं आयुष्य तुम्हाला प्रतिसाद देतं. झिग झिगलर म्हणतात तसं, "अत्युत्कृष्ट! आणखी चांगलं हवंय". लेस ब्राऊन म्हणाला, "चांगल्यापेक्षा अधिक चांगलं आणि उत्तमपेक्षा अधिक उत्तम!" माझा मुलगा, विल्यम म्हणतो, "ग्रेट!" आणि कित्येक वर्षं मी म्हणत आलो, "एकदम मस्त! यापेक्षा चांगला दिवस मी बघितलेला नाही!" नंतर एक दिवस मी शिकागो येथील डब्ल्यूएल्एस् रेडिओच्या अध्यक्ष झेमिरा जोन्स यांना भेटलो. गेल्या काही वर्षांत ते माझे चांगल्यापैकी मित्र झाले आहेत. मी जेव्हा त्यांना प्रथमच भेटलो आणि त्यांना विचारलं, "हाऊ आर यू टुडे?" तेव्हा त्यांनी मला उत्तर दिलं, "मी आशीर्वाद मिळालेला आणि खास मर्जीतला आहे." मी त्यांना विचारलं, "काय म्हणालात?" ते म्हणाले, "आशीर्वाद मिळालेले आणि खास मर्जीतले." मी म्हटलं, "वा! काय छान अभिवादन. मीपण हे वापरू का?" ते म्हणाले, "प्लीज! आणखी खूप लोकांना हे अभिवादन वापरायला सांगा, कारण अभिवादनाच्या शक्तीबद्दल आणि सकारात्मक कसं बोलावं याबद्दल, तसंच जीवनात शक्ती निश्चित करण्याबद्दल समजून घेण्याची लोकांना गरज आहे."

तुम्ही लोकांना कसं भेटता आणि त्यांना कसं अभिवादन करता, हा तुम्हाला आयुष्य प्रत्येक दिवशी कसं अभिवादन करतं आणि भेटतं याचा एक मोठा भाग आहे. तुम्ही ज्यांच्याशी बोलता फक्त त्यांच्यावरच त्याचा परिणाम होतो असं नाही, तर ते तुमच्यावरही परिणाम करतं, हे अधिक महत्त्वाचं आहे. 'मी आशीर्वाद लाभलेला आणि खास मर्जीतला आहे.' असं म्हणण्याने तुम्हाला कसं वाटतंय एवढंच फक्त व्यक्त होत नाही, तर तुमची सातत्याने असणारी स्थितीदेखील त्यामुळे व्यक्त होते. तुम्हाला आत्ता कसं वाटतंय आणि नंतर कसं वाटणार आहे, हे तुम्ही व्यक्त करता. तुमच्या आयुष्यात काय चाललंय आणि आयुष्यात काय घडायला पाहिजे याबद्दलची तुमची अपेक्षा, हे सुद्धा त्याच्यातून व्यक्त होतं. ज्या नसतील अशा गोष्टी तुम्ही उच्चारता, जणू काही त्या अस्तित्वात आहेतच! तुम्हाला जेव्हा छान वाटत असेल आणि जेव्हा छान वाटत नसेल, अशा वेळी तुम्हाला आशीर्वाद असतात आणि तुम्ही खास मर्जीतले असता. जेव्हा तुमच्या खिशात पैसे असतात किंवा

जेव्हा तुम्ही कफल्लक असता, तेव्हाही तुम्ही आशीर्वाद असलेले आणि खास मर्जीतले असता. जेव्हा गोष्टी चांगल्या चाललेल्या असतात आणि जेव्हा आव्हानं असतात, तेव्हाही तुम्ही आशीर्वाद असलेले आणि खास मर्जीतले असता; कारण परिस्थिती सुधारणार आहे अशी तुमची श्रद्धा तुम्ही व्यक्त करत असता. आशीर्वाद लाभलेले आणि खास मर्जीतले! माझ्या कर्मचारी वर्गाचं, माझ्या कुटुंबाचं आणि माझ्या मित्रांचं हे एक ब्रीदवाक्यच झालं आहे. मी माझ्या एवढ्या मोठ्या श्रोतृवर्गासोबत हे अभिवादन वाटून घेतलंय की आम्हाला एक 'आशीर्वाद लाभलेले आणि खास मर्जीतले' असा क्लब स्थापन करावा लागला. ज्याच्यात एका वार्तापत्राचा आणि एका टोल फ्री दैनंदिन सकारात्मक संदेशाचा समावेश आहे. प्रेरणा, उत्साह आणि मोठ्या अपेक्षांसह आयुष्याला भेटा आणि त्याचं स्वागत करा. मग आयुष्यही तुम्हाला काहीतरी देऊन प्रतिसाद देईल. मित्रांनो, हा 'आणखी एक महान दिवस आहे.' आणि 'होय! मी आशीर्वाद लाभलेला आणि खास मर्जीतला' आहे.

अपेक्षा

यशस्वी व्हायचं असेल, तर तुम्हाला एक सकारात्मक मानसिक दृष्टिकोन विकसित करावा लागेल. प्रत्येक दिवशी सकारात्मक वृत्ती आणि सकारात्मक अपेक्षा वाढवावी लागेल. प्रसंगामध्ये वाईट काय आहे ते शोधण्याऐवजी चांगलं काय आहे ते शोधणं म्हणजे सकारात्मक वृत्ती. पाऊस यावा त्याबद्दल उत्तेजित होणं म्हणजे सकारात्मक वृत्ती; कारण तुम्हाला ठाऊक आहे की वनस्पतींना वाढण्यासाठी पाणी लागतं, फुलांनाही फुलण्यासाठी पाणी लागतं आणि पाऊस नसेल तर वाळवंट तयार होईल. मोठ्या गोष्टींची अपेक्षा करणं म्हणजे सकारात्मक अपेक्षा. एक जुनी म्हण आहे की अशा लोकांच्या बाबतीत चमत्कार घडतात, जे लोक अपेक्षा करतात आणि त्यांचं स्वागत करतात. मोठ्या गोष्टींची अपेक्षा करा, सकारात्मक मानसिक दृष्टिकोन विकसित करा म्हणजे तुम्ही मोठ्या गोष्टी करू शकाल. एका सकारात्मक मानसिक दृष्टिकोनामुळे तुम्ही प्रत्येक वादळाला तोंड देऊ शकाल आणि प्रत्येक आशीर्वादाबरोबर

एक ओझं असतं आणि प्रत्येक ओझ्याबरोबर आशीर्वाद असतो. आशीर्वादाचं लक्ष्य ठेवा. हॅव ए ग्रेट डे!

बरेच वेळा जेव्हा लोक 'दृष्टिकोन'बद्दल बोलतात तेव्हा त्या व्यक्तीच्या रूपाबद्दल, स्वभावाबद्दल किंवा व्यक्तिमत्त्वाबद्दल बोलतात. ज्या लोकांना 'विशिष्ट दृष्टिकोन आहे' अशा लोकांना आपण सगळेच ओळखत असतो, त्याचा सर्वसाधारणपणे 'वाईट दृष्टिकोन' असा अर्थ असतो. वाईट दृष्टिकोनाचा संदर्भ केवळ वाईट व्यक्तिमत्त्वाशीच नसतो, तर वाईट मानसिकतेशी आणि जगाकडे बघण्याच्या नकारात्मक पद्धतीशीदेखील असतो. प्रत्येक प्रसंगाचे फक्त नकारात्मक पैलू बघणं...... पेला अर्धा भरलेला आहे यापेक्षा अर्धा रिकामा आहे हे बघणं. जगाबद्दलचा तो एक निराशावादी दृष्टिकोन आहे. मी एकदा असं वाचलं होतं - निराशावादी माणसाची व्याख्या म्हणजे अशी व्यक्ती जी संधी दार ठोठावत असताना आवाजाची तक्रार करते!

तर मग 'वाईट दृष्टिकोन' अशी जर काही गोष्ट असेल, तर 'चांगला दृष्टिकोन' अशी पण गोष्ट असणारच. एक सकारात्मक दृष्टिकोन आणि आशावादी वृत्ती! सकारात्मक मानसिक दृष्टिकोनामुळे आशावाद निर्माण होतो (नकारात्मक वृत्ती आणि नकारात्मक दृष्टिकोनाच्या विरुद्ध). माझा एक चांगला मित्र लॅरी विनगेट म्हणतो, ''तुम्ही आयुष्यात काहीही करा, पण नकारात्मक मानसिक दृष्टिकोनापेक्षा सकारात्मक मानसिक दृष्टिकोन ठेवलात तर तुम्ही ते अधिक चांगलं कराल.''

आशावादी

तुम्ही जसा एक सकारात्मक मानसिक दृष्टिकोन वाढवाल, तसा तुमचा आशावादही वाढेल. तुमच्या कृतींमुळे सकारात्मक गोष्टी घडणार आहेत याच्यावर विश्वास ठेवण्याची क्षमता आणि चांगल्या गोष्टी घडण्याची अपेक्षा अशा प्रकारचा दृष्टिकोन म्हणजे आशावाद. वाईट गोष्टींपेक्षा चांगल्या गोष्टींची अपेक्षा करण्याची जाणीव विकसित होणं याचा अर्थ तुम्ही आशावादी आहात. तुम्ही जसा तुमचा सकारात्मक मानसिक दृष्टिकोन विकसित कराल, तसं तुम्ही आशावादी राहायला शिकाल.

इंद्रधनुष्याकडे पाहा आणि पाऊस पडला तरच इंद्रधनुष्य दिसतं हे लक्षात ठेवा! मी ऐकलेली एक गोष्ट सांगायला मला आवडेल, ''मी एवढा आशावादी आहे की मी मासे पकडण्यासाठी बोटीतून चाललोय आणि माझ्याबरोबर मी सॉस नेतोय.'' 'सकारात्मक राहा आणि लक्षात ठेवा की एक सकारात्मक विचार करणारा माणूसच बरेच वेळा अदृष्य गोष्टींदेखील बघतो, न दिसणाऱ्या गोष्टींची त्याला जाणीव होते आणि अशक्य ते तो मिळवतो!'

आकडेवारी दर्शवते की दृष्टिकोनामुळे काही प्राप्त करण्यावरच फक्त फरक पडत नाही तर शारीरिक आरोग्यामध्येसुद्धा फरक पडतो. सकारात्मक दृष्टिकोन असलेल्या लोकांची प्रवृत्ती आजारी पडण्याकडे कमी असते आणि जेव्हा असे लोक आजारी पडतात, तेव्हा ते लवकर बरे होतात.

मरेपर्यंत जगा

तुमचा दृष्टिकोन हा वस्तुस्थितीपेक्षा कितीतरी अधिक महत्त्वाचा आहे. एका ज्येष्ठ नागरिकांच्या गटाबरोबर बोलत असताना एका स्त्रीने मला याबद्दल सांगितलं – तिची कोणाला गरज असल्याचं तिला वाटत नसल्याने तिला नैराश्य आलेलं आहे. मी तिला विचारलं की तिला हे उमगलं आहे का की, कर्नल सँडर्सने तो पासष्ट वर्षांचा होईपर्यंत केंटुकी फ्राईड चिकन सुरू केलं नव्हतं, क्लारा पेलर ऐंशी वर्षांची होईपर्यंत 'व्हेअर इज द बीफ?' असं म्हणत एक लोकप्रिय टी.व्ही. तारका झाली नव्हती. जॉर्ज बर्नने ऐंशीच्या वर्षी ऑस्कर पटकावलं आणि त्यानं वयाच्या नव्वदीत असताना प्रयोग सादर करण्याचा दहा वर्षांचा करार केला! ज्येष्ठ नागरिक मॅरॅथॉनमध्ये पळतात, व्यवसाय सुरू करतात, पर्वत पालथे घालतात आणि सगळ्या प्रकारची आश्चर्यजनक कामं करतात. ते सगळे वृद्ध होत चालले आहे, हे त्यांना कळत असतं. पण, 'मी एक वेळ विरून जाईन पण गंज चढवून घेणार नाही!' असा त्यांचा दृष्टिकोन असतो. जॉर्ज बर्न्स रोज सकाळी उठल्यावर, मृतांना वाहिलेल्या श्रद्धांजलीची यादी बघायचे. आणि जर त्या यादीत त्यांचं

नाव नसेल तर ते कामात मग्न व्हायचे! हीच त्यांच्या यशाची गुरुकिल्ली होती असं ते म्हणत. शंभर वर्षांचे होईपर्यंत ते जगले आणि नंतर मृत्यू पावले. बरेच लोक, जे पासष्टाव्या वर्षीच जगण्यातून निवृत्त होतात आणि काही वर्षांनी त्यांना फक्त पुरण्यात येतं. मी तुम्हाला कळकळीची विनंती करतो, मरेपर्यंत जगण्याचं थांबवू नका! साठाव्या वर्षीदेखील खेळणं चालू ठेवणारा निग्रो लीगचा महान बेसबॉल खेळाडू सॅचेल पेज याने म्हटल्याप्रमाणे, 'वय हे फक्त वस्तुस्थितीच्या वरचढ असण्याबद्दल आहे. तुम्ही जर ते मनावर घेत नसाल तर त्यामुळे फरक पडत नाही!' मित्रांनो, संपूर्ण आयुष्य जगण्यातला आनंद लुटा!

मॅडम सी.जे. वॉकर

अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असूनही जिने हार मानली नाही, अशी मॅडम सी.जे. वॉकर ही एक जोशपूर्ण स्त्री होती. ती काही फार उच्चशिक्षित नव्हती. पण एक अतिशय सकारात्मक दृष्टिकोन असेली स्त्री होती. तिच्या या दृष्टिकोनामुळे ती तिच्यापेक्षा अधिक गुणवान आणि अधिक शिकलेल्या लोकांहूनही जास्त उच्च स्थानी पोहोचली आणि अविश्वसनीय उंची गाठून तिने करोडो डॉलर्स कमावले. मॅडम सी.जे. वॉकर अमेरिकेतली पहिली कृष्णवर्णी करोडपती झाली. तुमचा कल कुठे आहे याच्यापेक्षा शेवटी तुमचा दृष्टिकोन तुम्ही किती उंचीवर पोहोचता हे ठरवतो, हे तिला समजून चुकलं! एक सकारात्मक मानसिक दृष्टिकोन विकसित करा आणि तुम्हीदेखील उच्च स्थानावर पोहोचू शकाल!

एका मित्राने दोन लहान मुलांबद्दलची कथा मला सांगितली. एक आशावादी होता, तर दुसरा निराशावादी. संशोधन करणाऱ्या एका गटाने सकारात्मक आणि नकारात्मक मानसिक दृष्टिकोनांवर अभ्यासपूर्ण संशोधन केलं आणि त्या मुलांना या संशोधनासाठी दाखल करून घेण्यात आलं. ज्या मुलाचा दृष्टिकोन नकारात्मक होता त्याला संशोधकांनी एका एकदम नवीन आणि मनोरंजक खेळण्यांनी, व्हिडिओ गेम्सनी भरलेल्या खोलीत नेलं. जगभरच्या सगळ्या मुलांनी ज्यांची निर्विवादपणे उत्तम

अशी निवड केली होती अशी सगळ्या प्रकारची खेळणी, खेळ आणि मशीन्स तिथे होती. त्यांनी त्या मुलाला खोलीत एकटं सोडलं आणि म्हणाले, "छान वेळ घालव." दुसरा जो आशावादी मुलगा होता त्याला एका अशा खोलीत ठेवण्यात आलं, जी खूपच वेगळी होती. घोड्याच्या लीदीने भरलेल्या खोलीत त्याला सोडण्यात आलं.

संशोधकांनी त्या दोघांचं दोन्हीकडून दिसणाऱ्या आरशांतून निरीक्षण केलं आणि त्यांना जे आढळलं त्याने ते थक्क झाले. निराशावादी मुलगा त्या खोलीच्या मधोमध निव्वळ बसला आणि रडत राहिला. आशावादी मुलगा मात्र हसतच होता. इथेतिथे उड्या मारत होता, मस्त मजा करत होता. संशोधक जेव्हा निराशावादी मुलगा असलेल्या खोलीत गेले, तेव्हा त्यांनी त्याला विचारलं, "एवढ्या सुंदर खेळण्यांच्या आणि खेळांच्यामध्ये बसून तू रडत का होता?" तो म्हणाला की त्याला खात्रीने वाटत होतं की कोणीतरी येऊन ती खेळणी घेऊन जाईल किंवा खेळणी मोडतील, नाहीतर त्या खेळण्यात काहीतरी चुकीचं असेल. नंतर ते संशोधक त्या खोलीत गेले जिथे तो मुलगा अजूनही त्या कमरेइतक्या उंच लीदीच्या ढिगाच्या मधोमध उड्या मारत होता, मजा करत होता. त्यांनी त्याला विचारलं, की तो एवढा छान वेळ कसा घालवत होता? आणि त्याने उत्तर दिलं, "तुम्ही मला मूर्ख बनवू शकत नाही हे मला माहीत आहे. ही एवढी घोड्याची लीद इथे आहे म्हणजे एक शिंगरू पण कुठेतरी जवळपास असणारच!"

मित्रांनो, आयुष्य अर्धवट जगण्यासाठी खूपच छोटं आहे. तुमचं आयुष्य भरभरून जगण्याचा तुम्ही निश्चय केला पाहिजे आणि प्रत्येक क्षण जागवला पाहिजे. आयुष्याची मजा लुटा. जेव्हा लोक आत्महत्या करतात आणि त्यांची आयुष्यं फेकून देतात तेव्हा ते लज्जास्पद ठरत नाही काय? तुमच्या कुवतीचा पूर्ण उपयोग न करता, आयुष्य तुकड्या-तुकड्यांनी थोडं-थोडं वाया घालवणं हेदेखील लज्जास्पदच आहे. शेवटचा परिणाम एकच असेल, मग ते सगळंच तुम्ही एकाच वेळी करा किंवा थोडं-थोडं, तुम्ही आयुष्य पूर्णपणे जगत नाही आणि म्हणून त्याच्या खऱ्याखुऱ्या आनंदाला तुम्ही मुकता. आयुष्य नेहमीच पूर्णपणे जगा!

असाधारण विचारच असाधारण माणूस घडवतो

मोठं व्हायचं असेल, तर तुम्हाला असाधारण विचार करावे लागतील, असाधारण गोष्टी कराव्या लागतील आणि असाधारण उद्दिष्टांच्या मागे जावं लागेल. *मॅन्स सर्च फॉर हिमसेल्फ* पुस्तकाचे लेखक आणि एक महान मानसशास्त्रज्ञ रोलो मे म्हणाले होते, ''धैर्याच्या विरुद्ध शब्द भित्रेपणा नव्हे, तर मळलेल्या पायवाटेवरून चालणं (ठरावीकच गोष्टी करणं) हा आहे.'' लोक कुठे चालले आहेत आणि का, याचा विचार न करता इतरांसारखं वागणं म्हणजे नाकासमोर बघून चालणं. वेगळं उठून दिसायच्याऐवजी आपण मुख्य प्रवाहात मिसळून जातो. प्रवाहाबरोबर जाण्याचा आपला कल असतो. अध्यक्ष थिओडॉर रुझवेल्ट यांचं एक सर्वसाधारण तत्त्वज्ञान होतं, ज्यामुळे ते समूहात उठून दिसले. ते म्हणाले, ''कॉमन मॅन न होण्याची मी निवड करतो. मला जर शक्य असेल तर असाधारण बनण्याचा माझा हक्क आहे. मी सुरक्षिततेचा नव्हे, तर संधीचा शोध घेईन. सरकार काळजी घेतंय त्यामुळे सुस्त झालेला, बापुडवाणा, गरीब झालेला असा एक सरकारचा आश्रित नागरिक मला व्हायचं नाही. मला ठरवून धोका पत्करायचाय, स्वप्नं बघायची आहेत, काहीतरी घडवायचंय, हरायचंय आणि जिंकायचंही आहे. जेमतेम हातातोंडाची गाठ पडेल असं मला जगायचं नाही. खात्रीलायक अस्तित्वापेक्षा मला आयुष्याची आव्हानं पेलायला आवडेल, कल्पनाविश्वातल्या शिळ्या शांततेपेक्षा मला सार्थकतेचं उत्तेजन अधिक पसंत आहे. मी कोणत्याही मालकापुढे कधीही नतमस्तक होणार नाही किंवा कोणत्याही मित्रापुढे वाकणार नाही. मानाने आणि निर्भयपणे ताठ उभं राहणं हा माझा वारसा आहे, विचार करणं आणि स्वत:साठी कृती करणं, जगाला धिटाईने सामोरं जाणं आणि म्हणणं, ''हे मी केलंय.'' फ्रँक सिनात्राने त्याच्या एका गाण्यात म्हटलंय 'आय डिड इट माय वे!' (मी ते माझ्या पद्धतीने केलंय) मित्रांनो, मी तुम्हाला सांगतो, ते तुमच्या पद्धतीने करा. असाधारण गोष्टींचा विचार करा, असाधारण गोष्टी करा आणि हेन्री डेव्हिड थोरोने म्हटल्याप्रमाणे ''एखादा माणूस जर त्याच्या स्वप्नांच्या दिशेने आत्मविश्वासपूर्वक पुढे गेला आणि त्याने कल्पना केलेलं आयुष्य

जगण्यासाठी त्याने प्रयत्न केले, तर त्याला 'इन अनकॉमन अवर्स' सारखं अनपेक्षित यश मिळेल.''

तुमच्या आयुष्याचा हेतू शोधा

थिंक अँन्ड ग्रो रिच : ए ब्लॅक चॉईस या पुस्तकाचे लेखक डेनिस किम्ब्रो यांनी मला सांगितलेली एक कथा तुम्हाला आज सांगायचीय. पर्सी सटन, मॅनहॅटन बरोचे माजी अध्यक्ष, यांच्याकडून ऐकलेली माल्कम एक्स यांच्याबद्दलची ही कथा आहे. पर्सी सटन यांनी तरुण असताना एका कोर्ट प्रकरणात, माल्कम एक्स यांच्यातर्फे केस चालवून ती अतिशय कठीण परिस्थितीत जिंकली. माल्कम आणि विरुद्ध पक्षाच्या वकिलात अतिशय आवेशपूर्ण कायदेशीर लढाई झाली. जेव्हा ते कोर्टाच्या इमारतीतून बाहेर पडत होते, तेव्हा माल्कमचे पाठीराखे एका बाजूला होते आणि त्याचे प्रतिस्पर्धी दुसऱ्या बाजूला. एका काळ्या लांबलचक लिमोसिन गाडीकडे माल्कम आणि पर्सी सटन जात असताना बरेचसे अंगरक्षक त्यांच्या सुरक्षेसाठी बरोबर गाडीपर्यंत गेले. पर्सी सटन काही बोलू शकत नव्हते, एवढे भयभीत झाले होते, पण माल्कम मात्र अतिशय थंड होते. पर्सीने त्यांना विचारलं, ''मिनिस्टर माल्कम, मृत्यू साक्षात समोर दिसत आहे. अशा परिस्थितीत तुम्ही एवढे शांत कसे काय राहू शकता?'' माल्कमनी शांतपणे उत्तर दिलं, ''संकट आहे असं माझ्या लक्षातदेखील आलं नाही. माझ्या असण्याच्या व्यतिरिक्त दुसरेच विचार माझ्या मनात चालू आहेत. पण मी चिंतातुरसं नाही याचं कारण एक कथेत आहे. बंधु पर्सी, ओमर नावाच्या एका म्हाताऱ्या कामगाराची कथा बरेच वर्षांपूर्वी मी ऐकली होती. त्याला स्वप्नात मृत्यूचा चेहरा दिसलेला असतो. जागा होऊन तो त्याच्या मालकाकडे जातो आणि विचारतो, मृत्यूपासून सुटका करून घेण्यासाठी त्याला सर्वांत वेगवान घोडे मिळू शकतील काय? मालक त्याला सर्वांत जलद पळणारा घोडा देतो. ओमर न थांबता तीन दिवस तो घोडा चालवत राहतो. झोप, अन्न किंवा जीवनावश्यक गोष्टींसाठीही तो थांबत नाही. जेवढं जलद जाता येईल तेवढं तो जात राहतो. तीन दिवसांनंतर त्या रस्त्याला सात वेगवेगळे फाटे फुटतात. तो आधी, एकदम

उजवीकडचा रस्ता घेतो पण लगेचच त्याचं मन बदलतं आणि तो एका रस्त्याकडून दुसऱ्या रस्त्याकडे असा फिरतच राहतो, शेवटी एकच रस्ता उरतो. तो रस्ता पकडून ओमर दमाने आणि जलद घोडदौड करतो. सुमारे पाचशे फूट गेल्यावर मृत्यूचा चेहरा दृश्यमान होतो आणि म्हणतो, "ओमर, ओमर तू मला तीन दिवस का बरं वाट बघत थांबवलंस?" माल्कम एक्स सटनकडे वळले आणि म्हणाले, "या कथेचं नीतितत्त्व असं आहे की तुम्ही कितीही पळा, लपा, वाकडे-तिकडे जा, पण तुम्ही काहीही केलंत तरी या आयुष्यातून तुम्ही जिवंत सुटू शकत नाही." म्हणूनच 'जेव्हा तुम्ही इथे आहात तेव्हाच तुम्ही तुमच्या आयुष्याचा अर्थ शोधलेला बरा, आयुष्य परिपूर्णतेने जगा, अत्युत्कृष्टतेचा ध्यास घ्या आणि तुमचं स्वप्न जगा, कारण या आयुष्यातून तुम्ही जिवंत बाहेर पडू शकत नाही!'

तुम्हाला कशामुळे चालना मिळते!

मी एका शाळेत भाषण दिल्यानंतर एक प्रभावित झालेली तरुण स्त्री माझ्याकडे आली. ती म्हणाली की तिला भाषण आणि माहिती आवडली. पण त्याचा खरोखरच फायदा होईल की नाही, हे तिला जाणून घ्यायचं होतं. "या गोष्टींचा खरोखरच उपयोग होतो?" तिने विचारलं. नंतर त्याचा खरोखर उपयोग होतो की नाही याचा निर्णय घ्यायला मदत होण्यासाठी तिने मला एक प्रश्न विचारला. ती म्हणाली, "जोलीसाहेब, तुम्ही कोणत्या प्रकारची गाडी चालवता?" त्या प्रश्नामुळे मी काहीसा व्यथित झालो आणि क्षणभर भांबावून गेलो, कारण एखाद्याच्या यशाच्या पातळीशी मी त्याच्या 'गाडीच्या प्रकारा'ची बरोबरी करत नाही. मी तिच्या डोळ्यात बघितलं आणि तिला सांगितलं, "खरं सांगू का?, वस्तुतः मी आत्ता कोणती गाडी चालवतोय यामुळे काहीच फरक पडत नाही तुम्हाला माहीत आहे याची गुरुकिल्ली आहे की मला काय चालना देतं! जर मी माझ्या कारणासाठी जगायला गतिमान असलो आणि एक अत्युत्कृष्ट आयुष्य जगण्यासाठी प्रभावित होत असलो, तर मला जे पाहिजे ते मी खरेदी करू शकेन आणि काय पाहिजे ते

चालवू शकेन!'' आयुष्यात तुम्ही काय चालवता याला महत्त्व नाही, पण तुम्हाला कशामुळे चालना मिळते, ते महत्त्वाचं! उत्कृष्टतेचा ध्यास घ्या आणि सर्वांत चांगली गोष्ट चालवा... तुम्ही!

उत्कृष्ट विरुद्ध परिपूर्ण

वेबस्टरच्या व्याख्येप्रमाणे 'उत्कृष्ट'ची व्याख्या आहे, 'अत्यंत चांगला दर्जा, पहिल्या दर्जाची गुणवत्ता.' परिपूर्णतेची व्याख्या आहे, 'कोणताही दोष किंवा चुक नसलेली अवस्था'. आणि ते पुढे असंही म्हणतात की परिपूर्ण नसलेलं इतर काहीही अस्वीकारार्ह आहे. आता असं बघा, पुष्कळ लोक असं म्हणतात की ते 'परफेक्शनिस्ट' आहेत आणि त्यांना फक्त अगदी निर्दोष असेच परिणाम पाहिजेत. ते असं म्हणतात की 'सरावातून परिपूर्णता येते!' पण वास्तवात मात्र 'सरावामुळे सुधारणा होते.' मी परिपूर्णतेसाठी नव्हे तर अत्युत्कृष्टतेसाठी शर्थीचे प्रयत्न करतो. सातत्याने होणाऱ्या आणि कधीही न होणाऱ्या सुधारणेसाठी मी प्रयत्न करतो आणि माझं काम सर्वाधिक चांगलं, अधिक चांगलं करण्याचा निकराचा प्रयत्न करतो. मी काल करत होतो त्यापेक्षा आज अधिक चांगलं करणं आणि उद्याच्या दिवशी आजच्यापेक्षाही चांगलं करणं हे माझं उद्दिष्ट आहे.

हँक ॲरॉनला जेवढ्या होम-रन्स मिळाल्या, त्याच्या दुपटीने स्ट्राईक आऊट मिळाले, पण तरीही त्याने इतर कोणाहीपेक्षा अधिक होमर्स फटकावले. तो परिपूर्ण नसला तरी अत्युत्कृष्ट होता. मी असं म्हणेन की तुम्ही अत्युत्कृष्ट होण्याचा ध्यास घेतला पाहिजे, परिपूर्ण होण्याचा नव्हे; कारण अत्युत्कृष्ट असणं तुम्हाला सातत्याने तुमचं सर्वाधिक चांगलं अधिक चांगलं करत राहायला परवानगी देतं. ए. एल. विल्यम्सने हे फार चांगल्या प्रकारे सांगितलं आहे. तो म्हणतो, ''जे तुम्ही करू शकता ते सगळं तुम्ही करू शकता आणि सगळं तुम्ही करू शकता ते पुरेसं आहे. फक्त एवढी खात्री करा की तुम्ही जे काही सगळं करू शकता ते निर्विवादपणे तेवढंच तुम्ही सगळं काही करू शकता ते आहे!'' मार्टिन

ल्यूथर किंग, ज्युनिअर यांनी ते खूप सुंदर सांगितलंय. जेव्हा ते म्हणाले, ''एखाद्या माणसाला जर रस्ते झाडायला सांगितलं असेल तर त्याने ते रस्ते अगदी मायकेल अॅन्जेलो चित्र रंगवेल किंवा बीथोव्हेन संगीतरचना करेल किंवा शेक्सपिअर काव्यरचना करेल, तसं करावं. त्याने रस्ते एवढे सुंदर झाडावेत की सगळे स्वर्गातले आणि पृथ्वीवरचे महात्मे थबकतील आणि म्हणतील, ''ज्याने त्याचं काम फारच अप्रतिम केलं आहे असा एक महान रस्ते झाडणारा इथे राहत होता...'''' अत्युत्कृष्टतेसाठी परिश्रम करा, परिपूर्णतेसाठी नव्हे आणि तुमचं सर्वांत चांगलं, अधिक चांगलं करण्याचा नेहमीच प्रयत्न करा!

अत्युत्कृष्टता... थोडी अधिक!

आपण जेव्हा अत्युत्कृष्टतेबद्दल बोलतो, तेव्हा ते खूप कठीण आहे, खूप मागणी करणारं आहे आणि म्हणून शक्य नाही, असा बरेच लोक विचार करतात आणि म्हणून प्रयत्नदेखील करत नाहीत. तरीही, अत्युत्कृष्टतेच्या व्याख्येप्रमाणे, प्रत्येक दिवशी थोडंसं अधिक करणं, अधिक जोमाचा प्रयत्न करणं, थोडं अधिक अंतर कापणं, छोट्या छोट्या गोष्टी करणं म्हणजे अत्युत्कृष्टता. आता असं बघा, एकदा का तुम्हाला तुमचं सर्वांत चांगलं देण्याची सवय लागली की त्याचे परिणाम दिसायला सुरुवात होईल. जॉन हेसनी म्हटलंय, ''एक रेसचा घोडा, जो एखादा मैल, काही सेकंदांनीदेखील अधिक जलद पळू शकतो, त्याची किंमत दुपटीने अधिक असते, कारण त्या थोड्याशा अधिक वेगाने पळल्यामुळेदेखील मोठा फरक पडतो.'' एका कवितेत म्हटलंय की साधारण आणि असाधारण यांच्यातला फरक फक्त एक छोटंसं 'अधिक' आहे. तसंच 'प्रयत्न' आणि 'विजय' यातला फरकदेखील एक अधिक 'जोष' आहे. थोड्याशा 'अधिक'मुळे खूप मोठा फरक पडू शकतो. रोजच्या रोज थोडंसं अधिक द्या आणि अत्युत्कृष्टतेमुळे खरोखरच उत्तम फायदे मिळतात, हे तुमच्या ध्यानात येईल.

हायसिंथ मॉर्गन

एका महाविद्यालयात भाषण देत असताना भेटलेल्या एका स्त्रीच्या कथेने मला प्रभावित केलं. ती स्त्री म्हणजे हायसिंथ मॉर्गन. सहाव्या इयत्तेपर्यंत शिकलेली हयासिंथ वयाच्या विसाव्या वर्षी अमेरिकेला आली. तिचं इंग्रजी जरी यथातथा असलं, तरी यशस्वी होण्याची इच्छा मात्र जबरदस्त होती. एक गृह पर्यवेक्षिका म्हणून नोकरीला सुरुवात करून तिने स्वत:चं इंग्रजी सुधारायला सुरुवात केली. पाच वर्षं काम करून तिने, तिच्या छोट्याशा बेटावरच्या गावात तिच्या आईकडे ठेवलेल्या दोन मुलांना परत घेऊन यायला पुरतील एवढे पैसे साठवले. ती जेव्हा तिच्या मुलांना आणायला गावी परत गेली, तेव्हा तिला कर भरावे लागल्याने तिची साठवलेली रक्कम खर्ची पडली. तिने आणखी तीन वर्षं काम केलं, पैसे साठवले आणि तिच्या मुलांना अमेरिकेला परत आणलं. तिने पुन्हा घरकामं करायला सुरुवात केली. एकीकडे शिकत असताना पाच वर्षं नोकरी केली. शेवटी तिला तिची पदविका मिळाली आणि तिचं डॉक्टर होण्याचं स्वप्न साकारण्यासाठी तिने एका स्थानिक कम्युनिटी महाविद्यालयात प्रवेश घेतला. पण तिला असं सांगण्यात आलं की तिच्या मर्यादित शैक्षणिक पार्श्वभूमीमुळे ते शक्य होणार नाही. पण यशस्वी होण्याची तिची इच्छा प्रबळ होती. तिने परीक्षांमध्ये 'ए' श्रेणी मिळवली आणि वैद्यकीय व्यवसायाच्या पूर्वतयारीच्या अभ्यासक्रमासाठी असणाऱ्या शैक्षणिक संस्थेत जाण्यासाठी ती उत्सुक होती. पण तिने आता चाळिशी ओलांडल्याने, देशातल्या प्रत्येक संस्थेकडून तिचं वय जास्त असल्याच्या कारणामुळे तिला नाकारण्यात आलं. पण हयासिंथने माघार घेतली नाही. तिने तिचे प्रयत्न चालूच ठेवले आणि शेवटी बाल्टिमोर इथल्या जॉन हॉपकिन्स विद्यापीठाच्या लोकांनी तिची गुणवत्ता बघून, तसंच तिची कहाणी ऐकून तिचा पूर्ण शिष्यवृत्तीवर, त्यांच्या वैद्यकशास्त्रशिक्षण – पूर्व कार्यक्रमासाठी स्वीकार केला. मित्रांनो, निश्चय आणि प्रेरणा असल्यावर काहीही करता येऊ शकते याची ही सत्य कथा म्हणजे पुरावा आहे. श्रद्धा, आत्मविश्वास, निश्चय आणि चिकाटी यांच्या मिश्रणाबरोबर असणारं स्वप्न जे नाकारलं जाऊच शकत नाही. लक्षात ठेवा, तुम्ही फक्त विश्वास ठेवलात, तर सगळं काही शक्य आहे.

बोलणारा पक्षी

माझ्या आवडत्या गोष्टींपैकी एक म्हणजे, पाच भाषा बोलू शकणाऱ्या एका दुर्मीळ, बोलणाऱ्या पक्ष्याची. एका माणसाने या दुर्मीळ, बोलणाऱ्या पक्ष्याबद्दल ऐकलं आणि त्याच्या शोधार्थ त्याने जगभराचा दौरा काढला. दमवून टाकणाऱ्या या शोध मोहिमेनंतर तो एका पाळीव प्राण्यांच्या दुकानात माहिती विचारण्यासाठी थांबला आणि त्याच दुकानात त्याला त्या पक्ष्याचा शोध लागला. त्याने त्या दुकानाच्या मालकाला सांगितलं की त्याला एका छोट्या दौऱ्यासाठी जायचंय, पण तो पक्षी त्याच्या घरी दोन दिवसात पाठवून द्यावा. दोन दिवसांनंतर घरी पोहोचल्यावर त्याने तो पक्षी आलेला आहे का असं त्याच्या बायकोला विचारलं. तिने उत्तर दिलं, ''होय.'' तो म्हणाला, ''कुठे आहे तो?'' तिने उत्तर दिलं, ''ओव्हनमध्ये.'' ''काय? तो एकमेवाद्वितीय असा पाच भाषा बोलू शकणारा दुर्मीळ पक्षी होता!'' आणि त्याची बायको म्हणाली, ''ओहो, तो तसं बोलला का नाही?'' आपल्यापैकी बरेचजण त्या पक्ष्यासारखे असतात. आपली आयुष्यं बदलू शकणारी कौशल्यं आणि गुण आपल्याकडे असतात, पण जगाला देण्यासारखं आपल्याकडे काय आहे ते दाखवून देण्यासाठी आपण बोलतच नाही!

मित्रांनो, इतरांना तुमची कौशल्यं आणि गुण यांच्याबद्दल कळू द्या. तुम्ही एकमेव आहात हे त्यांना माहीत होऊ द्या. अगदी तुमच्यासारखं दुसरं कोणीच नसतं, कोणीच नाही!

उघड बोला!

तुम्हाला जर आयुष्यात काहीतरी पाहिजे असेल, तर तुम्ही बोलायला इच्छुक असलं पाहिजे आणि तुम्हाला काय पाहिजे ते लोकांना कळू दिलं पाहिजे. तो पक्षी बोलला नाही त्यामुळे कोणाचंतरी रात्रीचं जेवण बनला हे आपण आधीच बोललो. पण बऱ्याच लोकांबद्दलही हे खरं आहे. ते विचारत नाहीत. बायबलमध्ये म्हटलंय, 'विचारा आणि तुम्हाला ते मिळेल.' तसंच त्याच्या उलटदेखील लागू पडतं. विचारू नका आणि

तुम्हाला मिळणार नाही. बऱ्याच लोकांना ते विचारत नाहीत म्हणून मिळत नाही. विन सेमिनार्सचा माझा मित्र लॅरी विंगेट म्हणतो तसं, "तुम्हाला जर आयुष्याकडून अधिक पाहिजे असेल तर तुम्ही आयुष्याकडून अधिक मागितलं पाहिजे!" विचारा आणि तुम्हाला अधिक मिळेल, विचारू नका आणि तुम्हाला आयुष्य जेवढं देईल तेवढंच मिळेल, तुम्हाला जे पाहिजे ते मिळणार नाही. तुम्हाला जर पा-हि-जे असेल, तर तुम्हाला मा-गा-वं लागेल.

तुम्ही जेव्हा बोलायला सुरुवात करता, तेव्हा आपल्या अंतर्गत संभाषणाचीही तुम्ही दखल घेतली पाहिजे. ज्या संभाषणाचा आपण एकतर विचार करतो, किंवा स्वतःशीच बोलतो, ते म्हणजे स्वगत. आपल्या कृतींवर आणि दृष्टिकोनांवर त्याचा फार मोठा प्रभाव पडत असल्याने हे स्वगत जरी निरुपद्रवी किंवा निरर्थक भासलं, तरी खरं म्हणजे ते खूप महत्त्वाचं असतं. आपला दृष्टिकोन आपल्या कृती निश्चित करतो. एवढंच नव्हे तर तो आपल्या स्वतःशीदेखील निगडित असतो, ज्याचा परिणाम, आपण काय करू आणि करणार नाही याच्यावरपण होऊ शकतो. आपल्या अंतर्गत संभाषणावर ताबा ठेवायला आपण शिकलं पाहिजे.

आता तोंड बंद करा

बिछान्यातून उठूच नये असं वाटणारे काही दिवस तुमच्या आयुष्यात आले होते का? तुम्ही झोपाळलेले होता म्हणून नव्हे, पण प्रश्नांचा तुम्हाला एवढा वैताग आणि उबग आला होता की त्यापेक्षा बिछान्यातच पडून राहणं तुम्हाला अधिक श्रेयस्कर वाटलं? असो, प्रत्येकाच्या आयुष्यात असे दिवस येतात. तुमचं अंतर्गत संभाषण, तुमचा अंतर्गत संवाद बदलणं ही त्या दिवसांवर मात करण्याची गुरुकिल्ली आहे. जेव्हा तुम्हाला तो विचार सांगतो की बिछान्यातून उठण्याचं तुम्हाला काही कारण नाही, तेव्हा तुम्हाला असं 'शट अप' म्हणून प्रतिसाद द्यायची सवय लावली पाहिजे. बरोबर आहे, फक्त म्हणा तोंड बंद कर आणि स्वतःला सांगा उठून पुढे चला, कामाला लागा! कारण हे तुमच्यासाठी

फक्त तुम्हीच करणार, दुसरं कोणीही नाही. नकारात्मक स्वगताचा सर्वसाधारणपणे परिणाम म्हणजे नैराश्य. उठा आणि काहीतरी सकारात्मक ऐका ('प्रेरणादायी मिनिट'सारखं) किंवा मग (*इट ओन्ली टेकस ए मिनिट टू चेंज युवर लाईफ*सारखं) काहीतरी सकारात्मक वाचा. प्रत्येक दिवशी तुम्ही वाचू शकाल अशा सकारात्मक गोष्टींची यादी करा. अशा काही गोष्टी म्हणा जसं – "आजचा दिवस खूप छान असणार आहे, कारण तो तसा असेल असं मी ठरवलंय. दोन पानं एकसारखी कधीच नसतात. दोन हिमकण किंवा बोटांचे दोन ठसे एकसारखे नसतात. माझा जन्म जे करण्यासाठी झाला आहे ते करण्यासाठी दुसऱ्या कोणाचाही जन्म झालेला नाही." जागे व्हा, उठा म्हणजे तुम्हाला प्रगती करता येईल! एक दिवस उत्तम घालवण्याचा निर्णय घ्या!

कापणी करा आणि पेरा

तुम्हाला जर आयुष्याकडून अधिक पाहिजे असेल तर तुम्हाला आयुष्यात अधिक गुंतवणूक करावी लागेल. जेवढं अधिक द्याल, तेवढं तुम्हाला अधिक मिळेल. जेवढं जास्त विकाल, तेवढा अधिक पैसा कमवाल. जेवढं अधिक बियाणं पेराल, तेवढी अधिक रोपं तुम्हाला कापता येतील. बहुतेक लोक त्यांचं जहाज बंदरात येण्याची वाट बघत थांबतात, पण त्यांनी कोणतंच जहाज बाहेर पाठवलेलं नसतं. त्यांनी कोणतंही बियाणं पेरलेलं नसतं, पण त्यांना रोपं वाढलेली पाहिजे असतात. आता बघा, शेतकरी दहा बियाही न पेरता शंभर रोपांची अपेक्षा करतो का? नाही, तो मग खूप बियाणं पेरतो आणि त्यातलं थोडंफार येणार नाही हे त्याला ठाऊक असतं, पण तो जेवढं अधिक पेरतो तेवढं त्याला अधिक मिळतं. हे एक कालातीत सत्य आहे. जसं पेराल, तसं उगवेल. त्याचा अर्थ असा आहे की तुम्हाला कामात गढून गेलं पाहिजे. ते तुम्हाला घडवून आणलंच पाहिजे! तुम्हाला जर आयुष्याकडून अधिक काही हवं असेल, तर तुम्हाला आयुष्यात अधिक काही घालावं लागेल. विश्वास ठेवा म्हणजे तुम्ही ते मिळवू शकाल!

सर्जनशील बूट पॉलिशवाला

तुमच्यासमोर उभ्या ठाकतील अशा काही अडथळ्यांवर मात करण्यासाठी आणि यशस्वी होण्यासाठी तुम्हाला कल्पक मार्ग शोधून काढलेच पाहिजेत. तुम्हाला सर्जनशील असलंच पाहिजे. लेस ब्राऊन एका कार्यमग्न अधिकाऱ्याची कथा सांगतात, जो नेहमीच एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घाईघाईने जात असतो. एकदा तो एका बैठकीसाठी चाललेला असतो. ऑफिसमधून रस्त्यावर गेल्यावर एका बूटपॉलिश करणारा माणूस त्याला हटकून म्हणतो, ''भल्या माणसा, तुझे बूट धुळीने भरल्यासारखे दिसतायत. मी तुझ्या बुटांना पॉलिश करू का?'' तो अधिकारी म्हणाला, ''नाही, मला वेळ नाही.'' पुढे सहा चौकापैकी प्रत्येक चौकात त्याला बूटपॉलिशबद्दल विचारण्यात येतं आणि तो तेच उत्तर देतो. शेवटी सातव्या चौकात तो एका बूटपॉलिश ठेल्यावरून पुढे जात असताना एक माणूस मोजत असतो ''९७, ९८, ९९, १००....'' तो म्हणतो, ''माझ्या मित्रा, व्यत्यय आणल्याबद्दल मी तुमची क्षमा मागतो, कारण तुम्ही एक कार्यमग्न सद्गृहस्थांसारखे दिसता. पण आज माझा वाढदिवस आहे आणि मी स्वतःशी एक पक्कं ठरवलंय की माझ्या स्टँडवरून जाणाऱ्या शंभराव्या माणसाला मी विनामूल्य बूट पॉलिश करून देईन आणि तुम्ही ते सद्गृहस्थ आहात. कृपा करून तुमच्या बुटांना पॉलिश करण्याची संधी मला द्या आणि मी स्वतःला दिलेल्या वचनाचा मला मान राखू द्या.''

मग तो अधिकारी खाली बसतो आणि बूट पॉलिशवाला त्याचं काम सुरू करतो आणि खूप मेहनतीने करतो. तो कपडा मारून इतकं जोरात काम करतो की लवकरच त्याच्या भुवयांवरून घाम ओघळायला लागतो. त्या पॉलिशवाल्याने त्या कामात असलेल्या अधिकाऱ्याला फारच छान काम करून दिलं आणि खरंच ते बूट जणू नवीन असल्यासारखे दिसायला लागले. तो अधिकारी निघण्याच्या तयारीत त्याला म्हणाला, ''तुमची नेहमीची फी किती आहे?'' बूट पॉलिस करणारा म्हणाला, ''पाच डॉलर्स, साहेब.'' त्या ऑफिसरने त्याला दहा डॉलर्स देऊन म्हटलं, ''वाढदिवसाच्या शुभेच्छा!'' बूट पॉलिशवाला तिथे काही मिनिटांसाठी थांबला आणि मग म्हणाला, ''९७, ९८, ९९...''. मित्रांनो, या

गोष्टीवरून सरळच स्पष्ट होतं की बरेच वेळा आपल्याकडे जे काही असतं ते म्हणजे आपली अक्कलहुशारी, त्यामुळे आपण सर्जनशील असलं पाहिजे आणि हुशारीचा उपयोग केला पाहिजे. सर्जनशील बना!

आव्हानात्मक असण्याव्यतिरिक्त आयुष्याकडून आपल्याला कोणतीही खात्री नसते. आयुष्य कठीण असेल हे जणू काही अध्याहृतच असतं. तरीही मला विश्वास आहे की नकारात्मक दृष्टिकोनांपेक्षा सकारात्मक दृष्टिकोन ठेवून जर आपण दिवस घालवला तर तो अधिक सहज सोपा आणि अवीट आनंददायक होतो.

स्वप्नांचा पाठपुरावा करताना तुम्ही सर्जनशील असलं पाहिजे, तुम्ही यश मिळवू शकाल यावर तुमचा विश्वास असला पाहिजे, आणि 'हे शक्य आहे' असं तुम्हाला सातत्याने सांगणारी, ''होय, मी करू शकतो'', ''होय, मी करू शकतो'', ''होय मी करू शकतो'' असं तुम्हाला सतत म्हणायला लावणारी मनाची बैठकही असलीच पाहिजे. तुम्हाला 'मी करू शकतो' अशा दृष्टिकोनाची गरज आहे. एक 'होकारार्थी' दृष्टिकोन. असा दृष्टिकोन, ज्यामुळे फरक पडेल. चार्ल्स स्विन्डॉलने म्हटलंय, ''माझी अशी पक्की धारणा आहे की आयुष्य म्हणजे, माझ्याबरोबर काय घडतंय हे दहा टक्के आणि मी त्याच्यावर कशी प्रतिक्रिया देतो हे नव्वद टक्के.'' आणि तुमच्याबरोबरही ते तसंच आहे. आपल्या दृष्टिकोनांचा ताबा आपल्याकडे असतो! प्रत्येक दिवस एक महान दिवस करण्याचा निर्णय घ्या. मिळवण्याचा निर्णय घ्या... एक नवीन दृष्टिकोन!

प्रकरण ६

हातपाय हलवत राहिलंच पाहिजे – प्रयत्न न सोडता!

स्वप्नं जर यशाची बीजं असतील, तर यशाची गुरुकिल्ली कोणती? उत्तर आहे चिकाटी आणि अथक परिश्रम! तुम्ही तुमचं स्वप्न कधीच सोडून देऊ शकत नाही. तुम्ही तुमच्या स्वप्नांचा पाठपुरावा करत असताना तुमच्या मार्गात काही आव्हानं, काही अडथळे येतील, पण तरीही तुम्ही चिकाटीने काम करतच राहिलं पाहिजे. जीवनातले अडथळे पार करण्यासाठी तुम्हाला निर्मितीक्षम असलं पाहिजे, तसंच तुमच्या सगळ्या कौशल्यांचाही वापर केला पाहिजे. आयुष्यात कोणत्या संधी आहेत त्याचा शोध घेताना जर तशा काही संधी उपलब्ध नसतील तर त्या निर्माण केल्या पाहिजेत. लोकांनी आपल्या स्वप्नांवर फेकलेली लिंबं आणि बर्फ यांसारखे थंड प्रतिसाद घेऊन आपण त्यांचं लिंबांच्या सरबतात रूपांतर केलं पाहिजे! आपण स्वत:वर विश्वास ठेवलाच पाहिजे आणि चिकाटीने काम करण्यासाठी वचनबद्ध राहण्याची आणि कधीही माघार न घेण्याची बांधिलकी मानली पाहिजे! दुसऱ्या शब्दात – एकदा का आपला दृष्टिकोन 'मी करू शकतो' असा झाला, की नंतर मग आपण 'मी करू शकतो' हा कल बनवला पाहिजे. सातत्याने आणि चिकाटीने कृती करत राहण्यासाठी आपण वचनबद्ध असलं पाहिजे. *तुम्हाला फक्त हातपाय हलवत राहिलं पाहिजे!*

दोन बेडूक

कोणे एके काळी एका गावातल्या रस्त्यावरून दोन बेडूक चालले होते. एक मोठं वादळ सुटलं आणि ते गोंधळून गेले. वारा एवढ्या जोराने सुटला की ते एकमेकांपासून दुरावले आणि हरवून गेले. त्या सगळ्या गोंधळात पहिला बेडूक एका दुधाच्या बाटलीत पडला. त्याने रागावून

आजूबाजूला पाहिलं, आयुष्याला आणि त्याच्यावर आलेल्या वाईट प्रसंगाला शिव्या घातल्या. आलेल्या संकटाबद्दल आणि आयुष्य किती वाईट आहे याबद्दल तक्रार करत तो रडायला लागला. रडत आणि तक्रार करत त्याने त्याची ऊर्जा प्रश्नावर केंद्रित केली आणि लवकरच हार मानून तो मरण पावला. दुसरा बेडूकही एका दुधाच्या बाटलीत पडला, पण त्याची वृत्ती वेगळी होती, दृष्टिकोन वेगळा होता, सकारात्मक होता. तो दुधात पडलाय ही परिस्थिती त्याला आवडली नव्हती. आयुष्याने त्याच्यावर लादलेली अवघड वळणं त्याला आवडली नाहीत. पण त्याने प्रश्नाऐवजी त्याच्यावरचा उपाय शोधल्यावर त्याची ऊर्जा बळावली. तो उड्या मारत, लाथा झाडत राहिला. त्याला समजलं की तुमच्याबाबतीत काय घडलंय हे फारसं महत्त्वाचं नाही, पण तुम्ही त्याबद्दल काय करता हे महत्त्वाचं आहे! म्हणून मग त्याने लाथा झाडायला सुरुवात केली आणि झाडतच राहिला. घुसळून घुसळून त्याचं लोणी होईपर्यंत तो लाथा मारतच राहिला आणि शेवटी बाहेर पडला. मित्रांनो, आयुष्य नेहमीच रास्त खेळ खेळणार नाही. अशी वेळ येईल जेव्हा ते तुमच्यावर वाकडे चेंडू टोलवेल. तुम्ही नुसतंच आयुष्यावर रागावून, प्रश्नांवरच लक्ष केंद्रित करून ते तुमच्याबाबतीत कसं अन्याय्य आहे याचाच विचार करता की प्रश्नावर तोडगा काढण्यावर तुमचं लक्ष केंद्रित करता, यावर तुमचं अंतिम यश किंवा अपयश अवलंबून राहील. मी अगदी निःसंशयपणे शोधून काढलंय, की तुमच्याबाबतीत काय घडलंय हे नव्हे, तर तुमच्या बाबतीत जे घडलंय त्यावर तुम्ही काय कृती करता हीच यशाची गुरुकिल्ली आहे.

हातपाय हलवतच राहिलं पाहिजे
गीतकार विली जोली

तुम्हाला माहीत आहे प्रत्येकाच्या आयुष्यात थोडाफार पाऊस पडणार आहे
प्रत्येकाच्या घरात कधी तरी संकट येणार आहे
पण जेव्हा संकट तुमच्या जवळ येतं तेव्हा तुम्ही नुसतंच तिथे बसून राहून रडता

किंवा तुम्ही खंबीरपणे उभं राहून संकटाचा सामना करण्यासाठी
सज्ज होता

माझा आवाज लोक लक्षपूर्वक ऐकतात
आयुष्यातलं यश हे योगायोगाने नव्हे तर निवडीने मिळतं
पुढे जायचं, वादळातून मार्ग काढायचा याची निवड तुम्ही करता
किंवा मग तुम्ही प्रयत्न सोडून देण्याची आणि गोष्टी बिघडायला लागल्या
की खचून जाण्याची निवड करता

तुम्ही जिंकणार किंवा हरणार हे तुमच्यावरच अवलंबून आहे
तुम्हाला जर उच्चस्थानी पोहोचायचं असेल
तर तुमच्या हृदयात खोलवर कुठेतरी गाढ विश्वास असला पाहिजे
तुमचं सगळं काही द्या, तुमच्याकडे असलेली प्रत्येक गोष्ट
आणि कधीही, केव्हाही, केव्हाही, थांबू नका!

तुम्हाला हातपाय हलवत राहिलंच पाहिजे, पुढे सरकत राहिलंच पाहिजे
तुम्हाला कष्ट करत राहिलं पाहिजे, शर्थीने प्रयत्न केले पाहिजेत

वाऱ्याची दिशा तुम्ही ठरवू शकत नाही,
मला माहीत आहे
पण तुमची नौका कोणत्या दिशेने जाणार आहे, हे तुम्ही निश्चित करा
वारा जर उत्तरेकडून वाहत असेल
पण तुम्ही जर दक्षिणेकडे जायचं ठरवलं असेल
तर तुम्हाला प्रवाहाचा उपयोग केलाच पाहिजे,
जिथे तुम्हाला जायची इच्छा आहे तिथे जाण्यासाठी

आयुष्याची शर्यत जलद किंवा मजबूत लोकांसाठी नसते
तर जो सतत पुढे जातच राहतो त्याची असते
शर्यत कितीही धकाधकीची झाली तरी जो विजेत्याच्या चषकावर
हक्क सांगतो

तो असतो सतत हातपाय हलवणारा आणि प्रयत्न कधीही सोडून न देणारा!

यश ही कधीही माघार न घेण्याची गोष्ट आहे हे सत्य व्यक्त करणारी मी लिहिलेली ही पद्यरचना आहे. ती एक संख्याशास्त्रीय घटना आहे. तुम्हाला फक्त प्रयत्न करत राहायचंय, तुम्हाला अथक परिश्रम केलेच पाहिजेत. जगाकडे बघण्याची एक नवीन मानसिकता, एक नवीन दृष्टिकोन हे विकसित केल्यावर तुम्हाला काहीतरी अधिक करायचंय. तुमच्याकडे एक स्वप्न आहे, तुम्हाला उद्दिष्ट दिसतंय, तुमचा दृष्टिकोन नवीन आहे आणि तुमचं उद्दिष्ट साध्य करू शकाल असा तुम्हाला विश्वास आहे, पण तुम्ही तुमच्या उद्दिष्टपूर्तीच्या दिशेने वाटचाल करायला लागता आणि प्रश्न, आव्हानं दिसायला सुरुवात होते. तुमच्या तोंडावर दरवाजे बंद होतात, लोक तुमच्या कल्पनांना 'नाही' म्हणतात. रस्त्यात अडचणींचे डोंगर उभे राहतात. आता तुम्ही काय करणार? तुम्ही प्रयत्न सोडून देणार का? **नाही!**

पुढे जात राहण्यासाठी तुम्ही एक निर्णय घेतला पाहिजे. तुम्हाला जर तुमच्या उद्दिष्टांपर्यंत पोहोचायचंय, जर यश मिळवायचंय, तर तुम्हीही कधीही, केव्हाही माघार न घेण्याचा निर्णय घेतला पाहिजे; कष्ट करतच राहण्याचं तुम्ही ठरवलं पाहिजे, सकारात्मक मानसिक दृष्टिकोनाचा थेट प्रतिसाद म्हणजे प्रयत्न कधीही सोडून न देता चिकाटीने काम करत राहण्याची प्रक्रिया. सगळ्या यशाच्या कहाण्यांची किल्ली म्हणजे कृती करण्यासाठी उचलेलं पाऊल.

चिकाटी न सोडता परिश्रम करत राहण्याबद्दल माझ्या आवडत्या गोष्टींपैकी एक म्हणजे डब्ल्यू. मिशेलची कहाणी. आमच्या वेळच्या महान वक्त्यांकडून, तसंच झिग झिग्लर आणि अँथनी रॉबिन्सच्या ध्वनिफितीतून मी जेव्हा माझा स्वयंविकासाचा शोध सुरू केला, तेव्हा डब्ल्यू. मिशेल हे नाव मी सातत्याने ऐकत होतो. त्यांच्या आयुष्यातली परिस्थिती आणि अडथळे हादरवून टाकणारे असूनदेखील ज्या माणसाने माघार घ्यायचं नाकारलं त्याच्या चिकाटीच्या प्रयत्नांची आणि निश्चयाची प्रेरणादायी कथा ऐकून मी चक्रावून गेलो.

काही वर्षांपूर्वी मी मिशेलला भेटलो. आम्ही जणू काही कित्येक वर्षांपासून एकमेकांना ओळखत आहोत इतके ते प्रेमळ आणि स्नेहपूर्ण होते. तेव्हापासून आम्ही दोघंही चांगले मित्र झालो. फक्त तेच सांगू शकतील, अशी त्यांची कथा सांगताना मी त्यांना ऐकलं आहे. आयुष्यात तुमच्या बाबतीत काय घडतं याला महत्त्व नाही, तर तुम्ही त्याबद्दल काय करता, हे महत्त्वाचं असल्याची आठवण ती गोष्ट मला सातत्याने करून देते.

डब्ल्यू. मिशेल, अमर माणूस

आयुष्यातील अडथळे पार करण्याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे डब्ल्यू. मिशेल. 'अमर' म्हणून त्यांना आदराने संबोधण्यात येतं. वीस वर्षांपूर्वी सॅनफ्रॅन्सिस्कोमध्ये, विद्यार्थी दशेत असताना मिशेल अर्धवेळ केबल ऑपरेटर म्हणून काम करत होते. शाळा आणि काम यांच्या मधल्या वेळात, करमणुकीसाठी म्हणून ते त्यांची नवीन हार्ले-डेव्हिडसन मोटरसायकल चालवायला वेळ काढायचे. त्यांच्या मोटरसायकलवरून बाहेर जाऊन उल्हसित करणारा वारा तोंडावर घेता येईल, अशा वेळेसाठी ते जगायचे. एकदा असंच मोटरसायकल चालवत असताना ते एक चौक ओलांडत होते आणि अचानक त्यांना एक ट्रक लाल दिवे दाखवताना दिसला. तो ट्रक मिशेलवर येऊन आदळला, ते जमिनीवर फेकले गेले आणि ते तिथे वेदनेने तळमळत असताना त्यांना इंधनाचा वास आला आणि त्यांना उमगलं की त्यांचं अंग त्या इंधनाने माखलेलं आहे. अचानक स्फोट झाला, मोटरसायकलला ज्वाळांनी वेढून टाकलं आणि हातपाय पसरवत लगेचच मिशेललाही ज्वाळांनी लपेटून टाकलं. ते जणू काही एक मानवी पलिता झाले आणि नखशिखांत भाजून निघाले. आधीच्या रूपाशी काहीही साधर्म्य राहिलं नाही, त्यांनी हातापायांची बोटंही गमावली. त्रासदायक शस्त्रक्रिया आणि पुनर्वसनाच्या उपचारांत त्यांना कित्येक महिने घालवावे लागले, पण त्यांनी जिद्द सोडली नाही. त्यांनी शिक्षण पूर्ण केलं आणि व्यवसाय सुरू करून लवकरच चांगलं यश मिळवलं. स्वतःसाठी एक विमान खरेदी करण्याएवढे ते यशस्वी झाले. ते विमान म्हणजे त्यांची अत्यंत आवडीची वस्तू झाली आणि त्यांचा सगळा फावला वेळ ते विमान उडवण्यात घालवू लागले. एका संध्याकाळी, विमान उडवत असताना, त्यांच्या विमानाच्या

इंजिनात बिघाड झाला. त्यांनी विमान उतरवण्याचा प्रयत्न केला, पण ताबा सुटून विमान आदळलं. कित्येक महिने कोमात काढल्यावर जेव्हा ते शुद्धीवर आले, तेव्हा त्यांना आढळून आलं की ते कमरेपासून खाली विकलांग झाले होते! ते उठून बसले आणि स्वतःकडे बघितल्यावर त्यांना चाकाच्या खुर्चीशी जखडला गेलेला, जळालेला आणि आता लुळापांगळा झालेला माणूस दिसला. इतरांना असं वाटत होतं की ते हार मानतील, पण मिशेलनी तसं केलं नाही. ते म्हणाले, ''मी करू शकेन अशा दहा हजार गोष्टी होत्या. आता नऊ हजार असतील.'' त्यांची कथा त्यांनी इतरांनाही सांगितली आणि ते जगातल्या सर्वोत्तम प्रेरणादायी वक्त्यांपैकी एक झाले. कोलोराडो, कॅलिफोर्निया आणि हवाई इथे त्यांची स्वतःची घरं आहेत. ते आयुष्य खरोखरच भरभरून जगतात. ते ज्याबद्दल बोलतात तसं आयुष्य ते स्वतः जगतात. तुमच्या बाबतीत काय घडतं ते महत्त्वाचं नाही, तुम्ही त्याबद्दल काय करता ते लक्षात घेतलं पाहिजे.

कधीही हार मानू नका!

मर्फीच्या नियमाप्रमाणे जेव्हा आयुष्य तुमच्याकडे वळलेला चेंडू फेकतं, तेव्हा तुम्ही काय करता असं बऱ्याच लोकांनी मला विचारलं. मर्फीचा नियम? तुम्हाला माहीत आहे, 'जे चुकणार असतं, ते चुकणारच. अगदी शक्य तेवढ्या चुकीच्या वेळेला.' मी एकदा कोणालतरी असं म्हणताना ऐकलं की आयुष्यात तुम्हाला एकतर प्रश्न पडलेला तरी असतो, तुकडाच सोडून दिलेला असतो किंवा तुम्ही प्रश्नाच्या दिशेने मार्ग आक्रमत असता. मग मर्फीप्रमाणेच, तुमच्या यशाची किल्ली आहे – हार मानायची नाही, फक्त प्रयत्न सोडून द्यायचे नाहीत. 'सोडून देऊ नका' या एका अतिशय प्रसिद्ध कवितेचा हा एक भाग आहे. लेखक अनामिक, पण त्याचा संदेश खूप स्पष्ट आहे.

जेव्हा गोष्टी चुकतात जशा त्या काही वेळा चुकतात,
जेव्हा तुम्ही आक्रमत असलेला रस्ता सगळा उंच
चढावरचा भासतो,

जेव्हा साठवलेले पैसे कमी असतात आणि कर्जं मोठी असतात,
जेव्हा तुम्हाला हसायचं असतं पण निश्वास सोडावा लागतो,
जेव्हा काळजीचं ओझं असतं तेव्हा तुम्ही थोडे खाली वाकता,
विश्रांती घ्यायचीच असेल तर घ्या पण चालणं सोडून देऊ नका,
आयुष्य त्याच्या झटक्यांनिशी आणि वळणांसह विचित्र आहे,
असं आपल्यापैकी प्रत्येक जण कधीतरी शिकतो,
आणि पुष्कळशा अपयशांनंतर,
तुम्ही कदाचित जिंकला असतात, जर तुम्ही ठाम राहिला असतात तर,
प्रयत्न सोडून देऊन देऊ नका, वेग जरी मंद वाटला तरी,
कदाचित आणखी एका प्रयत्नानंतर तुम्ही यशस्वी व्हाल
मित्रांनो, काहीही झालं तरी प्रयत्न सोडून देऊ नका,
तुम्ही कधीही माघार घेणार नाही अशी तुमच्या मनाची तयारी करा.

सोडून देऊ नका!

गोष्टी घडतात! तो जीवनाचा एक भाग आहे. या पृथ्वीतलावर जितका काळ राहण्याचं भाग्य प्राप्त झालंय त्याची किंमत, आयुष्य आपल्यासमोर वाढून ठेवत असलेल्या आव्हानांना आणि अडथळ्यांना सातत्याने तोंड देऊन आपल्याला चुकती करावी लागते. पण आपण लवकर चिकाटी सोडली नाही, तर आपण जिंकू शकतो. कधीही हार मानू नका! हा 'सोडून देऊ नका' चा भाग दोन आहे.

बरेचदा उद्दिष्ट जवळच असतं,
एका विफल आणि अडखळणाऱ्या माणसाला भासतं त्यापेक्षा
बरेचदा धडपड करणाऱ्याने हार मानलेली असते,
जेव्हा त्याने कदाचित विजेत्याचा चषक मिळवला असता.
आणि रात्र सरून गेल्यावर तो हे खूप उशिरा शिकलेला असतो
तो सोनेरी मुकुटाच्या किती जवळ होता.
यश म्हणजे उलटं फिरवलेलं अपयश,

संशयाच्या ढगांची रुपेरी किनार आणि
तुम्ही किती जवळ होता हे तुम्ही कधीच सांगू शकणार नाही
ते जेव्हा दूर दिसतं तेव्हा ते जवळ असू शकतं
तेव्हा तुम्हाला जेव्हा खूप जोरात फटका बसतो तेव्हाही
लढाई चालूच ठेवा
ज्या वेळेला गोष्टी फार वाईट भासतात त्या वेळेसही तुम्ही
प्रयत्न सोडू नका

एक जुनी म्हण सांगते, 'विजेते कधीही माघार घेत नाहीत आणि माघार घेणारे कधी विजयी होत नाहीत!' मोठं व्हायचं असेल तर तुम्ही चिकाटीने प्रयत्न केलेच पाहिजेत. कधीही, केव्हाही तुमची स्वप्नं सोडून देऊ नका. कारण पराभव झाला म्हणजे ती व्यक्ती संपली असं नव्हे. एखादा माणूस प्रयत्न सोडून देतो तेव्हाच खरं म्हणजे संपतो! लक्षात ठेवा, तुम्ही जर ते स्वप्न पाहू शकलात, तर तुम्ही ते करू शकता. तुमचा दिवस उत्तम जावो!

मला असं आढळून आलंय की, महानतेची खरी व्याख्या अशी आहे की जे लोक माघार घ्यायला नकार देतात आणि चिकाटीने प्रयत्न करत राहतात, असे सर्वसाधारण लोक असामान्य गोष्टी करतात. प्रत्येक प्रतिकूल परिस्थिती आणि मर्यादा, ज्या सर्वसाधारणपणे लोकांना त्यांच्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्यासाठी नाउमेद करतात, त्यांची चिकाटीच्या प्रयत्नांमुळे भरपाई होते. तुमची स्वप्नं सत्यात उतरवण्यासाठी चिकाटी ही एक जमेची बाजू आणि कृतीत असलेलं पाऊल आहे. कधीही माघार न घेण्याची कृती म्हणजे चिकाटी आणि निश्चय म्हणजे एक दृष्टिकोन!

चिकाटी

तुम्ही चिकाटीने प्रयत्न करणं हे तुमची स्वप्नं सत्यात आणण्यासाठी नितांत गरजेचं आहे. विजेता होण्यासाठी लागणाऱ्या गुणांपैकी सर्वांत

महत्त्वाचा गुण म्हणजे चिकाटी. तुम्ही कधीही माघार घेणार नाही असा तुमच्या मनाचा निश्चय करून सतत प्रयत्न करत, प्रयत्न करत, प्रयत्न करतच राहिलं पाहिजे. प्रयत्न कधीही सोडायचा नाही! चिकाटीमुळे अडथळ्यांचा पाडाव होतो. आयुष्य तर म्हणणारच आहे, 'नाही!', लोक म्हणणारच आहेत, 'नाही!'. पण तुम्ही जर प्रयत्न करत राहिलात, तर आयुष्याला शेवटी म्हणावंच लागेल, 'होय!'. हा एक कायदा आहे. जे काही तुम्ही वर फेकाल, ते खाली आलंच पाहिजे. या गुरुत्वाकर्षणाच्या नियमाप्रमाणे, सरासरीचा नियम असं सांगतो की जर तुम्ही दीर्घ काळपर्यंत मागत राहिलात, तर तुम्हाला 'होय' हे उत्तर मिळेल. ते घडणार आहे! पूर्वीचे अध्यक्ष काल्विन कुलिज यांच्या एका उद्‌धृत वचनाप्रमाणे, 'चिकाटी आणि विश्वास हेच फक्त सर्वशक्तिमान आहेत. मुसंडी मारत राहा, कारण चिकाटीची जागा कोणीच भरून काढू शकत नाही; गुणही नाही, कारण खूप गुणी पण अयशस्वी लोक जगात आहेत. असामान्य प्रतिभाही नाही, कारण फळाला न आलेली असामान्य प्रतिभा काहीच उपयोगाची नसते. फक्त शिक्षणामुळे नाही, कारण हे जग सुशिक्षित, उपेक्षित लोकांनी भरलेलं आहे. माझ्या परिसंवादात मी म्हणतो तसं – ''तुम्हाला ठोठावत, ठोठावत, ठोठावत, ठोठावत आणि ठोठावतच राहावं लागेल, जोपर्यंत तुम्ही ते ठोठावून उघडत नाही, किंवा तोडून खाली पाडत नाही!'' खडक आणि पाण्याचा प्रवाह हे जर समोरासमोर आले तर प्रवाहच नेहमी जिंकेल. निव्वळ शक्तीच्या जोरावर नव्हे, तर सातत्याने केलेल्या चिकाटीच्या अथक प्रयत्नांमुळे!

अपयशाची भीती

स्वप्नांचा पाठपुरावा करण्यापासून लोकांना परावृत्त करणारी मोठी अडचण म्हणजे अपयशाची भीती. अपयश हा यशाचाच एक भाग आहे, हे समजून न घेतल्याने लोक अपयशाला घाबरत असतात. प्रत्येक यशस्वी माणसाला कधी ना कधी तरी अपयश आलेलं असतं. पण ते अपयशाचा उपयोग करतात, अपयशातून शिकतात. **अपयशाला ते त्यांना संपवणारा नव्हे,** तर गुरू बनवतात. थॉमस एडिसन त्यांच्या विजेचा बल्ब शोधून

काढण्याच्या प्रयत्नात १०,००० वेळा अपयशी झाले, पण त्यांनी हार मानली नाही. ते म्हणाले, ''मी अपयशी झालो नाही, मी फक्त विजेचा दिवा कसा बनवता येणार नाही, याचा आणखी एक मार्ग शोधला.''

विल्यम शेक्सपिअरने म्हटलंय, 'आपले संशय फितूर असतात, आपण जिंकून काहीतरी चांगलं मिळवू म्हणून आपल्याला प्रयत्न करण्याचीच भीती घालतात.' हरण्याला घाबरू नका. खरं म्हणजे अपयशाची अपेक्षा करा. कारण जर तुम्ही अपयशी झालात आणि त्यातून शिकलात, तर तुम्ही उद्दिष्टाच्या निश्चितच अधिक निकट असाल. एका माणसाची कथा आहे की जो वयाच्या एकविसाव्या वर्षी व्यवसायात अपयशी झाला, बाविसाव्या वर्षी निवडणुकीच्या स्पर्धेत हरला, चोविसाव्या वर्षी पुन्हा एकदा व्यवसायात अपयशी ठरला. तो सव्वीस वर्षांचा होता तेव्हा त्याची प्रेयसी मृत्यू पावली. सत्ताविसाव्या वर्षी त्याला प्रचंड नैराश्य भरलं, चौतिसाव्या वर्षी तो अमेरिकेच्या संसदेची निवडणूक हरला. छत्तीसाव्या वर्षी पुन्हा एकदा हरला. पंचेचाळिसाव्या वर्षी तो संसद सदस्याच्या स्पर्धेत अयशस्वी झाला. सत्तेचाळिसाव्या वर्षी तो उपाध्यक्ष होण्याच्या प्रयत्नात अयशस्वी झाला. एकोणपन्नासाव्या वर्षी तो सिनेटर होण्याच्या स्पर्धेत हरला आणि वयाच्या बावन्नाव्या वर्षी तो युनायटेड स्टेट्सचा अध्यक्ष म्हणून निवडून आला! त्याचं नाव होतं अब्राहम लिंकन! मित्रांनो, तुम्ही कधीही प्रयत्न सोडून देऊ शकत नाही! अपयशाला तुमच्या वरचढ होऊ देऊ नका. तो यशाचाच एक भाग आहे. तुमच्या अपयशातून शिका, अपयशाला तुमचा गुरू बनवा, तुम्हाला संपवणारा नव्हे! लक्षात ठेवा, लोक जेव्हा अयशस्वी होतात तेव्हा ते संपत नाहीत. ते जेव्हा प्रयत्नच सोडून देतात, तेव्हा ते संपतात!

शर्यतीची मागणी = चिकाटी

चिकाटीबद्दलची माझी एक आवडती गोष्ट ल्यूकच्या पुस्तकातल्या अकराव्या खंडातली आहे, ज्यामध्ये येशू ही नीतिकथा सांगतात – ''समजा तुम्ही मध्यरात्री तुमच्या एखाद्या मित्राच्या घरी पावाचे तीन तुकडे मागण्यासाठी गेलात, तर तुम्ही त्याला ओरडून सांगाल, ''माझ्याकडे

माझा एक मित्र आत्ताच भेटायला आलाय आणि माझ्या घरी अन्न नाही. तू मला एक मोठ्ठा पाव उधार देशील का?'' तो त्याच्या शयनगृहाच्या खिडकीतून आवाज देऊन सांगेल, ''कृपा करून मला उठायला सांगू नकोस. मी रात्रभरासाठी दरवाजा बंद केला आहे आणि आम्ही सगळे बिछान्यात आहोत. या वेळेला मी तुला मदत करू शकत नाही.'' जर तुम्ही बराच वेळ दार ठोठावत राहिलात, तर तो उठेल आणि तुम्हाला जे काही पाहिजे असेल ते सगळं देईल. एक मित्र म्हणून जरी तो उठला नाही तरी केवळ तुमच्या सातत्याने केलेल्या मागणीमुळे आणि चिकाटीमुळे!''

यशाच्या शोधात, तुमची उद्दिष्टं साध्य करण्याची चिकाटी ही निश्चितच एक गुरुकिल्ली आहे. कारण सगळ्या गुणांमध्ये शेवटी फरक पडतो तो चिकाटीमुळे. कल्पना करा की तुम्ही आदल्या रात्री बाहेर होतात. तुम्ही इतके कार्यमग्न होतात की त्यामुळे तुम्हाला जेवायला वेळच मिळाला नाही. मग घरी आल्यावर तुम्ही एवढे दमलेले होतात की तुम्ही न जेवताच सरळ बिछान्यात पडून झोपून गेलात. दुसऱ्या दिवशी तुम्ही भुकेच्या तीव्र जाणीवेने उठता. तुमचं पोट गुरगुरतंय आणि त्यातून सगळ्या प्रकारचे आवाज येत आहेत. तुम्ही खरंच उपाशी आहात. तुम्ही स्वयंपाकघरात जाऊन रेफ्रिजरेटर उघडता आणि तो पूर्ण रिकामा असतो. अगदी काहीही नसतं त्याच्यात. मग तुम्ही कपाटाकडे जाऊन ते उघडता आणि ते ही पूर्णपणे रिकामं असतं, एखादं बिस्किटदेखील नसतं त्याच्यात! तुमचं पोट गुरगुरतंय, तुम्ही उपाशी आहात आणि तुमच्याकडे अन्न नाही. तुम्हाला खायला काहीतरी मिळवलंच पाहिजे, तुम्ही काय करणार आहात? तुम्ही दुकानात जाणार आहात? सेव्हन-इलेव्हनमध्ये? मॅकडोनल्डमध्ये? मित्राच्या घरी? काय करणार आहात तुम्ही?

तुम्ही किराणा दुकानात जाता, पण तिथे दरवाज्यावर एक सूचना लिहिलेली आहे, 'उष्णता निर्माण करण्याच्या यंत्रणेत बिघाड झाल्याने दुकान तात्पुरते बंद राहील'. तुम्ही रस्त्यावर उतरून फास्ट फूड स्टोअरकडे घाईघाईने जाता आणि तिथे पोहोचल्यावर तुम्हाला आढळतं की दुकानाच्या दरवाजाला कुलूप आहे. सूचनेत लिहिलेलं असतं की, 'कर्मचारीवर्ग संपावर आहे आणि पर्यायी नोकर मिळणं शक्य होणार

नाही.' तुम्ही घाईघाईने दुसऱ्या एका फास्टफूड सेंटरकडे धावता. त्याचा पाण्याचा पाईप फुटल्याने तेही बंद असतं! तुम्ही उपाशी आहात, आता तुम्ही काय करणार? तुम्ही एखाद्या मित्राच्या घरी जाणार आहात? उपाहारगृहात किंवा मग दुसऱ्या किराणा दुकानात? तुम्ही काय करणार आहात? काय करणार आहात तुम्ही?

मित्रांनो, मी तुम्हाला खरंच सांगून टाकतो. एका व्यक्तीने, अगदी एकाही व्यक्तीने असं म्हटलं नाही की 'मी प्रयत्न सोडून देईन' तुम्ही त्याचा विचारदेखील केला नाही. का? कारण जेव्हा तुम्ही भुकेलेले असाल, अन्नाची तुम्हाला फारच गरज असेल तर, जोपर्यंत तुम्हाला अन्न मिळत नाही तोपर्यंत तुम्ही प्रयत्न करतच राहणार.

तुमच्या यशाबद्दलदेखील हेच सत्य आहे. तुम्ही तुमच्या स्वप्नांच्या मागे जात राहिलं पाहिजे. तुम्हाला अथक प्रयत्न करावे लागतील. तुम्हाला कधीही हार मानून चालणार नाही. तुम्हाला कठोर परिश्रम करावे लागतील. मग तुमच्या तोंडावर कितीही दरवाजे बंद का होईनात. तुमच्या मार्गात संकटांचे कितीही डोंगर आणि अडचणी आल्या, तरी तुम्ही हार न मानण्याचा दृष्टिकोन विकसित केला पाहिजे. कधीही हार मानू नका, कधीही प्रयत्न सोडू नका, चिकाटी ठेवा!

तुम्ही जर एखाद्या मुंगीकडे बारकाईने पाहिलं, तर कधीही हार न मानणारा असा तो एक अविश्वसनीय प्राणी आहे. एखादी मुंगी जात असताना तुम्ही जर तिच्या मार्गात एखादं पान, काठी किंवा वीट नाहीतर आणखी काहीतरी टाकलं, तरी ती त्याच्यावर चढेल किंवा त्याच्या खाली जाईल, भोवताली फिरेल आणि तिच्या उद्दिष्टापर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक ते सर्व काही करेल. ती कधीही थांबत नाही. ती कधीही हार मानत नाही. ती प्रयत्न करत राहते, सरकत राहते, तिच्या उद्दिष्टामागे जात राहते. जेव्हा ती मरण पावते तेव्हाच फक्त ती तिचं प्रयत्न करणं थांबवते. एक मुंगी तिचा प्रयत्न थांबवत नाही एवढंच नव्हे, तर ती हिवाळ्याचीदेखील नेहमीच तयारी करत असते. ती सतत उद्याचा विचार करत असते. पण टोळ मात्र फक्त आजचाच विचार करतो. टोळ सगळ्या उन्हाळ्यात फक्त उन्हाळ्याचाच विचार करतो, तर मुंगी सगळ्या उन्हाळ्यात हिवाळ्यादेखील विचार करते. जेव्हा हिवाळा येतो, तेव्हा

मुंगी थोड्याफार आरामात जगू शकते, पण टोळाला मात्र त्रास होतो. तात्पर्य असं आहे की मुंगी जबाबदारीने कठीण काळाची तयारी करते कारण कधी ना कधी तो येणारच असतो.

आपण सर्वांनी मुंगीपासून हा धडा घेतला पाहिजे. प्रत्येक दिवशी आपण जबाबदारीने काम केलं पाहिजे. आपल्यापुढे उद्दिष्टं ठरवून, त्यांच्याशी बांधिलकी निश्चित करून त्यांचा पाठपुरावा केला पाहिजे. आपण दुसऱ्या दिवसासाठी नियोजन केलं पाहिजे आणि मग आपल्या वाटेत कितीही अडथळे आले तरी आपण आपले प्रयत्न कधीही सोडून देता कामा नयेत. आपल्यापुढे कितीही प्रश्न निर्माण झाले किंवा आपण स्वतःला कोणत्याही परिस्थितीत सापडलेले दिसलो, तरी आपण कधीही माघार घ्यायची नाही. आपल्या स्वप्नांचा पाठपुरावा करणं आणि उद्दिष्टं गाठण्यासाठी कठोर परिश्रम करणं हे चालूच ठेवलं पाहिजे. उन्हाळा चालू असतानाच आपण हिवाळ्याच्या गरजांचा विचार केला पाहिजे आणि भविष्याची तरतूद नेहमी आधीच करून ठेवली पाहिजे. आपण उद्याचं नियोजन आणि तयारी करून घेतली पाहिजे. संकटकाळासाठी आपण थोडी तयारी करून ठेवली पाहिजे. कारण जसा सूर्यप्रकाश असतो, तसा पाऊसही पडतो आणि ज्याप्रमाणे उन्हाळा असतो, तसाच हिवाळाही असेल. खूप काम करा, कठीण काळासाठी तयार राहा आणि सर्वांत महत्त्वाचं... **प्रयत्न कधीही सोडू नका!**

प्रकरण ७

प्रेमाचा त्याच्याशी काय संबंध? सगळाच!

टिना टर्नरने प्रश्न विचारला, "प्रेमाचा त्याच्याशी काय संबंध?" पण तिने उत्तर दिलं नाही. बरेच लोक असंही विचारतील, "तुमचं आयुष्य बदलण्यामध्ये प्रेमाचा काय संबंध आहे? यश मिळवण्याशी प्रेमाचा काय संबंध?"

उत्तर आहे, "सगळं काही! प्रेमाचा संबंध त्या सगळ्याशी आहे, कारण प्रेम ही या पृथ्वीतलावरची सर्वांत शक्तिशाली भावना आहे. बरं करणं, बांधणं आणि पूर्ववत करणं, नूतनीकरण करणं आणि आमूलाग्र बदल घडवणं, नूतनीकरण करणं आणि परिवर्तन घडवणं, हे सगळं करण्याची क्षमता प्रेमात आहे. प्रेम सगळ्या गोष्टींची आशा करतं, सगळं ऐकतं, सगळ्यावर विश्वास ठेवतं आणि सगळं सहन करतं, प्रेम सगळ्यावर विजय मिळवतं... आणि कधीही अपयशी होत नाही.'

मागरिट वॉकरने लिहिलंय, की प्रेम तुमचं हृदय विशाल बनवतं आणि तुम्हाला आतून मोठं करतं. ड्युक एलिंग्टनने म्हटलं की प्रेम फक्त मी तुमच्या बरोबर आहे असं म्हणत नाही तर मी तुमच्यासाठी आहे असं म्हणतं. मार्टिन ल्यूथर किंग, ज्युनिअर यांनी म्हटलं आहे, "भयाच्या रोगाला तिरस्कार आणि कडवटपणा कधीही बरं करू शकत नाहीत. फक्त प्रेमच ते बरं करू शकतं. तिरस्कारामुळे आयुष्याला विकलांगता येते. प्रेमामुळे ते मुक्त होतं. तिरस्कारामुळे आयुष्यात गोंधळल्यासारखं होतं. प्रेमाने त्याच्यात सुसंवाद येतो. तिरस्कारामुळे आयुष्य काळवंडून जातं. प्रेमाने ते उजळून निघतं. मी प्रेमाबरोबर राहायचं ठरवलंय, कारण तिरस्कार हे फार मोठं ओझं आहे!" कारण तुम्ही बघता, प्रेम हे, तुमचं

आयुष्य बदलवणाऱ्या इतर गोष्टींप्रमाणे एक निर्णय आहे. प्रेम म्हणजे पर्याय निर्माण करणारी एक निवड आहे. तिरस्कारदेखील एक निवड आहे, पण पर्याय घालवणारी.

द ग्रेटेस्ट सीक्रेट इन द वर्ल्ड या पुस्तकात ओज मॅन्डिनोने विधान केलंय की दीर्घ काळ टिकणारं यश पाहिजे असेल तर आवश्यक घटक म्हणजे प्रत्येक दिवसाची सुरुवात करताना तुमच्या हृदयात प्रेम असू द्या, हाडांना उबदार बनवणाऱ्या सूर्यप्रकाशावर प्रेम करा आणि आत्मा स्वच्छ करणाऱ्या उजेडावर प्रेम करा. इतरांवर, अगदी आपल्या शत्रूवरदेखील प्रेम करा. एवढं प्रेम करा की त्यांना प्रतिसाद म्हणून प्रेमच करावं लागेल, दुसरा पर्यायच राहणार नाही. कारण प्रेम भिंती तोडून पूल बांधू शकतं. तुम्हाला जे कोणी भेटतील त्यांचं स्वागत प्रेमाने करा, त्यांना प्रेमाने वागवा आणि त्यांच्यावर त्याचा काय परिणाम होतो हे समजून घ्या. तरीही, अधिक महत्त्वाचं म्हणजे ते तुमच्यात कसा आमूलाग्र बदल घडवून आणतं, ते समजावून घ्या! तुम्ही वेळेवर नियंत्रण ठेवू शकत नाही, तुम्ही हवामानावर ताबा ठेवू शकत नाही... जी फक्त एकच गोष्ट तुम्ही नियंत्रणात ठेवू शकता, ती म्हणजे तुम्ही स्वतः. कोणत्याही व्यक्तीशिवाय किंवा गोष्टींव्यतिरिक्त प्रेम करण्याचा निर्णय घेऊ शकता. लक्षात ठेवा, प्रेम कधीच अयशस्वी होत नाही!

प्रेम : पर्वत हलवणं

ते करता येत नाही असं लोक म्हणतात. ते म्हणतात की हे अशक्य आहे, पण ते करता येतं आणि प्रेम कधीच अयशस्वी होत नाही हे समजून घेऊन त्यावर विश्वास ठेवला, तो महात्मा गांधी आणि मार्टिन ल्यूथर किंग, ज्युनिअर यांनी. प्रेमाच्या अतुलनीय शक्तीचा वापर मोहनदास गांधींनी पर्वत हलवायला आणि इतिहासाचं पुनर्लेखन करायला केला. ज्यांना सामान्यतः महात्मा म्हणून ओळखण्यात येत होतं, ज्याचा अर्थ आहे 'महान आत्मा'. ब्रिटिश सत्तेपासून भारताला मुक्त करण्यासाठी त्यांनी त्यांच्या महान आत्म्याच्या शक्तीचा वापर केला. प्रेमाच्या अतुलनीय शक्तीला ब्रिटिशांच्या बंदुका आणि इतर हिंसक डावपेच हरवू शकत

नाही, हे त्यांनी भारतीय लोकांना शिकवलं. इतर लोकांनी जे अशक्य आहे म्हटलं होतं, ते साध्य करण्यासाठी सगळ्या अडचणींना तोंड देऊन, अहिंसक, प्रेमावर लक्ष केंद्रित करणाऱ्या पद्धतीने एक चळवळ सुरू करायला त्यांनी भारतीयांना प्रवृत्त केलं. शस्त्रसज्ज आणि अधिक ताकदवान ब्रिटिशांच्या विरोधातली स्वातंत्र्याची लढाई जिंकण्यासाठी त्यांनी निःशस्त्र लोकांच्या गटांचं नेतृत्व केलं. १९४७ मध्ये भारताने ब्रिटनपासून पूर्ण स्वातंत्र्य मिळवलं.

मार्टिन ल्यूथर किंग, ज्युनिअर या एका तरुण मंत्र्याने त्यानंतर काही वर्षांनी तीच तंत्रं वापरली. गांधीजींच्या आश्चर्यकारक आत्मशक्तीचा वापर करून आणि त्यांचं तत्त्वज्ञान घेऊन त्यांनी ती अमेरिकेसाठी नव्याने उपयोगात आणली. आगीशी आगीने लढाई करणे हाच फक्त एक मार्ग असतो आणि ते तत्त्वज्ञान इथे चालणार नाही, असं बऱ्याच जणांनी त्यांना सांगितलं, पण प्रेम कधीही अयशस्वी होत नाही हा आग्रह त्यांनी कायम ठेवला. त्यांचं बरोबर होतं हे काळाबरोबरच सिद्ध झालं. पृथ्वीतलावरची सर्वांत शक्तिशाली ताकद कोणती असेल तर प्रेम, हे त्यांनी त्यांच्या अहिंसक मोहिमेच्या माध्यमातून लोकांना समजावून दिलं. प्रेमाच्या अतुलनीय शक्तीने जे सबल झालेले आहेत, अशा लोकांना जगातल्या सगळ्या बंदुका, कुत्री आणि आग ओकणारी शस्त्रं पराभूत करू शकत नाहीत. प्रेमाच्या निखळ शक्तीशी, कशाचीही अगदी कशाचीही तुलना होऊ शकत नाही हे गांधीजी आणि मार्टिन ल्यूथर किंग यांनी सिद्ध करून दाखवलं. प्रेम कधीही अयशस्वी होत नाही! प्रेम करून बघा!

प्रेम करून बघा!
विली जोली आणि गेराल्ड पॅटर्सन

तुम्ही प्रत्येक गोष्ट वापरलीय आणि प्रत्येक गोष्ट अयशस्वी ठरलीय
त्या शब्दांत आहे एक संदेश, जो मी सांगतोय
तुम्हाला त्या बंदुकांची किंवा युद्धांची गरज नाही
एक उपाय असा आहे जो घडवेल, विनाश करणार नाही

प्रेमाचा उपयोग करा! प्रेम हे त्या सगळ्यावरचं उत्तर आहे
प्रेमाचा उपयोग करा! प्रेम हे त्या सगळ्यावरचं उत्तर आहे
या जुन्या जगात तुम्ही सगळीकडे गेलात
खरं म्हणजे पर्वादेखील करत नाहीत अशा
लोकांवर तुमची श्रद्धा ठेवलीत
प्रयत्न सोडू नका आणि हार मानू नका
येशूवर तुमची श्रद्धा ठेवा आणि तुमचं दुभंगलेलं हृदय तो सांधून देईल

प्रेमाचा उपयोग करा! प्रेम हे त्या सगळ्यावरचं उत्तर आहे
प्रेमाचा उपयोग करा! प्रेम हे त्या सगळ्यावरचं उत्तर आहे

प्रभावीपणे प्रेम करण्यासाठी तुम्ही प्रथम स्वत:वर प्रेम करायला शिका. कशाच्याही आधी, स्वत:वर प्रेम करण्याची बांधिलकी असणं अतिशय आवश्यक आहे. कारण जर तुम्ही स्वत:वर प्रेम केलं नाहीत तर तुम्ही स्वत:चा चुकीचा उपयोग करायला आणि स्वत:वर अन्याय करायला सुरुवात कराल. दूरगामी यश मिळवायचं असेल तर स्वत:चा अभिमान असणं हा एक अत्यावश्यक घटक आहे, हे अभ्यासपूर्ण अहवालांनी सिद्ध केलंय. जर तुम्ही स्वत:वर प्रेम करत नसाल, तर मग दुसरं कोणीतरी तुमचा गैरफायदा घ्यायला वेळ लागणार नाही. जे तुम्ही स्वत:च कराल. नाहीतर मग तुमची ज्या प्रकारच्या गौरवास्पद स्थानाची पात्रता आहे, तसा मान तुम्हाला न देणाऱ्या आणि तुमची अवहेलना करणाऱ्या लोकांना तुम्ही सातत्याने शोधत राहाल. तुम्ही स्वत:ची किंमत कमी करून घ्याल, स्वत:ला क्षुद्र लेखाल आणि खरोखर तसेच व्हाल. स्वत:च्याच बोलण्याने पाणी ओताल. बाकी सगळ्या गोष्टींपूर्वी तुम्ही स्वत:वर प्रेम करायला, स्वत:बद्दल गुणग्राहकता दाखवायला, तसंच स्वत:बद्दल चांगली भावना ठेवायला शिकलं पाहिजे. काही लोक या प्रक्रियेला सकारात्मक स्वप्रतिमा विकसित करणं असं संबोधतात किंवा स्वत:बद्दलची गौरवाची भावना वाढवणं असंही समजतात, पण वास्तवात ते स्वत:वर प्रेम करायला, स्वत:ला जपायला शिकणं आहे.

स्वत:वर प्रेम करायला शिका

आकडेवारी दर्शवते की जे लोक यशस्वी असतात ते कशालाही आणि कोणालाही त्यांना कमी लेखू देत नाहीत. स्वत:बद्दलची गौरवाची भावना आणि मिळवलेलं यश यांचा परस्परसंबंध आहे हे त्यांना माहीत असतं. डॉ. कार्टर जी. वुडसन यांनी म्हटलंय, "तुम्ही जर एखादी व्यक्ती कोणत्या पद्धतीने विचार करते हे ठरवू शकलात, तर ते काय करतील याबद्दल चिंता करण्याचं तुम्हाला कारण राहणार नाही. मागच्या दाराने या असं त्यांना तुम्हाला सांगावं लागणार नाही. तसं न सांगताच ते मागच्या दाराने येतील आणि जर मागचं दारच नसेल तर ते स्वत:च्या फायद्यासाठी तसा एक दरवाजा करून घेतील!" मित्रांनो, तुम्ही तुमच्या दैनंदिन आयुष्याचा एक भागच बनवून स्वत:शी म्हणा, "मला मी आवडतो, मी स्वत:वर प्रेम करतो. दोन पानं एकमेकांसारखी नसतात, दोन हिमकण सारखे नसतात आणि हाताच्या दोन बोटांचे ठसेही सारखे नसतात. जे करण्यासाठी माझा जन्म झालाय ते करण्यासाठी आणखी कोणाचाही जन्म झालेला नाही. एका विशेष उद्देशासाठी देवाने निर्माण केलेली अशी मी एकमेव व्यक्ती आहे आणि देव वाईट काही निर्माण करत नाही, हे मला माहीत आहे!" स्वत:वर प्रेम करण्याची स्वत:शीच खूणगाठ बांधा!

तुम्हाला स्वत:वर प्रेम करायला आणि स्वत:बद्दल चांगली भावना ठेवायला शिकलं पाहिजे, कारण तुम्हाला जर स्वत:बद्दल चांगलं वाटत नसेल तर तुम्ही कोणतीही गोष्ट किंवा कोणीही व्यक्ती तुमची स्वप्नं सोडून देण्याबद्दल आणि तुमच्या उद्दिष्टांपासून विचलित व्हायला, तसंच आयुष्यातल्या तुमच्या सेवाव्रतापासून डळमळीत व्हायला कारणीभूत होतील. जॉर्ज बेन्सनने 'द ग्रेटेस्ट लव्ह ऑफ ऑल' हे गाणं गायलंय. त्याच्यात असं म्हटलंय की सर्वांत महान प्रेम आपल्यातच असतं. स्वत:वर प्रेम करणं हे सर्वांत महान प्रेम आहे. तरीही बरेच लोक कधीही स्वत:वर प्रेम करायला शिकत नाहीत. स्वत:बरोबर राहायला आवडत नाही म्हणून, एकटेपणाची भीती म्हणून नव्हे, काही लोकांना एकटं राहिलेलं चालत नाही, याचं तुम्ही निरीक्षण केलंय का? तुम्ही स्वत:वर

प्रेम करायला शिकलं पाहिजे. बार्बारा डि. अँन्जेलिसने लिहिलंय, ''तुम्हाला जर स्वत:वर प्रेम करणं जमत नसेल, तर दुसऱ्या कोणावर प्रेम करणंदेखील अवघड होईल.''

आता स्वत:वर प्रेम करायला कसं काय शिकायचं, असं बरेच जण विचारतील. किती जणांनी असं गाणं ऐकलंय जे तुम्हाला पहिल्या वेळेला आवडलं नव्हतं? जोपर्यंत तुम्ही त्या गाण्यात स्वत:चा आवाज मिळवून गात नाही, पायाने ताल धरत नाही तोपर्यंत तुम्ही ते गाणं दररोज ऐकणं चालू ठेवलंत तर ते आवडून घ्यायला तुम्ही 'शिकलात'. कशावरही प्रेम करायला तुम्ही शिकू शकता. काहींचं लग्न अशा लोकांबरोबर झालेलं असतं, ज्यांच्यावर प्रेम करणं त्यांना शिकावं लागलं. संपूर्ण गांभीर्याने बोलायचं झालं तर आपण स्वत:बद्दल चांगल्या गोष्टी बोलणं हा आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग केला पाहिजे. स्वत:शीच 'गोड बोलणं' हा आपण स्वत:वर प्रेम करायला शिकण्याचा एक मार्ग आहे.

सांख्यिकी माहिती असं दर्शवते की, ऐंशी टक्के लोकांचं संभाषण नकारात्मक आणि स्वत:ला अपयशी ठरवणारं असतं. त्यांचा अंतर्गत संवाद मर्यादा घालणारा आणि स्वत:चंच खच्चीकरण करणारा असतो. बाह्य जगाशी चालणारा संवाद नकारात्मक असतो. आपण स्वत:वर प्रेम करायला शिकलं पाहिजे. जर नाही शिकलो तर आपल्या यशाला खीळ घालणाऱ्या, विनाशकारी अशा गोष्टी आपल्या हातून घडतील. याच्याशी प्रेमाचा काय संबंध? सर्व काही.

आपण जेव्हा प्रेमाचा विचार करतो तेव्हा आपण प्रणयाची भावनिक संकल्पना असा एक ठरावीक विचार करतो. पण प्रेम त्यापेक्षा कितीतरी अधिक आहे. बरेचसे सुस्पष्ट पैलू असलेली प्रेम ही एक विस्तृत संकल्पना आहे. आपण आपल्या मित्रांवर प्रेम करतो, पण आपल्या जोडीदारावर करू तशा प्रकारे नाही. प्रेम वेगवेगळ्या प्रकारात येतं. प्रेमाचे तीन मुख्य प्रकार आहेत : इरॉस, फिलिओस आणि अगेप.

प्रेमाच्या गाण्यांत आपण सहसा ज्या प्रेमाबद्दल बोलतो ते प्रणयी प्रकारचं प्रेम म्हणजे इरॉस. आपण सर्वसाधारणपणे प्रेमाबद्दल बोलताना ज्याचा विचार करतो, तेच हे प्रेम. हे प्रेम एक पुरुष आणि स्त्री यांच्यामधील आहे. या प्रेमात तीव्रता आणि भेटीसाठी आसुसणं, तळमळ आणि इच्छा

आहे. फिलिओस प्रेम हे मित्रमैत्रिणी आणि कुटुंबाच्या सदस्यांबद्दल आहे. सहसा फिलिओस प्रेमाला बंधुभाव म्हणून संबोधण्यात येतं. वस्तुतः त्यामुळेच फिलाडेल्फियाला सिटी ऑफ ब्रदरली लव्ह असं म्हणण्यात येतं. फिलिओस या शब्दापासून ते घेण्यात आलं. शेवटचं अगेप प्रेम म्हणजे देवाबद्दलचं प्रेम. अगेप हे शुद्ध प्रेम आहे, जे देवाचं आपल्यावर आणि आपलं देवावर असतं.

इरॉस लव्ह!

आपण ज्या प्रकारच्या प्रणयी प्रेमाशी चांगलेच परिचित आहोत, तो प्रेमाचा प्रकार म्हणजे इरॉस प्रेम. प्रेमीजनांसंबंधीच्या गाण्यांत आपण ज्याबद्दल ऐकतो ते हे इरॉस प्रेम. प्रणयी कादंबऱ्यांतून लोक या प्रेमाबद्दल वाचतात. एक पुरुष आणि स्त्री यांनी एकरूप होऊन मानवी जीवांची निर्मिती करायला उद्युक्त करणारं हे प्रेम.

माझ्या पत्नीबद्दलचं प्रेम व्यक्त करायला मी जे गीत लिहिलं, त्याचं शीर्षक आहे 'दुसरं कोणी नाही, तूच'. माझ्या बायकोवर मी एवढं का प्रेम करतो ते इतरांपर्यंत पोहोचवण्यासाठी... एवढं की तिच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी मी फुटक्या काचांवरूनदेखील रांगत जाईन.

दुसरं कोणी नाही, तूच..
गीतकार विली जोली

तुम्ही कधी गर्दीत असूनदेखील एकटेपणा अनुभवलाय?
तुम्ही कधी एखाद्या खोलीत होतात पण ते घर नव्हतं?
तुम्ही कधी धावत होतात पण कुठेच जात नव्हतात?
तुम्ही प्रेमात आहात असं तुम्हाला वाटत होतं
पण तुम्ही पर्वा करत नाही हेही तुम्हाला ठाऊक होतं?

मी कित्येक वर्षं तसाच होतो,
बाहेरून मी हसत होतो

पण मनात मात्र अश्रू होते
तुला मी भेटलो त्या दिवसापर्यंत,
माझी सगळी स्वप्नं सत्यात आली तो दिवस होता तो

तू, बाकी कोणी नाही तूच
तू मला जसं वाटायला लावतेस तसं मला वाटतं
तू, दुसरं कोणी नाही, फक्त तूच
मी माझं सगळं प्रेम पणाला लावतो, माझं सगळं प्रेम!

माझे सगळे मित्र म्हणाले की ती फक्त एक पुढे सरकणारी गोष्ट होती..
प्रेमरोग, एक साधं छोटं प्रकरण!
पण माझं आयुष्य बदलतंय हे त्यांना ठाऊक नव्हतं
आणि मी कधीच, कधीही, कधीही पूर्वीसारखा असणार नव्हतो!

ज्या क्षणी मी तुला पाहिलं, माझ्यात काहीतरी बदललं
सुरुवातीपासूनच मला माहीत होतं, हे असंच घडायचं होतं!
मी आणाभाका घेतल्या आणि मी आनंदाने त्याप्रमाणे वागेन
पुन्हा आणि पुन्हा आणि पुन:पुन्हा!

मग त्यांनी मला विचारलं मला तुझ्याबद्दल काय वाटतं
मी तुला सांगतो मला कसं वाटतं
प्रत्येक दिवशी गुडघ्यांवर बसून मी प्रार्थना करतो
कारण तुझ्या प्रेमाबद्दल मी कृतज्ञ आहे,
प्रेमाबद्दल कृतज्ञ आहे!

तू, दुसरं कोणी नाही, तूच
मला असं वाटायला लावणारी, जसं तू लावतेस!
तू, दुसरं कोणी नाही, तूच

मी माझं सगळं प्रेम पणाला लावतो, माझं सगळं प्रेम!
मग त्यांनी मला विचारलं मला काय वाटतं तुझ्याबद्दल
मी जगाला सांगेन मला कसं वाटतं
या भूतलावरचा सगळा पैसा
तुझ्या तुलनेत काहीच नाही
कितीही पैसा ओतला, तरी तुझ्यावर प्रेम करण्यापासून मला
रोखू शकणार नाही!

नाही, नाही, कधीही नाही, नाही, नाही!
कधीही नाही, कधीही कधीही, कधीही नाही!
कधीही तुझ्यावर प्रेम करणं थांबवणार नाही!
कधीही नाही, कधीही कधीही, कधीही नाही!
कधीही तुझ्यावर प्रेम करणं थांबवणार नाही!
माझ्या सगळ्या प्रेमानिशी मी तुझ्याशी वचनबद्ध आहे!
दुसरं कोणी नाही, फक्त तू!

तू मला जसं वाटायला लावतेस त्याच्याशी कितीही मोठ्या
रकमेची तुलना होऊ शकणार नाही
आणि या वेळेला ते खरं आहे मला हे माहीत आहे

म्हणून मला जे करायचंय ते मी करेन,
मी पर्वतांवर चढेन
मी सर्वांत खोल समुद्रातून पोहून जाईन
मी चक्रीवादळातूनही जाईन
मी खरं म्हणजे, मी तुझ्याकडे पोहोचायला फुटक्या काचांवरून चालून जाईन!
तुझ्यासाठी... दुसरं कोणी नाही, फक्त तुझ्यासाठी!

नाती जोडण्याचा जादूई मंत्र...

एक यशस्वी आणि आनंददायक नातं जोडण्याचं गुपित काय आहे, असं जवळजवळ प्रत्येक दिवशी मला विचारण्यात येतं. माझी पत्नी आणि मी केवळ एकत्रच राहत नाही तर आम्ही एकत्र काम करतो, एकत्र खेळतो. आम्हाला दोघांना एकमेकांबरोबर किती आनंद वाटतो आणि आम्ही जवळजवळ नेहमीच एकत्र असतो. त्यामुळे बऱ्याच लोकांना आश्चर्यमिश्रित कौतुक वाटतं. याचं गुपित काय आहे? प्रत्येक दिवशी प्रेम करायचा सराव करणं हे ते गुपित आहे.

मी जेव्हा माझ्या विवाहाची तयारी करत होतो, तेव्हा ज्यांच्या लग्नाला पन्नास वर्षांपेक्षा अधिक काळ उलटून गेलाय अशा एका जोडप्याशी बोलल्याचं आठवतं त्यांनी मला सल्ला दिला, 'प्रेम हे भावनेपेक्षा काहीतरी अधिक आहे, तो एक निर्णय आहे!' जेव्हा तुम्ही म्हणता, ''मी करेन!'', तेव्हा करा! दुसरं, आपण सगळ्या गोष्टींबद्दल बोलतो, काहीच गोष्टींबद्दल नव्हे... सगळ्या गोष्टींबद्दल!! आपल्याला जेव्हा काही प्रश्न असतात, तेव्हा आपण त्याबद्दल ताबडतोब बोलतो आणि कोणीच हरणार नाही असा मार्ग त्यातून काढतो. आपण विजयाकडे जातो, ज्यात आपण दोघेही जिंकतो! बघा, आपल्याला वाद घालायची गरज नाही, आपण त्यावर चर्चा करू शकतो, हे आपण शिकलो! आपण 'एकमेकांशी' बोलतो 'एकमेकांना' नाही. आपण जर एकमेकांशी बोललो, तर वाद होण्याची शक्यता कमी आहे. वाद घालण्यासाठी दोन लोकांची गरज असते! म्हणून जर एकाने त्यात भाग घेतला नाही, तर तुमच्यात वादविवाद होऊ शकत नाही. तुमच्यापुढे निवड आहे. संवाद साधायचा असेल तर तुम्ही एकमेकांशी बोलू शकता आणि वाद घालायचा असेल तर एकमेकांना उद्देशून बोलू शकता. भांडणातील हवा जर विचारांनी काढून घेतली नाही तर त्यामुळे वादविवाद, काथ्याकूट आणि भांडणतंटे होऊ शकतात, बाचाबाची होते. मग एखाद्याला जिंकण्याची एवढी तीव्र इच्छा असते की, ते त्याचा शेवटच होऊ देत नाहीत. प्रत्येकाला आपलाच शब्द शेवटचा ठरावा असं वाटतं, त्यामुळे सातत्याने प्रतिकार होत राहतो. समझोता होणं अशक्य व्हावं अशा प्रकारच्या गोष्टी त्या तापलेल्या संवादाच्या क्षणी बोलल्या जातात आणि त्याचा परिणाम म्हणजे संवादाला खीळ आणि ताटातूट होणं. या

सगळ्यातून का जायचं? थोडासा धीर धरा आणि 'एकमेकांशी' बोलायला शिका आणि 'एकमेकांना' नव्हे. आयुष्य खूप मधुर होईल!

कोण कोणावर अधिक प्रेम करतं?

आपल्या जोडीदाराबरोबर अधिक प्रभावीपणे संवाद कसा साधायचा याबद्दल आपण यापूर्वी बोललो. दुसरं एक गुपित जे मला अतिशय उपयोगी पडलं, ते मला तुम्हाला सांगू द्या. तिच्यावर मी प्रेम करतो हे तिला सांगणं हा मी माझ्या दिनक्रमाचा एक भाग बनवून टाकतो आणि ते खूप सोपं आहे. आपल्या यशाचं ते एक गमक आहे. काही दिवस असे असतात जेव्हा ती माझ्यावर प्रेम करते त्यापेक्षा मी अधिक करतो आणि इतर काही दिवस मी करतो त्यापेक्षा ती माझ्यावर अधिक प्रेम करते, असं मला आढळून आलंय. त्यामुळे सातत्याने शक्ती बदलत राहणारं नातं आमच्या दोघांत निर्माण होतं. आम्हाला असं आढळून आलंय की जी व्यक्ती कमीत कमी प्रेम करते, त्या व्यक्तीचा या परस्परसंबंधामध्ये अधिक प्रभाव असतो आणि जी व्यक्ती सर्वाधिक प्रेम करते तिचा प्रभाव कमी असतो. म्हणूनच ज्या नात्यांमध्ये सतत आलटून-पालटून प्रभाव पडत राहतो, आणि बदल होत राहतो, ती नाती सर्वांत उत्तम असतात. प्रत्येक दिवशी, मी न चुकता तिला सांगतो की मी तिच्यावर प्रेम करतो, मग मी तिच्यावर अधिक प्रेम करतो किंवा ती माझ्यावर. प्रेमात राहण्याच्या माझ्या निर्णयाची त्यामुळे मला आठवण होत राहते. एवढंच नव्हे तर तिला त्यामुळे अधिक सुरक्षित वाटतं. लक्षात ठेवा, प्रेम ही फक्त एक भावना नव्हे, तर एक निर्णयदेखील आहे.

फिलिओस प्रेम

मित्रांमधलं परस्पर प्रेम हे पुढील प्रकारचं, फिलिओस प्रेम आहे. आपण ज्यांच्यावर प्रेम करतो आणि त्यांची काळजी घेतो असे मित्र आणि नातेवाईक आपल्या सर्वांना असतात, तरीही आपण जेव्हा प्रेमात पडतो, तेव्हा ती एक वेगळीच भावना असते. आपल्याकडे जे असतं ते इतरांशी वाटून घेणं आणि एकमेकांशी नातेसंबंध तयार करण्यासाठी प्रवृत्त होणं हे फिलिओस प्रेम आहे.

मला हाक मारा!
विली जोली आणि ब्रॅडली थॉमस यांची रचना

सोयीस्कर असणं म्हणजे मैत्री नव्हे
मैत्रीचा अर्थ आहे बांधिलकी आणि सातत्य
मला हाक मारा (तुम्ही मला हाक मारू शकता.)
– जेव्हा तुम्हाला माझी गरज असेल!
मला हाक मारा (तुम्ही मला हाक मारू शकता.)
– फोन उचला आणि मला फोन करा!

अशा मित्राचा उपयोग काय,
जर तुम्ही त्याच्यावर भरवसा ठेवू शकत नसाल?
जेव्हा तुम्हाला गरज वाटते,
तुम्ही म्हणताय तुम्हाला मित्राची गरज आहे
जो आनंदात आणि दुःखात तुमच्या पाठीशी असेल,
आणि जो प्रत्यक्ष कृती करेल हे तुम्हाला माहीत आहे

तुम्ही मला बोलावू शकता – बोलवा, बोलवा नाही का
बोलावणार तुम्ही मला?
तुम्हाला जर माझी गरज असेल, तर मला बोलवा!

तुम्हाला मित्राची गरज आहे असं तुम्ही म्हणता
जेव्हा तुम्ही विजयी व्हाल तेव्हा तो असेल
पण तुम्ही हरलात तरीही तो तुमच्या शेजारी उभा असेल
मध्यरात्रीदेखील ज्याला तुम्ही बोलावू शकाल असा कोणीतरी
जेव्हा तुम्ही बोलवाल तेव्हा तो नकार देणार नाही हे
तुम्हाला माहीत आहे
मला सकाळी बोलवा,
रात्री उशिरा हाक मारा,
कारण तुम्ही मला केव्हाही बोलावलं

तरी हरकत नाही हे तुम्हाला माहीत आहे!
मी तुम्हाला एकदा सांगतोय आणि मी तुम्हाला दोनदा सांगेन,
मला तुमची खरोखरच काळजी आहे आणि मी वाटून घ्यायला तयार आहे;
आणि मी त्याग करायलाही तयार आहे

मला हाक मारा, तुम्ही मला बोलवू शकता, हो खरंच!
तुम्हाला जर माझी गरज असेल, तर उशीर करू नका;
फोन उचला आणि मला ताबडतोब बोलवून घ्या!

मी काही फक्त चांगल्या दिवसांपुरता मित्र नाही
मी अगदी अखेरपर्यंत साथ देणारा आहे
मित्र कसा प्रामाणिक आणि सच्चा असला पाहिजे
तो काय करतो त्यावरून त्याचं प्रेम दिसतं, तो काय बोलतो यावरून नव्हे!

इतका दीर्घ काळ मी प्रेमाबद्दल विचार करत असायचो,
चुंबनांनी आणि आलिंगनांनी मी दाखवलं की मी त्यांच्यावर प्रेम करतो
पण नंतर मग एक दिवस, येशू माझ्या मार्गात आला
आणि मला म्हणाला, तुमचं आयुष्य त्यांच्यासाठी वेचण्याच्या तुलनेत
दुसरं कोणतंच महान प्रेम तुम्ही त्यांना देऊ शकत नाही!

मला सकाळी बोलवा,
मला रात्री उशिरा हाक मारा,
कारण तुम्ही मला कोणत्याही वेळी जरी बोलवलंत
तरी हरकत नाही हे तुम्हाला माहीत आहे!
मी तुम्हाला एकदा सांगतो आणि मी तुम्हाला दुसऱ्यांदा सांगतो,
मी तुमची खरोखरच काळजी करतो आणि तुमच्याबरोबर
सहभागी व्हायला मी तयार आहे
आणि त्याग करायची माझी तयारी आहे

मला हाक मारा, तुम्ही मला बोलवू शकता, हो खरंच!
तुम्हाला माझी गरज असेल तर मी जवळच उभा आहे
फक्त माझं नाव घ्या आणि मी तिथे असेन,
वाट बघू नका आणि वेळ लावू नका
फक्त फोन उचला आणि मला लगेच फोन करा!
माझ्या बंधुंनो, भगिनींनो
तुम्ही मला बोलवू शकता, तुम्ही मला बोलवू शकता!

सगळं प्रेम, जे शुद्ध आणि गूढरम्य असतं, ते शारीरिक प्रेमापासून आध्यात्मिक प्रेमाकडे वळतं. तुम्ही कधी असा अनुभव घेतलाय का, की तुम्ही ओळखत असलेल्या कोणालातरी मदतीची किंवा तुमची गरज आहे असं जाणवतं, आणि त्याच वेळेला फोनची घंटी वाजते आणि ती व्यक्ती तीच असते! हे गमतीशीर नाही काय? जे प्रेम प्रामाणिक आणि एकनिष्ठ असतं ते नेहमीच शारीरिकतेपासून भावनिकतेच्याही पलीकडे जातं आणि आध्यात्मिकतेकडे वाटचाल करतं.

अगेप!

जगाचा निर्माता आणि त्याची निर्मिती यांच्यातल्या प्रेमाला अगेप म्हणतात. देव आणि मुलांमध्ये असतं ते हे प्रेम. आपण आणि देव यांच्यातलं पवित्र प्रेमप्रकरण असतं. अगेप हे खरं प्रेम आहे!

माझ्या एका मित्राने तो सातत्याने खऱ्या प्रेमाच्या शोधात कसा होता, याची अभिव्यक्ती करणारं, त्याने लिहिलेलं एक विशेष गाणं त्याच्या विवाहप्रसंगी मला गायला सांगितलं. त्याच्या शोधाची परिणती नेहमीच निराशेत होत होती. पण एक दिवस आश्चर्यकारकरीतीने त्याच्या अगदी हाताशीच असलेलं खरं प्रेम एक दिवस त्याला गवसलं! मी ते गाणं त्याच्या विवाहाच्या वेळी गायलं आणि ते कितीतरी लोकांच्या हृदयाला भिडलं. ते केवळ प्रेक्षकांसाठीच स्फूर्ती देणारं नव्हतं, तर माझ्यासाठीही ते प्रेरणादायी होतं. देशभरातील लोकांसाठी मी ते गाणं गात होतो आणि तुमच्याबरोबरही मला ते वाटून घ्यायची इच्छा आहे... खरं प्रेम!

खरं प्रेम
डॅनी मॅक्क्रिमॉनची रचना

आपल्या हृदयात एवढा गोंधळ झालाय,
शब्दांनी आणि साध्या स्पर्शानेदेखील
जे खरं आहे त्याकडे आपण डोळेझाक करतो
आश्चर्यांकडे आपण खेचले जातो
आपल्या स्वतःच्या इच्छांच्या सापळ्यात आपण अडकतो

खरा मित्र कोण आहे ते शोधून काढल्यावर
कुठे सुरुवात करायची तेच आपल्याला कळत नाही
आपण निरर्थकच दुसऱ्यांपर्यंत पोहोचत असतो
दोष दुसऱ्यावर ढकलण्याचा प्रयत्न करतो
जेव्हा दोष आपल्यातच असतो

मला वाटलं मला ते विशेष प्रेम सापडलंय
काही लोक ज्याची फक्त स्वप्नंच बघतात असं प्रेम
पण मला प्रकाश दिसला तो क्रॉसच्या जवळ
त्यागाबरोबर खरं प्रेम आलं!

त्यापेक्षा अधिक महान प्रेम तुम्हाला मिळणार नाही
तुम्ही जर फक्त विश्वास ठेवलात तर!
प्रत्येकासाठी इथे भरपूर आहे आणि ते कोणत्याच
हृदयाला अतृप्त ठेवणार नाही
हे शक्य झालं त्या सौजन्यामुळे!
मला शेवटी ते विशेष प्रेम मिळालंय
अशा प्रकारचं प्रेम ज्याचं काही लोक फक्त स्वप्नच बघू शकतात..
कारण मी क्रॉसजवळ प्रकाश बघायला सुरुवात केली
खरं प्रेम त्यागाबरोबर आलं!

हो, खरं प्रेम त्यागाबरोबर आलं
खरं प्रेम, मला माझा स्वर्ग मिळाला!
खरं प्रेम, त्यागाबरोबर आलं!
खरं प्रेम, तो एकच ज्याने त्याचं आयुष्य देऊन टाकलं!
आणि क्रॉसजवळ मी प्रकाश बघायला सुरुवात केली
खरं प्रेम त्यागाबरोबर आलं!

काही अटी न घालता आणि घातल्या न जाता दिलं गेल्यावर जे परिपूर्ण होतं, असं प्रेम ही एक देणगी आहे, हे ओळखणं म्हणजे खरं प्रेम. आपल्यावर प्रेम केलं जातं आणि प्रेम मोकळेपणाने दिलं जातं, देण्यात येत राहतं, असा विश्वास, श्रद्धा, आत्मविश्वास, दिलासा म्हणजे खरं प्रेम. तरीही स्वीकारणं आपल्यावर अवलंबून असतं. आपण प्रेम स्वीकारतो की नाकारतो हे सगळं श्रद्धेवर अवलंबून असतं. शेवटी प्रेम, सगळं प्रेम हेच एका भावनेपेक्षा अधिक आहे, हे सांगणं महत्त्वाचं आहे. प्रेम ही एक निवड आहे, प्रेम हा एक निर्णय आहे!

कसंही करून करा

लोक अवास्तव, अतार्किक आणि स्वकेंद्रित असतात
तरीही त्यांच्यावर प्रेम करा!
तुम्ही जर चांगलं केलंत, तर लोक तुमच्यावर स्वार्थी, अंत:स्थ हेतू असल्याचा ठपका ठेवतील;
तरीही चांगलंच करा!
तुम्ही जर यशस्वी असाल, तर तुम्हाला खोटे मित्र आणि खरे शत्रू मिळतील
तरीही यशस्वी व्हा!
तुम्ही आज जे चांगलं कराल, ते उद्या विस्मृतीत जाईल;
तरीही चांगलंच करा!
प्रामाणिकपणा आणि स्पष्टवक्तेपणा तुम्हाला कमकुवत बनवेल;
तरीही प्रामाणिक आणि स्पष्टवक्तेच राहा!

सर्वांत मोठ्या कल्पना असलेले सर्वांत मोठे लोक, सर्वांत क्षुद्र मन असलेल्या
क्षुद्र लोकांकडून गोळी घालून मारले जाऊ शकतात;
तरीही मोठा विचार करा!
लोक, दबून राहणाऱ्या लोकांच्या बाजूने कौल देतात... पण
फक्त उच्च लोकांच्याच मागे जातात;
पण तरीही दबून राहणाऱ्या लोकांसाठी लढा!
जी गोष्ट घडवण्यासाठी तुम्ही वर्षानुवर्षं घालवता
त्या गोष्टी एका रात्रीत उद्ध्वस्त होऊ शकतात;
तरीही त्या घडवा!
लोकांना मदतीची खरोखर गरज असते, पण तुम्ही त्यांना मदत केल्यावरही
ते तुमच्यावर हल्ला करू शकतात
तरीही लोकांना मदत करा!
तुमच्याकडे असलेलं सर्वोत्कृष्ट तुम्ही जगाला देता आणि कधीकधी
लाथा मारून तुमचे दात तोडण्यात येतात;
तरीही तुमच्याकडे असलेलं सर्वोत्कृष्टच जगाला द्या!
चांगलं करा, प्रेम करा आणि लोक तुम्हाला हसतील, नावं ठेवतील;
तरीही चांगलं करा, प्रेम करा... कारण प्रेम कधीही हरत नाही!
अनामिक लेखक

एका विजेत्याचा दृष्टिकोन

आपण यापूर्वी एका विजेत्याचा दृष्टिकोन असण्याबद्दल आणि सीडीआय (कॅन डू इट) बद्दल बोललो. याचा अर्थ तुम्ही ते करू शकता यावर तुमचा खरोखरच विश्वास आहे आणि तुम्ही जिंकणार आहात यावरदेखील तुमचा विश्वास आहे. तुम्ही ज्यांना ओळखता त्यांच्याबरोबरच नव्हे, तर ज्यांना ओळखत नाही अशांबरोबरदेखील प्रेम वाटून घ्या. **सुवर्ण नियम** असा आहे की, 'तुमच्याबरोबर लोकांनी जसं वागावं अशी तुमची अपेक्षा आहे, तसं तुम्ही इतरांबरोबर वागा.' जॉन वेसलीने हे इतकं नेमकं म्हटलंय –

जमेल तितकं भलं करा
जमेल त्या साधनांनिशी करा
जमेल त्या मार्गांनी भलं करा
जेव्हा जेव्हा जमेल तेव्हा तेव्हा करा
शक्य त्या सर्वांचं
शक्य तितका काळ – भलं करा

येस, यू कॅन! इतर लोक जरी हसतील आणि तुम्हाला कमी लेखतील तरीही. तुम्ही जर फक्त प्रेमाचा उपयोग केला तर तुम्ही विस्मयजनक गोष्टी करू शकता. तुम्ही करू शकता! प्रेमाचा वापर करा!

प्रेम एक धोका आहे!

सोडून देणं, म्हणजे हार मानणं,
हार मानणं म्हणजे सोडून देणं
सोडून देणं म्हणजे प्रयत्न थांबवणं
प्रयत्न करण्याचं थांबवणं म्हणजे काहीही न करणं!
आणि आपल्या सर्वांना माहीत आहे की जेव्हा काही केलं जात नाही
तेव्हा काहीही मिळत नाही आणि अभद्र गोष्टी जोमाने वाढतात
जिथे चांगले लोक काहीच करत नाहीत
कधीतरी तुम्हाला धोका पत्करावाच लागतो!
ते आव्हानात्मक असेल आणि कठीणदेखील असेल
पण मिळणारी पारितोषिकं धोका पत्करण्याच्या योग्यतेची आहेत!

मूर्ख दिसायचा धोका पत्करणं म्हणजे हसणं
भावुक दिसायचा धोका पत्करणं म्हणजे रडणं
गुंतण्याचा धोका पत्करणं म्हणजे दुसऱ्यापर्यंत पोहोचणं
तुमच्या खऱ्या भावना उघड करणं म्हणजे तुमचं खरं स्वरूप
उघड होण्याचा धोका पत्करणं

समूहापुढे तुमच्या कल्पना आणि स्वप्नं मांडणं
म्हणजे त्यांना गमावण्याचा धोका पत्करणं
प्रेम करणं म्हणजे प्रेमाची परतफेड न होण्याचा धोका पत्करणं!
जगणं म्हणजे मरण्याचा धोका पत्करणं
आशा करणं म्हणजे निराश होण्याचा धोका
प्रयत्न करणं म्हणजे पराभूत होण्याचा धोका
पण धोका पत्करलाच पाहिजे कारण,
आयुष्यातला सर्वांत मोठा अडथळा म्हणजे कशाचाही धोका न पत्करणं!
जो माणूस कशाचाही धोका स्वीकारत नाही, तो काहीच करत नाही
आणि त्याच्याकडे काहीच नसतं!
ते लोक कदाचित त्रास आणि दुःख टाळू शकतील
पण ते शिकू शकणार नाहीत, त्यांना भावना समजणार नाहीत
त्यांची वाढ होणार नाही, ते प्रेम करू शकणार नाहीत
ते खरं म्हणजे जगूच शकणार नाहीत!
जो माणूस धोका पत्करतो, तो खरोखरच मुक्त असतो!

अनामिक

प्रेम कधीही हरत नाही!

प्रेम सोशिक आणि दयाळू असतं
प्रेम मत्सरी किंवा बढाया मारणारं नसतं
ते उद्धट किंवा उद्दाम नसतं
प्रेम स्वतःच्याच मार्गाबद्दल आग्रही नसतं
ते चिडलेलं किंवा नाकारणारं नसतं
चुकीच्या गोष्टींचा ते आनंद साजरा करत नाही, तर योग्य गोष्टींचाच
आनंद साजरा करतं
प्रेम सगळं सहन करतं, सगळ्यावर विश्वास ठेवतं
सगळ्या गोष्टींची आशा करतं, सगळं सहन करतं, प्रेम कधीही हरत नाही!

(जे. कोरिंथिअन्स १३ मधून - प्रेम या खंडातून घेतलेलं)

प्रश्न असा आहे... प्रेमाचा याच्याबरोबर काय संबंध आहे?
उत्तर आहे – सगळाच!

मी फक्त प्रेम सोडू शकतो!

मी जेव्हा मरण पावेन... माझं जे काही उरेल ते देऊन टाका
मृत्यूची वाट बघत असलेल्या वृद्ध लोकांना आणि मुलांना
आणि जर तुम्हाला रडायचं असेल तर तुमच्या भावासाठी रडा
जो रस्त्यावरून तुमच्या बाजूने चालतोय
आणि जेव्हा तुम्हाला माझी आठवण येईल, तेव्हा तुमचे बाहू कोणाही भोवती वेढून घ्या
आणि तुम्हाला जे मला द्यायचंय ते त्यांना द्या
मी तुमच्यासाठी काही ठेवणार आहे...
शब्दांपेक्षा किंवा आवाजापेक्षा काहीतरी चांगलं
प्रेम मरत नाही, लोक मरतात
म्हणून मग माझं जे काही उरेल ते प्रेम असेल,
मला देऊन टाका! मी तुम्हाला स्वर्गातल्या घरी भेटेन!

अनामिक

प्रकरण ८

आशीर्वादासह निश्चिती!

श्रद्धा हे आशेचं सार, अ–दृश्य गोष्टींचा पुरावा!

हिब्रुज ११:१

श्रद्धा! यशाबरोबर तिचं काय काम? देशभरातल्या यशस्वी लोकांच्या घेतलेल्या या मुलाखतींत, त्यांच्या यशाच्या रहस्याबद्दल ते सगळे जण एकच गोष्ट म्हणाले, ''तुमची स्वत:वर, तुमच्या स्वप्नांवर आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे देवावर श्रद्धा असली पाहिजे!''

आफ्रिकन संस्कृतीत त्याला इमानी म्हणतात, ज्युईश संस्कृतीत त्याला इमुनाह म्हणतात, मुसलमान लोक त्याला इमाम म्हणतात. तुम्ही काही जरी नाव वापरलं, तरी त्याचा अर्थ एकच असतो – श्रद्धा! वेबस्टरने श्रद्धेची व्याख्या अशी केली आहे, 'पूर्ण आत्मविश्वास आणि निश्चिती; गाढ विश्वास आणि मजबूत विचारसरणी, नि:संशय विश्वास. देवाशी एकनिष्ठता आणि प्रेम!' श्रद्धा म्हणजे खात्री, अनुग्रह असलेली खात्री, की देव आहे आणि तो आहे म्हणून आपला विश्वास आहे! आणि त्या विश्वासावर आपला विश्वास आहे! काही लोक असं म्हणतील की श्रद्धा म्हणजे पुरावा नसलेला विश्वास, पण मी एल्टन ट्रूब्लड यांच्याशी सहमत आहे. त्याने म्हटलंय, ''श्रद्धा म्हणजे काही पुराव्याशिवाय विश्वास नव्हे, कोणताही किंतु न बाळगता असलेला विश्वास!''

श्रद्धा म्हणजे तुमच्यापेक्षा महान असणाऱ्या कोणावर तरी असलेला विश्वास आणि नंतर मग त्या विश्वासावर अवलंबून केलेली पाऊल पुढे टाकण्याची कृती. ते म्हणजे एक विचार घेऊन, तो विश्वासात परिवर्तित झालेला बघणं. त्या विश्वासाची नंतर मग एक सुस्पष्ट निश्चित समज

येते, ज्ञान येतं. ते ज्ञान वाढत राहतं आणि परावर्तीत होणंही चालू राहतं. तुम्हाला कळेल, नक्की कळेल आणि तुम्हाला कळतंय हेदेखील तुम्हाला कळेल अशा वेळेपर्यंत!

असा एक निर्माता आहे, जो सबल करतो, तशी दृष्टी देतो, प्रोत्साहित करतो आणि आपल्याला जगवतो, सूर्यप्रकाशात किंवा वादळातही, ही समज येणं म्हणजे श्रद्धा आणि इतर गोष्टींप्रमाणेच... श्रद्धा म्हणजे निर्णय.

श्रद्धा ही एक अशी संकल्पना आहे, जिचं बऱ्याच लोकांना आकलन होत नाही आणि म्हणून लोक तिचा फायदा करून घेऊ शकत नाहीत. आपल्या सर्वांकडे श्रद्धा आहे.

आपली श्रद्धा कशावर आहे यातच त्याचं मर्म आहे. प्रत्येक दिवशी आपण आपल्या श्रद्धेचं प्रदर्शन करतो. आपण एखाद्या खोलीत प्रवेश करतो आणि आपल्याला बसायला सांगितल्यावर आपण ती खुर्ची मजबूत आहे किंवा नाही किंवा आपलं वजन तिला पेलवेल किंवा नाही याची खात्री करून घेत नाही. आपण सरळ खुर्चीत बसतो. आपलं वजन त्या खुर्चीला सहन होईल किंवा नाही हे माहीत नसतानाच आपण त्यावर बसतो. त्याला म्हणतात श्रद्धा. आपण एक नोकरी मिळवतो आणि बॉस म्हणतो की मी तुम्हाला इथे काम करण्याबद्दल एक 'विवक्षित' रक्कम देईन. उद्यापासून सुरुवात करा आणि दोन आठवड्यांत मी तुम्हाला पैसे देईन. आपण ते दोन आठवडे, खरं म्हणजे तो बॉस आपल्याला पैसे देऊ शकेल किंवा नाही हे नीट माहीत नसतानाच, काम करतो. नंतर आपल्याला सर्वसाधारणपणे एक चेक देण्यात येतो, जो वठेल की नाही हे शोधून काढायच्या आधीच खर्च करायला लागतो! मित्रांनो, हा एक कळसार तरी ठेवलेला विश्वास आहे, किंवा आपण जे हातात पकडू शकणार नाही. तरीही आपण त्याच्यावर विश्वास ठेवतो, असा एक विश्वास किंवा खात्री म्हणजे श्रद्धा. जी एक नैसर्गिक गोष्टीवरची श्रद्धा झाली, जी एका मोठ्या आध्यात्मिक श्रद्धेचा एक छोटा भाग आहे, तरीही श्रद्धा ही नेहमीच एक निर्णय असते.

श्रद्धा म्हणजे...

ज्या गोष्टी डोळ्यांना दिसत नाहीत, अशा गोष्टींची आशा करणं म्हणजे श्रद्धा. गोष्टींची आशा करणं म्हणजे त्यांची स्वप्न बघणं, अपेक्षा करणं आणि अशा गोष्टींबद्दल खात्री असणं. दुसऱ्या शब्दात, तुम्ही ज्या गोष्टी पाहू शकत नाही त्या गोष्टींवर विश्वास ठेवणं म्हणजे श्रद्धा आणि त्याची फलनिष्पत्ती तुम्हाला दिसू शकते. बरेच लोक श्रद्धेच्या अस्तित्वावर संशय घेतात, कारण ते ती बघू शकत नाहीत. ते विद्युतऊर्जेच्या अस्तित्वाबद्दल आक्षेप घेत नाहीत, जी त्यांच्या घरात येताना त्यांना दिसत नाही, पण जेव्हा ते दिवा लावतात तेव्हा त्याचा परिणाम त्यांना दिसतो! त्यांना वारा दिसत नाही, पण चक्रीवादळाचे परिणाम दिसतात. त्यांना रेडिओ आणि दूरचित्रवाणीच्या लहरी दिसत नाहीत, पण जेव्हा ते दूरचित्रवाणी संच किंवा रेडिओ लावतात, तेव्हा त्यांना त्याचे परिणाम दिसतात. ज्या गोष्टींची आपण आशा करतो त्या गोष्टींची श्रद्धा म्हणजे सार आहे. पुरावा, ज्या गोष्टी पाहिलेल्या नाहीत त्यांचा. श्रद्धा ठेवा!

दहा हजार डॉलर्सची श्रद्धा

जेव्हा आपण प्रेरणेबद्दल बोलतो तेव्हा हे समजून घ्यायला पाहिजे की ते स्फूर्तीपेक्षा खूप वेगळं आहे. प्रेरणेचा संबंध डोक्याशी आहे तर स्फूर्ती हृदयातून येते. स्फूर्ती तर्कशास्त्र आणि परिस्थिती यांच्याकडे दुर्लक्ष करते. ती श्रद्धेवर अवलंबून असते. तुमच्याकडे जर श्रद्धा नसेल, तर तुम्ही ती मिळवण्यासाठी प्रयत्न करायला पाहिजे आणि जर तुमच्याकडे श्रद्धा असेल, तर ती विकसित करण्यासाठी, अधिक मजबूत बनवण्यासाठी प्रयत्न करून अधिकाधिक शक्तिशाली होण्यासाठी मदत केली पाहिजे. पर्वताला हलवू शकणारी श्रद्धा विकसित करा. बरेच वेळा आपण दहा सेंटच्या श्रद्धेवर दहा हजार डॉलर्सचे परिणाम मिळवण्याचा प्रयत्न करतो. तुम्हाला जर भव्यदिव्य निष्पत्ती पाहिजे असेल तर तुमची स्वप्नं पण मोठी हवीत आणि मोठी श्रद्धा – देवावर आणि आयुष्यात तुमच्यावर कितीही कठीण प्रसंग आला, तरी देव तुम्हाला कधीही सोडून जाणार नाही किंवा तुमचा त्याग करणार नाही. शिवाय तुमचा स्वतःवरही विश्वास असू द्या!

तुम्ही जर अशी स्वप्नं बघू शकलात तर ते तुम्ही करूही शकता, असा विश्वास बाळगण्याची श्रद्धा तुमच्याकडे असायला पाहिजे. कारण तुमचा विश्वास नसेल तर इतरांनी तुमच्यावर विश्वास ठेवावा अशी अपेक्षा करू नका! आयुष्यात काहीतरी मिळवायचं असेल, तर ते तुम्ही बघितलं पाहिजे, त्याचा विचार केला पाहिजे, त्याचं स्वप्नं बघितलं पाहिजे, विश्वास ठेवला पाहिजे आणि त्याच्या मागे गेलं पाहिजे! ते सत्यात आणण्यासाठी तुमची श्रद्धा असली पाहिजे. लक्षात ठेवा, तुम्ही जर फक्त विश्वास ठेवलात तर सगळं काही शक्य आहे!

बेशुद्ध होऊ नका..

आयुष्याच्या आव्हानांमुळे आपल्या श्रद्धेची परीक्षा घेतली जाते असं आपण सगळे जण अनुभवतो. अशाही वेळा असतात, जेव्हा फक्त श्रद्धेवर विसंबून राहण्याखेरीज आपल्या हातात दुसरं काहीही नसतं. एका वैद्यकीय आव्हानाला सामोरं जात असल्यामुळे माझ्या एका मैत्रिणीने मला फोन केला होता आणि मी तिच्याशी बोलत होतो. तिला एक शस्त्रक्रिया करून घ्यावी लागणार होती आणि ती गंभीर स्वरूपाची शस्त्रक्रिया होती. तिच्या परिस्थितीबद्दल तिला कळून आल्यानंतर, काही दिवसांनी तिच्यावर दुसरा एक आघात झाला. तिच्या दहा वर्षांच्या मुलाला एक प्राणघातक रोग झाल्याचं निदान करण्यात आलं होतं आणि त्या रोगामुळे त्याला कायमचा हृदयरोग जडणार होता! तिचे स्वत:बद्दलचे विचार आणि भीती बाजूला पडली आणि फक्त त्याचीच काळजी व्यापून राहिली. तिने फोन केला आणि मला विचारलं, ''माझ्याच बाबतीत असं का?'' आयुष्याचं दान सगळ्यांनाच मनासारखं पडत नाही आणि ते स्वभावत:च कठीण असतं, असं मी तिला सांगितलं. आणि जेव्हा हातातले प्रश्न उलगडत नाहीत, तेव्हा तर ते अधिकच अवघड ठरतं. तुम्ही जरी कितीही प्रभाव, पैसा किंवा तुमच्याकडे असलेली शक्ती यांचा उपयोग केला, तरीही तो प्रश्न सुटत नाही. या वेळा अशा आहेत, जेव्हा तुम्हाला श्रद्धेची गरज असते. तुमची त्या श्रद्धेबरोबर बांधिलकी असली पाहिजे. एखाद्या बोटीत बसून, त्या बोटीतच राहायची बांधिलकी ठेवणं, काहीही झालं तरी मला श्रद्धेच्या बाबतीत हे उदाहरण द्यायला आवडतं.

काहीही झालं तरी, बोट जरी खवळलेल्या पाण्यात सापडली, तरीही तुम्ही बोटीतच राहायला हवं. बोट जर जोरजोरात हेलकावे घ्यायला लागली, तरीही तुम्ही बोटीतच राहायला हवं. बोट जरी कलंडली, तरीही बोटीतच राहा, जरी ती बुडाली तरीही. 'बोटीतच राहा!' का? कारण तुम्हीच बघाल की जरी बोटीत असलं तरी तुम्ही मात्र ऐन वादळातदेखील तग धरून राहाल. पवित्र वचनांत नमूद केल्याप्रमाणे 'जे देवावर अवलंबून राहतात, ते त्यांची शक्ती, पुन्हा नव्याने मिळवतात. ते गरुडांप्रमाणे त्यांच्या पंखांवर भरारी मारतील, ते धावतील पण थकणार नाहित, ते चालतील पण चक्कर येऊन पडणार नाहीत!' मित्रांनो, आयुष्यात वादळी क्षण येतात आणि ती वादळं घोंगावणारच, पण तुम्ही जर वाट बघितलीत आणि श्रद्धा ठेवलीत तरच तुम्ही टिकून राहाल.

सगळ्या गोष्टी एकत्रितपणे चांगल्यासाठीच घडतात...

एका छोट्या समाजात एके काळी एक शहाणा चिनी बाप होता. त्याला समाजात खूप मानाचं स्थान होतं. फक्त त्याच्या शहाणपणामुळे नव्हे तर त्याच्या मालकीच्या दोन गोष्टींमुळेही, एक ताकदवान मुलगा आणि एक घोडा. एक दिवस घोड्याने कुंपण तोडलं आणि पळून गेला. सगळे शेजारी एकत्र जमले आणि म्हणाले, "काय वाईट नशीब!" त्या शहाण्या बापाने उत्तर दिलं, "त्याला तुम्ही वाईट नशीब का म्हणता?" काही दिवसांनी त्याचा घोडा इतर दहा घोड्यांसह परत आला. सगळे शेजारी म्हणाले, "काय छान नशीब!" शहाणा बाप म्हणाला, "तुम्ही त्याला चांगलं नशीब का म्हणता?" काही दिवसांनी त्याचा ताकदवान मुलगा एका नवीन घोड्याला वठणीवर आणण्यासाठी गेला आणि त्याला घोड्याने फेकून दिल्यामुळे त्याच्या कुल्ल्यांना मार बसला. सगळे शेजारी आले आणि म्हणाले, "काय वाईट नशीब!" शहाण्या बापाने प्रतिसाद दिला, "तुम्ही त्याला वाईट नशीब का म्हणता?" एका आठवड्यानंतर एक दुष्ट सेनापती त्या शहरात आला आणि सगळ्या शक्तिमान, धडधाकट शरीराच्या तरुण मुलांना एकत्र करून लढाईसाठी घेऊन गेला. त्याने ज्याला नेलं नाही तो होता – कुल्ल्यांना इजा झालेला मुलगा. लढाईमध्ये सगळे तरुण मारले गेले. जेव्हा ही बातमी

त्यांच्या शहरात पोहोचली तेव्हा सगळे शेजारी त्या बापाकडे धावत गेले आणि म्हणाले, "काय चांगलं नशीब!" आणि तो बाप म्हणाला, "नशीब? नाही. हे नशीब नाही! सगळ्या गोष्टी चांगल्यासाठी एकत्रितपणे काम करतात, अशा लोकांसाठी, ज्यांचं देवावर प्रेम आहे!" अशाही वेळा असतात जेव्हा गोष्टी खूप कठीण भासतात आणि ठरवल्याप्रमाणे गोष्टी घडत नाहीत. पण तुम्ही जर बारकाईने बघितलंत आणि श्रद्धा ठेवलीत, तर तुम्हाला दिसून येईल की प्रत्येक आशीर्वादाबरोबर एक ओझंदेखील असतं आणि प्रत्येक जबाबदारीबरोबर एक आशीर्वाद. प्रत्येक काळ्या ढगाला एक रुपेरी किनार असते – जर तुम्ही ती शोधायला आणि त्याच्यावरून काही शिकायला तयार असलात तर.

तुमची उद्दिष्टं एकदा निश्चित केलीत, मोठी स्वप्नं उराशी बाळगलीत, मार्गदर्शनपर पुस्तकांतून काय करावं याचा सल्ला मिळवला, की आयुष्य तुमच्या दिशेने एक वळणदार चेंडू फेकतं? योजनेत नसलेलं काहीतरी घडतं आणि तुमचा त्याच्यावर काहीही ताबा नसतो. काही लोक त्याला 'मर्फीचा नियम' म्हणतात आणि बाकीचे लोक फक्त जीवनाचा एक भाग समजतात. द रोड लेस ट्रॅव्हल्ड या पुस्तकातली पहिलीच ओळ तडाखा हाणते : 'आयुष्य कठीण आहे!' आयुष्याचा खेळ न्याय्य नसतो आणि कधीकधी आयुष्याला त्याची पर्वा असते असंही दिसत नाही. तुमच्याकडे अशा गोष्टी येतील ज्या खीळ घालतील, विचलित करतील आणि तुम्हाला मार्गातून दूर फेकतील. तुमच्या विचाराने जे करता येण्यासारखं आहे ते तुम्ही केल्यावर, तुमच्या पुढे अशी काही परिस्थिती निर्माण झाली, जिचं तुम्ही स्पष्टीकरण देऊ शकत नाही, अर्थ लावू शकत नाही किंवा ताबा ठेवू शकत नाही, अशा वेळेस तुम्ही काय कराल? **तुम्ही तरीही तग धरून राहा आणि तुमच्या श्रद्धेला जागृत ठेवा.**

ते जाण्यासाठीच आलंय!

लेस ब्राऊन एका सत्याबद्दल बोलतो की आयुष्य तुमच्या दुर्लक्षित बाजूवर प्रहार करेल आणि काही वेळेस खालीदेखील लोळवेल. पण

तो प्रहार सहन करण्याइतकी श्रद्धा तुमच्याकडे असली पाहिजे आणि हे जाणून घेतलं पाहिजे की भविष्याची भूतकाळाबरोबर तुलना होऊ शकत नाही. तुमच्यासाठी काही मोठ्या गोष्टी अस्तित्वात आहेत आणि आव्हानात्मक परिस्थितीवर मात करण्यासाठी तुमच्याजवळ श्रद्धा असली पाहिजे. शेवटी तो म्हणतो, 'तुमचा जर पाडाव झाला तरी तुम्ही पाठीवर पडण्याचा प्रयत्न करा. कारण जर तुम्ही वर पाहिलंत तर तुम्ही उठू शकता.' डॉ. जॉन ए. चेरी, मला घडविणाऱ्यांपैकी एक, हे टेंपल हिल्स, मेरीलँड इथल्या फुल गॉस्पेल एएमइ झिऑन चर्चचे पाद्री आहेत. ते अमेरिकेतलं एक सर्वांत मोठं आणि जगातलं दुसऱ्या क्रमांकाचं मेथॉडिस्ट चर्च आहे. एवढ्या मोठ्या भक्तजनांच्या संख्येचं चर्च उभं करणं, प्रवचनं देणं या कामाला बरीच आव्हानं असतात. त्यांच्या प्रवचनात त्यांनी आपल्याबरोबर हा अनुभव वाटून घेतलाय की आपण जर यश मिळवण्याचा नेटाने प्रयत्न करणार असलो, तर प्रथम हे समजून घेणं आवश्यक आहे की बायबल आपल्यापुढे बरीच सत्यं आणि धागेदोरे ठेवतं. ते या सत्याबद्दल बोलतात की जेव्हा तुम्ही आयुष्यात पुढे जाता आणि देवाने तुम्हाला जे नेमून दिलंय, त्या कामात तुम्हाला प्रश्नं आणि आव्हानं येतील. त्या आव्हानांचा सामना करण्यासाठी तुम्हाला एका श्रद्धेची, फार मोठ्या श्रद्धेची गरज भासेल. सगळ्या बायबलमध्ये आपल्याला 'इट केम टू पास' हा शब्दप्रयोग आढळतो. बऱ्याच लोकांना असं वाटतं की काहीतरी घडलंय किंवा घडणार आहे असा त्याचा अर्थ आहे. गोष्टी घडून जाणार आहेत असा त्याचा अर्थ आहे. गोष्टी घडतील, पण ते सर्व नाही. आता असं बघा, आव्हानात्मक आणि अवघड गोष्टी जेव्हा आयुष्यात घडतात, तेव्हा बाकीची गोष्ट समजावून घेण्याइतकी श्रद्धा आपल्याकडे असलीच पाहिजे. जेव्हा ते 'केम टू पास' घडून जाईल, ते पुढे जाईल, ते टिकण्यासाठी आलेलं नाही.

प्रत्येकाच्या आयुष्यात आव्हानं येतील, जी विश्वासाची परीक्षा घेतील, निश्चयाची परीक्षा घेतील. तरीही, जेव्हा आव्हानं येतात तेव्हा ती कायम टिकण्यासाठी येत नाहीत, ती पुढे निघून जातात. फक्त विश्वास ठेवण्याइतकी श्रद्धा जर आपल्याकडे असेल, तर आपण आपला विकास

करू शकतो. कारण ती परिस्थिती आणि तो विश्वास हा विजेत्यांना 'विजेते होऊ इच्छिणाऱ्यां'पासून वेगळं करेल. आपल्या सर्वांना आव्हानं पेलावी लागतात. अडचणी सर्वांनाच येतात, फक्त लक्षात ठेवा, की त्या 'निघून जाण्यासाठी' येतात, टिकून राहण्यासाठी येत नाहीत! श्रद्धा ठेवा आणि टिकून राहा, कारण संकटं फक्त आली होती... निघून जाण्यासाठी!

या वेळा अशा आहेत, जेव्हा तुम्हाला तुमची आंतरिक शक्ती एकवटावी लागते. ज्यामुळे तुम्हाला त्या अडचणींवर मात करायला मदत होईल. अशी आंतरिक शक्ती, जी तुमच्या श्रद्धेचा एक सरळ परिणाम आहे. ती एक देवावरची श्रद्धा आहे जी तुम्हाला जगवते आणि टिकवून ठेवते. जेव्हा तुम्हाला सगळ्या बाजूंनी तोंडघशी पाडण्यात आलेलं असतं, जेव्हा बाकीचं सगळं अपुरं असतं; तेव्हा श्रद्धेमुळेच तुम्हाला दिलासा मिळतो की या सगळ्या परिस्थितीतून तुम्ही टिकून राहाल एवढंच नाही, तर तुम्ही अधिक जोमाने वाढाल. मी रुग्णाला त्याच्या समाधानासाठी देण्यात येणाऱ्या प्लॅसिबो – खोट्याखोट्या – गोळीसारख्या श्रद्धेबद्दल बोलत नाही, ती तुम्हाला फक्त शांत करते. मी एका गाढ श्रद्धेबद्दल बोलतोय, जिच्यामुळे तुम्हाला लढा देण्याची इच्छाशक्ती मिळते. अशी श्रद्धा जी तुम्हाला पुढे जात राहण्याचं धैर्य देते. परिस्थितीवर मात करण्याची स्फूर्ती देणाऱ्या श्रद्धेबद्दल आणि अडचणी असतानादेखील पुढेच जात राहण्याची ऊर्जा देण्याच्या श्रद्धेबद्दल मी बोलतोय.

आयुष्यातल्या इतर सगळ्या गोष्टींप्रमाणे श्रद्धा हा एक निर्णय आहे आणि सगळ्या निर्णयांप्रमाणे तो निर्णय घ्यायला फक्त एक मिनिट लागतं; तुमचं आयुष्य बदलायला फक्त एक मिनिट लागतं! बायबलमध्ये आपल्याला एक कथा वाचायला मिळते, ज्यामध्ये दोन चोर क्रॉसवर लटकवलेले असतात. नाझरेथच्या एका महान प्रेषिताकडे त्यांनी त्या क्रॉसवरून बघितलं, ज्याचं नाव येशू होतं आणि एक नवीन संदेश इस्रायलच्या लोकांना शिकवल्यामुळे त्याला क्रॉसवर चढवण्यात आलं होतं. एक ओरडतो, ''तर मग तू म्हणतोस की तू प्रेषित आहेस? जर तू प्रेषित आहेस तर त्या क्रॉसवरून खाली उतरून स्वतःला वाचवत

का नाहीस? आणि तसं करत असताना आम्हालादेखील का वाचवत नाहीस?'' मग दुसरा चोर म्हणतो, ''मूर्खा, तू शांत का बसत नाहीस? तू कोणाशी बोलतोयस, कळत नाही का तुला?'' मग तो येशूकडे, येशू ख्रिस्ताकडे वळतो आणि म्हणतो, ''येशू, जेव्हा तू तुझ्या साम्राज्यात प्रवेश करशील, तेव्हा कृपा करून माझी आठवण ठेव.'' आणि येशू उत्तर देतो, ''तुम्ही आज माझ्याबरोबर स्वर्गात असाल. हे माझं तुम्हाला गंभीरपणे दिलेलं वचन आहे.'' (ल्यूक : २३-३९-४१ द *लिव्हिंग बायबल*)

हा एक निर्णायक क्षण आहे, कारण फक्त एका मिनिटात एका चोराने एक आयुष्य बदलवून टाकणारी विनंती केली. त्या एका मिनिटात त्याचं आयुष्य अनंतकाळपर्यंत बदललं. त्याचं आयुष्य बदलायला फक्त एक मिनिट पुरेसं झालं, कारण त्याच्यापेक्षा एक मोठी शक्ती आहे, जी त्याचं आयुष्य बदलू शकते, तिच्यावर त्याने विश्वास ठेवला. त्याच्या श्रद्धेमुळे त्यानं तोंड उघडलं आणि एक प्रश्न विचारला, ज्यामुळे त्याचे आयुष्य बदललं.

विचारा

तुमची स्वप्नं प्रत्यक्षात यावीत, म्हणून बरेच वेळा तुम्हाला मदतीची गरज भासेल. तुम्हाला कोणाच्यातरी मदतीची गरज भासेल. बरेच वेळा तुम्हाला मदत करण्यासारखी व्यक्ती फार दूर नसते, खरं म्हणजे तुमच्या आवाक्यात असते. पण बरेच लोक अशा मदतीची विचारणाच करत नाहीत. त्यांना नकार मिळण्याची एवढी भीती असते आणि एवढा अनाठायी अभिमान असतो की ते मदत मागणं नाकारतात. असे बरेच लोक असतात जे मदत द्यायला तयार आणि इच्छुक असतात, पण त्यांना कोणी विचारतच नाही. हे, हायस्कूल सुंदरी प्रॉम शोला एकटीनं जाण्यासारखं आहे, कारण तिला जोडीदार मिळाला नव्हता. शेवटी वर्गातल्या एका पुस्तकी किड्याने विचारलं आणि ती त्याच्याबरोबर प्रॉमला गेली. इतर मुलांना तिला डेटसाठी विचारण्याची भीती वाटत होती. कारण तिला बऱ्याच जणांच्या विनंत्या आल्या असतील आणि ती त्यांचं आमंत्रणं फेटाळून लावेल असं

त्यांनी गृहीत धरलं. त्या पुस्तकी किड्याला वाटलं की विचारण्यात त्याचं नुकसान होईल असं काहीच नव्हतं, म्हणून मग त्याने तिला आमंत्रित केलं. त्याने विचारलं आणि तिने 'हो' म्हटलं, कारण दुसऱ्या कोणीही तिला विचारलंच नाही. त्या परिसरात तो एक मोठा माणूस ठरला, केवळ एका सौंदर्यसम्राज्ञीची सोबत केली म्हणून नव्हे, तर त्याच्यात ते विचारण्याची हिंमत होती म्हणून शेवटी तो तिचा प्रियकर झाला आणि नंतर पती! तुम्हाला जर आयुष्याकडून काही मिळवायचं असेल तर तुमची ते मागण्याची इच्छा असली पाहिजे. श्रद्धा ठेवा, स्वतःवर विश्वास ठेवा आणि मग त्या विश्वासावर कृती करण्याची इच्छा ठेवा. मागा आणि तुम्हाला ते मिळेल! शोध घ्या आणि तुम्हाला ते मिळेल! तुम्हाला जर मिळवायचं असेल तर तुम्ही मागितलं पाहिजे! सगळ्या गोष्टी शक्य आहेत हे लक्षात ठेवा, फक्त जर तुम्ही विश्वास ठेवाल तर!

मॅथ्यू ७.७ मध्ये म्हणलंय, 'मागा आणि ते तुम्हाला मिळेल, शोधा आणि तुम्हाला ते सापडेल. ठोठवा – आणि ते तुमच्यासाठी उघडण्यात येईल. जो कोणी मागतो त्या प्रत्येकाला देण्यात येतं आणि जो शोध घेतो त्याला ते सापडतं आणि ठोठावतो त्याच्यासाठी दरवाजा उघडण्यात येतो.' तुम्ही जसा विश्वास ठेवाल, तसं तुम्हाला वागवण्यात येईल! तुम्ही एक क्षण वेळ काढाल आणि त्या पवित्र वचनांकडे जवळून बघाल, तर तुम्हाला नेहमीच एक कृती करण्याची आज्ञा आढळेल. जिचा संदर्भ तुम्हाला काय मिळेल याच्याशी असतो.

मागा आणि तुम्हाला मिळेल, विचारणं म्हणजे तुम्हाला काय पाहिजे ते माहीत असणं, ते मागायची इच्छा असणं आणि ती इच्छा दुसऱ्यांपर्यंत पोहोचवणं. शोधा आणि तुम्हाला ते सापडेल. शोधणं याचा अर्थ असा की कृती करण्याची तुमची इच्छा आहे. त्याचा शोध घेण्याच्या शेवटी, ठोठवा आणि तुमच्यासाठी दरवाजा उघडण्यात येईल. ठोठावणे म्हणजे ठोठावण्याची तुमची इच्छा आहे आणि ठोठावतच राहा, आग्रह धरून सातत्याने अथक प्रयत्न करण्यासाठी.

या प्रत्येक वचनामध्ये एक कृती करण्याची आज्ञा आहे. काहीतरी असं जे आपल्याला करावं लागणार आहे. म्हणजे त्या वचनाचा दुसरा

भाग सत्यात येईल. आपण काही कृती केली पाहिजे, आपल्या श्रद्धेचं दर्शन घडवलं पाहिजे, काही विश्वास दाखवला पाहिजे. आपण संपूर्ण आणि उत्तम आशीर्वाद प्राप्त करायला पात्र आहोत त्याचा अनुभव घेण्यासाठी.

'मागा आणि तुम्हाला मिळेल. शोधा आणि तुम्हाला सापडेल. ठोठवा म्हणजे दरवाजा उघडला जाईल.' उलटपक्षी, तुम्ही जर मागितलं नाहीत तर तुम्हाला बहुतेक मिळणार नाही. तुम्ही जर शोधलं नाहीत तर सापडणार नाही आणि ठोठावला नाहीत तर बहुतेक तुमच्यासाठी दरवाजा उघडला जाणार नाही. जर आयुष्यात काहीतरी मिळवायचं असेल तर तुम्हाला कृती करावी लागेल. आणि मी तुमच्याबद्दल म्हणतोय, तुम्हालाच. जर काही परिणाम पाहिजे असतील तर काहीतरी कृती केली पाहिजे. दैवी वचनं दर्शवतात की श्रद्धेबरोबरच आपण काही वैयक्तिक जबाबदारीदेखील उचलली पाहिजे आणि आपली श्रद्धा व्यक्त व्हावी, कार्यान्वित व्हावी यासाठी काहीतरी कृती केली पाहिजे. वॉली अमोस, द कुकी किंग असं म्हणतो की तुमच्याकडे श्रद्धा, एकाग्रता आणि पुढे जाण्याची क्षमता असली पाहिजे. तो म्हणतो, देव ही काही एकांगी कल्पना नाही आणि त्यामुळे आपल्याकडे आपल्या स्वप्नांवर विश्वास ठेवण्याची श्रद्धा असली पाहिजे, आपल्या स्वप्नांवर आपली ऊर्जा एकवटण्याची एकाग्रता, तसंच पुढे जात राहण्यासाठी योग्य ती कृती करण्याची, स्वप्नं सत्यात यावीत यासाठी योग्य ती कृतिशील पावलं टाकण्याची श्रद्धा असली पाहिजे. एका मित्राने मला सांगितलं, 'श्रद्धा म्हणजे केवळ सत्य नव्हे, तर ती एक कृतीदेखील आहे.' श्रद्धा जर प्रभावी करायची असेल, तर तुम्ही कृती केली पाहिजे कारण 'कामाशिवाय श्रद्धा मृत आहे!' तुमच्या श्रद्धेवर, कृती करा, त्यासाठी प्रयत्न करा!

पोहोचण्यासाठी प्रयत्न करा
डॅनी मॅक्‌क्रिमॉन यांची रचना

तुम्हाला जर आध्यात्मिक आशीर्वाद पाहिजे असतील,
तर तुम्ही अपेक्षेने या

तुम्ही जसा प्रयत्न कराल, प्रयत्न कराल त्यासाठी ते प्राप्त करायला श्रद्धेने
तुमच्या आत्म्याला जर ते मिळवायची गरज असेल तुमच्या
प्रयत्नांकडून तुम्हाला शक्ती मिळेल,
तुम्ही जसा प्रयत्न कराल, प्रयत्न कराल श्रद्धेने ते मिळवण्यासाठी
पोहोचा त्याच्यापर्यंत, फक्त पोहोचा त्याच्यापर्यंत
देवाकडे तुमच्यासाठी एक आशीर्वाद आहे
तुम्हाला जे करायचंय ते म्हणजे फक्त त्याच्यापर्यंत पोहोचा
तेव्हा देव पुढे करेल त्याचा हात, तुम्हाला आशीर्वाद देण्यासाठी...

'जे स्वत:ला मदत करतात, त्यांना देव मदत करतो.' हे वचन आपण सर्वांनी ऐकलंय. हे दैवी वचन आहे असं मानण्यात येतं, पण खरं म्हणजे हे विधान बेंजामिन फ्रँकलिनने केलं होतं! ते जरी बायबलमधलं नसलं तरी त्याला बायबलचा वैशिष्ट्यपूर्ण संदर्भ आहे. तुमच्याकडे विश्वास ठेवण्याची श्रद्धा असेल, तर तुम्ही तुमच्या आयुष्यात देवाने काहीतरी घडवावं यासाठी त्या दैवी शक्तीला मुक्त करू शकता. ते दुसऱ्या एका जुन्या म्हणीप्रमाणे आहे, जी बायबलमधली नसली तरी त्याला श्रद्धेचं वैशिष्ट्य आहे, 'तुम्ही जर एक पाऊल टाकलंत, तर देव दोन पावलं टाकेल' आपल्याकडे श्रद्धा असली पाहिजे आणि त्या श्रद्धेप्रमाणे आपण कृती केली पाहिजे. आपण पूर्णपणे भरलेलं माप मिळविण्यासाठी पात्र आहोत. श्रद्धा हे एक सत्य आहे आणि एक कृतीदेखील आहे! तुमच्या श्रद्धेप्रमाणे कृती करा.

जोमाने काम करा, हुशारीने काम करा, देवावर विश्वास ठेवा

आपण खूप काम करण्याबद्दल, प्रामाणिक धडपड करण्याबद्दल, आपल्या उद्दिष्टांशी बांधिलकी ठेवण्याबद्दल आणि नशीबावर अवलंबून न राहण्याबद्दल बोललो आहोत. कारण नशीबाची व्याख्याच आहे की, संधी आणि पूर्ण तयारी यांचा मिलाफ. खूप काम केल्याने यश मिळतं, पण चलाखीने काम करणं हेदेखील महत्त्वाचं आहे. आपल्या कामाचा विचार करणं, योजना आखणं आणि संघटित असणं यामुळे तुमच्या

प्रयत्नांचे सर्वाधिक फायदे मिळू शकतात. देवावर विश्वास हा सर्वांत महत्त्वाचा घटक आहे हे लक्षात ठेवा. तुमची तयारी झाली आहे आणि यश मिळवण्यासाठी तुम्ही सज्ज आहात असं तुम्हाला वाटत असलं, तरी आयुष्य तुम्हाला काही वाकडी वळणं दाखवेल, तुमचा पाडाव करेल, खीळ घालेल, विचलित करेल, मार्गावरून बाजूला हटवेल. तरीही तुमच्या मनात ही खूणगाठ बांधा की जर देव तुमच्या पाठीशी असेल तर सगळं जग जरी तुमच्या विरोधात गेलं, तरीही तो त्यांच्यापेक्षा अधिक महान आहे! श्रद्धा असेल, खोलवर रुजलेली श्रद्धा असेल तर पराभव अशक्य. एका तत्त्ववेत्त्याने म्हटलंय, ''प्रार्थना अशी करा, जसं काही सगळं देवावर अवलंबून आहे आणि काम असं करा, जसं काही सगळं तुमच्यावर अवलंबून आहे! जोमाने काम करा, हुशारीने काम करा आणि देवावर विश्वास ठेवा!''

खूप काम केल्याचा फायदा होतो

'भव्य प्रेरणादायी मिनिट' आवडलं म्हणून मला एका मैत्रिणीचा फोन आला. तिच्या आईकडून ऐकलेली एक म्हण ती मला सांगू इच्छित होती. ज्या म्हणीमुळे तिला तिच्या उद्दिष्टांपर्यंत पोहोचायला मदत झाली होती. तो संदेश होता 'खूप केलेले कष्ट उपयोगी पडतात.' 'हार्ड वर्क'ला पर्याय नाही. पाण्याबरोबर जसं ओलं, आगीबरोबर जशी उष्णता, तसा अपार कष्ट आणि यश यांचा संबंध आहे; त्यांचा संबंध अविभाज्य आहे. नशीब किंवा चांगलं ग्रहमान याचा परिणाम म्हणजे यश नव्हे तर खूप कष्ट. कोणीतरी एकदा म्हणालं, ''मी नशिबावर गाढ विश्वास ठेवणारा माणूस आहे. मी जेवढं अधिक काम करतो, तेवढं ते अधिक फळफळतं.'' 'कठोर परिश्रमातून सुबत्ता येते, टिवल्याबावल्या केल्या तर गरिबी' अशी म्हण आहेच. विल्यम पेनने लिहिलंय, "No pain, no palm; No Throne, No throne; No gall, No glory; No cross, No crown!" (म्हणजेच टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही) खूप कष्ट करा आणि तुम्ही फक्त विश्वास ठेवला तर सगळं काही शक्य आहे, हे लक्षात ठेवा.

वैयक्तिक संपन्नता वाढवण्यावर श्रद्धा असणं ही काही नवीन संकल्पना नाही, पण कित्येक वर्षं फार कमी लोकांना हे समजलं की त्याचा संबंध यशाशी आहे. बहुतेक लोकांनी श्रद्धेची संकल्पना फक्त आध्यात्मिक संपन्नतेशी संबंधित आहे, असा मर्यादित विचार केला. एखादा व्यवसाय चालवण्याशी किंवा यशाची यंत्रणा राबवण्यासाठी त्याचा विचार केला गेला नव्हता. निव्वळ प्रयत्न करणं किंवा टिकून राहणं, याच्या पलीकडे श्रद्धेचा विचार करण्यात आला नव्हता. खरं म्हणजे भरभराट होण्याशी, आध्यात्मिक धन आणि सुबत्ता याबरोबर तुमची शारीरिक संपत्ती आणि सुबत्ता यांचीही वाढ करण्याचा, श्रद्धा हा एक मार्ग आहे. अशी एक नवीन विचारप्रणाली या शतकात उदयाला आली. डॉ. नॉर्मन व्हिन्सेंट पिल यांच्यासारख्या धर्मोपदेशकांच्या कामातून ही संकल्पना लोकप्रिय करण्यात आली आणि नंतर डॉ. रॉबर्ट शूलरसारख्या लोकांनी तिचा विस्तार केला. श्रद्धेतून सुबत्ता ही संकल्पना नंतर केनेथ कोपलँड आणि डॉ. फ्रेडरिक के. सी. प्राईस यांच्यासारख्या धर्मोपदेशकांनी विस्तारित केली.

द पॉवर ऑफ पॉझिटिव्ह थिंकिंग या पुस्तकात डॉ. नॉर्मन व्हिन्सेंट विल यांनी दाखवून दिलंय की एका सकारात्मक मानसिक दृष्टिकोनाने, मनाच्या एका योग्य अवस्थेने, फक्त एका साध्या प्रार्थनेतून उद्युक्त केल्याने एखाद्या माणसाला या पृथ्वीतलावर आध्यात्मिक आणि आर्थिक यश निर्माण करता येईल. डॉ. पील यांनी एका साध्या, तरीही अर्थपूर्ण संदेशावर भर दिलाय - तो 'स्वर्ग सुख' असा आदर्शवाद नव्हता, तर प्रार्थनेद्वारा यश आणि ईप्सित-सिद्धी अशी धार्मिकता होती.

बायबलमधील स्वप्नाळू

कोणत्या प्रकारची स्वप्नं तुम्ही बघावीत? ते किती मोठं असावं? तुमचं स्वप्न तुमच्यापेक्षा मोठं असावं, जे तुमच्यावर वरचष्मा गाजवत आणि तुम्हाला पूर्णपणे पकडून टाकतं. तुम्ही जर बायबलवर नजर टाकाल तर तुम्हाला असं आढळेल की ज्यांनी त्यांची स्वप्नं स्वीकारली, त्यांना अशक्य गोष्टी करणं शक्य झालं होतं. जेकब, जोसेफ, डॅनिएल आणि जॉन ही अशी काही उदाहरणं आहेत. हे असे लोक होते, ज्यांच्याबरोबर

देवाने स्वप्नं वाटून घेतली. ते लोक स्वप्नांनी त्यांना यशाकडे न्यावं यासाठी तयार होते. 'मी माझा आत्मा सगळ्या जिवंत माणसांवर ओततो आणि तुमच्या मुली भविष्यवाणी उच्चारतील, तुमचे वृद्ध लोक स्वप्नं बघतील आणि तुमची तरुण मुलं पुढे काय होणार ते बघतील.' स्वप्नं बघायचं धारिष्ट्य करा आणि यशस्वी व्हायचं धैर्य दाखवा.

तुम्हाला जर मोठे परिणाम पाहिजे असतील आणि काहीतरी मिळवायचं असेल, तर गाढ श्रद्धा असणं आवश्यक आहे. आयुष्य स्वभावत:च कठीण आहे. काही वेळा अशा येतील, जेव्हा तुमची श्रद्धा ही एकच अशी गोष्ट असेल ज्यामुळे तुम्ही तग धरून राहाल. शेवटाकडे जाण्यापासून तुम्हाला वाचवू शकणारी फक्त तीच एक गोष्ट असेल. आयुष्य हे एक सुंदर आणि रोमांचक साहस बनू शकेल. पण ते सर्व तुमच्यावर अवलंबून आहे. आत्मविश्वास, निश्चय, ठामपणा आणि गाढ श्रद्धा यांनी भरलेलं एक मोठं स्वप्न, हे तुमचं आयुष्य कधीही अनुभवलं नसेल असं एक फार सुंदर साहस बनवतील. पण तुम्ही सर्व घटकांचा वापर केला पाहिजे आणि ते शक्य आहे याच्यावर विश्वास ठेवला पाहिजे.

संकटांनी खचून जाऊ नका

एकदा का तुम्ही तुमचं उद्दिष्ट निश्चित केलंत आणि त्याच्या पूर्तीसाठी मार्ग आक्रमायला सुरुवात केलीत, की तुम्हाला नक्कीच अडचणी येतील. काही अडथळे येतील, पण त्यांनी तुमचं नीतिधैर्य खचून देऊ नका. इजिप्तमधून मोझेसने जेव्हा हिब्रू मुलांना बाहेर आणलं, तेव्हा त्याने त्या देशाची पाहणी करण्यासाठी बारा हेरांना पाठवलं. त्यापैकी दहा जणांनी परत येऊन सांगितलं की त्या देशात दूधदुभतं आणि मध यांची सुबत्ता आहे, पण तिथे राक्षसदेखील आहेत. त्या दहा हेरांना काम सोडून द्यायचं होतं, कारण त्यांना वाटलं की त्या राक्षसांच्या तुलनेत ते एखाद्या टोळासारखे होते. फक्त दोन जणांनी देवावर विश्वास ठेवला. त्या राक्षसांमुळे त्यांचं मानसिक खच्चीकरण झालं नाही, कारण त्यांचा देवावरचा अधिक मोठा विश्वास होता. देवावर विश्वास ठेवण्याची

त्यांची तयारी होती आणि त्या जमिनीवर स्वामित्व गाजवता येईल असं म्हणायला ते तयार होते. अडथळ्यांनी हतबल होऊ नका. जेव्हा देव तुमच्या बाजूचा असतो, सगळं जग जरी तुमच्या विरोधात गेलं तरी तो त्यांच्यापेक्षा महान असतो.

बायबलमधलं माझं एक आवडतं वचन डॉयटरनॉमी प्रकरण ३० मधून घेतलंय. जिथे असं लिहिलंय, 'तुमच्याविरुद्ध साक्ष देण्यासाठी मी आज स्वर्ग आणि पृथ्वीला बोलावतो, आज मी तुम्हाला जीवन आणि मृत्यू, आशीर्वाद किंवा शाप यांच्यासमोर ठेवलंय. म्हणजे तुम्ही आणि तुमची मुलं जगू शकाल असं आयुष्य निवडाल!' आपण आनंदी राहण्याची निवड केली पाहिजे, निरोगी राहणं निवडलं पाहिजे. सुरक्षित राहण्याची निवड केली पाहिजे आणि धनवान असणं निवडलं पाहिजे. निवड असं मी का म्हणतो? कारण यश ही एक निवड आहे, एक योगायोग नव्हे.

तुमच्या आशीर्वादांची मोजदाद करा

आयुष्यात तुम्हाला अडचणी येणार आहेतच. कोणीतरी असं म्हटलंय की आयुष्यात एकतर तुम्हाला प्रश्न आहेत, नुकताच तुम्ही एखादा प्रश्न सोडवताय किंवा एखाद्या नव्या प्रश्नाकडे तुमची वाटचाल चालू आहे. पण तुम्ही तुमच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करणार की तुमच्या आशीर्वादांवर, याचा तुम्ही निर्णय घेतलाच पाहिजे. मी असं सुचवतो की तुमचे आशीर्वाद मोजण्याची तुम्ही बांधिलकी असली पाहिजे आणि तुमचे प्रश्न मोजण्याची नव्हे. दुर्दैवाने, बहुसंख्य लोक त्यांचे प्रश्न मोजतात आणि मिळालेल्या आशीर्वादांकडे दुर्लक्ष करतात, जे प्रश्नांपेक्षा नेहमीच अधिक असतात. मी ह्या गोष्टीबद्दल एवढं खात्रीने कसं बोलू शकतो? कारण तुम्ही आत्ता पुस्तक वाचताय, ज्याचा अर्थ तुम्ही अजूनही जिवंत आहात आणि वाचायला समर्थ आहात. मी तुम्हाला या गोष्टीची खात्री देतो की, आता याक्षणी असे लाखो मृत लोक असतील, जे तुमच्या प्रश्नांसकट तुमच्या जागी असण्यासाठी काहीही करायला तयार होतील. कारण जर तुम्ही जिवंत असाल, तर तुम्हाला आशीर्वाद

आहेत आणि तुमच्याकडे वाचनाची, बघण्याची, ऐकण्याची आणि कल्पना दुसऱ्यापर्यंत पोहोचवण्याची क्षमता आहे. तुमच्याकडे भरपूर पैसा किंवा खूप साधनसंपत्ती नसेल, पण तुम्ही जिवंत आहात; त्यामुळे तुम्ही भूतकाळात गोष्टी जशा होत्या त्या बदलण्यासाठी काही निर्णय घ्यायला अजूनही समर्थ आहात आणि त्या निर्णयांमुळे भविष्यकाळात गोष्टी अधिक चांगल्या घडू शकतील. जोपर्यंत तुम्ही जिवंत आहात, तोपर्यंत तुमची सरशी आहे! तुमचे प्रश्न नव्हे तर तुमचे आशीर्वाद मोजा. एका मित्राने मला एक चिठ्ठी पाठवली. ज्याच्यात म्हटलं होतं, 'जेव्हा तुमची किंमत काहीही नसते, तेव्हा देव काहीतरी घडवत असतो! लक्षात ठेवा, जेव्हा डोक्यावरून पाणी जातं तेव्हाही तुम्ही देवाच्या पायाखालीच असता!' तुमच्या आशीर्वादांची मोजदाद करा!

देवावर श्रद्धा ठेवल्यानंतर आपण स्वतःवरच्या गाढ विश्वासातून ती श्रद्धा पुढे नेली पाहिजे. इतर लोकांना ज्या गोष्टी अशक्य किंवा अघटित वाटतात, त्या मिळवणं शक्य आहे यावर तुम्ही विश्वास ठेवलाच पाहिजे. तुमचा आत्मविश्वास वाढवणारा विश्वास तुमच्याकडे असावा, उद्धटपणा मात्र नसावा. या क्षणाला ते दिसू शकत नाही पण भविष्यकाळात शक्य होऊ शकेल असा विश्वास ठेवणं म्हणजे श्रद्धा.

श्रद्धेला वेगवेगळी नावं आहेत असं नव्हे, तर श्रद्धेचे वेगवेगळे आकार आणि पातळ्यादेखील आहेत. काही लोक असे असतात ज्यांची श्रद्धा छोटी असते, तर काही लोक असे असतात ज्यांची श्रद्धा महान असते. तुमची श्रद्धा आणि स्वप्नं, डासाइतकी लहान असू शकतात किंवा हत्तीएवढी मोठी असू शकतात. एक डास एखाद्या पिल्लाचं प्रजोत्पादन करणं हे काही दिवसांत करू शकतो, पण एक हत्ती मात्र पिल्लाला जन्म द्यायला तेवीस महिने घेतो. तुम्हाला कोणत्या प्रकारची श्रद्धा आणि स्वप्नं पाहिजेत? एका रात्रीपुरती डासांएवढी छोटी स्वप्नं की हत्तीच्या आकाराची मोठी, प्रचंड स्वप्नं?

देवाची शक्ती त्यांच्या आयुष्यात कार्यरत व्हावी यासाठी असंख्य लोकांनी श्रद्धेचा उपयोग केल्याची उदाहरणं संपूर्ण बायबलमध्ये आहेत. त्यांना चमत्कारांचा अनुभव आला आणि देवाच्या शक्तीचे पुरावे

याचाही अनुभव आला. श्रद्धेवर कृती केली म्हणून हे चमत्कार केवळ बायबलमधल्या लोकांच्या आयुष्यात घडले नाहीत, तर अनेक वर्षं ते घडत राहिलेले आहेत आणि आजमितीलादेखील घडत आहेत!

मॅगी जॉन्सन

अलीकडेच टेक्सासमध्ये भाषण देण्यासाठी मी प्रवास करत होतो. त्या वेळेस मला एका लोभस तरुण स्त्रीला भेटण्याची संधी मिळाली, तिचं नाव होतं मॅगी जॉन्सन.

विमानात योगायोगानेच मॅगी माझ्या शेजारच्या आसनावर बसली होती (नशिबावर मी विश्वास ठेवत नाही हे मी तुम्हाला सांगितलंय). जेवण आश्चर्यकारकरीत्या चांगलं असल्यावरून आमच्यात संभाषण सुरू झालं. आम्ही दोघे किती प्रवास करत होतो याबद्दल आमचं संभाषण पुढे चालू राहिलं आणि बोलत असताना मला उमगलं की तिचं कामाचं वेळापत्रक माझ्यापेक्षाही अधिक धकाधकीचं होतं. एवढा वेग ती कसा काय ठेवू शकते? असं मी तिला विचारलं. तिने मला उत्तर दिलं की केवळ जिवंत असल्याबद्दल ती आनंदी होती त्यामुळे त्या वेगाबद्दल तिची काही तक्रार नव्हती.

तिने पुढे असंही सांगितलं की पाच वर्षांपूर्वी तिला तिसऱ्या टप्प्यावर असलेला स्तनांचा कर्करोग असल्याचं निदान करण्यात आलं होतं. ती तिशीच्या मध्यावर होती आणि तिच्याबाबतीत असं काही घडतंय - यावर तिचा विश्वासच नव्हता. तिला स्तनांच्या कर्करोगाचा कोणताही कौटुंबिक इतिहासदेखील नव्हता. ती व्यवस्थित जेवत खात होती आणि महत्त्वाचं म्हणजे कर्करोग व्हायला ती खूप लहान होती, असं तिला वाटत होतं. तिच्या चाचण्यांच्या निदानांप्रमाणे तिचा कर्करोग स्तनांतून लिम्फ नोड्सपर्यंत पसरला होता आणि बरा होण्याची शक्यता फार कमी होती. ती अजून फारतर दोन वर्षं जगेल असं सांगण्यात आलं होतं. मॅगीने त्यांचं भाकीत ऐकलं, पण तिच्याकडे भिस्त ठेवण्यासाठी दुसरं काहीतरी होतं - तिची देवावरची श्रद्धा. तिला किमान दहा केमोथेरपीचे आणि रेडिएशनचे उपचार लागतील असं सांगण्यात आलं होतं. मॅगीने

सकारात्मक विचार करणं चालू ठेवलं आणि देवावरही श्रद्धा ठेवली. पाच वेळा उपचार झाल्यानंतर मॅगी तिच्या नेहमीच्या तपासणीसाठी गेली आणि कर्करोगाची निशाणीदेखील आढळली नाही! डॉक्टरांचा या गोष्टीवर विश्वासच बसेना. आणखी सखोल चाचण्या घेण्यात आल्या आणि बायोप्सीदेखील करण्यात आली, पण कर्करोगाचं नामोनिशाण नव्हतं. पाच वर्षं होत आली आहेत पण कर्करोगाचं काहीही चिन्ह नाही. तो पूर्णपणे नाहीसा झाला आहे.

एका निराशाजनक परिस्थितीला सामोरी गेलेली मॅगी स्तनांच्या कर्करोगाच्या तिसऱ्या अवस्थेतून बरी झालेली आहे. त्या परिस्थितीतदेखील ती तिच्या आशावादाला आणि श्रद्धेला धरून राहिली. तिने कधीही हार मानली नाही. तिने मृत्यूच्या नजरेला नजर दिली आणि ती जिंकली. लक्षात ठेवा, जे लोक विश्वास ठेवतात त्यांच्यासाठी सगळं काही शक्य आहे.

कौटुंबिक श्रद्धा

डोरिस डीबो ही सुद्धा एक कर्करोगातून वाचलेली स्त्री आहे, पण तिच्या श्रद्धेची कहाणी खूप वेगळी आहे. ती माझी काही काळासाठी मैत्रीण होती. गेल्या काही वर्षांत तिनं हर्निया, पार्किनसन्स आणि कर्करोग अशा बऱ्याच आजारांना तोंड दिलं. १९८३मध्ये तिला कर्करोग असल्याचं निदान झालं. शस्त्रक्रिया करण्यात येऊन त्यानंतर तिला क्ष-किरण उपचार देण्यात आले. सहा वर्षांनंतर कर्करोगाने पुन्हा फुप्फुसात डोकं वर काढलं आणि नंतर तो गायब झाला. पाच वर्षांनंतर तिला स्तनांच्या कर्करोगासाठी शस्त्रक्रिया करून घ्यावी लागली. या सगळ्यात ती हताश झाली नाही. देवाचा तिच्या आयुष्यावर ताबा आहे अशी तिची श्रद्धा असल्याचं डिबो म्हणाली आणि जरी तिला कर्करोग असला तरी कर्करोगाने तिच्यावर ताबा मिळवलेला नाही. आयुष्याची मजा लुटत प्रत्येक दिवस परिपूर्णतेने जगण्याचा तिने निर्णय घेतला.

दरवेळी, उपचार करणं ह्याचा अर्थ आजार बरा करणं किंवा प्रश्नाचा बीमोड करणं असा होत नाही, हा तिचा विश्वास आहे. तिच्या परिस्थितीशी भयमुक्त आणि अस्वस्थ न होता तोंड देण्याची शक्ती तिला

देण्यात आल्याने ती बरी झाली. देवाने तिच्याकडे प्रश्न नव्हे, तर तो हाताळण्यासाठी शक्ती आणि कृपादृष्टी पाठवली असा तिचा विश्वास आहे. तिच्या या श्रद्धेमुळेच तिला पूर्ण शांती लाभली आहे!

तिच्या या श्रद्धेच्या केवळ तिच्याच आयुष्यात प्रभाव पडला असं नव्हे, तर तिच्या मित्र-मैत्रिणींवर आणि कुटुंबावरदेखील प्रभाव पडला. काही वर्षांपूर्वी तिच्या भावाला पोटाच्या रोगाने ग्रासलं आणि जगण्याची शक्यता फक्त पाच टक्के असल्याचं सांगण्यात आलं. ते त्याच्यासाठी करू शकतील असं दुसरं काहीही नसल्याचं अतिदक्षता विभागाच्या डॉक्टरांनी त्याच्या कुटुंबियांना सांगितलं. तिने तिच्या भावासाठी प्रार्थना करायला सुरुवात केली आणि तो बरा होणार आहे अशी श्रद्धा वाढवण्यासाठी विश्वास ठेवायला त्याला मदत केली. तिची श्रद्धा एवढी शक्तिशाली होती की इतरांना तिच्यामुळे ऊर्जा मिळाली. आज तिचा भाऊ घरी परतलाय, त्याच्या मुलाबाळांच्या आणि नातवंडांच्या सहवासाचा आनंद लुटत तो एक परिपूर्ण आयुष्य जगतो आहे. त्याच्या बरं होण्याच्या आनंदाप्रीत्यर्थ देण्यात आलेल्या एका मेजवानीला मी गेलो होतो आणि त्याने मला त्याच्या बहिणीच्या श्रद्धेमुळे शक्ती कशी मिळाली, तसंच सगळ्या कुटुंबाचं तिच्या श्रद्धेमुळे सबलीकरण कसं घडलं, हे सांगितलं. चमत्कार घडायचा असेल तर तुम्ही चमत्काराची अपेक्षा केली पाहिजे, असं ती म्हणाली. श्रद्धेच्या शक्तीचं डोरिस डिबो हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. तिचा विश्वास आहे की जिथे डॉक्टर्स संपतात तिथे देव सुरू होतो. ती केवळ श्रद्धेवर विश्वासच ठेवते असं नव्हे, तर ती श्रद्धेबरोबर चालत राहते! श्रद्धा म्हणजे...

गुरूचा स्पर्श

ज्याला जुनं सामान म्हणता येईल अशा मालाचा लिलाव चालू होता. लिलाव करणारा एका अतिशय जुन्यापुराण्या आणि भंगार दिसणाऱ्या व्हायोलिनपर्यंत पोहोचला. त्याने ते व्हायोलिन उचललं आणि बेसूर झालेल्या त्याच्या तारा छेडल्या. त्याने कपाळाला आठ्या घालून निरुत्साहाने त्या जुन्या, घाणेरड्या व्हायोलिनकडे बघितलं आणि दहा

डॉलर्सवर त्याची बोली लावली. ते घ्यायला कोणीही खरेदीदार नव्हते. त्याने ती किंमत पाच डॉलरपर्यंत खाली आणली, पण तरीही काहीच प्रतिसाद मिळाला नाही. पन्नास सेंटपर्यंत किंमत येईपर्यंत त्याने ती कमी करणं चालू ठेवलं. तो म्हणाला, ''पन्नास सेंट्स, केवळ पन्नास सेंट्स. त्याची किंमत फारशी नाही हे मला ठाऊक ठाऊक आहे, पण कोणीतरी ते पन्नास सेंट्सला घेऊ शकेल.'' त्या क्षणाला एक दाढीमिशा पिकलेला म्हातारा माणूस पुढे आला आणि ते व्हायोलिन तो हातात धरू शकतो का असं त्याने विचारलं. त्याने त्याचा रुमाल काढला आणि व्हायोलिनवरची धूळ पुसली. मग त्याने सावकाश तारा छेडल्या आणि काळजीपूर्वक प्रत्येक तार सुरांवर लावली. नंतर त्याने ते जुनं व्हायोलिन त्याच्या हनुवटीखाली धरलं आणि वाजवायला सुरुवात केली. मग बऱ्याच लोकांनी कधी ऐकलं नसेल असं अतिशय सुंदर संगीत त्या जुन्या व्हायोलिनमधून प्रकटलं. त्या जुन्या, विटलेल्या व्हायोलिनमधून सुंदर गाणी आणि भावपूर्ण संगीत ऐकू यायला लागलं. लिलाव पुकारणाऱ्याने मग बोली सुरू करायची किंमत विचारली. एक माणूस शंभर डॉलर्स म्हणाला आणि मग दुसऱ्याने दोनशे डॉलर्सची बोली लावली आणि मग ती बोली चढत चढतच गेली. शेवटी ते व्हायोलिन एक हजार डॉलर्सना विकलं गेलं. पन्नास सेंट्सनादेखील जे जुनं-पुराणं व्हायोलिन घ्यायला कोणी तयार नव्हतं त्या व्हायोलिनला हजार डॉलर्स! गुरूच्या हातात जर एखादी गोष्ट ठेवण्यात आली तर छोट्याशा, क्षुल्लक गोष्टीचं मोलही कितीतरी वाढतं, ते या कथेवरून दिसतं!

जेव्हा तुम्ही तुमची स्वप्नं आणि आकांक्षा देवाच्या हातात ठेवता, तेव्हा तुम्ही तुमच्या श्रद्धेवर जगत असता. श्रद्धा म्हणजे जेव्हा तुम्हाला ठाऊक असतं की देव आहे आणि तो आहे हे स्वीकारायला तुम्ही तयार असता आणि तो असल्याप्रमाणे जगता! आणि या खात्रीनुसार त्याने दिलेल्या स्वप्नांमागे तुम्ही पावलं टाकता. लेस ब्राऊनने म्हटल्याप्रमाणे, ''तुम्ही उडी टाकाल आणि तिथे जाळं येईल, ही खात्री असणं म्हणजे श्रद्धा!'' किंवा रोझिता पेरेझ म्हणते तसं, ''उडी मारण्याची आणि खाली येत असताना पंख फुटण्याची श्रद्धा ठेवा!''

बऱ्याच लोकांच्या आयुष्यात श्रद्धेचं स्थान कसं असू शकतं याची त्यांना खात्री नसते; पण कोणत्याही संशयाशिवाय माझी श्रद्धा हा माझा स्रोत, माझी मार्गदर्शक आणि माझी शक्ती आहे. बराच काळ माझ्या मी गोष्टी करण्याचा प्रयत्न केला, पण अत्यंत वाईट प्रकारे अयशस्वी झालो. फक्त जेव्हा मी देवावर विश्वास ठेवायला शिकलो आणि श्रद्धेनी कामासाठी बाहेर पडलो, तेव्हा माझ्या आयुष्यात किती आश्चर्यजनक गोष्टी घडू शकतात हे मला कळायला सुरुवात झाली. मी नम्र, निरोगी आणि भुकेलं राहावं अशी माझी नेहमीची प्रार्थना असते! मी निरोगी राहावं अशी मी प्रार्थना करतो, कारण आरोग्यापेक्षा दुसरं काहीही महत्त्वाचं किंवा मौल्यवान नाही. मी जर निरोगी असेन तर संपत्ती निर्माण करणाऱ्या गोष्टी करू शकेन. पण मी जर निरोगी नसेन तर उत्तम आरोग्य प्राप्त करण्यासाठी कोणतीही किंमत फार मोठी नसेल.

मी नम्र असावं अशी मी प्रार्थना करतो. प्रत्येक दिवशी मी नम्र असावं यासाठी प्रार्थना करतो, कारण जेव्हा मी उद्धट आणि गर्विष्ठ होतो, तेव्हा असं समजत होतो की मला मिळालेलं सगळं यश हे मीच मिळवलंय. माझ्या आयुष्यातलं सर्वांत लाजिरवाणं सादरीकरण मी केलं आणि जो महत्त्वाचा धडा शिकलो तो मी कधीही विसरणार नाही. मी जो उभा आहे तो स्फूर्ती देण्यासाठी, प्रभाव पाडण्यासाठी नव्हे, हे मी शिकलो आणि फुकटच्या भेटवस्तू जशा विनामूल्य वाटल्या जातात, तशाच त्या फुकट परतही घेतल्या जातात हेही शिकलो. देवाने माझा एका टेलिफोनसारखा उपयोग करावा. माझ्याशी बोलावं आणि माझ्या माध्यमातून बोलावं आणि माझा उपयोग संपला की पुन्हा गरज भासेपर्यंत मला बाजूला काढून ठेवावं.

शेवटी मी प्रार्थना करतो की मी भुकेलेलं असावं, स्वत:बद्दल समाधानी होऊ नये आणि नेहमीच माझ्यातलं चांगलं, अधिकाधिक उत्तम देण्याचा प्रयत्न करावा. मी उद्या जे काम करेन ते आज केलेल्या कामापेक्षा चांगलं असावं. मला आत्मसंतुष्ट व्हायचं नाही. माझ्यामध्ये पुढचा पर्वत ओलांडून जायची इच्छा नेहमीच असावी, मी कोण आहे आणि कोणाचा आहे ते मी विसरू नये!

लॅरी विंगेट या माझ्या मित्राला सांगायला आवडतं तसं, ''सर्वांत उत्तम गोष्टींची अपेक्षा करायला श्रद्धा शिकवते, वाईट गोष्टींसाठी तयारी करायला आणि सगळ्या गोष्टींचा उत्सव साजरा करायला श्रद्धा शिकवते!'' आयुष्याचा आनंद साजरा करा आणि श्रद्धेच्या बळावर पुढची पावलं टाकण्याची तयारी ठेवा! देव तुम्हाला कधीही सोडून देणार नाही किंवा त्याग करणार नाही ही एक आशीर्वादासह दिलेली खात्री आहे!

पाऊलखुणा

एका माणसाला एका रात्री एक स्वप्नं पडलं. देवाबरोबर तो एका किनाऱ्यावर चालत होता असं ते स्वप्न होतं. त्याच्या आयुष्यातले प्रसंग आकाशात झळकले. प्रत्येक प्रसंगाच्या वेळी त्याला वाळूमध्ये पावलांच्या ठशांचे दोन-दोन जोड दिसून आले, एक त्याचे आणि दुसरे देवाचे. त्याच्या आयुष्यातला शेवटचा प्रसंग जेव्हा त्याच्यापुढे झळकला तेव्हा त्याने वाळूतल्या पावलांच्या ठश्यांकडे पाहिलं. त्याला आढळलं की त्याच्या आयुष्यातल्या बऱ्याच प्रसंगांच्या वेळी तिथे पावलांचा फक्त एकच जोड होता. त्याच्या हेही लक्षात आलं की त्याच्या आयुष्यात घडलेल्या अत्यंत कठीण, अतीव दुःखद प्रसंगांच्या वेळी तसं घडलं होतं. अस्वस्थ होऊन त्याने देवाला त्याबद्दल प्रश्न विचारला, 'देवा, तुम्ही सांगितलंय की मी एकदा का तुमच्या मागे जाण्याचा निर्णय घेतला की तुम्ही मला कधीही सोडून जाणार नाही किंवा माझा त्याग करणार नाही. सगळ्या वाटचालीत तुम्ही माझ्याबरोबर असाल असं तुम्ही मला सांगितलंत. पण मी असं पाहातोय की माझ्या आयुष्यातल्या सर्वाधिक त्रासदायक वेळेला एकाच माणसाच्या पावलांचे ठसे आहेत. मला जेव्हा तुमची अत्यंत गरज होती, त्या वेळेला तुम्ही मला का सोडून दिलंय ते मला कळत नाही!'' देवाने उत्तर दिलं, ''माझ्या अनमोल मुला, मी तुझ्यावर प्रेम करतो आणि तुला कधीही सोडून जाणार नाही. तुझ्या त्रासाच्या आणि धकाधकीच्या काळात तुला पावलांचा जो फक्त एकच जोड दिसतोय... त्यावेळेस मी तुला उचलून घेतलं होतं.''

अनामिक लेखक

प्रकरण ९

आकाश हीच सीमा!

आकाश हीच सीमा!
ए एल जॉन्सन यांची पद्यरचना

तुम्ही स्वत:ला विचारता भविष्यात काय दडलंय तुमच्यासाठी
बातम्यांच्या मथळ्यांनी तुम्हाला घाबरवून सोडलंय
इतर प्रत्येकासारखी, तुम्हाला पाहिजे शांतता आणि सुख
पण ते इथे मिळू शकण्याची आहे का काही शक्यता?
तुम्ही कसं विसरू शकता?
या सगळ्या गोंधळातली फक्त एकच खात्रीची गोष्ट?
तुम्ही ज्याची इच्छा करता त्याची आधीच मिळालीय खात्री
निर्मात्याकडून आपल्या सर्वांना, ज्याच्यावर आहे आपला विश्वास!

आकाश हीच सीमा
तुम्ही जिथपर्यंत जाऊ शकता तिथपर्यंत घेऊन जाईल तुम्हाला तुमची श्रद्धा
तुमचं हृदय त्याच्यात ओता
तुमच्याकडे आहे शक्ती आणि हीच वेळ आहे ती दर्शवण्याची

तुम्ही ते सगळं ऐकलंय आधीच, पण ते वाटतंय अशक्य
कारण सगळं जग झालंय वेडं!
पण तुम्ही एकटे चालत नसता जेव्हा तुमच्या घरात असतो जगाचा स्वामी
जे काही वाईट असेल त्याचा प्रतिकार तो आहे

आता तिथे असतील ते संशयी
तुम्हाला सांगतील तुम्ही पाठलाग करताय एका आभासाचा
पण तुम्हाला ठाऊक आहे सत्य आणि ते सत्य देईल तुम्हाला मुक्ती
एखाद्या ताऱ्यासारखं वेगाने चमकायला
सगळ्या जगाला बघण्यासाठी

आकाश हीच सीमा
श्रद्धा घेऊन जाईल तुम्हाला, जिथपर्यंत तुम्हाला जायचंय!
तुमचं हृदय त्याच्यात ओता
शक्ती तुमची आहे आणि वेळ झालीय ते दर्शवण्याची

खरोखर आकाश हीच एक सीमा आहे. तुमचा विश्वास आणि श्रद्धा तुम्हाला उद्दिष्टांपर्यंत घेऊन जाईल. आव्हानं, अडथळे आणि अडचणी येतील, ज्या तुमच्या निश्चयाची परीक्षा बघतील; पण तुमची श्रद्धा असेल, विश्वास ठेवण्याची बांधिलकी असेल, तुमच्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्याची तयारी असेल, तर हे खरं आहे याचा तुम्हाला प्रत्यय येईल. खरोखरच आकाश हीच सीमा आहे! तरीही तुम्हाला ठरवावंच लागेल की उच्च स्थानावर पोहोचवण्याची तुमची इच्छा आहे किंवा नाही आणि किती उंचावर तुम्ही पोहोचू इच्छिता.

तुम्ही ते कशा प्रकारे व्यक्त करता, कोणत्या प्रकारे त्या गोष्टींकडे बघता, आयुष्यात एक विशिष्ट 'बॉटम लाईन' असते. मथितार्थ असा की तुम्ही विजयी व्हाल किंवा पराभूत, शेवटी ते सगळं तुमच्यावरच अवलंबून आहे. सगळं काही म्हणून आणि करून झाल्यावर (आणि सर्वसाधारणपणे कृतीपेक्षा बोललं जास्त जातं), यश ही एक निवड करायची गोष्ट आहे, योगायोगाची नव्हे. विल्यम सेनिंग्ज ब्रायंटने एक विधान केलंय, ''भवितव्य ही योगायोगाची नव्हे तर निवड करायची गोष्ट आहे. ती प्रतिक्षा करण्याची बाब नसून, प्राप्त करण्याची गोष्ट आहे.''

तुम्ही तुमची बोट किनाऱ्याला लागण्याची अजून वाट बघताय का?

बरेच लोक ते त्यांची बोट येण्याची वाट कशी बघतायत त्याबद्दल बोलतात. ते शांतपणे बसून राहतात आणि संधीची वाट बघतात. मी मला 'मोठी संधी' केव्हा मिळेल याची वाट बघत नाईटक्लबमध्ये माझी कला सादर करत होतो ते दिवस मला आठवतात. मी लोकांना नेहमीच असं बोलताना ऐकलंय, 'गात राहा, जोमाने गा आणि एक दिवस तुम्हाला कोणीतरी संधी देईल!' मी फक्त संधी मिळेल म्हणून वाट बघत राहिलो, पण ते कधीच आली नाही. मग मी शिकायला लागलो की यश ही एक निवड असते, योगायोग नसतो. मी असंही शिकलो की तुमचं भवितव्य घडवण्याचा सर्वांत उत्तम मार्ग म्हणजे प्रथम स्वतःला घडवलं पाहिजे. मी एक स्वयंविकासाचा कार्यक्रम सुरू केला आणि मी असंही ठरवलं की मला कोणीतरी मोठी संधी देईल याची मी वाट बघत बसणार नाही. मी स्वतःच माझी संधी घडवेन. माझ्यापुढे निवड होती –माझी बोट येण्याची वाट बघत बसायचं किंवा मग पोहून त्रोटीपर्यंत जायचं. मग मी बोटीपर्यंत पोहत गेलो आणि मी ते केलं याचा मला खूप आनंद होतोय, कारण माझे काही मित्र अद्याप गोदीतच उभे आहेत, वाट बघत. जोनाथन विंटर्सनी म्हटलंय, "मी यशाची वाट बघत राहिलो, पण ते मिळालं नाही, म्हणून मग मी त्याच्याशिवाय पुढे जात राहिलो." मित्रांनो, यश ही वाट पाहत राहण्याची गोष्ट नाही... ती एक प्राप्त करण्याची गोष्ट आहे! तुमची बोट येण्याची वाट बघत बसू नका, उडी मारा आणि तिच्यापर्यंत पोहत जायला सुरुवात करा. तुम्ही तसं केलंत याचा तुम्हाला आनंदच होईल.

एका हायस्कूलमध्ये भाषण दिल्यानंतर, स्वाक्षऱ्या देत विद्यार्थ्यांशी बोलत होतो. एक तरुण स्त्री शांतपणे वाट बघत थांबली होती. मग तिने विचारलं, "तुम्हाला यश मिळत नसेल तर काय करायचं?" मी प्रतिसाद दिला, "मग तुम्ही त्याच्या मागे गेलंच पाहिजे!" एक क्षणभर ती गोंधळलेली वाटली, मग तिचे डोळे चमकले आणि ती म्हणाली, "म्हणजे मी त्याची वाट बघत बसायला नको असा तुमच्या म्हणण्याचा अर्थ आहे? वा!"

त्या क्षणी मला समजून चुकलं की बऱ्याच लोकांचा यशासंबंधी एक मोठा गैरसमज असतो. त्यांना त्याबद्दल चुकीचं शिक्षण मिळालेलं असतं. सर्वाधिक लोक असं समजतात की यश ही अशी काहीतरी गोष्ट आहे जी योगायोगाने मिळते आणि तुम्ही एकतर नशीबवान असता किंवा नसता. मी हे ठासून सांगतो की यश हे असंच योगायोग म्हणून मिळत नसतं. तुम्ही एक निर्णय घेता आणि त्यावर कृती करता. आपण निर्णय घेतला पाहिजे आणि मग ते घडवलं पाहिजे! एक जुनी म्हण आहे, 'आयुष्याबद्दल एक गमतीची गोष्ट आहे. तुम्ही जर फक्त सर्वोत्तम गोष्टी व्यतिरिक्त इतर काहीही स्वीकारायला नकार दिलात तर पुष्कळदा तुम्हाला ते मिळतं.' त्या तरुण स्त्रीने मनाची एक नवीन बैठक घेऊन त्यादिवशी हायस्कूल सोडलं. ती यशाची वाट बघत थांबणार नव्हती, ती पुढे होऊन मिळवणार होती.

यश हा योगायोग नव्हे, ती एक निवड आहे

आपण म्हणतो की तुमच्या बाबतीत जे घडतं त्याची निवड तुम्ही करू शकत नाही, मग तुम्ही यशस्वी होण्याची निवड कशी करू शकता? तर बघा, प्रथम आपण यशाची व्याख्या करू. यशाचा निर्माता, थिंक अँड ग्रो रिच पुस्तकाचा लेखक नेपोलियन हिल यशाची व्याख्या 'योग्य अशा उद्दिष्टांची किंवा ध्येयाची सातत्याने होत राहणारी जाणीव' अशी करतो. सातत्याने होत राहणारी याचा अर्थ तुमच्या स्वप्नपूर्तीच्या दिशेने तुम्ही डोळ्यात भरण्यासारखी प्रगती करता आहात. सुयोग्य म्हणजे जे चांगलं आणि सकारात्मक आहे आणि समाजाला पूरक आहे. हिटलर यशस्वी होऊ शकला नाही कारण त्याचं स्वप्न दुष्टपणाचं आणि घातकी होतं. तो समाजविधायक असण्याऐवजी समाजविघातक होता. यश ही योग्य उद्दिष्ट किंवा ध्येयाची सातत्याने होत राहणारी जाणीव आहे. तुमच्या लक्षात आलं असेल, मी पैशांबद्दल काही म्हटलं नाही. कारण आपण आधीच असं म्हटलंय की पैशांवरून यश ठरत नसतं. काही यशस्वी मातापित्यांनी प्रामाणिक, कष्टाळू मुलांना वाढवण्याचं स्वप्न पाहिलं होतं आणि त्यांनी ते साध्यदेखील केलं. यशस्वी शिक्षक एक वेळ श्रीमंत नसतील, पण त्यांनी तरुणांचं आयुष्य एका सकारात्मक पद्धतीने घडवलं.

पण यश ही निवड कशी असू शकते? आयुष्यात बऱ्याच गोष्टी अशा असतात ज्या तुम्ही ताब्यात ठेवू शकत नाही. पण तुम्ही त्यांना कसा प्रतिसाद देता याच्यावर तुम्ही नियंत्रण ठेवू शकता. हवामान किंवा नैसर्गिक आपत्ती याच्यावर तुमचं नियंत्रण असू शकत नाही, पण तुम्ही त्यांना कसा प्रतिसाद देता ह्यावर ताबा ठेवू शकता. अर्थव्यवस्थेवर तुम्ही ताबा ठेवू शकत नाही, पण तिला तुम्ही कसा प्रतिसाद देता हे तुमच्या ताब्यात असू शकतं. यश हा योगायोग नव्हे, ती एक निवड आहे. ऱ्हाईनहोल्ड नायबुहर म्हणाले, ''देवा, ज्या गोष्टी बदलू शकणार नाहीत त्यांना शांतपणे स्वीकारायची शक्ती आम्हाला द्या, ज्या गोष्टींत बदल घडवून आणायची गरज आहे, त्या बदलण्याचं धैर्य द्या आणि एका गोष्टीपासून दुसरी गोष्ट वेगळी समजण्याचं शहाणपण द्या.'' आनंदी, निरोगी आणि धनवान असण्याची निवड करा आणि लक्षात ठेवा, जर तुम्ही विश्वास ठेवलात तर सगळ्या गोष्टी शक्य आहेत!

आपल्याबाबतीत काय घडेल हे आपण निश्चित करू शकत नाही, हे खरं आहे. प्रश्न आणि परिस्थिती आपल्याला सातत्याने आव्हान देत असते. पण त्या परिस्थितीला आपण कसे सामोरे जातो आणि काय प्रतिसाद देतो हे आपण निश्चित करू शकतो. आपण ज्या निवडी करतो त्याप्रमाणे त्याचे परिणाम आपल्याला मिळतात. ज्या निवडी आपण करतो ते आपल्या हातात असतं आणि शेवटी त्याची जबाबदारी आपल्याला घ्यावी लागते. आपण काय आहोत आणि कुठे आहोत हा आपण केलेल्या निवडींचा परिणाम असतो.

दोष ग्रहताऱ्यांचा नाही

''प्रिय ब्रूटस, दोष आपल्या ग्रहांत नव्हे तर आपल्यातच आहे, आपण एवढे दबलेले आहोत त्याचा!'' हे एक शेक्सपिअरचं वचन आहे. तरीही ते एक सर्वकालीन सत्य उघड करतं. आपल्या नशिबाची किल्ली आपल्याच हातात असते. माझ्या टेबलावर एक वचन लिहिलेलं आहे, जे ही गोष्ट उत्तमरीत्या सांगते आणि मी ती रोज वाचतो. 'एका ठरावीक

बिंदूपर्यंत प्रत्येकाचं आयुष्य, परिसर, वंशावळ, आनुवंशिकता, हालचाल आणि त्यांच्या भोवतालच्या जगात होणाऱ्या बदलांवर अवलंबून असतं. पण एक वेळ अशी येते की तुमच्या आयुष्याच्या मातीला, तुम्हाला जसा पाहिजे तसा आकार देणं तुमच्या हातात असतं. फक्त जे दुर्बल असतात, ते त्यांच्या पालकांना, त्यांच्या वंशाला, त्यांच्या काळाला, चांगल्या नशिबाच्या अभावाला किंवा मग नशिबाच्या फेऱ्याला दोष देतात. प्रत्येकामध्ये हे म्हणण्याची आंतरिक शक्ती असते, की आज मी आहे तो असा आहे आणि मी उद्याही तसाच असेन! पण हे स्वप्न, कृतीतून प्रत्यक्षात आणलं गेलं पाहिजे!' जर तसं असायलाच पाहिजे, तर आपली स्वप्नं प्रत्यक्षात आणणं हे तुमच्यावर आणि माझ्यावर अवलंबून आहे.

हम्टी डम्टी

हम्टी डम्टी एका भिंतीवर बसले
हम्टी डम्टी उंचावरून पडले
राजाचे सगळे घोडे
आणि राजाचे सगळे सैनिक
हम्टी डम्टीला पुन्हा जोडू नाही शकले

जे काही असेल ते असो, मथितार्थ असा की हम्टी डम्टीचा शेवट जमिनीवर तुटून, फुटून आणि पूर्णपणे वाईट झाला आणि या टप्प्यावर हम्टी-डम्टीला एक अवघड निर्णय घ्यायचा होता. अंड्याची भुर्जी म्हणून शेवट करून घ्यायचा की सनी साइड अप म्हणून? तुमच्या आयुष्यात काय घडतं यामुळे काही फरक पडत नाही. तुम्ही त्याबद्दल काय करता हे महत्त्वाचं आहे! कधीकधी आपल्या आयुष्यात असे प्रश्न उभे राहतील जे तुम्हाला हबकून टाकतील. असे प्रश्न जे कठीण, त्रासदायक असतील आणि तुम्हाला भुईसपाट करतील. आपण खाली पडू, पण आपल्याला पळ काढण्याची गरज नाही. आपल्याला मदत करायला समर्थ किंवा उत्सुक कोणी नसेल कदाचित, पण आपण स्वतः तर आहोत ना. हीच वेळ आहे जेव्हा स्वतःबद्दल आपण पूर्ण जबाबदारी घेतली पाहिजे. एकदा

एका धर्मोपदेशकाला मी सांगताना ऐकलं, "मात खाण्याबद्दल तुम्ही कदाचित जबाबदार नसाल, पण पुन्हा उठून उभं राहण्यासाठी तुम्हीच जबाबदार आहात." मी त्यांच्याशी पूर्णपणे सहमत झालो. तुम्हाला काय झालंय यानं काही फरक पडत नाही, तुम्ही त्याबद्दल काय करता यालाच फक्त अर्थ आहे. उठा आणि कामात गुंतून जा. लक्षात ठेवा, निवड तुमची आहे.

सुरुवातीच्या काळात मी माझी भाषणं ठरवण्यासाठी एका मध्यस्थाला करारबद्ध केलं होतं. माझी भाषणं ठरविण्याची सगळी जबाबदारी मी त्या मध्यस्थावर सोपवून एकामागून एक आमंत्रणं येण्याची वाट बघत बसलो. मी आपला वाट बघतच बसलो आणि फोनची घंटी कधीच वाजली नाही. म्हणून मग मी त्या मध्यस्थाला डच्चू दिला आणि दुसऱ्या एकाला काम दिलं. पुन्हा मी प्रतीक्षा करतच राहिलो, करतच राहिलो आणि फोन कधीही वाजला नाही. शेवटी माझ्या डोक्यात प्रकाश पडला. माझ्यासाठी आमंत्रणं मिळवणं हे त्यांचं काम आहे, पण ती माझी जबाबदारी आहे. त्यांनी जर माझ्यासाठी भाषणांची आमंत्रणं मिळवली नाहीत, तर त्यांची नोकरी जाईल, पण त्यांनी जर आमंत्रणं आणली नाहीत तर माझं घर जाईल! कोणाची जबाबदारी आहे ती? माझी! माझं यश हे शेवटी माझ्याच हातात आहे, इतर कोणाच्या नाही.

ती माझी जबाबदारी आहे

हनिबालने म्हटलंय, "तुम्हाला जर रस्ता सापडत नसेल, तर रस्ता तयार करा!" आयुष्य सोपं नाही आणि आपल्या मार्गात नेहमीच अडचणी येतील. मोठी घबाडं मिळवताना सर्वसाधारणपणे अडथळे पण मोठेच असतात. ते घडवण्यासाठी आपला निश्चय अढळ असला पाहिजे. आपणच आपल्या आयुष्याचा निर्देशक, निर्माता, कथालेखक आणि सितारा व्हायचं ठरवलं पाहिजे. आपल्याला एकतर वेगळं उठून दिसावं लागेल, नाहीतर मुख्य प्रवाहात मिसळून जावं लागेल. जॉर्ज बर्नार्ड शॉ एकदा म्हणाले, 'लोक ते जसे आहेत त्याचं खापर नेहमीच त्यांच्या

परिस्थितीवर फोडत असतात. मी परिस्थितीवर विश्वास ठेवत नाही. या जगात पुढे येणारे लोक असे असतात जे सज्ज होतात आणि त्यांना पाहिजे ती परिस्थिती शोधतात; आणि त्यांना जर ती मिळाली नाही, तर ते ती घडवतात', आपल्या यशापयशाची जबाबदारी आपण उचलली पाहिजे. आपलं आयुष्य आपण कसं घडवतो याचीही जबाबदारी आपण घेतली पाहिजे. इन्व्हिक्टस या विल्यम अर्नेस्ट हेन्ली याच्या कवितेत म्हटल्याप्रमाणे 'दरवाजा किती सरळ आहे हे महत्त्वाचं नाही, त्याच्यातून निघणं किती त्रासाचं आहे, हे महत्त्वाचं. माझ्या भवितव्याचा धनी मीच आहे, माझ्या आत्म्याचा प्रमुखही मीच आहे.' तुमची स्वप्नं प्रत्यक्षात आणणं हे शेवटी तुमच्याच हातात आहे.

दुसऱ्याला दोष देण्याचा खेळ

सबबी! सबबी! ज्या लोकांना सबबी द्यायला आवडतात, त्या लोकांचा मला काही उपयोग नाही, हे माझ्या लक्षात आलंय. सबबी हे अकार्यक्षम लोकांचं एक साधन आहे. जे सबबी देण्यात आघाडीवर असतात, ते क्वचितच दुसऱ्या कोणत्या गोष्टीत प्राविण्य मिळवतात! कारण गोष्टी चुकल्या की त्याचं इतरांवर खापर फोडणारे लोक आपल्याला सर्वांत जास्त वेळा सापडत असतात.

ते एका 'ढकलाढकलीच्या खेळा'मध्ये सापडलेले असतात. हा 'दोषारोपाचा खेळ' असा आहे, ज्याच्यात जिंकत कोणीच नाही आणि प्रत्येक जण हरतो. या खेळाला रोख नेहमीच अडचणींवर असतो, त्याच्यावर उपाय काढण्यावर कधीच नसतो. हरणाऱ्या लोकांना हा 'ढकलाढकलीच्या वेळात' खेळायला आवडतं. सर्वसाधारणपणे प्रत्येक दिवशी नवीन सबबी तयार करण्यासाठी ते नवनवीन मार्ग शोधत असतात. म्हणजे मग दोषारोपाचं बोट दुसऱ्याकडे रोखता यावं. त्यामध्ये एक बोट इतरांकडे रोखलेलं असलं तरी तीन बोटं स्वतःकडे वळलेली असतात. सहसा त्यांनी जिथे सुरुवात केलेली असेल, तिथेच ते संपतात. दुसऱ्या बाजूला, विजेते हे जाणतात की काहीतरी हालचाल होत राहण्यासाठी कोणीतरी जबाबदारी उचलणं अत्यावश्यक आहे. 'दोषारोपाचा खेळ'

खेळायला ते नकार देतात. कारण दोष देण्याचा संबंध भूतकाळाशी असतो, तर जबाबदारी उचलण्याचा संबंध भविष्याशी हे त्यांना माहीत असतं. तुम्हाला जर पुढची वाटचाल करायची असेल तर तुम्हं जबाबदारी घेतलीच पाहिजे, जी आहे प्रतिसाद देण्याची क्षमता. थोरोनी म्हटलं आहे, "गोष्टी बदलत नाहीत, आपण बदलतो!" 'ढकलाढकलीच्या' खेळात अडकू नका. जबाबदारी घ्या आणि पुढे जात राहा!

नेतृत्व म्हणजे...

नेतृत्व ही एक कृती आहे, स्थान नव्हे. बरीच वर्षं मी नेतृत्वावर कार्यक्रम केले आणि माझ्या साहित्याबद्दल मला विश्वास होता. त्यानंतर काही वर्षांनी मला असं जाणवलं की, त्याबद्दल बोलणं एक गोष्ट आहे, पण ते करणं वेगळं आहे. नॅशनल कॅपिटल स्पीकर्स असोसिएशनचा मी अध्यक्ष झालो आणि ज्याबद्दल मी बोलतोय त्या गोष्टी मला प्रत्यक्ष जगल्या पाहिजेत याची मला जाणीव झाली. वर्षाच्या सुरुवातीला, ज्या गटाला अत्यल्प सभासदांचं दुखणं होतं अशा गटाची जबाबदारी मी स्वीकारली. त्या गटाची उपस्थिती आणि नीतिधैर्यही खालच्या पातळीवर होतं. काहीतरी नवीन कार्यक्रम सुरू करावेत, संस्थेची प्रतिमा उंचवावी, उत्पन्न वाढावं, उपस्थिती अधिक असावी आणि सभासदत्व दुप्पट व्हावं म्हणून मी एक बारा कलमी योजना तयार केली. ती एक महत्त्वाकांक्षी संकल्पना होती आणि बोर्डाच्या बऱ्याच सभासदांनी माझं डोकं ठिकाणावर असण्याबद्दल शंका उपस्थित केली. प्रथम मी भविष्याबद्दलचं चित्र बोर्डाने ग्राह्य मानावं यासाठी प्रयत्न केला. दुसरं, मी एक असा चमू तयार केला, ज्याच्यात प्रत्येकाचा सहभाग होता आणि प्रत्येकाचा फायदा होता. भविष्याच्या चित्राबद्दलचा माझा उत्साह मी सर्वांबरोबर वाटून घेतला आणि योजना बारगळू नये म्हणून अडचणींना थारा दिला नाही. वर्ष संपताना, आम्ही सभासदांची उपस्थिती आणि उत्पन्न दुप्पट केलं होतं, हे सांगायला मला आनंद होतोय. आम्ही काही आदर्श कार्यक्रम सुरू केले आणि संस्थेत नवीन प्राण फुंकले! लक्षात घ्या मी 'आम्ही' असं म्हणतोय. नेतृत्वाकडे टाकलेलं पहिलं पाऊल म्हणजे, जिंकायचं

असेल तर त्यासाठी एक चमू लागतो आणि त्या चमूमधल्या प्रत्येकाचा यशापासून फायदा झाला पाहिजे आणि अपयशापासून शिकलं पाहिजे. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे मी शिकलो की नेतृत्व हे एक 'स्थान' नाही... ती एक कृती आहे!

प्रभावी नेतृत्वाच्या दिशेने वाटचाल

नॅशनल कॅपिटल स्पीकर्स असोसिएशनचा अध्यक्ष या नात्याने माझ्या एक वर्षाच्या वाटचालीत नेतृत्व म्हणजे काही एक पद नव्हे, हे मी शिकलो. नेतृत्व म्हणजे एक कृती आहे. एक परिणामकारक चमू विकसित करण्यासाठी बरीच पावलं उचलण्याची गरज होती. प्रथम, तुम्हाला दूरदृष्टी असावी लागते आणि शेवटी, तुम्ही पूर्ण जबाबदारी उचलली पाहिजे. गोष्टी जर वाईट घडायला लागल्या, तर त्याची पूर्ण जबाबदारी घेण्याची नेत्याची तयारी असलीच पाहिजे. तरीही, जेव्हा गोष्टी चांगल्या घडतात तेव्हा नेत्याने त्याचं श्रेयही वाटून घ्यावं. संस्थेच्या प्रत्येक पातळीवर तेही उपलब्ध होऊ शकतात आणि व्हावेत; उच्च स्थानापासून ते अगदी तळापर्यंत. परिणामकारक नेते इतर नेत्यांना घडायला मदत करू शकतात. नेतृत्व ही एक कृती आहे, स्थान नव्हे, हे लक्षात ठेवणं हीच गुरुकिल्ली आहे.

एकदा का तुम्ही जबाबदारी स्वीकारलीत आणि तुमच्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्याची प्रक्रिया सुरू केलीत, की नियोजित नसलेले प्रश्न आणि आव्हानं उसळी मारून वर येतील आणि तुमच्या प्रगतीस खीळ घालतील. त्या वेळी तुम्ही काय करणार? अशा वेळेलाच तुम्ही 'ठोश्यांबरोबर लोळण' घ्यायला शिकलं पाहिजे आणि तुमच्यावर परिस्थितीने उगारलेला हात पकडून कसंही करून जिंकायचा निश्चय केला पाहिजे.

काही वर्षांपूर्वी मला केंटुकीला एका महाविद्यालयाच्या दीक्षान्त समारंभाला भाषण करायचं आमंत्रण आलं होतं. अंदाजे अठरा तास एका शाळेत घालवण्याचं वेळापत्रक ठरलेलं होतं. रविवारी संध्याकाळी रात्री

नऊ वाजता पोहोचून दुसऱ्या दिवशी दुपारी तीनला निघायचं होतं. सकाळी दहा वाजता भाषण करायचं होतं. माझ्या भाषणाच्या आधी निदान एक तास मला ते न्यायला येतील या अपेक्षेने मी सकाळी लवकर उठलो. मला कार्यक्रम समन्वयकाकडून माझ्या नियोजित वेळेच्या सुमारे पंधरा मिनिटं आधी एक फोन आला. त्यानं विचारलं मी खिडकीच्या बाहेर बघितलंय का? मी सांगितलं की मी बघितलेलं नाही. जेव्हा मी बाहेर बघितलं तेव्हा दिसलं की जमिनीवर बारा इंचांचा बर्फाचा थर साठला होता. रात्रीच्या वेळेला त्या विभागाला बर्फाच्या वादळाचा तडाखा बसला होता आणि शहराची यंत्रणाच बंद पडली होती, कॉलेजेदेखील! सगळे कार्यक्रम रद्द झाले होते आणि माझं भाषणदेखील. गावाबाहेर जाणारे सगळे रस्ते बंद झाले होते आणि गव्हर्नरनी आणीबाणीची स्थिती जाहीर केली होती! विमानतळाकडे जाणारे रस्ते आणि विमानतळ, निदान पुढील तीन दिवसांसाठी बंद राहणार होता. मी अडकलो होतो!

मी माझ्या वेळापत्रकाकडे बघितलं आणि मला आढळून आलं की, माझ्यापुढे भाषणांचा एका पूर्ण आठवड्याचा नियोजित कार्यक्रम होता आणि मी त्या भाषणांना जाऊ शकणार नव्हतो. समन्वयकाने माझी क्षमा मागितली आणि मी ठीक आहे का ते विचारलं. मी त्याला सांगितलं की मी ठीक आहे आणि माफी मागण्याची काही आवश्यकता नाही. माझं ज्याच्यावर नियंत्रण नाही त्या गोष्टींबद्दल चिंता करण्याची गरज नाही. ते म्हणजे वेळेच्या आणि ऊर्जेचा एक अपव्यय ठरेल. माझ्याबाबतीत काय घडतंय ते निवडणं माझ्या हातात नव्हतं, मी त्याबद्दल काय करतो आणि त्याला कसा प्रतिसाद देतो याची मात्र मी निवड करू शकतो आणि मी आनंदी राहणं निवडतो, शांत आणि अविचल राहणं निवडतो आणि वाईट परिस्थितीचाही सर्वात चांगला उपयोग करून घेण्याची निवड करतो.

मी खरोखरच अडकलोय हे कळून आल्यावर, मी काही फोन केले आणि माझ्या कार्यक्रमांची पुनर्रचना केली. नंतर मग मी कार्यक्रम समन्वयकाला विचारलं की मला कोणीतरी शाळेच्या परिसरात घेऊन जाऊ शकेल काय, कारण मला फक्त एक पुस्तक पूर्ण करायचं होतं. ते चार दिवस जणूकाही माझ्यासाठी देवाची एक देणगीच ठरले, कारण

शेवटी मला त्या पुस्तकाकडे लक्ष द्यायला थोडा वेळ मिळाला. कित्येक महिन्यांत केलं नसेल तेवढं काम मी त्या चार दिवसांत करू शकलो.

आकडेवारीनुसार – आजारपणाला सर्वांत मोठा हातभार लावणारं काय असेल तर चिंता. चिंता आणि अस्वस्थपणा हृदयरोगाला आणि उच्च रक्तदाबालाच मोठी चालना देतात असं नव्हे, तर संधिवाताला आणि इतर अनेक रोगांनाही हातभार लावतात. आकडेवारी असंही दर्शवते की एकट्या स्त्री-पुरुषांपेक्षा विवाहित लोक अधिक जगतात, बहुतेक त्यांच्या काळज्या आणि अस्वस्थता वाटून घेण्यासाठी त्यांच्यापाशी कोणीतरी असतं, म्हणून असावं. काळजीने केवळ तुमचं आयुष्यच कमी होतं असं नव्हे, तर तुमच्या प्राविण्य मिळवण्याच्या कामासाठी काळजीचा काहीच उपयोग नसतो. आजार, दुःख आणि स्वतःवर संशय याच्याशिवाय काहीच पदरात पडत नाही. चिंताग्रस्त नको, आनंदी राहा! ... कारण निवड तुम्ही करता.

तुम्हाला जर यशस्वी व्हायचं असेल तर चिंता आणि संशयाचा त्याग केला पाहिजे आणि आयुष्याबरोबर पुढे गेलं पाहिजे. प्रत्येक दिवशी जोमाने जगा आणि तुम्हाला जेवढं उत्तम होणं शक्य आहे, तेवढं होण्याचा प्रयत्न करा. आनंदी असण्याची निवड करा आणि तुम्ही जे करत असाल ते नेहमीच उत्कृष्ट करण्याचा प्रयत्न करा. परिपूर्णता नव्हे, उत्कृष्टपणा. का? कारण परिपूर्णतेमुळे तुम्हाला विफलता येऊ शकते आणि त्यामुळे तुम्ही निष्क्रिय होता. परंतु तुम्ही जेवढे चांगले होऊ शकाल त्यावर लक्ष केंद्रित करणं, प्राविण्य मिळवणं ही एक सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. उत्कृष्टतेचा पाठपुरावा करताना तुम्ही अधिकाधिक चांगले होण्याचा प्रयत्न करत राहू शकता आणि स्वतःचेच वैयक्तिक उच्चांक तोडू शकता. परिपूर्ण नसल्याबद्दल विफल न वाटता आपण काल काय केलं त्यापेक्षा अधिक चांगलं करण्याचा आपण नेहमीच प्रयत्न केला पाहिजे. पूर्वी आपण जे मिळवलं होतं त्याच्यात सुधारणा केली पाहिजे आणि जे साध्य केलं त्याच्या प्रत्येक पातळीवर आपण अधिकाधिक खंबीर व्हायला पाहिजे.

प्राविण्याची किंमत असते

मी अलीकडेच एक फलक वाचला, ज्याच्यात लिहिलं होतं 'प्राविण्याची किंमत असते, तुम्हाला पूर्ण रक्कम चुकती करावी लागते पण तुमच्या गुंतवणुकीवर तुम्हाला उत्कृष्ट फायदे मिळतात कारण त्याच्यावरचे परतावे मिळतच राहतात.' अत्युत्कृष्टपणा हा सत्यासारखा आहे. तुम्ही तो कितीही दडपलात किंवा झाकण्याचा प्रयत्न केलात, तरी नेहमीच उसळी मारून वर येईल, हे नाकारता येणार नाही. ते राखेतून उठणाऱ्या एखाद्या फिनिक्स पक्ष्यासारखं आहे – तुम्ही त्याचा नाश करण्याचा किंवा त्याला खीळ घालण्याचा प्रयत्न केलात तरी उत्कृष्टपणा नेहमीच राखेतून वर उठेल. प्रत्येकासाठी आयुष्य कठीण आहे. पाऊस, सज्जन आणि दुर्जन दोन्ही प्रकारच्या लोकांवर पडतो, पण जे उत्कृष्टपणावर विश्वास ठेवतात आणि झपाटून त्याच्यामागे जात राहतात, ते लोक आयुष्याच्या अनपेक्षित बदलांमुळे खचून जात नाहीत. प्रश्न आणि आव्हानं यांच्याबरोबर नुसतंच जाऊ नका, जर त्यांच्यातून मार्ग काढत जा. उत्कृष्टपणाची किंमत द्यावी लागते... पण त्यामुळे मिळणारी बक्षिसं अतिशय उत्कृष्ट असतात.

तुम्ही स्वप्नं बघितली पाहिजेत आणि नंतर सुबुद्ध, निश्चित निर्णय घेऊन सुरुवात करा आणि शेवटी तुमच्या पाठपुराव्यात उत्कृष्टपणा असू द्या. तरीही खऱ्याखुऱ्या इच्छेच्या अभावी बरेच लोक प्रयत्न सोडून देतात आणि त्यांच्यात असलेली कुवत त्यांना कधीच समजत नाही. नुसतीच स्वप्नं पाहणारे आणि काहीतरी मिळवणारे यांच्यात इच्छा हा जो एक भाग आहे, त्यामुळे फरक होतो. काहीतरी थोडंसं अधिक, जे फार मोठा फरक घडवतं.

तुम्हाला यशस्वी व्हावं असं वाटायला हवं आणि अत्युत्कृष्ट असावं असंही वाटायलाच हवं. तुमची स्वप्नं सत्यात उतरावीत असं तुम्हाला वाटायलाच पाहिजे आणि आपण मोठं व्हावं असंदेखील वाटलंच पाहिजे. ते पाहिजे असं तुम्हाला वाटलंच पाहिजे आणि खूप तीव्रतेने वाटलं पाहिजे.

काही वर्षांपूर्वी मी एका हायस्कूलमध्ये भाषण करत असताना आणि मला एक तरुण गृहस्थ भेटला, जो अंदाजे सहा फूट पाच इंच उंच होता आणि त्याचं वजन २५० पौंड होतं आणि स्नायू पीळदार हाते. तो चार्ल्स अॅटलससारखा दिसत होता. शारीरिकतेचा तो एक परिपूर्ण नमुना होता. कार्यक्रमानंतर मी त्याला काय व्हायची इच्छा आहे असं विचारलं आणि त्याने सांगितलं की त्याला व्यावसायिक फुटबॉल खेळायची इच्छा आहे, पण त्याला खरोखरच तशी तीव्र इच्छा आहे की नाही याबद्दल मी विचारात पडलो. कारण व्यावसायिक फुटबॉलचं क्षेत्र हे अतिशय स्पर्धात्मक आहे. त्याला तशी खूपच इच्छा आहे असं त्याने मला सांगितलं. मी त्याला विचारलं, ''अगदी मनापासून?'' आणि त्याने उत्तर दिलं, ''खूप मनापासून.'' मग मी म्हणालो, ''अगदी मनापासून?'' आणि तो म्हणाला, ''अगदी मनापासून.'' मग मी त्याला एक निर्णायक प्रश्न विचारला, ''एका विटांच्या भिंतीतून आरपार जाण्याइतकं तुला ते पाहिजे?'' आणि त्याने उत्तर दिलं, ''नाही, मला काही ते एवढं तीव्रतेने नको आहे.'' मी म्हटलं, ''माझ्या मित्रा, जोपर्यंत विटांच्या भिंतीतून जाण्याची तयारी असण्याइतकं ते तुला हवंसं वाटत नाही, तोपर्यंत तुझ्यासाठी यश मिळवणं आणि व्यावसायिक पातळीवर पोहोचणं अतिशय कठीण असेल. फक्त कौशल्य असणं एवढंच पुरेसं नाही, तुम्हाला ते खरोखरच पाहिजे असण्याची गरज आहे!'' असे लाखो लोक आहेत, ज्यांच्याकडे अप्रतिम कौशल्यं आहेत पण ते त्यांचा वापर करीत नाहीत. त्यांनी नोकरी करण्याचा पर्याय निवडलेला असतो, कारण अतिशय तीव्र स्पर्धा असल्याने त्यांना त्यांची स्वप्नं पूर्ण करण्याची तेवढी आच नव्हती. त्यांच्याकडे सामान्य लोकांपेक्षा वरच्या पातळीवर पोहोचण्यासाठी लागणारी तीव्र इच्छा नव्हती. त्यांच्याकडे इच्छा नव्हती.

तुमची विटांच्या भिंतीतून जाण्याची तयारी असण्याइतकं तुम्हाला ते मिळवण्याची निकड भासली पाहिजे. तुम्हाला त्या भिंतीतून कदाचित कधीही जावंदेखील लागणार नाही. पण गरज पडल्यास तुमची तशी तयारी असली पाहिजे. कोणत्याही पातळीवर यश मिळवण्यासाठी तुम्हाला ते खरोखरच हवंसं असलं पाहिजे! विन्स लोम्बार्डी या महान फुटबॉल

प्रशिक्षकाने म्हटलंय, ''एक यशस्वी व्यक्ती आणि इतर यांच्यातला फरक म्हणजे शक्तीचा अभाव नव्हे तर इच्छेचा अभाव हे आहे!'' इच्छा...!

तुम्हाला ते किती मनापासून हवंय?

''म्हणजे तुम्हाला एक रॉक स्टार व्हायचंय, हं?'' एका रेकॉर्ड कंपनीच्या कार्यकारी अधिकाऱ्याने मला विचारलेला तो प्रश्न होता. मी काही वर्षांपूर्वी त्यांच्या ऑफिसमध्ये गेलो होतो. नंतर त्याने मला विचारलं होतं की रॉक स्टार होण्यासाठी जे करावं लागतं ते करण्याची माझी तयारी आहे का? आराम सोडण्याची माझी तयारी आहे का? दुसऱ्या शहरात स्थलांतर करण्याची माझी तयारी आहे का? यशस्वी होईपर्यंत रस्त्यावर राहायची माझी तयारी आहे का? लवकर उठायची आणि उशिरा झोपायची माझी तयारी आहे का? रॉक स्टार होण्यासाठी जे काही करावं लागेल ते करायला मी तयार होतो का? तो मला म्हणाला की बहुतेक मला जरी ती किंमत चुकती करावी लागली नाही, तरी मी त्यासाठी तयार असावं लागेल. बरेचसे लोक रॉक स्टार बनण्यासाठी त्यांचं सर्वस्व ओतायला तयार नसतात, एक डॉक्टर स्टार, एक नर्स स्टार, एक कॉम्प्युटर स्टार, एक सेल्स स्टार, आर्किटेक्ट स्टार, उद्योजक स्टार, वास्तुविशारद किंवा मग इतर कोणत्याही प्रकारचा स्टार – कारण तुमची स्वप्नं प्रत्यक्षात यावी अशी जर तुमची इच्छा असेल तर तुमचं सर्वस्व त्याच्यासाठी देण्याची तुमची तयारी असली पाहिजे.

तुम्हाला ते खरोखरच मनापासून पाहिजे? तुम्ही गंभीर आहात? माझ्या म्हणण्याचा अर्थ खरेखुरे गंभीर? एका वचनाप्रमाणे. तुम्ही हृदयविकाराच्या झटक्याइतके गंभीर आहात का? कारण हृदयविकाराच्या झटक्याने तुम्हाला ओढूनच नेलं जाईल, तो खेळ करत नाही! तुमच्या यश मिळवण्याबद्दल तुम्ही खरोखरच गंभीर आहात का? मोठा फरक घडवून आणेल असे थोडे अधिक कष्ट उपसण्याची तुमची तयारी आहे का? थोडंसं अधिकचं काम? उशिरापर्यंत जागं राहून लवकर उठायची तुमची तयारी आहे का? टी.व्ही. बंद करून, तुमच्यात सुधारणा घडवून

आणतील अशी पुस्तकं वाचण्याची तुमची तयारी आहे का? तुमच्या स्वप्नांचा पाठपुरावा करताना थोडा त्रास आणि नाकारलं जाणं यांचा अनुभव घ्यायला तयार आहात का? जे आरामशीर नसेल असं करण्याची तुमची इच्छा आहे का? तुमच्या स्वप्नांसाठी लढा देण्याची तुमची तयारी आहे का? तुम्ही गंभीर आहात का? तुम्ही जे करताय त्याबद्दल तुम्ही गंभीर आहात किंवा मग उगीचच लुडबुड करताय?

काही लोकांना खरोखरच वाटतं की ते गंभीर आहेत, पण वास्तवात मात्र ते फक्त पाट्या टाकत असतात. त्यांना वाटतं ते गंभीर आहेत, पण वास्तवात मात्र ते फक्त स्वतःलाच मूर्ख बनवत असतात. पण त्यांची काहीच प्रगती होत नसते. ते एखाद्या ट्रेडमिलवर धावण्यासारखं असतं – जोरात धावायचं पण जायचं मात्र कुठेच नाही. बरेचसे लोक याच भ्रमात असतात आणि त्यांना कृतिशीलता आणि परिणाम यातला फरक कळून येत नाही. मला कसं काय माहीत? कारण मी अशा लोकांपैकीच एक होतो, जे कामात असतात पण पोहोचत कुठेच नाहीत. कित्येक वर्षे मी कार्यमग्नतेच्या झंझावातासारखा होतो. पण जेव्हा निरखून पाहिलं तेव्हा मला कळून चुकलं की मी काहीच प्राप्त करू शकलो नव्हतो. मी तेच तेच करत होतो. पण मी खरं म्हणजे गंभीर नव्हतो. मला ते मिळवण्याची खरं म्हणजे तेवढी तळमळच नव्हती.

तुम्ही जेव्हा गंभीर असता, तेव्हा तुम्ही अधिक कष्ट उपसायला तयार असता आणि थोडंसं अधिक द्यायची तुमची तयारी असते. अडचणीचं असेल तेही करायला तुम्ही तयार असता. तुमची बांधिलकी एका वेगळ्या पातळीवर पोहोचते. तुमचे स्वतःचे चांगले प्रयत्न सातत्याने सुधारण्याचे मार्ग तुम्ही शोधत राहता. तसा शोध घेऊन तुम्ही स्थिर, अविचल आणि कोणीही थांबवू शकणार नाही, असं होण्याचा निर्णय घेता.

स्वतःला तुम्ही एक प्रश्न विचारा, ''मी गंभीर असतो तर मी काय केलं असतं?'' कोणत्या उद्दिष्टपूर्तीसाठी मी प्रयत्न केले असते? कोणत्या गोष्टी करणं मी चालू ठेवेन आणि कोणत्या कृती मी थांबवेन? अनुत्पादक अशा वेळ फुकट घालवणाऱ्या कोणत्या गोष्टी करणं मी थांबवलं असतं? मी जर खरोखरच गंभीर असतो तर मी काय केलं असतं? स्वतःला हा प्रश्न विचारा आणि तुमचं मनच तुम्हाला उत्तर

देईल. एकदा का तुम्हाला उत्तरं मिळाली की एक कागद घ्या आणि ती उत्तरं लिहून काढा. ती वाचा आणि त्या यादीप्रमाणे काम करायला सुरुवात करा. तुम्ही सध्या जे काही करत असाल त्यापेक्षा तुम्ही अधिक करू शकता. तुम्ही सध्या काहीही करत असाल तरी तुम्ही अधिक काही करू शकता, जर तुमची गंभीर व्हायची इच्छा असेल तर...

मित्रांनो, तुम्ही जे काही करता त्यात उत्कृष्टपणा आणण्याचा प्रयत्न करा. फार मोठी इच्छा आणि उद्दिष्टांपर्यंत पोहोचण्याची बांधिलकी विकसित करा आणि नंतर तुमचं यश मिळवण्यासाठी पूर्ण जबाबदारी उचला. गंभीर व्हा आणि लवकरच तुमची स्वप्नं धुमारे फुटून, वाढ होऊन बहरलेली तुम्हाला दिसू लागतील.

धैर्य दाखवा

थिओडोर रुझवेल्टचा विश्वास होता की आयुष्य जगण्यासाठी आहे आणि जर जगायचंच असेल तर मग निदान चांगलं मनमुराद जगा, नाहीतर जगूच नका. तुम्ही एकतर मार्गस्थ असता किंवा मार्गात असता, एकतर आयुष्याकडे तटस्थपणे पाहणारे प्रेक्षक किंवा मग एक चमकदार सहभागी. खालील उद्धृत वचनावरून आपल्याला कळतं की टेडी रुझवेल्ट त्याच्याच कालावधीत एक आख्यायिका का ठरला. त्या काळात त्याने त्याची आयुष्य परिपूर्ण जगण्याची बांधिलकी व्यक्त केली आहे. त्याला 'चांगलं मोठं धैर्य दाखवा.' जे आपल्याला प्रोत्साहन देतात... आणि म्हणतात धैर्य दाखव! टीकाकार महत्त्वाचा नसतो किंवा शक्तिमान लोकदेखील कसे अडखळून पडले हे दर्शवणारा माणूसदेखील. खरं म्हणजे त्या क्षेत्रात काम करणाऱ्या माणसालाच ते श्रेय द्यायला पाहिजे. ज्याचा चेहरा धूळ, घाम आणि रक्ताने माखून निघालाय. जो धैर्याने प्रयत्न करतो, चुका करतो आणि तरीही प्रगती करत राहतो. ज्याला खूप उत्साह माहीत असतो, निस्सीम भक्ती माहीत असते आणि योग्य कारणासाठी तो स्वतःला खर्ची घालतो; ज्याला सर्वांत चांगलं म्हणजे घवघवीत यश प्राप्त करण्याच्या शेवटी विजय माहीत असतो आणि वाईटात वाईट, तो जर अयशस्वी झाला तर निदान तो काहीतरी भव्यदिव्य करण्याच्या

प्रयत्नात अयशस्वी झालेला असतो. म्हणून मग त्याचं स्थान अशा थंड आणि भित्र्या आत्म्याच्या लोकांबरोबर कधीच नसेल ज्यांना विषयाची किंवा पराभवाचीही माहिती नसते. आयुष्य भरभरून जगा!

आयुष्य ही एक देणगी, आहे जिची स्तुती करून तिचा सर्वाधिक आनंद लुटण्यासाठी मी तुम्हाला प्रोत्साहित करतो. गॅलरीत बसलेला एक प्रेक्षक म्हणून तुमची अखेर होऊ देऊ नका. मैदानात पुढे जाऊन सहभागी होण्याचा निर्णय घ्या. हे आणखी एक असं वचन आहे जे मी माझ्या टेबलावर ठेवतो. 'पन्नास यार्ड रांगेतील आसनं छान आहेत, पण त्यांची मला आवड नाही. कारण मी इथे खेळायला आलोय आणि मी जिंकण्यासाठी खेळतो.'

आयुष्यासाठी सोपे नियम

यशस्वी आयुष्य एक गुंतागुंतीची प्रक्रिया असण्याची आवश्यकता नाही. कोणीतरी असं म्हटलंय की आयुष्यात यश मिळवणं साधं आहे. ते सोपं नाही, पण साधं आहे. आपण बालवर्गात जे शिकण्याची गरज होती आणि जे शिकलो, ते सगळं देणारं एक पुस्तक मी वाचलं! जे शिकणं आवश्यक होतं ते आपण त्या वर्गात शिकलो की नाही, याची मला खात्री नाही पण माझा विश्वास आहे की आपल्याला माहीत असणं आवश्यक असलेल्या बऱ्याच महत्त्वाच्या गोष्टी आपण बालवर्गात शिकलो. यश साधं आहे, सोपं नव्हे पण साधं! आयुष्यासाठी काही साधे नियम आहेत:

१. स्वप्नं बघण्यासाठी वेळ काढा (लक्षात ठेवा, बऱ्याचशा मोठ्या प्राप्त केलेल्या गोष्टी कधीतरी अशक्य मानण्यात आल्या होत्या.)
२. वरचेवर आणि खोलवर विचार करा.
३. ज्या पद्धतीने तुम्हाला वागवलं जावं अशी तुमची अपेक्षा असेल, तसंच इतरांना वागवा.
४. 'धन्यवाद' आणि 'कृपया' बरेच वेळा म्हणा!
५. प्रत्येक दिवसाचं स्मितहास्याने स्वागत करा.

६. मूर्खांबरोबर कधीही वाद घालू नका. जे बघत असतील त्यांना दोघांमधला फरक सांगता येणार नाही. (डुकराशी कधीही कुस्ती खेळू नका, दोघंही घाणेरडे व्हाल आणि डुकराला तेच आवडतं.)
७. आनंदी असण्याची निवड करा.
८. उत्कृष्टतेबरोबर बांधिलकी तयार करा. (लक्षात ठेवा, इतर करणार नाहीत त्या गोष्टी जर तुम्ही आज कराल, तर उद्या करण्यासाठी तुमच्याकडे इतरांकडे नसतील अशा गोष्टी असतील)
९. कृतज्ञ राहा. (लक्षात ठेवा, प्रश्न नसते तर संधीही नसत्या)
१०. आयुष्यावर प्रेम करा! आनंद घ्या! मानवी आत्म्यासाठी असणाऱ्या शक्यता, अंगभूत गुण आणि शक्ती यांना कधीही कमी लेखू नका. आयुष्य म्हणजे एक धमाका आहे.

ते खरंच गुंतागुंतीचं नाही. दुर्दैवाने बरेच लोक ते गुंतागुंतीचं बनवतात. स्कॉट स्काईल्सने म्हटलंय, ''आयुष्य हे बरंचसं चर्चला जाण्यासारखं आहे; बरेच लोक जातात, पण कमी लोकांना समजतं.'' श्रद्धा ठेवा, विश्वास असू द्या आणि लक्षात ठेवा की आकाश हीच एक खरी सीमा आहे! नेहमीच आकाशापर्यंत पोहोचायचा प्रयत्न करा आणि जर ते नाही जमलं तर तुम्ही ताऱ्यांपैकी एक नक्कीच असाल!

प्रकरण १०

लांबलचक वाटेवर छोटी छोटी पावलं

मध्यरात्रीचा फिनिक्स
संगीतरचना : डायन केनी
'स्केगी' या डेबोरा सिम्स–वुडच्या नाटकातून

मध्यरात्रीचा फिनिक्स उठतो
भूतकाळाच्या राखेतून
अंधारात झळाळत
शेवटी पसरतो तो आपले पंख

सोनेरी सूर्य प्रकाशित करतो
खालची गवताळ पठारं
आणि जांभळा मोहोर फुलतो पुन्हा
जिथे काहीच नव्हतं उगवत

एका लांबलचक वाटेवर टाकलेली छोटी पावलं
एका लांबलचक वाटेवर टाकलेली छोटी पावलं
एका लांबलचक वाटेवर टाकलेली छोटी पावलं

या विषयाचं संगीत
गाण्यातले छोटे प्रतिध्वनी
नाईटिंगेल्स आणि हमिंगबर्डचे

आपण का नाही गाऊ शकत त्यांच्याबरोबर?
बेसूर स्वर निनादतील पुन्हा
जर आपण समजून घेतलं नाही
आणि एकदा जागृत झाली स्मृती
की ती करते स्वतःची मागणी

एका लांबलचक वाटेवर टाकलेली छोटी पावलं
एका लांबलचक वाटेवर टाकलेली छोटी पावलं
एका लांबलचक वाटेवर टाकलेली छोटी पावलं

म्हणून तुम्ही तुमचा आवाज चढवा
आणि मी माझा आवाज चढवेन
पुन्हा आणू या समतोल, स्वप्नांवरचा आपला विश्वास
अधिकाधिक बंधुत्व आणि शांतता

एका लांबलचक वाटेवर टाकलेली छोटी पावलं
एका लांबलचक वाटेवर टाकलेली छोटी पावलं
एका लांबलचक वाटेवर टाकलेली छोटी पावलं

तो खूपच लांबचा रस्ता आहे, पण आपण तो पार करणारच!

तो कधीकधी एक न संपणारा रस्ता वाटतो, पण प्रत्येकाला शेवट असतोच. अगदी कठीण काळाला आणि प्रतिकूल परिस्थितीलादेखील. आपल्या शोकांतिकांच्या आणि संकटांच्या कठीण परिस्थितीच्या अंधःकारातून एका पूर्णपणे उलथापालथ करणाऱ्या आणि आमूलाग्र बदलाच्या बीजाची निर्मिती होते. फिनिक्स जसा राखेतून उठतो तसंच, आपली पहिली पावलं जरी खूप लहान वाटली, तरी ती छोटी छोटी पावलंच आपल्याला महान ध्येयांकडे घेऊन जातात. त्या अडचणीच्या काळाच्या क्षणांतच बरेच विस्मयजनक विषय आणि आमूलाग्र बदल जन्म घेतात. डेनिस किंबरोला असं सांगायला

आवडतं की पीछेहाट ही पुनरागमनाची पूर्वतयारी असते! संकटांना तोंड देणारे वैयक्तिक निर्णयाचे ते छोटे क्षण, त्रास आणि अस्वस्थता असूनदेखील विजयाच्या आणि ध्येयपूर्तीच्या क्षणांकडे घेऊन जातात.

कोंबडीचं पिल्लू आणि गरुड

कोणे एके काळी पर्वताच्या अत्युच्च शिखरावर एका गरुडाने त्याचं घरटं बांधलं होतं. जोराचा वारा सुटला आणि त्यामुळे त्या घरट्यातून एक अंडं उडालं आणि पर्वतावरून खाली दरीत घरंगळलं. एका कोंबड्यांच्या फार्ममध्ये जाऊन पोहोचलं. त्यातल्या आई कोंबडीने गरुडाचं छोटं अंडं पाहिलं आणि ती म्हणाली, ''काय विचित्र दिसणारं कोंबडीचं अंडं, पण मी ते उबवेन आणि माझं छोटं कोंबडीचं पिल्लू जन्माला घालेन!'' ते उबेपर्यंत कोंबडी त्याच्यावर बसली. जेव्हा ते पूर्णपणे उबवलं गेलं तेव्हा त्याच्यातून तो मोठी चोच, मोठे पाय आणि मजबूत पंख असलेला पक्षी बाहेर आला. कोंबडीने त्या छोट्या पक्ष्याकडे बघून म्हटलं, ''काय हे विचित्र दिसणारं कोंबडीचं पिल्लू, पण तू माझ्या छोट्या पिल्लांपैकी एक होऊ शकशील.'' जरी तो पक्षी गरुडाची गुणसूत्रं आणि जनुकं घेऊन जन्माला आला होता, तरी तो कोंबड्यांच्या खुराड्यात जन्मल्यामुळे त्याला वाटलं तोही एक कोंबडाच आहे. तो कोंबड्यासारखा चालायचा आणि बोलायचा. कोंबड्यांसारखाच विचार करायचा आणि त्यांच्यासारखीच स्वप्नं बघायचा. त्याचं सर्वांत मोठं कोंबडी स्वप्न होतं ते एक दिवस कुंपणावर सर्वांत उंच बसायचं म्हणजे त्याला कोंबड्यासारखं आरवता येईल. म्हणजे वेगळं दिसण्याबद्दल इतर पक्षी त्याच्याकडे बघून हसत होते, तसं हसणार नाहीत. पण प्रत्येक वेळेस तो जेव्हा हे स्वप्न बघायचा तेव्हा स्वतःशी म्हणायचा, ''मला माहीत आहे मी त्या कुंपणावर कधीच जाऊ शकणार नाही! मला माहीत आहे, त्यांनी नेहमीच सांगितलं होतं की कोंबड्या उडू शकत नाहीत!'' म्हणून मग त्याने प्रयत्नदेखील केला नाही. प्रयत्न सोडून तो फक्त तिथून निघून जायचा. एक दिवस जेव्हा तो कोठाराच्या अंगणात उभा होता, त्या छोट्या पक्ष्याने वर पाहिलं तेव्हा त्याला एक अभूतपूर्व दृश्य दिसलं. आकाशाच्या सम्राटाप्रमाणे एक गरुड

राजेशाही थाटात उडत जाताना त्याने पाहिला. तो छोटा पक्षी एवढा आश्चर्यचकित झाला की त्याने आपली हरवलेली तेवढी शक्ती एकवटून ओरडला, ''कोण आहेस तू? कोण आहेस तू?'' त्या मोठ्या गरूडाने त्या छोट्या पक्ष्याला, त्याच्या तीक्ष्ण श्रवणशक्ती, नजर यामुळे पाहिलं आणि तो उतरून म्हणाला, ''मी कोण आहे? तू काय आहेस?'' छोटा पक्षी म्हणाला, ''मी कोंबडी आहे.'' मोठ्या गरूडाने त्या लहान पिल्लाच्या डोळ्यात सरळ पाहून म्हटलं, ''माझा चेहरा पाहा, तू अगदी माझ्यासारखा दिसतोस! माझे पंख बघ, तू अगदी माझ्यासारखा दिसतोस! मित्रा, तू कोंबडी नाहीस, तू गरुड आहेस! तुझे पंख फडफडव आणि तू जसा गरुड म्हणून जन्माला आला आहेस, तसा उड.'' लहान पक्ष्याने त्याचे पंख फडफडवले... आणि तो उडाला... तो ढगांच्याही वर पोहोचला! मित्रांनो तुम्ही कोंबडी म्हणून जन्माला आला नव्हता, तुम्ही गरुड म्हणून जन्मला होतात. गरुडासारखं उडा, जसे तुम्ही जन्मला आहात!

व्हिटनी ह्युस्टनने एक फार सुंदर गाणं गायलंय, त्याचं शीर्षक आहे, 'वन मोमेंट इन टाईम (काळामधला एक क्षण)' जे एका क्षणाच्या महत्त्वाबद्दल आहे. त्यात वर्णन केलं आहे की, एक क्षण, एक निर्णायक क्षण तुमचं आयुष्य कसं बदलू शकतो. त्या क्षणाला तुम्ही ओळखता की आशावादी आणि उत्तेजित अपेक्षांसह भविष्याला सामोरं जाण्यासाठी प्रत्येक दिवस ही तुमच्यापुढे एक नवी कोरी संधी असते. हा एक क्षण असतो, एक निर्णायक क्षण, ज्या वेळी तुम्हाला समजून येतं की तुम्ही एक जेते आहात. तो क्षण पकडून भविष्यात उत्साहाने पुढे जायला पाहिजे, कारण हाच तो क्षण आहे ज्याची तुम्ही तयारी केली होती. पुढे जा आणि खूणगाठ बांधा की आव्हानं असतील, कधी वर, कधी खाली, गोडाबरोबर आंबट, आनंदाबरोबर थोडं दुःख आणि तरीही त्या क्षणात जेव्हा तुम्ही स्वतःवर अवलंबून असता, तेव्हा तुम्हाला माहीत असतं की तुम्ही कधीच एकटे नसता.

वन मोमेंट इन टाईम! प्रत्येकाच्या आयुष्यात त्यांच्या आयुष्याचे संदर्भ आणि दिशा निश्चित करणारे क्षण येतात. हे क्षण सर्वसाधारणपणे 'निश्चित निर्णायक क्षण' म्हणून ओळखले जातात आणि हे पुसटसे

क्षण, ते छोटेसे क्षण आपली आणि पर्यायाने इतरांचीही आयुष्यं बदलवून टाकतात. १९५५मध्ये मॉन्टगोमेरीत अलापादो येथे रोझा पार्क्स हिनं एका निर्णायक क्षणी आपलं बसमधलं आसन सोडून द्यायला नकार दिला, कारण ती थकलेली होती. तिने त्या वेळी जो निर्णय घेतला त्यामुळे एका अशा चळवळीची ठिणगी पडली, ज्यामुळे सारा देशच बदलून गेला. बस बहिष्कारासाठी मॉन्टगोमेरीच्या लोकांचं नेतृत्व करू शकेल अशा व्यक्तीचा शोध घेताना एक सव्वीस वर्षांचा पाद्री म्हणाला, ''मी करतो ते.'' जग पुन्हा कधीही पहिल्यासारखं होणार नाही, कारण मार्टिन ल्यूथर किंग, ज्युनिअर याने एक असा निर्णय घेतला ज्यामुळे त्यांचं नशीबच पालटून गेलं. अपॉस्टल पॉल यांना दमास्कसच्या रस्त्यावर एक असा प्रसंग अनुभवास आला, ज्या निर्णायक क्षणामुळे त्यांचं आयुष्य बदललं आणि जगही बदललं. एका क्षणात ते ख्रिस्ती लोकांचं हनन करणाऱ्यापासून त्या धर्माचे सर्वांत महान पाठीराखे झाले. ते अगदी एका क्षणात घडलं. तो एक निर्णायक क्षणदेखील होता. आपण ज्या चोराबद्दल पूर्वी चर्चा केली तो येशू ख्रिस्ताशेजारी एका क्रॉसवर लटकत होता आणि त्याला उमगलं होतं की तो फक्त जर एवढंच म्हणेल, ''तुम्ही तुमच्या साम्राज्यात प्रवेश कराल, तेव्हा मला लक्षात ठेवा,'' तर तो त्याचं आयुष्य बदलू शकेल.

आपल्या सर्वांच्या आयुष्यात निर्णायक क्षण असतात, असे क्षण जे आपल्या अस्तित्वावर दिला जाणारा भर बदलतात. काही म्हणतील की आपलं भवितव्य त्या क्षणांमध्ये निश्चित होतं. तरीही आपल्यापैकी बरेच जण माघार घेतात किंवा कच खातात, कारण त्यांना अस्वस्थ वाटत असतं. त्यांच्या प्रकारामुळे निर्णायक क्षण अवघडलेले असतात, पण वाढणं हेदेखील अवघडलेलंच असतं. बदल अस्वस्थ करणारा असतो, तरीही तो आपल्या दैनंदिन जीवनाचा एक भाग आहे. ते निर्णायक क्षण हे असे क्षण आहेत जे विजेते घडवतात.

दिशा बदलवणारे आणि परिणामकारक क्षण आपल्या सर्वांच्याच आयुष्यात आलेले असतात, पण जेव्हा आपलं चरित्र आणि दृष्टिकोन खरोखरच अधोरेखित करून त्यांना आकार देतात, तेव्हा ते निर्णायक क्षण होतात. खरं म्हणजे तो क्षण त्याची व्याख्या करत नाही तर त्या क्षणाला आपण जो प्रतिसाद देतो त्यामुळे फरक पडतो. अनपेक्षित असे

क्षण आपल्या सर्वांच्याच आयुष्यात येतात आणि आपला इतिहास ते बदलतात. पण बरेच लोक त्या क्षणांपासून पळून जातात आणि त्या क्षणांच्या धगीमध्ये कोमेजून जातात. त्या क्षणांच्या आव्हानांना पेलण्यासाठी तयार राहणं ते नाकारतात.

फ्रँकलिन डेलानो रुझवेल्ट एक दिवस जेव्हा उठला आणि त्याचे पाय पोलिओच्या आघातामुळे हलू शकत नाहीत असं त्याला आढळून आलं, तेव्हा तो त्याच्यासाठी एक निर्णायक क्षण ठरला. तरीही त्याने त्याच्या स्वप्नांचा पाठपुरावा करायचा निर्णय घेतला. या देशाच्या इतिहासात तो सर्वाधिक लोकप्रिय अध्यक्ष झाला आणि आत्तापर्यंत चार वेळा निवडून आलेला एकमेव अध्यक्ष ठरला!

विन्स्टन चर्चिलना जेव्हा ते लहान असताना त्यांचे वर्गमित्र त्यांच्या अडखळत बोलण्याच्या वैगुण्यामुळे चिडवत होते आणि कुचेष्टा करत होते, तेव्हा त्यांच्या आयुष्यातला तो एक निर्णायक क्षण होता. त्यांना काहीतरी सांगायचंय आणि ते सांगतील हे जगासमोर सिद्ध करून दाखवायचं त्यांनी मनाची तयारी केली. त्यांच्या तोतरेपणावर त्यांनी मात केली आणि ते एक प्रभावी वक्ते ठरले. त्यांच्या या कौशल्यामुळे ते एक राष्ट्रीय नेता झाले आणि शेवटी इंग्लंडचे पंतप्रधान. त्यांना नोबेल शांतता पुरस्कार प्रदान करण्यात आला आणि ज्यांच्या भाषणातील उतारे उद्धृत केले जातात, असे ते एक सर्वकालिन महान वक्ते ठरले.

डेनिस बर्ड

१९९२मध्ये, डेनिस बर्ड हा न्यू यॉर्क जेट्सचा फूटबॉल संघाच्या बचावफळीतला एक खूप प्रसिद्ध खेळाडू होता. एका रविवारी तो त्याच्या सोबतच्या खेळाडूबरोबर एका विचित्र अपघातात सापडला आणि त्या क्षणापासून त्याचं आयुष्य कायमचं बदललं. त्याच्या सहकाऱ्याबरोबर टक्कर झाल्यावर तो जमिनीवर पडून राहिला आणि त्याचे हात किंवा पाय हलवणं त्याला शक्य होत नव्हतं. डॉक्टर्स आणि त्याचे प्रशिक्षक मैदानात धावत गेले. बर्डने त्यांना सांगितलं की, त्याला मानेपासून खालच्या भागात काहीच संवेदना नव्हती. सुरुवातीला त्यांना वाटलं की नसांना मृतवत

करणारी ती 'स्टिंगर' नावाची स्थिती असावी. पण काही दिवसांनंतर त्यांना समजून चुकलं की वस्तुतः डेनिस बर्ड आयुष्यभरासाठी विकलांग झाला होता. डॉक्टरांनी त्याच्या बऱ्याच चाचण्या केल्या आणि तो पुन्हा कधीच चालू शकणार नाही असा निष्कर्ष काढला. पण डेनिस बर्ड हा काही कोणी सर्वसाधारण रुग्ण नव्हता आणि त्याने त्या परिस्थितीचा स्वीकार केला नाही. तो फुटबॉल खेळू शकणार नाही असं सांगितल्यावर त्याने तशी संधी मिळण्यासाठी अडचणींवर मात केली. व्यावसायिक फुटबॉल खेळण्याची संधी मिळावी म्हणून त्याला तोंड द्याव्या लागणाऱ्या कोणत्याही अडथळ्यापेक्षा त्याच्याकडे काहीतरी महान असं होतं – त्याचा देवावरचा गाढ विश्वास आणि स्वतःवरची.

हॉस्पिटलमध्येच असतानाच्या त्याच्या सगळ्या मुलाखतींत त्याने सातत्याने हेच सांगितलं की त्याचा विश्वासच त्याला तारून नेईल. तो विश्वास त्याने कधीही सोडून दिला नाही! आजमितीला तो डेनिस बर्ड फाऊंडेशनचा अध्यक्ष आहे. १९९३ चे वर्ष सरताना न्यू यॉर्क जेट्सनी त्याचं धैर्य आणि सर्वांत चांगलं काम करण्याच्या बांधिलकीसाठी त्याचा गौरव केला. ज्या मैदानात त्याने कसोटीचा क्षण अनुभवला होता आणि विकलांग झाला होता, त्या मैदानाकडे डेनिस बर्ड परतला. त्याच दिवशी डेनिस बर्ड कोणत्याही काठी किंवा वॉकरशिवाय त्याच्या स्वतःच्या बळावर त्या मैदानात चालला. त्याच्या प्रचंड विश्वासाने आणि निश्चयाने त्याला सबल केलं होतं. विश्वास ही गुरुकिल्ली आहे. विश्वास ठेवा आणि प्राप्त करा.

डॉ. रॉबर्ट कूलर यांनी त्यांचं आयुष्य आणि त्यांचं धर्मोपदेशन कार्यालय, त्यांच्या एका निर्णायक क्षणामुळे कसं बदललं ते इतरांनाही सांगितलं. १९५३ मध्ये ते जेव्हा कॅलिफोर्नियाला एक चर्च स्थापन करण्यासाठी गेले होते, तेव्हा त्यांना वापरता येईल अशी फक्त एकच जागा त्यांना शोधून काढता आली. जी होती एक ड्राइव्ह-इन थिएटर. प्रार्थनागृह मिळवण्याइतके पुरेसे पैसे जमेपर्यंत ते ठिकाण वापरायला आणि तसं नियोजन करून त्यांनी कामाला सुरुवात केली. त्यांनी चर्च सुरू केलं आणि त्यांच्या चर्चच्या एकमेवाद्वितीय स्वरूपामुळे त्यांना काही तसेच

एकमेवाद्वितीय सभासद मिळाले, मिस रोझीसारखे. ती नेहमीच्या चर्चला जाऊ शकत नव्हती. कारण त्या चर्चमध्ये अपंग लोकांसाठी सोयी नव्हत्या. मिस रोझी त्यांच्या चर्चला जायला लागली आणि त्याचा एक महत्त्वाचा भाग बनली.

शेवटी, रेव्हरंड शूलर त्यांच्या प्रार्थनागृहाकडे स्थलांतरित व्हायला तयार झाले, पण ते मिस रोझीचं काय करणार होते? त्यांना एक अवघड निर्णय घेणं भाग होतं. नवीन प्रार्थनागृहाकडे स्थलांतर करायचं की ड्राइव्ह-इनमध्येच राहून प्रगतीला खीळ घालायची? तो क्षण त्यांच्यासाठी एक निर्णायक क्षण होता. त्यांना जाणीव झाली की त्यांचं व्रत होतं ते सेवा करण्याचं आणि ते लोकांवर मर्यादा आणू शकत नव्हते किंवा त्यांना वगळू शकत नव्हते. त्यांनी नवीन प्रार्थनागृह विकसित करण्याची निवड तर केलीच, पण ड्राइव्ह-इन मधली सेवादेखील पुढे चालू ठेवण्याचं ठरवलं. तसंच ड्राइव्ह-इन प्रार्थना केंद्र आणि चर्च याची युती असलेलं नवीन चर्चही बांधायचं ठरवलं.

नवीन चर्चसाठी त्यांनी जमीन विकत घेतली आणि त्या मोहिमेत त्यांना त्यांच्या जीवनविम्याचे पैसे द्यावे लागले. घर गहाण टाकावं लागलं, गाडी विकावी लागली आणि शक्य होईल तेवढं कर्ज काढावं लागलं. त्याचाच परिपाक म्हणून क्रिस्टल कॅथेड्रल आणि डॉ. शूलर्स अवर ऑफ पॉवर उभं राहिलं. जे लाखो लोकांची आयुष्यं बदलणारं जागतिक पातळीवरचं सेवा केंद्र ठरलं. डॉ. शूलरनी त्यांचं आणि इतरांचं आयुष्य बदलवणारा निर्णायक क्षण अनुभवला – मिस रोझी नावाच्या एका सामान्य, अपंग स्त्रीमुळे निर्णायक क्षण ठरलेला.

नाथन हेललादेखील निर्णायक क्षण अनुभवाला आले. ज्यांनी बदल घडवले आणि एका चळवळीला गती दिली. रिव्होल्यूशनरी युद्धाच्या वेळेस हेल यांनी शत्रूच्या गोटातील एका अतिशय खतरनाक कारवाईत स्वयंस्फूर्तीने भाग घेतला. या कारवाईनंतर परतताना त्यांना पकडण्यात आलं आणि चोवीस तासांच्या आत देहदंडाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना कोणाशीही संपर्क साधणं नाकारण्यात आलं. त्यांनी त्यांच्या पालकांना लिहिलेली चिठ्ठी त्यांच्या समोरच फाडून टाकण्यात आली. तरीही जिना चढत असताना त्या क्षणी त्यांनी असं एक वाक्य उच्चारलं,

ज्यामुळे युद्धाच्या प्रयत्नाचा सगळा अभिनिवेशन बदलून गेला, ''माझ्या देशासाठी द्यायला माझ्याकडे एकच आयुष्य आहे याचा मला फार खेद होतो.'' ते फक्त एकवीस वर्षांचे होते, पण त्यांचं धैर्य आणि मनाचा समतोलपणा त्यांच्या वयाच्या पलीकडला होता.

त्या क्षणी त्यांच्यामुळे एका मोर्चाची ठिणगी पडली आणि संकटांना तोंड देऊन विजय मिळवण्यासाठी क्रांतिकारी शक्तींना प्रेरणा मिळाली आणि अजूनही अमेरिकन लोकांच्या असंख्य पिढ्यांना तेव्हापासून प्रेरणा मिळत आलेली आहे.

माझ्या निर्णायक क्षणांपैकी एक क्षण तो होता, जेव्हा मी एका चांगल्या, पण मर्यादित स्थानिक कलाकारापासून अशा एका कलाकाराचं बीज पेरलं, ज्याच्याकडे एक महान कलाकार होण्याची कुवत होती. नॅशव्हिल, टेनेसीमध्ये एका कार्यक्रमात माझी कला सादर करण्यासाठी मला आमंत्रित करण्यात आलं होतं. तिथे जाताना माझी मानसिकता अशी होती की मी जणू काही संगीत व्यवसायाला मिळालेली दैवी देणगीच आहे आणि त्यांना माझ्या कलाविष्काराने मी दिपवून टाकेन आणि खऱ्या गाण्याची एवढी फिकीर करणार नाही. सांगायचं म्हणजे, तो कार्यक्रम पूर्णपणे फसला! मी पण पूर्णपणे 'फ्लॉप' ठरलो. एक पूर्ण ठोकळा! माझ्या आयुष्यातलं ते व्यासपीठावरून त्या रात्री परत चालत जाणं हे सर्वांत एकाकी चालणं होतं. गर्दीच्या प्रोत्साहनाची मला सवय झालेली होती आणि आता मला काय मिळालं होतं तर दुसरं काही नाही, पण फक्त शांतता. त्या क्षणी मला कळून चुकलं की माझे गुण हा माझा प्रश्न नव्हता, तर ते कसे वापरायचे याची मी केलेली निवड हा प्रश्न होता. इतरांना मनोरंजनाने प्रभावित करून त्यांना चांगलं वाटावं हा प्रयत्न मी करायला पाहिजे होता, त्याऐवजी मी फक्त प्रभाव पाडण्याचा आणि माझ्याकडे होतं ते वाटून न घेण्याचा प्रयत्न केला होता. मी फक्त पाट्या टाकल्या होत्या. माझ्या सादरीकरणात जीव ओतलेला नव्हता किंवा काही उद्देशही नव्हता. त्याच क्षणी मी निश्चय केला की माझे कलागुण किंवा माझा श्रोतृवर्ग यांना यापुढे मी कधीही गृहीत धरणार नाही. माझ्या भविष्यात अधिक महान शक्यतांचं बीज निश्चित होण्याचा तो एक निर्णायक क्षण होता. नेपोलियन हिलने म्हटलंय की प्रत्येक

विपरित काळात एका किंवा अधिक महान संधींची बीजं असतात. हे ब्रीदवाक्य खरं आहे याची मला खात्री आहे!

१९७० च्या ऑक्टोबरमध्ये एका लख्ख दिवशी सगळ्या महत्त्वाच्या क्षणांपैकी, माझं आयुष्य घडवणारा एक अतिशय महत्त्वाचा क्षण आला. शाळा सुटल्यावर कपडे बदलून मला बेसबॉल खेळायला जायचं होतं. त्यासाठी मी घाईघाईत घरी आलो तेव्हा माझे वडील जमिनीवर बेशुद्धावस्थेत पडलेले मला आढळले. ते श्वासोच्छ्वास करत नव्हते आणि माझ्या हाकांना काही प्रतिसादही देत नव्हते. मी ९११ ला फोन केला आणि ऑपरेटरला शांतपणे सांगितलं की माझे वडील जमिनीवर बेशुद्धावस्थेत पडलेले आहेत. मग मी माझ्या आईला तिच्या नोकरीच्या ठिकाणी फोन केला आणि सांगितलं की तिने घरी निघून यावं, कारण बाबांना बरं नाही. मला परिस्थितीची जरी चांगली जाणीव होती तरी मला तिला घाबरवायचं नव्हतं. माझी आई जेव्हा घरी आली तेव्हा पॅरामेडिक्सनी (वैद्यकीय साहाय्यकांनी) वडिलांचं शरीर उचलून नेलं होतं आणि माझ्या आईचं सांत्वन करून मग माझ्या भावाला मला सांगावं लागलं की बाबा मरण पावले आहेत. त्या दिवशी एका मुलातून एका मोठ्या माणसामध्ये माझं परिवर्तन झालं.

निर्णायक क्षण! असे ते क्षण, जे आपल्याला निर्णायक बनवू शकतात किंवा आपला हक्क ताबा काढून घेऊ शकतात, घडवू शकतात किंवा चक्क मोडून टाकू शकतात, मदत करू शकतात किंवा दुखवू शकतात. निर्माण करू शकतात किंवा आपल्यावर विजय मिळवू शकतात. आपण त्या क्षणाला कसा प्रतिसाद देतो, त्याच्यावरच सगळं अवलंबून असतं. त्या क्षणामुळेच सगळा फरक पडतो आणि तो क्षणच आपलं भवितव्य घडवतो. तो क्षण जर आपण पकडला आणि त्याच्याबरोबर वाढलो, नुसतंच नव्हे तर खरोखरच, आपण आर्थिक शक्तिशाली बनतो. आपण जर दबावाखाली मान टाकली आणि त्या क्षणाला हार मानली, तर आपला दुबळं होण्याकडे कल वाढतो. एका जुन्या म्हणीप्रमाणे – जो हातोडा लोखंडाला घडवतो, तोच हातोडा काचेच्या ठिकऱ्या उडवतो. निर्णायक क्षणांचा कधीच अंदाज बांधता येत नाही, तरीही त्यांचा आपल्या भविष्यावर फार खोलवर प्रभाव असतो.

जर...

– रुडयार्ड किपलिंग

जेव्हा आजूबाजूच्या लोकांची डोकी फिरलेली असतात
आणि दोष ढकलत असतात तुमच्यावर
तेव्हा तुमचं डोकं जर तुम्ही शाबूत ठेवू शकलात
जेव्हा सगळे लोक तुमचा संशय घेत असतात
तेव्हा त्यांनाही संशयाचा फायदा देऊन
जर तुम्ही स्वत:वर भिस्त ठेवून प्रतीक्षा करू शकलात
आणि वाट बघण्याचा तुम्हाला कंटाळा आला नाही
किंवा मग तुमच्याबद्दल खोटं पसरवत असतील
तर त्या खोटं बोलण्यात भाग घेऊ नका
किंवा तुमचा तिरस्कार केला जात असेल
तर तुम्हीदेखील तिरस्काराला बळी पडू नका
आणि तरीही फार छान आहात
असं भासवू नका किंवा फार शहाणपणाचं बोलू नका

तुम्ही जर स्वप्न बघाल आणि स्वप्नं तुमचे स्वामी होत नसतील
तुम्ही जर विचार कराल आणि विचारांना तुमची उद्दिष्टं बनवत नसाल
जर तुम्ही विषय आणि संकट यांना सामोरं जाल
आणि त्या दोन्ही ठगांना सारखंच वागवाल
तुम्ही उच्चारलेलं सत्य ऐकण्याची जर असेल तुमच्यात हिंमत
गुलामांनी विपरित केलेलं मूर्खांना कोंडीत पकडण्यासाठी
किंवा तुम्ही आयुष्याला दिलेल्या गोष्टी दुभंगलेल्या (तुटून गेलेल्या)
आणि खाली वाका, जुन्याच हत्यारांनी त्यांना पुन्हा सांधा
जर तुम्ही तुमच्या सगळ्या यशाचा एक बनवू शकाल डोलारा
आणि धोका पत्कराल मैदानात उतरून एक खेळी खेळण्याचा
हराल आणि परत प्रारंभापासून सुरुवात कराल

आणि तुमच्या अपयशाबद्दल एकही शब्द उच्चारणार नसाल
तुम्ही जर तुमचं हृदय आणि नसा आणि यांना पुष्टी द्याल
जे गेल्यानंतरही खूप वेळाने तुमची पाळी येण्यासाठी
मग तुमच्यात काही नसेल तरी थांबा
फक्त त्या इच्छेशिवाय, जी त्यांना म्हणते 'थांबा!'
तुम्ही जर गर्दीशी बोलाल आणि तुमचं मोल टेवाल
किंवा राजांबरोबर चालाल आणि सामान्यांचाही संपर्क सोडणार नसाल
जर तुम्हाला शत्रू किंवा प्रेमळ मित्रदेखील हानी पोहोचवणार नसतील
जर सगळे लोक तुमच्यासाठी एकच असतील,
पण एकही फार फार नसेल
जर तुम्ही क्षमा करू न शकणारं मिनिट भरू शकलात – साठ सेकंदांच्या दूरवर पळण्याने
ही पृथ्वी आणि तिच्यावरचं जे काही आहे ते तुमचंच आहे
आणि ते अधिकच आहे तुम्ही एक माणूस व्हाल, माझ्या मुला!

ठाम उभे राहा

मी लहान असताना 'अंकल' नावाचा एक खेळ खेळायचो ते मला आठवतं. ज्या खेळात लपाछपी असायची आणि तुम्हाला शोधून काढलं की सगळे तुम्हाला पकडून तुम्ही 'अंकल' म्हणेपर्यंत गुदगुल्या करत राहायचे (अंकल म्हणून हार मानेपर्यंत). तुमचे काही सवंगडी सहजपणे हार मानायचे आणि 'अंकल' म्हणायचे. पण एक गट असाही होता जे 'अंकल' म्हणायला नकार द्यायचे. तुम्ही त्यांना अगदी काही जरी केलंत तरी ते 'अंकल' म्हणत नसत. काळानुसार मला उमगलं की तेच ते लोक ज्यांचा नेते होण्याकडे कल असायचा आणि इतर मुलं त्यांचा आदर करायची.

तुमचे पाय घट्ट जमिनीत रोवलेले ठेवून दबावाला बळी पडायला जेव्हा तुम्ही नकार देता तेव्हा ते अवघड आणि गैरसोयीचं असतं. तरीही जे आपला शांतपणा सोडत नाहीत आणि स्वत:च्या जागेवर भक्कमपणे उभे राहातात, ते सर्वांत उच्च आदर मिळवतात. तुरुंगवासाच्या विसाव्या

वर्षी, दक्षिण आफ्रिकेच्या सरकारने त्यांना मुक्त करण्याचा प्रस्ताव मांडला. समझोता करून एकांतवास पत्करायला मान्यता दिली तर सरकार त्यांना सोडायला तयार होतं. या निर्णयाचा त्यांच्या आयुष्यावर खूप मोठा प्रभाव पडणार होता. ते वृद्ध होत चालले होते आणि मुलांना भेटण्यासाठी किंवा कुटुंबाबरोबर व्यतीत करण्यासाठी वेळ फारसा शिल्लक नव्हता. तुरुंगातलं आयुष्य अतिशय खडतर आणि क्रूर होतं. पण त्यांनी तुरुंगातच राहणं आणि हार न मानणं निवडलं. ते त्यांच्या भूमिकेवर ठाम राहिले. त्यामुळे त्यांची प्रतिमा केवळ दक्षिण आफ्रिकेतच नव्हे तर इतर देशांतील लोकांतदेखील महान झाली.

तुमची दैनंदिन कामं करत असताना काही दिवस असे येतील, जेव्हा तुम्ही हार मानावी आणि 'अंकल' म्हणावं अशा परिस्थितीत तुम्ही सापडल्याचं तुम्हाला आढळून येईल. दबाव मजबूत असेल आणि रस्ता कठीण असेल, पण लक्षात ठेवा की तुम्ही नेतृत्व करावं म्हणून कोणीतरी नेहमीच तुमच्याकडे बघतंय. माघार घेऊ नका, तणावाखाली खचून जाऊ नका. तुमची भूमिका ठाम ठेवा. त्या अनुभवातून तुम्ही मोठे व्हाल. केवळ इतर लोक तुमच्याकडे कसं पाहतात यामुळेच नव्हे, तर अधिक महत्त्वाचं म्हणजे तुम्ही स्वतः तुमच्याकडे कसं बघता यामुळेही तुम्ही फक्त विश्वास ठेवा आणि सगळ्या गोष्टी शक्य आहेत याची आठवण ठेवा!

मला आठवतंय, तरुण असताना गोष्टी जेवढ्या अधिक बदलतील, तेवढ्याच त्या तशाच राहतील. मी जेव्हा चौदा वर्षांचा असताना ॲल्बरी युनायटेड मेथाडिस्टच्या वॉशिंग्टन डी. सी.च्या चर्चच्या तरुणांच्या कॉयरमध्ये होतो. आम्ही डेसिडेराता शीर्षकाच्या संगीताचा तुकडा सादर केला, ज्यामुळे मी पूर्णपणे चक्रावून गेलो. तो तुकडा लिहिणारा संगीतकार किती आधुनिक आणि छान होता. हल्लीच्या जगाची नाडी त्याने किती अचूक पकडली होती. नंतर मी शोधून काढलं की या किंवा आधीच्या, त्याच्याही आधीच्या शतकात तो संगीताचा तुकडा लिहिण्यात आला नव्हता; तर तो संगीताचा तुकडा पाचशे वर्षांपूर्वी लिहिण्यात आला होता. मग मला कळलं की गोष्टी जेवढ्या अधिक बदलतात, तेवढ्याच त्या तशाच राहतात.

डेसिडराता

गोंधळ आणि गडबडीच्या वातावरणातून शांततेत जा आणि गप्प राहण्यात किती शांती मिळू शकते हे लक्षात ठेवा आणि जेवढं शक्य असेल तेवढं हार न मानता सगळ्या लोकांशी चांगले संबंध ठेवा. तुमचं सत्य सांगताना शांतपणे आणि स्पष्टपणे बोला. अगदी मंद, अज्ञानी लोकांचं म्हणणंदेखील ऐकून घ्या. त्यांच्याकडे पण त्यांच्या कथा आहेत. भडभड्या आणि आक्रमक लोकांना टाळा, ते लोक आत्म्याला क्लेशकारक असतात. तुम्ही जर तुमची इतरांशी तुलना केलीत, तर तुम्ही निकामी आणि कडवट व्हाल. कारण तुमच्यापेक्षा कमीअधिक तोलामोलाचे लोक नेहमी असतीलच. तुमचं यश तसंच तुमच्या योजनांचा आनंद लुटा. कितीही सर्वसाधारण असलं तरीदेखील तुमच्या स्वत:च्या करिअरमध्ये तुमचा रस असू द्या. वेळेबरोबर बदलणाऱ्या नशिबात तीच एक खरीखुरी मिळकत आहे. म्हणून तुमच्या व्यवसायात सावधगिरी बाळगा. त्यामुळे जे काही चांगले गुण असतील त्याकडेही डोळेझाक करू नका. बरेच लोक उच्च ध्येयपूर्तीसाठी प्रयत्न करतात आणि सगळीकडे जग साहसीपणाने भरलेलं आहे. तुम्ही जसे आहात तसेच राहा. विशेषत: प्रेमळपणाचा खोटा आव आणू नका. तसंच प्रेमाबद्दल कडवट दृष्टिकोनदेखील ठेवू नका. सगळ्या रखरखीतपणात आणि कठोरपणात तेच एक गवतासारखं चिरकाल टिकणारं आहे. तारुण्याच्या गोष्टींचा आब राखून त्याग करा आणि गेलेल्या वर्षांची समज चांगल्या प्रकारे घ्या. अचानक येणाऱ्या दुर्दैवी संकटांपासून स्वत:ला सावरण्यासाठी आत्मशक्तीची जोपासना करा. पण त्या संकटांच्या कल्पनेने दु:खातदेखील पडू नका. स्वत:बद्दल मृदू राहा, कारण बऱ्याच भयांचा उगम थकवा आणि एकटेपणा यांच्यात असतो, आणि ते एका निरोगी, शिस्त अंगी बाणवण्याच्या पलीकडचं असतं. झाडं आणि तारे यांच्यासारखेच तुम्हीदेखील या विश्वाचं एक बालक आहात आणि इथे असण्याचा तुम्हाला हक्क आहे. तुम्हाला ते स्पष्ट झालेलं असो वा नसो, हे विश्व तुमच्यापुढे जसं उलगडायला पाहिजे तसं उलगडतंय, म्हणून देवाबरोबर भांडू नका? तुमचे कष्ट, आकांक्षा आणि आयुष्याच्या संभ्रमावस्थेतदेखील तुमच्या आत्म्याची शांतता ठेवा. भंगलेली स्वप्नं, कंटाळवाणा तोच-तोचपणा आणि ढोंगी जगात आनंदी राहण्याचा प्रयत्न करा.

लखलखीत क्षण

काही वर्षांपूर्वी भेटण्याचा योग आलेल्या एका फिरस्त्या संगीतकाराला भेटण्याच्या जरी फक्त थोड्याच संधी मला मिळाल्या, तरी त्याचा माझ्यावर प्रभाव पडला होता. त्याला जास्त जाणून घेण्याइतका वेळ मला मिळाला नाही. वस्तुत: मला त्याचं खरं नावदेखील माहीत नाही. फक्त एवढंच माहीत आहे की प्रत्येक जण त्याला 'लखलखीत क्षण' म्हणत होता. तसं म्हणण्याचं कारण म्हणजे तो नेहमीच तुमचं स्वागत 'हॅलो' म्हणून करण्याऐवजी 'लखलखीत क्षण' असं म्हणून करायचा आणि निरोप घेतानादेखील तो 'गुडबाय' म्हणायच्याऐवजी तोच शब्द उच्चारायचा. त्याचं अस्तित्व जेवढं शांत तेवढंच प्रभावी होतं. तो तुमच्या डोळ्यात बघायचा आणि अस्सल आणि प्रामाणिक रुची घेऊन तुमच्याशी हस्तांदोलन करायचा. प्रत्येक व्यक्ती देवाच्या दृष्टीने विशेष असते, म्हणून आपल्याला भेटायची संधी मिळालेल्या प्रत्येक व्यक्तीचं स्वागत आणि गुणग्रहण कसं करावं, हे मी तरुण असल्याने आणि प्रभावित झाल्याने त्याच्याकडून शिकलो. त्याच्याबरोबरच्या काही क्षणांमुळे मी, आपल्याला इतरांनी खरंच कसं वागवायला पाहिजे, तसं त्यांना वागवायला व्यावहारिक अनुभवातून शिकू शकलो. तो जसा पटकन आला तसाच गेला आणि मी त्याला पुन्हा कधीही बघितलं नाही. पण मी त्याच्याबद्दल आत्मसात केलेले पाठ मात्र माझ्या नेहमीच लक्षात राहातील. आयुष्यावर प्रेम करा, तुम्हाला कसं वागवलं जाणं आवडेल, तसं जगा. आयुष्याबद्दल नेहमीच कृतज्ञ, उत्साही आणि उत्तेजित राहा नेहमी सकारात्मक स्वागताच्या शब्दांची आणि नमस्कारांची देवाण-घेवाण करा कारण जेव्हा तुम्ही इतरांच्या झाडांना पाणी घालता तेव्हा त्यातलं थोडं पाणी तुमच्या अंगावरदेखील उडल्याशिवाय राहत नाही.

तुमच्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्यासाठी मी तुम्हाला प्रवृत्त करतो आणि नंतर त्या स्वप्नामागे शेवटपर्यंत जाण्याची तुमच्या आंतरिक शक्तीची मदत घ्यायला सांगतो. आणि मी पैज लावतो की तुम्हाला आशीर्वाद लाभतील आणि तुम्ही खास मर्जीतले ठराल आणि तुमच्या आयुष्याच्या प्रत्येक दिवशी तुम्हाला 'लखलखीत क्षण' मिळतील.

सज्जन स्त्री-पुरुषहो, हे पुस्तक संपवत असताना मला तुम्हाला आठवण करून द्यायचीय की, तुमच्यामध्ये महानता आणि अमर्याद शक्ती आहे. नेहमीच सर्वांत मोठं स्वप्न बघा, मोठा विचार करा आणि तुम्हाला जसं वागवलं जावं असं वाटतं, तसंच इतरांनाही वागवा. कारण आपण सगळे स्वतंत्र असूनदेखील एकमेकांवर अवलंबून आणि परस्परसंबंधित आहोत. आपण बदल घडवू शकतो! आपण जग बदलू शकतो. पण आपण आधी स्वत:लाच बदलायला हवं!

'तुमचं आयुष्य बदलायला फक्त एक मिनिट पुरे!' ज्या मिनिटाला तुम्ही बदलण्याचा निश्चय करता आणि त्याप्रमाणे कृती करता, त्या मिनिटालाच तुम्ही तुमच्या आयुष्यात बदल घडवता! खटके उडतील, पण लढाई जिंकली जाईल!

प्रेरित राहा! खूप प्रेरित राहा!
आणि तुमची स्वप्नं खरोखरच जगा!

उच्च प्रेरित (विली जोली)

एक नोकरी होती मला, नोकरी, जिचा मला तिरस्कार होता
त्या नोकरीमुळे मी त्रासलो, पण तिच्यामुळे मी प्रेरित झालो
मला माहीत होतं की हे ते ठिकाण नव्हतं
जिथे मी असायला हवं होतं
मला नव्हतं राहायचं तिथे
पण मी फारच घाबरत होतो सोडून जायला

पण मग एक दिवस मला मिळाला माझा चेक
आणि त्यात जवळजवळ काही नव्हतंच

मी गेलो माझ्या बॉसकडे
तो हसला आणि म्हणाला 'मला नाही पर्वा'
माझी मुलं होती घरी उपाशी

मी घरही घालवण्याच्या बेतात होतो
त्याच वेळेला मी निश्चय केला, मला आता स्वतःच कृती केली पाहिजे

मी प्रेरित आहे, खूप प्रेरित आहे, मी प्रेरित आहे
मी पोहोचणार आहे उच्च स्थानावर
मी प्रेरित आहे, खूप प्रेरित आहे, मी प्रेरित आहे
मी नाही थांबणार कधीच

जेव्हा मी घेतला त्यांचा निरोप
माझे मित्र म्हणाले तू आहेस वेडा
पण फक्त तोच एकटा वेडा असतो
जो भीत असतो प्रयत्न करायला
ते म्हणाले तू होणार नाहीस कधीच यशस्वी
म्हणाले मी टिकणार नाही
पण माहीत होतं मला, मी ते केलंच पाहिजे
ते होतं – करा नाहीतर मरा

म्हणून मग मी घट्ट धरलं माझं स्वप्न
आणि ठेवलं ते माझ्या हृदयात
माझ्या विश्वासावर मी टाकलं बाहेर पाऊल
आणि शिकलो देवावर विश्वास ठेवायला
माहीत होतं मला द्यायचा आहे लढा
सर्व शक्तिनिशी लढा
मग गोष्टी लागल्या घडायला
तासा-तासांनी आले आशीर्वाद

म्हणून मी आहे प्रेरित, खूपच प्रेरित, मी आहे प्रेरित
जाणार आहे सर्वोच्च स्थानावर
मी आहे प्रेरित, खूपच प्रेरित, मी आहे प्रेरित
मी थांबणार नाही कधीच
हनिबाल म्हणाला होता, 'जर सापडत नसेल मार्ग, तर बनवा एक मार्ग.'

तुमच्या भोवती काय घडतंय किंवा तुमच्याबाबतीत काय घडतंय
त्याने होत नाही काही फरक
तुमच्या आत असेल तर काय घडतंय हे आहे महत्त्वाचं

लोक जेव्हा तुडवतात तुमची स्वप्नं पायाखाली
डोकं फिरवून घेऊ नका, बदलादेखील नको... पुढे जा!
कारण प्रचंड विजय आहे सर्वांत उत्तम सूड!

म्हणून मग जेव्हा लोक हसतात तुम्हाला
आणि प्रयत्न करतात तुम्हाला खाली खेचण्याचा
ती नकारात्मकता घ्या
आणि टाका तिला घुसळून
तुमच्या स्वप्नांना धरा घट्ट
तुमचा आत्मा उदू दे पेटून
तुमचा विश्वास जागवा
आणि घेऊन जा उंच, अधिक उंच

जर असेल तुमच्याकडे विश्वास, तर देवाकडे आहे शक्ती
द्यायला तुमच्या आयुष्याला आशीर्वाद प्रत्येक तासा-तासाला
विश्वास ठेवा
इच्छा ठेवा, वर पोहोचत राहा
आकाशात पोहोचेपर्यंत!

लक्षात ठेवा.. सगळ्या गोष्टी आहेत शक्य, जर तुम्ही
फक्त ठेवाल विश्वास
मी आहे विली जोली, हॅव ए फॅन्टॅस्टिक डे! (तुमचा दिवस छान जावो!)
नेहमी अशक्य स्वप्न बघा!

‘विली जोली साऱ्या श्रोत्यांमध्ये एक शक्ती आणि उत्साह संचारतात आणि त्यांनी अधिक काही बनावं, अधिक काही करावं, जेणेकरून त्यांना अधिक काही मिळेल, यासाठी त्यांचं मन वळवतात.’ – झिग झिगलर

एक मिनिट घ्या आणि जीवन बदलून टाका

तुमचं जीवन बदलण्यासाठी आणि तुमची स्वप्नं प्रत्यक्षात आणण्यासाठी सज्ज व्हा. तुमच्या स्वप्नातलं भविष्य घडवण्याची साधनं आणि यशाची किल्ली तुम्हाला देत आहेत मोटिव्हेशनल ट्रेनर विली जोली.

एकच मिनिट का?

का? कारण जीवन बदलण्यासाठी एकच मिनिट पुरेसं असतं. तुमच्या स्वप्नांच्या मागे जायचं तुम्ही ज्या क्षणी ठरवता, त्याच क्षणी तुमचं जीवन बदलतं. आपल्या मौल्यवान मिनिटांचा फायदा घेण्याची क्षमता प्रत्येकाकडे असते. प्रत्येकाला दिवसात तेवढीच मिनिटं मिळतात : 1440. तुम्ही त्याचं काय करता तो कळीचा मुद्दा आहे. विली जोली तुम्हाला ऊर्जा आणि कल्पनांनी भरून टाकोत!

यश

‘तुम्हाला जर काही लोकविलक्षण करायचं असेल, तर अशक्य ते स्वप्न पाहिलंच पाहिजे. भव्य स्वप्न पाहणं आणि तुमच्याकडे जे आहे त्या सर्वस्वानिशी त्याच्या मागे जाणं हीच यशाची किल्ली आहे. स्वप्न एवढं मोठं आहे की प्रश्नांचा त्याच्यापुढे काय पाड!’

निवडी

‘तुम्हाला काय होतं हे तितकंसं महत्त्वाचं नाही. तुमच्या आत काय होतं हे जास्त महत्त्वाचं आहे. तुम्हाला जीवनात निवडी करायच्या असतात. तुम्ही आनंदी असण्याची निवड करू शकता. निरोगी असण्याची, संपन्न असण्याची निवड करू शकता. यश ही निवड असते, अपघात नव्हे.’

सातत्य

‘जीवन नकार देणारच आहे. लोक नकार देणारच आहेत. पण तुम्ही जर सातत्य ठेवलं, तर कधीतरी जीवनाला ‘होय’ म्हणावंच लागेल. सातत्य विरोध मोडून काढतं. पराभूत होतात तेव्हा माणसं संपत नाहीत, प्रयत्न सोडून देतात तेव्हा संपतात. म्हणून काहीही सोडून देऊ नका. सातत्याने करत राहा आणि तुमची स्वप्नं प्रत्यक्षात येताना बघा.’

‘हे पुस्तक वाचून तुम्ही तुमचं जीवन आत्ता, एक एक मिनिटानं बदलू शकता. तुम्ही जास्त घडू शकता, जास्त करू शकता, जास्त मिळवू शकता, जास्त प्रेम करू शकता, जास्त हसू शकता.’
– मार्क व्हिक्टर हनसन, *चिकन सूप फॉर द सोल* या पुस्तकाचे सहलेखक

Marathi translation of *It Only Takes A Minute To Change Your Life!*

अनुवाद : शोभना शिकनीस

MANJUL
www.manjulindia.com

eBook available